UNIVERSAL
LIBRARY
OU_196038
UNIVERSAL
LIBRARY

# लोकसत्ता

लेखक—

**बा. रा. मोडक,** एम्. ए. एल्. टी.

संपादक—मुलांचें मासिक, नागपूर.

प्रथम आवृत्ति.

किंमत—

कापडी बाईंडिंग २ रु.

साधें बाईंडिंग १॥ रु.

मुद्रक व प्रकाशक—
दि. श्री. गोडबोले,
माधव प्रिंटिंग प्रेस, नागपूर.

# लेखकाचे दोन शद्ब.

लोकसत्तेवरील हा प्रबंध वास्तविक पांच वर्षांपूर्वीच प्रसिद्ध व्हावयाचा. तत्पूर्वीच तो लिहून ठेवलेला होता. पण एवढा खर्च करण्यासारखी तेव्हां परिस्थिति नसल्यानें इच्छा असूनहि तें काम मागें पडलें. १९३४ मध्यें मी विश्ववाणी मासिक हातीं घेतलें. त्यामुळें मला त्यांत एक एक प्रकरण छापतां आलें, व त्यामुळेंच आज हें पुस्तक अशा स्वरूपांत प्रसिद्ध करीत आहें.

एकदोन गोष्टींचा खुलासा येथें करावासा वाटतो. आजकाल एखादा महत्वाचा ग्रंथ प्रसिद्ध झाला म्हणजे लेखकानें वाङमयचौर्य कुठें कुठें केलें आहे हें पाहण्याची टीकाकारांची प्रवृत्ति असते. हा ग्रंथ म्हणजे माझ्या सतत १०–१२ वर्षांच्या राजनीतिशास्त्राच्या अभ्यासाचें दृश्य स्वरूप आहे. मासिकांचीं कामें असल्यानें गेल्या चारदोन वर्षांपासून या विषयाचा अभ्यास करण्याची मला फारशी सवडहि मिळत नाहीं. पूर्वीच लिहून ठेवलेला हा ग्रंथ आहे, व तो संपूर्ण स्वतंत्र आहे. पहिला भाग लिहितांना एका मुद्याखेरीज कोणत्याहि पुस्तकाचा मी आधार घेतलेला नाहीं. मांडणी व मतप्रतिपादन हीं सर्व स्वतंत्र आहेत. अर्थात एवढें खरें कीं अनेक ग्रंथांच्या वाचनानें मनावर झालेल्या परिणामापासून मी कांहीं अलिप्त नव्हतों. याला कोणी वाङमयचौर्य म्हणेल तर माझा त्याला इलाज नाहीं. पहिल्या भागांत 'निवडणुकीचे प्रकार' या संबंधानें इतर ग्रंथाचा आधार घ्यावा लागला. तसेंच "लोकसत्ता व लोकमत" या प्रकरणांत वृत्तपत्रांचे उपसंपादक केव्हां केव्हां कसें वागतात या संबंधाचें एक वाक्य आहे, तें लॉर्ड ब्राईसच्या 'मॉडर्न डेमोक्रॅसीज'मधल्या एका वाक्यावरून मला सुचलें आहे. तें उद्धृत करण्याची माझी इच्छाहि होती; पण पुस्तक न मिळाल्यानें तसें करण्याचें राहिलें.

पहिल्या भागाप्रमाणेंच दुसराहि भाग स्वतंत्र आहे. मात्र हा लिहितांना मधून मधून जीं कांहीं इंग्रजी अवतरणें दिलीं आहेत त्यासाठीं मला माझ्या खाजगी टांचण-बुकाचा उपयोग करावा लागला. विचार सर्व स्वतंत्र आहेत. मात्र 'सांघिक लोकसत्ता' ह्या प्रकरणाचा कांहीं भाग लिहितांना संघतत्वाच्या स्पष्टीकरणार्थ 'दि न्यू स्टेट' या पुस्तकाचा उपयोग केला आहे.

ग्रंथ लिहितांना किंवा छापतांना मला कोणाचीहि मदत झाली नाहीं, तेव्हां आभार कोणाचे मानूं! महाराष्ट्रांतील अभ्यासू वाचकांना हा ग्रंथ मी अर्पण करीत आहें. त्यांना आवडण्याजोगें या पुस्तकांत कांहीं सांपडलें तर मला परम संतोष होईल एवढेंच सांगून हे दोन शब्द पुरे करतों.

—बा. रा. मोडक

# प्रस्तावना

फॅसिझम, सोशिआलिझम, कम्यूनिझम किंवा तत्सम वादांचे पडसाद नित्यश: कानावर आदळत असतां सामान्य लोक अंमळ तिरस्कारानेंच विचारतील, 'ही लोकसत्तेची जीर्ण व टाकाऊ कल्पना आतां उराशीं बाळगण्यांत कितपत शहाणपण आहे ?'

या आक्षेपाला साधार, सोपपत्तिक व शास्त्रीय उत्तर देण्याचा मी माझ्या अल्पमतीनें यथाशक्ति प्रयत्न केला आहे. एका सुप्रसिद्ध ग्रंथकारानें म्हटल्याप्रमाणें माझा असा उलट प्रश्न आहे—'ठीक, लोकसत्ता टाकाऊ आहे तर तिच्या ऐवजी चिरंतन टिकून राहणारी, निदान बीजरूपानें स्थिरत्व असलेली, तसेंच मानवी स्वभावाच्या गुणदोषांच्या अस्तित्वावर अधिष्ठित असलेली दुसरी एखादी राज्यघटना दाखवा.' केवळ ध्येयवादाच्या प्रवाहांत वाहून जाण्यास माझी तयारी नाहीं. केवळ निर्हेतुक स्थितिप्रियतेच्या तमांत गुरफटून घेण्याचीहि माझी तयारी नाहीं. समतेसाठीं मला जेवढा स्वार्थत्याग करावासा वाटतो तेवढा स्वातंत्र्यासाठींही करावासा वाटतो. सर्वसंग्राहक, सर्वशक्तिमान् व सर्वव्यापी शासनसंस्था समता, न्याय व स्वातंत्र्य यांना विघातक ठरली व केवळ राष्ट्रीयत्वाच्या मदामुळें आंतरराष्ट्रीयतेला व विश्वबंधुत्वाला विरोधक असली तर तिच्याकडे मी सहानुभूतीनें पाहणार नाहीं. मानवी स्वभावांतील गुणदोष विचारांत न घेणारी कोणतीहि शासनपद्धति यशस्वी होऊं शकणार नाही व चिरकाल टिकूं शकणार नाहीं असा माझा विश्वास आहे.

माझ्या दृष्टीनें शासनपद्धतीचीं दोनच मुख्य स्वरूपें आहेत. पहिलें एकसत्ता व दुसरें लोकसत्ता. एकसत्ता (Dictatorship), अनियंत्रित राजसत्ता (Unlimited monarchy) धर्मगुरुसत्ता (Theocracy), फॅसिझम, नाझीजम, दक्षिण अमेरिकेंतील कित्येक राष्ट्रांत चालू असलेली एवमुक्त लष्करी अराजक लोकसत्ता (Military Republics), रशियांत हल्ली असलेली साम्यवादी सत्ता हीं सर्व एकसत्तेचींच निरनिराळी रूपें आहेत. उलट नियंत्रित राजसत्ता, प्रातिनिधिक राज्यसंस्था, लोकसत्ता व अराजक लोकसत्ता (Republic) प्रातिनिधीक समाजसत्तावाद (Parliamentary Socialism) ही सर्व लोकसत्तेचीं निरनिराळीं रूपें होत. या दोन परस्परविरोधी राज्यपद्धतीखेरीज तिसरी राज्यपद्धति असूंच शकत नाहीं. पैकीं एकसत्तेची कांहीं कांहीं रूपें आतां नामशेष झालीं आहेत. कांहीं अजून अवशिष्ट आहेत. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय परिस्थितीचा फायदा घेतल्यानें त्यांच्या ठिकाणी तूर्त जोमदारपणा व जिवंतपणा दिसत आहे. 'एकसत्ता' या प्रकरणांत त्यांचे समग्र दोष दाखविण्याचा प्रयत्न केला आहे त्यांच्या क्षणिक यशस्वितेनें भुरळून जाण्याचें कारण नाहीं. महायुद्धें होणें ही आतां ऐतिहासिक अपरिहार्यतेची बाब होऊन बसली आहे. प्रत्येक प्रयोगाच्या यशसिद्धीला कसोटी लागते. एकदोन महायुद्धाच्या दिव्यांतून हे प्रयोग यशःपूर्वक बाहेर पडले तरच त्यांच्या स्थिरतेबद्दल शाश्वती बाळगण्याचें कारण.

आणि एकसत्तेचीं कांहीं कांहीं रूपें अनेक वर्षांच्या प्रयोगानंतर आतां लोकसत्तेच्या स्वरूपांत विलीन होत आहेत. रशियांतील साम्यवादी प्रयोगानें जगाच्या मजूर वर्गांत केवढी

आशा उत्पन्न केली होती ! पण तेथील साम्यवादी एकसत्ताही आतां अधिकाधिक लोकसत्तात्मक होण्याच्या मार्गाला लागली आहे. हा मी लोकसत्तेचाच विजय समजतों. कांसवाची दौड कोणीहि कौतुकानें पहात नाहीं. त्याची मंदगति उपेक्षणीय असली तरी त्याचा धिम्मेपणा--निश्चय प्रशंसनीय ठरावा. त्यांतच चिरंतन यशाचीं बीजें सांठलेलीं असतात. उत्क्रांति हा लोकसत्तेचा पाया; क्रांती हा एकसत्तेचा आधार. क्रांतीमुळें मनुष्याची, तशीच राष्ट्रांची प्रगति कदाचित् सुलभतेनें व अल्पकालांत होईल. पण तिच्या स्थिरतेबद्दल खात्री देतां येत नाहीं. उत्क्रांतीनें होणारी प्रगति चिरकालीन ठरत असते. मानवीगुणदोषांचा व तिच्या लवचीकपणाचा लोकसत्तेंत उत्कृष्ट समन्वय झाला असल्यानें लोकसत्ताक राज्यकारभार, कोणत्या ना कोणत्या तरी स्वरूपांत शाश्वत चालूं राहील असें माझें प्रामाणिक मत आहे. आणि म्हणूनच एकसत्ता व साम्यवाद यांच्या आन्दोलनांवर सुशिक्षित समाजाचें मन हेलकावे घेत असतां लोकसत्तेच्या आधारावर त्याला स्थिर करण्याच्या उद्देशानें मी हा प्रबंध लिहिला आहे. लोकसत्तेच्या अंतरंगाची व बहिरंगाची यांत विचिकित्सा केली असून या विषयावर हा संपूर्ण ग्रंथ आहे असें मला वाटतें.

ग्रंथाचे दोन विभाग केले आहेत. पहिल्या विभागांत लोकसत्तेच्या अंतर्व्यवस्थेचें विवरण असून दुसऱ्या विभागांत त्याचें विवेचक परिक्षण केलें आहे. या राज्यपद्धतीचा पक्षपाती म्हणून केवळ मतप्रसाराच्या बुद्धीनें, व ललितवाङ्मयाच्या कुंचलीनें भडक रंगवून वर्णन करण्याच्या मोहांत मी पडलों नाही. शक्यतोंपर्यन्त ऐतिहासिक दृष्टि ठेवून व संशयग्रस्त मनाला हळूहळ संशयमुक्त करण्याचा हेतु ठेवून मी विवेचन करण्याचा प्रयत्न केला आहे. हा प्रयत्न कितपत साधला आहे हें ठरविणें अभ्यासू वाचकांकडेच सोंपवितों.

**—बा. रा. मोडक**

# अनुक्रमणिका


| प्रकरण | | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ | लोकसत्तेचा उदय | .... | १ |
| | **भाग पहिला** (लोकसत्तेची अंतर्व्यवस्था) | | |
| २ | राज्यघटनेचें स्वरूप | .... | १२ |
| ३ | लोकसत्ताक कायदेमंडळें | .... | १८ |
| ४ | लोकसत्ताक प्रधानमंडळ | .... | २६ |
| ५ | लोकसत्ता व पक्षसंस्था | .... | ३० |
| ६ | लोकसत्ता व पुढारी | .... | ३५ |
| ७ | लोकसत्ता व लोकमत | .... | ३९ |
| ८ | लोकसत्ता व स्थानिक स्वराज्यसंस्था | .... | ४६ |
| | **भाग दुसरा** (लोकसत्तेचें समालोचन) | | |
| ९ | गुणाविष्करण | .... | ५१ |
| ,, | दोषाविष्करण | .... | ६१ |
| १० | शुद्ध लोकसत्तेच्या मर्यादा | .... | ७० |
| ११ | लोकसत्ता व प्रत्यक्ष प्रतिकार | .... | ८० |
| १२ | लोकसत्ता व व्यक्तित्ववाद | .... | ८९ |
| १३ | लोकसत्ता व समाजसत्तावाद | .... | ९९ |
| १४ | लोकसत्ता व एकसत्ता | .... | ११२ |
| १५ | संघसत्ताक लोकशाही | .... | १२२ |
| १६ | समारोप | .... | १३१ |

# भाग पहिला

( लोकसत्तेची अंतर्व्यवस्था )

# लोकसत्ता

## प्रकरण १ लें.

# लोकसत्तेचा उदय

राज्यपद्धतीच्या इतिहासांत अत्यंत क्रांतिकारक, उत्तेजनात्मक व अद्‌भुतरम्य असें जर एखादें तत्व असेल तर तें लोकसत्तेचेंच होय. लोकसत्तेच्या कल्पनेचा प्रादुर्भाव होण्यापूर्वीं राज्यपद्धतींत एकजिनसीपणा उत्पन्न झाला होता व वाळवंटांतून प्रवास करीत असतां एकच दृश्य पाहून जसा मनाला आल्हाद वाटत नाहीं किंबहुना एकसारखेपणाचा कंटाळा येतो तद्वतच राज्यपद्धतीचें केवळ एकच एक दृश्यस्वरूप लोकांना त्रासदायक झालें असल्यास नवल नाहीं. म्हणून लोकसत्तेचें तत्व राज्यकारभाराच्या इतिहासांत क्रांती घडवून आणणारें होतें. तसेंच या तत्वामुळें राष्ट्राचे आपणही घटक आहों, आणि म्हणून राज्यकारभाराची जबाबदारी अंशत: आपणावर सुद्धां येते ही जाणीव प्रत्येक व्यक्तीमध्यें उत्पन्न करून देण्याचें सामर्थ्य याच तत्वांत आहे. यास्तव तें उत्तेजक व राष्ट्रांमध्यें नवीन चैतन्य उत्पन्न करणारें आहे. अशा या लोकसत्तेची हळूहळू उत्क्रांति कशी होत गेली त्याचें आपण संक्षिप्त ऐतिहासिक विवेचन करूं.

अगदीं प्रथमत: म्हणजे समाजाची घडी व्यवस्थितपणें बसण्यापूर्वीं लोक आपापल्या लहान लहान टोळ्या करून रहात असत. सुप्रसिद्ध फ्रेंच राजनीतिवेत्ता रूसो याचें असें म्हणणें आहे कीं हे लोक रानटी स्थितींत नव्हतेच. हल्लीच्याप्रमाणें त्यांच्यामध्यें आधिभौतिक सुधारणा झाली नव्हती हें खरें; पण एकमेकांशीं मिळूनमिसळून प्रेमभावानें व गोडीगुलाबीनें कसें रहावें हें समजण्याइतके ते बुद्धिमान होते. शेजाऱ्यापाजाऱ्याशीं शेजारधर्मानें राहून सर्वांची सामुदायिक उन्नति व्हावी असें त्यांना वाटत होतें. तसेंच स्वतंत्रतेनें रहाण्याचा आपणास निसर्गसिद्ध हक्क असून तो हिरावून घेण्याचा कोणालाही अधिकार नाहीं ही जाणीव त्यांच्या अंत:करणांत नेहमीं प्रामुख्यानें वास करीत असे. अर्थात आपल्यापैकींच एकाद्यास तात्पुरता राजा करून आपल्या अल्पसमाजाचा सामुदायिक संसार पाहूं देण्याचा ते त्याला अधिकार देत. पण तो राजा 'सार्वत्रिक मताच्या' (General will) बाहेर जातांच त्याला पदच्युत करण्याचा आपणास हक्क पोंचतो असेंही त्यांना वाटे. याप्रमाणें रूसोची विचारसरणी आहे.

पण याच्या अगदीं उलट मत हॉब्स या इंग्रज ग्रंथकाराचें आहे. रूसोप्रमाणें प्राचीनकालीन मनुष्यांमध्यें एवढा समंजसपणा होता असें त्याला वाटत नाहीं. किंबहुना ते स्वभावानें क्रूर व शीलानें पतित असे असून क्षुल्लक कारणांस्तव एकामेकांमध्यें भांडण करणें, चोरीचहाडी करणें, दरवडे घालणें, मनुष्याला तृणवत् समजून प्राणहानी करणें या गोष्टी यांच्या हाडीमासीं पूर्णतेनें खिळल्या होत्या. साहजीकच आपापसांत नेहमीं भांडणें होत. म्हणून त्यांच्यामध्यें जो सर्वांत बलिष्ठ असे तो सर्वांचा पराभव करून आपली सत्ता व प्रभुत्व स्थापन करी. तोच या लोकांचा राजा. राजा जो पावेतों सामर्थ्यवान होता तोपर्यंत कोणालाही आपलें डोकें वर करतां येईना. सर्वांना त्याची भिती वाटावी व त्या भितीमुळेंच ते आपापसांतील कलह थांबून एका ठिकाणींच गुण्यागोविंदानें राहण्याचा प्रयत्न करीत. राजाही त्यांना आपल्याकडून शक्य ती मदत करीत असे. म्हणून राजा हा समाजांतील सर्वांत मोठा मनुष्य समजला पाहिजे. सर्व लोकांनीं त्याला आपापले अधिकार व स्वातंत्र्य बहाल केलें ते त्यांना परत कधींही घेतां येत नाहीं. त्याच्या गुणावगुणाकडे त्यांनीं दुर्लक्ष केलें पाहिजे. त्याची सत्ता अखंड व चिरंतन आहे. व त्याच्या विरुद्ध कोणी उठलें तर सर्व आवश्यक उपाय योजून त्यांना चिरडून टाकण्याचा त्याला अधिकार पोंचतो. अशा प्रकारची हॉब्सची विचारपरंपरा आहे. एकंदर रूसो हा लोकसत्तेचा भोक्ता होता तर हॉब्स अनियंत्रित राजसत्तेचा कट्टा पुरस्कर्ता होता. एकाचा मानवी गुणांवर परम विश्वास तर दुसऱ्याचा पूर्ण अविश्वास. रूसोला फ्रान्सच्या जुलमी राजांच्या विरुद्ध चळवळ करावयाची होती, तर हॉब्सला इंग्लंडच्या जुलमी राजांचें समर्थन करावयाचें होतें आणि म्हणूनच प्रत्येकानें एकाच परिस्थितीवरून निरनिराळे सिद्धान्त बसविले. प्रत्येकाची वेगवेगळी मनोरचना असल्यानें वेगवेगळ्या तत्वांचा त्यांनी पुरस्कार केला.

पण या दोघांनीं कल्पिलेली मूळची परिस्थिती सत्यसृष्टींतली होती का नाहीं हें सांगतां येत नाहीं. दोघांनींही कल्पनेचे मनोरे रचले. कदाचित् दोघांचेंही म्हणणें अंशत: खरें असावें. रूसो म्हणतो त्याप्रमाणें मनुष्य त्यावेळीं इतका समंजस नव्हता; व हॉब्स म्हणतो त्याप्रमाणें तो इतका दुष्ट व हलकटही नव्हता. मनुष्यस्वभावांत गुणदोष असावयाचेच. पाशवीवृत्ती त्याच्यामध्यें केव्हां केव्हां प्रगट होतें तर केव्हां केव्हां उच्च मनोवृत्तीही त्याच्या कर्माच्या बुडाशीं असते हें आपण व्यवहारांत नित्य पाहतोंच. असो. या दोघांच्या मूळ सिद्धान्तावर त्यांच्या पश्चात् अनेक ग्रंथकारांनीं राज्यव्यवस्थेची इमारत बांधली. पण हा सर्व वाद केवळ तात्विक स्वरूपाचा असून तो प्रत्यक्ष राज्यकारभाला मदत करतो एवढेंच. आतां आपण लोकसत्तेच्या कल्पनेला व्यावहारिक स्वरूप कसकसें प्राप्त होत गेलें याचें ऐतिहासिक विवेचन करूं.

ख्रिस्तपूर्व कालांत ग्रीस व रोममध्यें लोकसत्तेचे अनेक प्रयोग करण्यांत आले. ग्रीस देशांत तर प्रत्येक मोठमोठ्या शहरांत सर्व लोकांच्या संमतीनें कार्यकारी मंडळें नेमण्यांत येऊन ठराविक कालपर्यंत तीं सर्व राज्यव्यवस्था पहात असत. त्यावेळीं गुलामांची संख्याही या शहरांत बरीच होती, पण त्यांना या व्यवस्थेंत हात घालण्याचा किंवा लोकसभेंत येऊन बसण्याचा व मत देण्याचा अधिकार नव्हता. हा हक्क फक्त ग्रीक लोकांनाच होता. या सर्वांनीं या सभेंत यावयाचे व निवडणूक करावयाची असा प्रघात होता. रोममध्यें इतकी निर्भेळ

लोकसत्ता नसली तरी प्रथम राजा मात्र नव्हता. आठदहा व केव्हां केव्हां दोन तीन वजनदार व कार्यकर्त्या माणसांचें एक मंडळ असून त्याच्या तंत्रानें सर्व राज्यकारभार चालावयाचा. पुढें पुढें मात्र या सत्ताधाऱ्यांच्या ठिकाणीं महत्वाकांक्षा उत्पन्न होऊं लागली व त्यांनीं राज्यें व साम्राज्यें स्थापन केलीं. ग्रीस देशांत लोकसत्तेचा प्रभातकाल झाला. लोकसत्तेचा प्रयोग तेथें बराच काल टिकला व तो यशस्वीही झाला. पण त्याचें कारण असें कीं लोकसत्तेची व्याप्ती जास्त नव्हती. प्रत्येक शहर हें घटक होतें. तें एक स्वतंत्र संस्थानच होतें. तें दुसऱ्याचें ताबेदार नव्हतें. तेव्हां अशा या शहरांमध्यें लोकससत्तेचा प्रयोग यशस्वी झाला त्यांत नवल तें काय ? आपल्या हिंदुस्थान देशांतही अत्यंत प्राचीनकालीं अशा प्रकारचीं छोटीं छोटीं लोकसत्ताक राज्यें पुष्कळ होतीं. लोकांनींच राजा निवडून देण्याची पद्धत पुष्कळ ठिकाणीं होती. विशेषेंकरून पंजाबांत व हिमालयाच्या पायथ्याशीं अशीं अनेक संस्थानें असल्याचे इतिहासांत दाखले सांपडतात. पण पुढें मोठमोठे पराक्रमी व महत्वाकांक्षी राजे उत्पन्न होऊन त्यांनीं आपल्या राज्यांचा विस्तार केला. तेव्हां हीं छोटेखानी लोकसत्ताक राज्यें नामशेष झालीं. यूरोपांतही रोमन सम्राटांच्या दडपणाखालीं ग्रीस देशांतीलही सर्व राज्यें चिरडून गेलीं. ग्रीस देश परतंत्र झाला व लोकसत्तेचा ऱ्हासकाल सुरू होऊन राजसत्तेचा पाया हळूहळू पक्का होऊं लागला.

या अल्प प्रयोगानंतर जी एकदाची राजसत्ता अस्तित्वांत आली ती झपाट्यानें उत्तरोत्तर अधिकाधिक दृढ होत गेली. इतकी कीं तिचें कधींकाळीं उच्चाटन होईल हा विचार सुद्धां लोकांना असंभाव्य वाटूं लागला. लोकशाहीच्या इतिहासांत हें एक सर्वांत मोठें आश्चर्यच ह्मणावयाचें. पर्जन्यऋतूंत सूर्यनारायणानें प्रातःकालीं जगाला दर्शन देऊन मेघपटलाच्या अफाट प्रदेशांत उडी घ्यावी व सायंकाळपर्यंत लोकांच्या दृष्टीआड व्हावें असाच हा प्रकार आहे. आश्चर्य हें कीं लोकशाहीचें उत्तेजक उदाहरण लोकांपुढें असूनही राजसत्ता स्थापन व्हावी व ती चिरकाल टिकावी. याचा उलगडा होत नाहीं. कदाचित् याचें कारण असें असावें कीं प्राचीनकाल हा इतिहासाचा प्रभातकाल असल्यानें राज्यघटनेचे नानाप्रकारचे प्रयोग होणें अपरिहार्यच होतें. या प्रयोगानंतर कोणती राज्यघटना सोयीची असते हें ठरावयाचें होतें. अखेर राजसत्ता ही उपयुक्त व आवश्यक ठरून तिचीच अंमलबजावणी पुढें होऊं लागली. दुसरें कारण असें असावें की ग्रीस काय किंवा रोम काय, तेथील परिस्थिती पुढें पूर्ण बदलली व या बदललेल्या परिस्थितींत लोकसत्तेचा प्रयोग यशस्वी होणें अशक्य कोटींतलें होतें. ह्मणून लोकशाहीनें अफाट कालाच्या सागरांत उडी घेतली व लोकांना वाटूं लागलें कीं ती आतां पृष्ठभागावर न येतां खालच्या खालींच लोप पावणार !

इतिहासाचा मध्यकाल हा अनियंत्रित व आक्रमणशील राजसत्तेच्या दडपशाहीचा काल होता. या कालांत बेगुमान, नीतिभ्रष्ट व जुलमी राजांनीं आपले सर्व मनोरथ सिद्धीस नेले. सम्राटपदाची दुष्ट हाव धरून आपल्या कडक अमलाखालीं असलेल्या प्रजाजनांना समरांगणावर आपल्या शत्रूंशीं लढण्यास राजे लोकांनीं भाग पाडले व आपली रुधिरपिपासा तृप्त केली. सर्व सुखाच्या ऐश्वर्यांत लोळण्यासाठीं त्यांनीं प्रजेवर जबर कर लावला. आपली विषयवासना तृप्त

करण्यासाठीं राज्यांतील सुन्दर ललनांचा त्यांनीं अमानुष छळ केला. केवळ सूडबुद्धीनें व खुनशी-पणानें प्रेरित होऊन विरोधकांना सुळावर चढविले. तरवारीच्या धारेवर परधर्मीयांना स्वधर्मीय केले व राजधर्म न कवटाळणाऱ्या थोर व मानी लोकांचा अमानुषपणें वध करविला. आपल्या आवडत्या बेजबाबदार बगलबच्च्यांना राज्यांतील मोठमोठ्या मानाच्या पदावर बसवून राज्यव्यवस्था विस्कळित करून ठेवली. आपल्या सर्व दुष्ट कृत्यांवर पांघरूण घालण्यासाठींच कीं काय लोकांवर बेगुमानपणें नियंत्रण करावयास ईश्वरानें इहलोकांत पाठविलेले आपण प्रतिनिधी आहोंत असें त्यांनीं निर्लज्जपणें प्रतिपादन केलें. असे एक काय हजारों प्रकार त्यांनीं केले व करविले. राजसत्तेच्या वरवंट्याखालीं पूर्ण भयभीत झालेल्या दुबळ्या प्रजेची स्थिती वधस्थानाकडे ओढत नेलेल्या दुःखोद्वेगानें ओरडणाऱ्या पराधीन बकऱ्याप्रमाणें अनुकंपनीय झाली होती. उदात्त मानवी तत्वांचा जगांत लोप झाला आहे कीं काय अशी सहज शंका येई. या कालाकडे कोणालाही अभिमानानें पाहण्याचें कारण नाहीं, इतका तो मानवजातीच्या नांवाला काळोखी फासणाऱ्या प्रसंगांनीं भरलेला होता !

त्यांतल्या त्यांत समाधानाची गोष्ट ही कीं या कुलांगारांच्या मालिकेंत कित्येक नर-रत्नांचेंही मणी होते. दयाधर्मशील व स्वकर्तव्यरत असेही कांहीं राजे या कालांत होऊन गेल्यामुळें ही दारुणपरिस्थिति सह्य झाली, लोकांनीं ती निमूटपणें सहन केली. वाळवटांत जसे हिरवेगार टापू मधून मधून दृष्टीस पडतात तद्वतच हीं नराधिपांचीं उदाहरणें होत. या टापूमुळेंच जसें मानवी जीवन या ओसाड व रखरखीत प्रदेशांत शक्य होतें त्याचप्रमाणें या थोर राजांच्या स्मृतीनें, उत्कंठतेनें, आशेनें व प्रसादानें प्रजाजनांनीं कष्टाचे सर्व कटु प्रसंग सोशिले. कदाचित् त्यांच्या वात्सल्यपूर्ण राज्यकारभारामुळेंच राजसत्ता दीर्घकालपर्यन्त टिकूं शकली. नाहीं तर लोकांच्या सामुदायिक सहनशीलतेला भयंकर ताण बसून इतिहासाचें पाऊल भराभर पडलें असतें व ज्या लोकसत्ताक घटना १८ व्या व १९ व्या शतकांत घडल्या त्यांची बरेंच शतकापूर्वीच आवृत्ति झाली असती. असो.

वरील विवेचनावरून एक गोष्ट वाचकांच्या प्रथम लक्षांत येईल. ती अशी कीं लोकसत्तेच्या तत्वाला जी चालना मिळाली तिचें मुख्य कारण राजेलोकांचा जुलूम हेंच असलें पाहिजे. ही गोष्ट अक्षरशः खरी आहे. लोकसत्ता हें एक उच्च तत्व आहे ह्मणून त्याचा आपण अंगिकार करावा हा शुष्कवाद लोकांना प्रथम पटला नाहीं व पुढेंही पटावयाचा नाहीं. कारण हें एक उच्च तत्व असलें तरी लोकसत्ताक राज्यपद्धतींत सर्वसामान्य लोकांना प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष राज्यकारभाराची कठीण जबाबदारी घ्यावी लागते, त्यांच्या स्वार्थत्यागबुद्धीवर बराच भार बसतो, पुष्कळशा उच्छृङ्खल पण अपरिहार्य मनोवृत्तींना त्यांना आळा घालावा लागतो. पण त्यामुळें राजसत्तान्तर्गत पाशवी प्रवृत्तींचें नियमन होतें या एकच आशेनें व उत्साहानें लोकशाही कार्यक्षम व कांहीशी यशस्वी झाली आहे. आपण साधारण व्यवहारांत पाहतों कीं लोक आपल्या मुलांना शिक्षण देतात याचें कारण शिक्षण घेणें चांगलें असतें असें नाहीं तर शिक्षणामुळें आपल्या मुलांना स्वतःचें पोट–तें नोकरी करून कां होईना–भरतां येईल हा हेतू पालकांच्या मनांत प्रामुख्यानें असतो. शिक्षणासाठीं शिक्षण घेणारे विद्यार्थी सांपडतील नाहीं असें नाहीं. पण ते

विरळा. हीच गोष्ट लोकसत्तेलाही लागू होते. अत्यहीं होणाऱ्या राजांच्या जुलूममुळें पतित-प्रवाहाप्रमाणेंच लोकांनीं लोकसत्तेचा मार्ग धरला. तो मनापासून नव्हे तर परिस्थितीच्या टोचणीमुळें.

एकदां राजसत्ता स्थापन झाली ती अनेक शतकांपर्यन्त अव्याहत व अप्रतिहत चालू होती. पण अखेरीस लोकांच्या सहनशीलतेला पराकाष्ठेचा ताण बसून हातपाय हलविण्या-खेरीज गत्यंतर नाहीं असें त्यांना वाटूं लागलें. जगाच्या राहटीकडे जे तुच्छतेनें दुर्लक्ष करीत अशा तत्ववेत्त्यांनाही राजांच्या जुलूमाची अत्यंत चीड येऊन त्यांनीं आपल्या लेखणीचें हत्यार राजसत्तेविरुद्ध उचललें. प्रत्यक्ष क्रान्ती होण्यापूर्वी लोकांच्या मनोवृत्तींत व विचारसरणींत क्रांती होत असते व हें क्रांती घडवून आणण्याचें श्रेय व जबाबदारीही कवि, तत्ववेत्ते व लेखक यांच्याकडे असते ही गोष्ट केव्हांही विसरतां कामां नये. रामदास, तुकाराम इत्यादि संत कवींनीं धार्मिक वृत्ति जागृत करून महाराष्ट्राची मनोभूमिका तयार केली व या भुमिकेवरच शिवाजी महाराजांना अलौकिक कार्य करतां आलें. अमेरिकन स्वातंत्र्याच्या युद्धापूर्वी इंग्लंडचा जुलूम व अन्याय यांचा प्रतिकार करण्याची प्रवृत्ती अमेरिकन लेखकांनीं उत्पन्न केली होती. फ्रेंचराज्यक्रांतीपूर्वी रूसो, व्हिक्टर ह्यूगो वगैरे ग्रंथकारांनीं क्रांतीला पोषक असें वातावरण फ्रान्सदेशांत तयार करून ठेवलें होतें. इंग्लंडच्या १६४२ मधील यादवीच्या, १६८० मधील राज्यक्रांतीच्या व एकंदर लोकसत्ताक चळवळीच्या बुडाशीं प्राचीनकाळीं इंग्रज लोक उपभोगीत असलेले स्वातंत्र्य व राजकीय हक्क यांच्या उद्बोधक स्मृतीचा जिवंतपणा हा होता. सर्व इतिहासांत हीच गोष्ट दिसून येते. एकदाची मनाची तयारी झाली म्हणजे कार्य सुकर होतें, प्रथम अशक्य वाटणारी गोष्टही घडून येते. फ्रेंच राज्यक्रांतीच्या पूर्वी ही परिस्थिती निर्माण झाली होती. या क्रान्तीचें श्रेय फ्रेंच लोकांना तर आहेच; पण त्याबरोबर हेंही लक्षांत ठेवलें पाहिजे कीं त्यांना इंग्लंड व अमेरिकेचा व साधारणपणें सर्व यूरोपियन लोकमताचा पाठिंबा होता. फ्रेंच लोकांना अत्यंत अनुकूल अशी संधि प्राप्त झाली व तिचा त्यांनीं चांगला उपयोग करून घेतला एवढेंच. ही राज्यक्रांती झाली नसती तर राजसत्तेला कदापि आळा बसला नसता, ती अव्याहत चालू राहिली असती असें कित्येक इतिहासकारांना वाटतें. पण तें चूक आहे. कारण एकादी अत्यंत महत्वाची ऐतिहासिक घटना व्हावयाची तर तिला क्षुल्लक कारण किंवा संधि पुरतें हें म्हणणें अगदीं खोटें आहे. त्या घटनेसाठीं मनोवृत्तीचा योग्य बनाव व्हावयास पाहिजे. लहान मोठ्या गोष्टींचा किंवा संधींचा परिपोष व्हावा लागतो. हा परिपोष पूर्ण होतांच क्षुल्लक कारणामुळेंही प्रचंड क्रांती घडून येते. केवळ आस्ट्रियन राजपुत्राच्या खुनामुळें १९१४ मध्यें एवढें मोठें युरोपियन युद्ध सुरूं झालें नाहीं. त्याचें कारण इंग्लंड व जर्मनी यामध्यें १८९९ पासून सुरूं झालेली नाविक, व्यापारिक व राजकीय प्रतिस्पर्धा हें होय. राजाविरुद्ध फ्रान्समध्यें उत्पन्न झालेल्या बौद्धिक परिस्थितीला तमाम दुबळ्या प्रजाजनांची मूक संमति होती हें विसरतां कामां नये.

फ्रेंच राज्यक्रांती १७८९ मध्यें घडून आली. फ्रान्सचा पराक्रमी बादशहा १४ वा लुई यानें युद्धापायीं तिजोरींतला सर्व पैसा खर्च केला. व खजीन्यांत तूट पडूं नये म्हणून लोकांवर जबर कर बसवून पैसा गोळा केला. तरी सर्व तिजोरी रिकामीची रिकामीच ! १५ वा लुई

अत्यंत चैनी व उधळपट्टया असा निपजला. त्याची प्रजा कराच्या वाढत्या प्रमाणामुळें अगदीं त्रस्त झाली. तो मरण पावल्यावर १६ वा लुई गादीवर आला, पण राज्यकारभार चालविण्यासाठीं पुरेसा पैसाही त्याच्या तिजोरींत नसल्यामुळें तो किंकर्तव्यमूढ झाला. अखेरीस लोकांची सभा बोलावण्याखेरीज त्याला गत्यंतर नव्हतें. ही लोकांची सभा भरली तेव्हां सभासदांनीं निश्चय केला–नव्हे शपथ घेतली–कीं लोकसत्ताक राज्यघटना तयार केल्याखेरीज तेथून हलावयाचें नाहीं. राजाच्या हुकुमांना त्यांनीं धाब्यावर बसविलें. राजाही विकट परिस्थितीपुढें थोडासा नरमला, व आपला बराच हेका त्यानें सोडला. तथापि लोकांची जेथपर्यंत जाण्याची मजल होती तेथ पर्यंत त्याला जातां येईना. दरम्यान लोकांनीं पॅरिसकडे धांव घेऊन राजधानी आपल्या ताब्यांत घेतली व अनेक राजभक्तांना तुरुंगांत टाकले. प्रत्यक्ष लुईलाही आपल्या सुरक्षिततेबद्दल भिती वाटू लागली व तो पळून जाऊं लागला. लोकांनीं त्यांस धरले व तुरुंगांत टाकले. लवकरच फरान्समध्यें अराजक लोकसत्तेच्या ( Republic ) स्थापनेची घोषणा झाली. लुईराजा निराशेनें व्याकुळ झाला व इतर राजांशीं पुन्हा राजसत्ता स्थापन करण्यासाठीं तो गुप्तपणें खल करूं लागला. पण हा कट उघडकीस येऊन लोकांनीं त्याची चौकशी करविली व त्यास दोषी ठरविले. लवकरच त्याचा शिरच्छेद झाला! त्याचबरोबर राजसत्तेचें पूर्ण निर्मूलन होऊन लोकसत्तेची स्थापना झाली. पुढें आस्ट्रिया, इंग्लंड, नॉर्वे, स्वीडन, सिसीली, सार्डीनिया वगैरे देशांच्या राजांना फरान्सची लोकसत्ताक चळवळ व त्याचें आक्रमणशील धोरण पसंत न पडून त्यांनीं आपापसांत तह करून फरान्सविरुद्ध युद्ध पुकारलें. प्रथम प्रथम लोकसत्तावाद्यांना यश येत गेलें. पण पुढें पुढें यशाचीं चिन्हें दिसेनात. ठिकठिकाणी लोकसत्ताक सैन्याचा पराभव होऊ लागला. अशा या आणीबाणीच्या प्रसंगीं फरान्समध्यें एक अतुल पराक्रमी योद्धा चमकूं लागला. त्याचें नांव नेपोलियन बोनापार्ट. त्यानें इटली, स्विट्झर्लंड, नेदरलंड, इजिप्त वगैरे देशांत सैन्य नेऊन अनेक विजय संपादन केले. तो फरांस देशाचा पहिला कॉसल झाला. पुढें त्यानें बादशहाची पदवी धारण केली. आस्ट्रिया, जर्मनसंस्थानें, प्रशिया, रशिया या सर्वांचा पुन्हा पुन्हा पराभव करून आपली अनियंत्रित सत्ता त्यानें स्थापन केली. इंग्लंडचा मात्र त्याला पराभव करता आला नाहीं. स्पेनचें संबंध राज्य त्यानें गिळंकृत केलें. पण स्पॅनिश लोक देशभक्तीनें प्रेरित होऊन त्याच्या विरुद्ध उठले. इकडे रशियानें उचल खाल्ल्यामुळें स्पेनमधलें बरेचसें सैन्य त्याला पूर्वेकडे न्यावें लागलें. या संधीचा फायदा घेऊन इंग्रजांची मदत घेऊन स्पॅनिश लोकांनीं त्याच्या विरुद्ध उठावणी केली व फ्रेंच सैन्याला मागें रेटीत फ्रासमध्यें आणले. इकडे रशियामध्यें कडाक्याची थंडी पडल्यानें नेपोलियनचें सैन्य नामोहरम झालें, व परत फिरलें. रशियनांनीं हल्ले चढवून त्याचा धुव्वा उडविला. या थकून भाकून व पराभूत होऊन आलेल्या सैन्याला आस्ट्रिया व प्रशियाच्या सैन्यानें तोंड दिलें. त्यांतही नेपोलियनचा मोठा पराभव होऊन तो आपल्या राजधानीकडे गेला व यापुढें कांहीं आशा नाहीं पाहून त्यानें राज्यपदाचा राजीनामा देऊन पळ काढला. पण शत्रुपक्षाच्या हातीं लागून त्याला एल्बा या बेटावर एकटें ठेवण्यांत आले. दरम्यान सर्व दोस्तराष्ट्रांनीं एकत्र जमून सरहद्दीची पुनर्घटना करण्याचें काम आरंभिलें. पण इतक्यांतच त्या बेटांतून नेपोलियन निसटला व पुन्हा फ्रान्समध्यें आला. त्याच्या निशाणाखालीं

फ्रेंच लोक उत्साहानें जमूं लागले. त्यानें पुन्हा एक मोठें सैन्य उभारलें आणि इंग्लंड व प्रशिया यांच्या सेन्याला तोंड देण्यासाठीं तो बेलजममध्यें शिरला. तेथें वाटरलूची लढाई होऊन त्यांत त्याचा पूर्ण पराभव झाला (१८१५). पुढें त्याला सेंट हेलेना बेटांत नेऊन ठेवण्यांत आलें. तेथेंच तो मरण पावला. फ्रान्समध्यें पुन्हा बोरबोन घराणें सुरू झालें.

असा एकंदर थोडक्यांत फ्रेंच राज्यक्रांतीचा व नेपोलियनचा इतिहास आहे. लोकसत्तेच्या कल्पनेला त्यामुळें कशी चालना मिळाली हें आतां पहावयाचें आहे. १७८९ पासून तो सरासरी १८०० पर्यंत फ्रान्समध्यें लोकसत्ताक राज्य होतें असें म्हणण्यास हरकत नाहीं. अर्थात कांहीं लोकांकडून असा आक्षेप येईल कीं '१७९४ नंतर जर नेपोलियनचें वजन उत्तरोत्तर वाढत गेलें, हळूहळू तो सर्व सत्ताधारी होत गेला व त्याला पहिला कॉसल निवडण्यांत आलें तेव्हां इटलीचा मुसोलिनी, रशियाचा स्टॅलीन किंवा तुर्कस्थानचा केमालपाशा या हल्लींच्या सत्ताधीशाप्रमाणें सर्व अधिकार त्याच्या हातीं आले. मग ती लोकसत्ता कोठली? हो, १७९४ पर्यंत फ्रान्समध्यें लोकसत्ताक राज्य होतें असें म्हटलें तर चालेल. पण पुढें मात्र नव्हतें.' पण त्याचबरोबर आपण हें लक्षांत ठेवलें पाहिजे कीं लोकसत्तेच्या संघटित प्रयत्नांचा तो प्रारंभ होता. तेव्हां सर्वथैव निर्भेळ अशी लोकसत्ता स्थापन होणें अशक्यप्राय होतें. लोकसत्ताक राज्यपद्धतीची लोकांना संवय नव्हती, ती चालवून दाखविण्याची हातोटी त्यांना साधली नव्हती. लोकसत्ताक परंपरा सुरू झाली नव्हती. अशा स्थितींत अंमळशी एकसूत्री कारभारानें मिश्रित झालेली लोकसत्ता नामनिराळी ठरावयाची नाहीं. हा आक्षेप घेणारे लोक आणखी एक गोष्ट विसरतात. १७८९ पासून तो १८१५ पर्यंतचा काल हा महायुद्धाचा काल होता. प्रत्येक राष्ट्राचा आणीबाणीचा तो प्रसंग होता. अशा कालांत निर्भेळ लोकसत्ता राहणें शक्य तरी आहे का? एवढेंच नव्हे तर राष्ट्राचा जीवनमृत्यूचा प्रश्न सोडवावयाचा असतो तेव्हां सर्व प्रजाजनांचें प्रथम कर्तव्य हें असतें कीं त्यांनीं आपले सर्व हक्क, सर्व स्वातंत्र्य विसरून जाऊन राज्यांतील मुख्य सूत्रधाराच्या हातीं आपखुषीनें सर्व अधिकार देऊन टाकणें. त्यांनीं हें वेळींच केलें नाहीं तर पुढें पश्चातापाची पाळी येते. अशा आणीबाणीच्या प्रसंगीं संयुक्त संस्थानाचा अध्यक्ष सर्वसत्ताधारी होतो. ब्रिटिश पार्लमेंटनें गत युद्धांत सर्व अधिकार लॉइड जॉर्ज याच्या हातीं दिले होते. व पुढें प्रसंग आला तर मुख्य प्रधानाच्या हातीं पुन्हां देईल. धामधुमीच्या कालांत लोकशाही निष्क्रिय व हतबल होतें. तींत जिवंतपणा रहात नाहीं, तिचा लोप होतो. हें सत्य त्रिकालाबाधित आहे. हा एकप्रकारें self-denying ordinance आहे, स्वयंसत्तासन्यास आहे. आणि या संन्यासांतच लोकशाहीचा मोठेपणा आहे. राजसत्तेलाही वेळप्रसंगीं स्वयंस्फूर्तीनें अधिकारभ्रष्ट व्हावें लागतें. लोकसत्तेला तसें करावें लागलें म्हणून कोणी नावें ठेवावयाला नको. तेव्हां फ्रान्समध्यें १७८९ पासून १८०० पर्यन्त लोकसत्तेचें प्रभुत्व होतें असें म्हणण्यास हरकत नाहीं. पुढें नेपोलियन बादशहा झाला. फ्रान्समध्यें राजसत्ता स्थापन झाली पण त्यावेळीं सुद्धां फ्रान्सची राजसत्ता व यूरोपांतील इतर राजसत्ता यांमध्यें अत्यंत महत्वाचा फरक होता. फ्रान्सची राजसत्ता परंपरागत स्थापन झालेली नव्हती. लोकसत्तेच्या भूमींत तिचा उदय झाला होता. लोकसत्तेचें खाद्य व पाणी राजसत्तेला मिळत होतें. आपले सर्व हक्क नेपोलियनच्या हातीं सुरक्षित आहेत ही जाणीव फ्रेंच

लोकांना होती. इतर राजसत्तेंत हे गुणविशेष नव्हते. तसेंच इतर राजांना नेपोलियनची मोठी भिती वाटे. याचें कारण तो अलौकिक पुरुष व पराक्रमी योद्धा होता हेंच केवळ नव्हे तर लोकसत्तेच्या धामधुमीच्या कालांत तो सामान्य लोकांमधून वर आलेला बादशहा होता. तो साम्राट असला तरी लोकसत्तेच्या विजयाचा मूर्तिमंत पुतळा होता. तो महत्वाकांक्षी असला तरी त्याच्या महत्वाकांक्षेला लोकसत्तेमुळें वाव व चैतन्य मिळाले होतें. त्याची सत्ता अनि-यंत्रित असली तरी लोकसत्तेचें ती दृष्य स्वरूप होती. नेपोलियन कितीहि बेगुमान बादशहा असला तरी तो लोकमताचा एक प्रतिनिधी होता. आणि या गोष्टीमुळेंच इतर राजांना त्याचा उत्कर्ष पाहवेना. त्याच्या पूर्वीचा फरेंच राजा जो १४ वा लुई तो सुद्धा असाच मुत्सद्दी व योद्धा होता. पण त्याच्याकडे ते निराळ्या दृष्टीनें पहात होते. नेपोलियन प्रमाणें त्याचें भय त्याना वाटेना, तो त्यांच्यापैकींच एक होता. सर्व यूरोपियन राजे नेपोलियनविरुद्ध उठले. कारण नेपोलियनची कारकीर्द यशस्वी झाली तर राजसत्तेला लवकरच मूठमाती मिळावयाची. म्हणून आपली सर्व शक्ति एकवटून त्याचा पूर्ण पराभव करावयाचा व लोकसत्तेच्या वाढत्या वृक्षाला समूळ खुडून टाकावयाचें, हा त्यांचा निर्धार होता. अखेर १८१५ मध्यें हें वृक्ष चिरडलें गेलें, पण त्याचीं खोल गेलेलीं माळेमुळें तशीच राहिलीं. त्यांचें उन्मूलन करणें राजांना अशक्य होतें. आणि हें अशक्य असल्यामुळेंच फरेंच राज्यक्रांती लोकसत्तेच्या इतिहासांत चिरस्मरणीय झाली आहे. लोकसत्तेच्या मार्गांत जी सर्वांत मोठी धोंड होती ती या राज्यक्रांतीनें दूर केली. लोकसत्तेची भराभर वाढ होण्याचें कार्य या क्रांतीनें सुकर केलें. याच दृष्टीनें फरेंच राज्यक्रांती-कडे पाहिलें पाहिजे.

फरेंच राज्यक्रांतीपूर्वी लोकसत्ताक प्रयत्न झाले नाहींत, असें नाहीं. त्यापूर्वींच अमेरिकन राष्ट्रांनीं एक होऊन इंग्लंडच्या अन्यायी धोरणाचा विरोध केला. १७५७ पासून १७६३ पर्यंत जे सप्तवार्षिक युद्ध झालें त्यांत अमेरिकेंतील इंग्रजी वसाहतींचें संरक्षण करण्यासाठीं इंग्लंडनें पुष्कळ स्वार्थत्याग केला. या युद्धापायीं जो खर्च आला तो अंशत: तरी भरून येण्यासाठीं ब्रिटिश पार्लमेंटनें अमेरिकेंत आयात होणाऱ्या चहा वगैरे पदार्थांवर थोडा कर बसविला. पण इंग्लंडच्या पार्लमेंटांत आपले ज्या अर्थीं प्रतिनिधी नाहींत त्या अर्थीं आपणावर कराचें ओझें लादण्यांत येऊं नये असा अमेरिकन वसाहतींनीं हट्ट धरला. पण हेकेखोर इंग्रज मुत्सद्यांना त्यांची समजूत घालतां येईना व या अत्यंत क्षुल्लक कारणास्तव युद्ध (१७७५–१७८२) होऊन त्यांत इंग्रजांचा पूर्ण पराभव झाला. या चहाच्या पायीं इंग्लंडनें अमेरिका गमावली ! कॅनडाचा प्रांत मात्र त्याच्याच ताब्यांत होता. अमेरिकन लोकांनीं अगोदरच स्वातंत्र्याचा जाहिरनामा प्रसिद्ध केला होता. व युद्धसमाप्तिनंतर लोकसत्ताक राज्यघटना तयार करून ती अमलांत आणली. ती आजतागाईत चालू आहे.

अमेरिकन राज्यक्रांतीचा फरेंच लोकमतावर फारच परिणाम झाला. इंग्लंडसारख्या बलिष्ठ राष्ट्रांशीं युद्ध करण्यास अमेरिकन लोक तयार झाले ही केवढी आश्चर्याची गोष्ट! राष्ट्रीयत्वाच्या स्फूर्तीनें प्रेरित झालेले लोक दुबळे नसतात, कोणतीही शक्ति त्यांच्यापुढें अधिक कालपर्यंत टिकाव धरूं शकत नाहीं हा बोध त्यांनीं त्यापासून घेतला. तसेंच अमेरिकेला इंग्लंडविरुद्ध फरेंच राजानें मदत केली या गोष्टीचा फरेंच लोकांच्या मनांवर फारच परिणाम झाला. आपला राजा

दुसऱ्या लोकांनीं परवशतेंत राहूं नये म्हणून त्यांना मदत करतो तर मग त्याची ही औदार्यबुद्धि आपणाविषयींच कां जागृत होत नाहीं याचें त्यांना नवल वाटलें. राजाबद्दल त्यांना जास्त चीड वाटूं लागली. एवढेंच नव्हे तर अमेरिकन लोकांना लुईनें केलेली मदत त्यांना स्फूर्तिदायक वाटली व आपल्या राजाविरुद्ध उठण्याचें एक प्रबळ कारण त्यांना सांपडलें.

पण अमेरिकन लोकांना इंग्लडचा इतिहासच मार्गदर्शक झाला. लोकसंमतीनें राज्यकारभार जेथें चालत आहे असा जो इंग्लंड देश तेथील मुत्सद्यांनीं अमेरिकन लोकांची संमति न घेतां अन्यायानें व जुलुमानें त्यांच्यावर कर लादावा ही गोष्ट त्यांना समजेना. आपलें स्वातंत्र सुरक्षित रहावें, आपल्या धर्मप्रवृत्तीप्रमाणें आपणास आचरण करावयास मोकळीक मिळावी म्हणून अत्यंत त्रास सहन करून व आपापलीं घरेंदारें सोडून पुष्कळसे इंग्रज वसाहतवाले या दूरच्या देशांत येऊन राहिले. पण पुढें येथेंही इंग्लंडचा ससेमिरा आपल्या मागें कायम आहेच ही गोष्ट त्यांना असह्य वाटूं लागली. आज एक कर लावला, उद्या दुसरा लावला जाईल, परवा इतर कायदे आपणावर लादले जातील व अशाप्रकारें आपलें स्वातंत्र्य हरण होईल या सर्व गोष्टी त्यांना इंग्रज मुत्सद्यांच्या विचारसरणींत दिसूं लागल्या.

इंग्रजांसारख्या स्वातंत्र्यप्रेमी लोकांनीं आपल्या देशभाईंचा अशा प्रकारें छळ करावा हें इष्ट नव्हतें. वास्तवीक इंलंड हें लोकसत्तेचें आगर होतें व आहेहि. त्यांचा सबंध इतिहास लोकसत्ताक प्रयत्नांच्या स्फूर्तिदायक घटनांनीं भरला आहे. आपल्या शिरजोर व अनियंत्रित राजांशीं भांडण्यांत त्यांचा सर्व काल निघून गेला. जॉन राजाला लोकांच्या हक्काचा जाहिरनामा मान्य करण्यास त्यांनीं भाग पाडलें. पहिल्या चार्लस राजाशीं युद्ध करून त्यास त्यांनीं यमसदनास पाठविले व लोकसत्ताक राज्य ( Common Wealth )स्थापन केलें. पण तो प्रयत्न सपशेल फसून कांहीं अटीवर दुसऱ्या चार्लस राजाला निमंत्रण दिलें. पुढें त्याचा भाऊ जेम्स हा धार्मिक बाबतींत आग्रही असल्यानें त्याच्या विरुद्ध चळवळ करून त्यास राज्यत्याग करावयास लावले व तिसऱ्या विलियमला गादीवर बसविले. पण त्यापूर्वीं त्याच्याकडून पार्लमेंटचे हक्क अबाधित राहतील ही कबूली घेतली. त्यापुढें लोकसत्तेची हळूहळू वाढ होत गेली. या सर्व गोष्टी अमेरिकन व यूरोपियन पुढाऱ्यांना चिरपरिचित होत्या. हें उदाहरण डोळ्यासमोर ठेवून त्यांनीं आपापल्या राजाविरुद्ध उठण्याचा प्रयत्न केला. फरेंच लोकांच्या प्रयत्नाविषयीं तर इंग्लडचा त्यावेळचा मुख्य प्रधान जो विलियम पिट त्यालाही सहानुभूति वाटत होती. पण जेव्हां त्यांनीं आपल्या राजाला फाशीं दिलें तेव्हां मात्र इंग्लडचेंच काय पण सर्व यूरोपखंडाचें पित्त खवळलें. खरोखर, फरेंच लोक त्यावेळीं फार पुढें गेले. क्रांती करणें एकवेळ सोपें असतें. पण तिचें नियंत्रण करून तिला योग्य मार्गांनीं नेण्यासाठीं अलौकिक बुद्धिसामर्थ्य व कार्यकुशलता लागते. तिच्या अभावीं फरेंचराज्यक्रांती व्हावी तशी यशस्वी झाली नाहीं.

पण इंग्लंड देशाचा लोकसत्तेचा इतिहास अमेरिकन व फरेंच लोकांना अत्यंत स्फूर्तिदायक व मार्गदर्शक झाला यांत शंका नाहीं. पण पूर्ण लोकसत्ता स्थापन करण्यास इंग्रजलोकांनाही फारच त्रास भोगावा लागला. वास्तविक १९११ पर्यन्त इंग्लंडला परिणामकारक

अशी लोकसत्ता स्थापन करतां आली नाहीं. आरंभापासूनच इंग्लंडांत मोठमोठे शूर व लढवय्ये सरदार रहात होते. सामान्य लोक व धनवान व शक्तिमान सरदार यांनीं एक होऊन राजाविरुद्ध आंदोलन केलें. राजसत्तेचा मोड झाला व सर्व सत्ता या मोठ्या लोकांच्या हातीं आली. ती त्यांच्या हातीं पुष्कळ शतकांपर्यंत राहिली. १८३२, १८६७, १८८५, १९११ या सनांमध्यें पास झालेल्या सुधारणाकायद्यांमुळें ही सत्ता हळूहळू सामान्य लोकांच्या हातीं येत गेली. असा एकंदर इंग्लंडच्या लोकसत्तेचा अत्यंत संक्षिप्त इतिहास आहे.

आतां वाचक कदाचित अशी पृच्छा करतील कीं इंग्लंडचा इतिहास लोकसत्तेच्या दृष्टीनें इतका अद्भुतरम्य व उद्बोधक आहे तर मग फरेंच राज्यक्रांतीलाच एवढें महत्व देण्याचें कारण काय ? इंग्लंडचें उदाहरण अमेरिकेला व या दोघांचों फरांसला मार्गदर्शक झालीं हें जर खरें तर मग फरेंच राज्यक्रांतीची इतकी महती कशाला गावयास पाहिजे ?

याचें कारण असें आहे की फरेंच राज्यक्रांतीपासूनच लोकांचे लोकसत्ताक चैतन्य वाढूं लागलें. कांहींतरी धडपड करून राजसत्तेला जर्जर करावे अशी भावना लोकांच्या अंत:करणांत या क्रांतीनंतरच जोरानें चलन पावूं लागली. तोंपर्यन्त लोकसत्तेचे तुरळक तुरळक प्रयत्न चालूं होते. पण पुढें या प्रयत्नांना संघटित स्वरूप प्राप्त होऊन लोकसत्तेच्या अफाट समुद्रांवर लाटावर लाटा उसळूं लागल्या व त्यांनीं राजसत्तेच्या कमकुवत झालेल्या लहान लहान नांवा-नौकांना अगतिक केले. या नौकांची गति पुढें कुंठित झाली. ही सार्वजनिक लोकसत्ताक मनोप्रवृत्ति उत्पन्न करण्याचें श्रेय फरेंच राज्यक्रांतीलाच आहे. व ही गोष्ट खरी आहे हें १८१५ नंतरच्या इतिहासानें सिद्ध होतें. १८३० मध्यें यूरोपखंडांत जिकडे तिकडे बंडें झालीं. फरांस, आस्ट्रिया, नेदरलंड, ग्रीस, हंगेरी, पोलंड वगेरे देशांतील लोक राजाविरुद्ध उठले. लवकरच १८३२ मध्यें इंग्लंडमध्यें रिफार्मबिल पास होऊन जास्त लोकांना मतदानाचा हक्क प्राप्त झाला. ग्रीस अगोदरच स्वतंत्र झाला होता. इटलीमध्यें क्रांती घडून तो देश पुढें आस्ट्रियाच्या मगरमिठींतून मुक्त झाला. हंगेरीमध्येंसुद्धां लोकसत्ताक प्रयत्न यशस्वी झाला. नेदरलंडमधून हॉलंड हा देश फुटून त्यानें आपलें स्वातंत्र्य मिळविलें. या व यासारख्या अनेक उदाहरणांवरून लोकसत्तेचा फैलाव फरेंच क्रांतीनंतर जोरानें होऊं लागला हें दाखवितां येईल.

दुसरें असें कीं इंग्लंड व अमेरिका यांचीं उदाहरणें सोडून दिलीं तर असें ह्मणतां येईल कीं फरेंच राज्यक्रांतीपूर्वी राजसत्ता अधिक सामर्थ्यवान् व प्रभावशाली होती. एकादें फळ कच्चें असेपर्यंत वृक्षाला घट्ट धरून असतें. पण चांगलें परिपक्व होतांच लहानसा धक्का मिळतांच तें खालीं जमिनीवर येऊन पडतें. तद्वतच फरेंच राज्यक्रांतीपूर्वी राजसत्ता दृढमूल होती. राजसत्तेचीं फळें या क्रांतीनंतर परिपक्व झालीं व पुढें लहान लहानशा बंडाच्या धक्यामुळें सहज खालीं येऊन पडलीं. राजांच्या जुलुमामुळें अगोदरच प्रजा त्रस्त झाली होती हें खरें, पण त्यांच्या सहनशीलतेला अजून ताण बसला नव्हता. उत्तरोत्तर परिस्थिति अगदीं असह्य होऊन तमाम जनसमुदाय कोणताही स्वार्थत्याग, कष्ट, हालअपेष्ठा सहन करण्यास तयार झाला. आणि म्हणूनच फरेंच राज्यक्रांति लोकसत्तेच्या मंदिराची पहिली महत्वाची पायरी आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं.

सबंध १९ व्या शतकांत लोकसत्ताक प्रयत्नांचा उत्तरोत्तर उत्कर्ष होत गेला. विसाव्या शतकांत तर लोकसत्तेची भराभर वाढ होत गेली. गत महायुद्धाच्या धरणीकंपामुळें रशिया, जर्मनी, आस्ट्रिया, तुर्कस्थान या देशांतील जबरदस्त राजसत्तेच्या इमारती जमीनदोस्त झाल्या. त्यांच्या ठिकाणीं लहानमोठीं अनेक प्रजासत्ताक राज्यें स्थापन झालीं. जर्मनी, पोलंड, झेको-स्लोव्हाकिया, यूगोस्लाव्हिया, आस्ट्रिया, लॅट्व्हिया, एस्थोनिया, लिथुआनिया, अजरबैजन, जॉर्जिया इत्यादि देश लोकसत्ताक होऊन युरोपांतून बेजबाबदार राजसत्ता नाहींशी झाली. नाहींपेक्षां स्पेनमध्यें फक्त होती. पण १९३१ मध्यें तेथेंही राज्यक्रांती होऊन आलफोन्सो राजा इंग्लंड देशांत पळून गेला. हा सर्व लोकसत्तेचा अपूर्व विजय आहे.

अजूनसुद्धां निर्भेळ लोकसत्तेचा अंमल सुरक्षित स्थापन होण्याला अनेक अडचणी व संकटें आहेत. पण तीं कालान्तरानें सर्व दूर होतील अशी आशा बाळगण्यास पुष्कळ जागा आहे. याही अडचणींचा आपण पुढें विचार करूं.

# लोकसत्तेची अंतर्व्यवस्था

## राज्यघटनेचें स्वरूप

### प्रकरण १ लें.

#### (१) राज्यघटना म्हणजे काय ?

मनुष्याच्या मागे निर्बंध लागलेले असतात. ते त्याला पाळले पाहिजेत. आपल्या शेजाऱ्याशीं मिळून मिसळून वागणें, दुसऱ्याचें नुकसान होऊ नये म्हणून आपल्याकडून प्रयत्नांची शिकस्त करणें, चारचौघांमंडळींत बसले असतांना अदबीनें बोलणें, आपल्या उच्छृंखल मनोवृत्तींना इतरांना अहितकर न होतील अशा रीतीनें आपल्या ताब्यांत ठेवणें वगैरे गोष्टींकडे प्रत्येक मनुष्याला लक्ष द्यावे लागतें. समाजाचे हे अलिखित नियम जसें त्याला पाळावे लागतात तसेंच सरकारी कायद्यांचें उलंघन न करणें हेंहि त्याचें कर्तव्य असतें. सारांश, मनुष्य स्वैर नसतो, त्याला कळत नकळत समाजाचे नियम व सरकारचे कायदे पाळावे लागतात व यांतच त्याचें हित आहे. त्याचप्रमाणें प्रत्येक राष्ट्राला व त्यांत स्थापन झालेल्या सरकाराला ठराविक नियमाप्रमाणें वागावे लागते. व्यक्तींनीं नियम पाळावेत व सरकारानें ते मोडावेत हें इष्ट तरी आहे काय ? म्हणून प्रत्येक सरकाराला सुद्धां कायद्यानें वागावें लागतें.

सरकार ज्या मुख्य कायद्यांनीं वागतें त्याला राज्यघटना म्हणतात. पण कायदा म्हणजे राज्यघटना असें कोणी समजूं नये. या दोहोंत फार फरक आहे. अगदीं सामान्यरीतीनें एखादें कायदेमंडळ अन्धेंअधिक मतें देऊन कायदे पास करीत असतें. तसा प्रकारें घटना तयार होत नाहीं. कायदेशीर रीतीनें सर्व देशांतील मोठमोठे मुत्सद्दी एकत्र होऊन लोकांच्या आवडीनिवडीप्रमाणें त्यांच्यासमोर असलेल्या ध्येयाला अनुसरून एक विधिसमुच्चय तयार करतात व त्याप्रमाणें सरकाराला वागावें लागतें. किंवा हिंदुस्थान देशाप्रमाणें एकादा देश परतंत्र असला तर विजयी राष्ट्रानें ही घटना तयार केलेली असते. तसेंच विधिमंडळानें केलेले कायदे अगदीं सामान्य रीतीनें रद्द होऊं शकतात, किंवा सरकारसुद्धां आपल्या हातांत असलेल्या अधिकारान्वयें त्या कायद्यांची अंमलबजावणी पुढें ढकलूं शकतें. सामान्य कायदे तत्कालिक असूं शकतात. पण घटना म्हणजे ती कायमची झाली. तिला सहसा बदलतां येत नाहीं. व ती बदलण्याचा जरी कायदेमंडळाला अधिकार असला (व तो असतोच. पण मध्यवर्ती सरकाराची दोन्ही कायदेमंडळें एकत्र होऊन तीन चतुर्थांश मतानें राज्यघटनेंत इष्ट तो

फेरबदल करून घेतात. व पुढें या केलेल्या फेरबदलासंबंधानें प्रांतिक कायदेमंडळांची किंवा एकंदर मतदारांची संमति घेतात. राज्यघटनेंत बदल करण्याची साधारणतः ही रीती आहे) तरी तींत कांहीं जबर कारणाशिवाय बहुधा ढवळाढवळ होत नाहीं. घटना ही सामान्य कायद्यापेक्षां श्रेष्ठ असते. कायदे समाजांतील रीती व न्याय यांना धरून असतात. पण एकाद्या देशाच्या राज्यघटनेंत तद्देशीयांच्या राजकीय महत्वाकांक्षा व हक्क यांचें स्वरूप प्रतिबिम्बित असतें. सरकारला राज्यघटनेचें उल्लंधन कधींही करतां येत नाहीं. व त्यानें तसें केलें तर वरिष्ठ व विशिष्ठ न्यायालयांत चौकशी होऊन सरकाराच्या विरुद्ध निकाल गेल्यास त्यास आपली चूक सुधारणें भाग पडते. राज्यघटनेप्रमाणें सरकार चालत आहे कीं नाहीं हें पाहण्याचें काम या न्यायाल्याकडे असतें व कायद्यांची अंमलबजावणी बरोबर होत आहे कीं नाहीं हें पाहण्याचें काम सरकाराकडे असतें. कायद्यांची मजल राष्ट्राच्या सूक्ष्म जीवनापर्यंतही जाते पण घटना या सर्व गोष्टींकडे स्थूलमानानें पाहते. क्षुल्लक क्षुल्लक बाबीसंबंधानें राज्यघटनेंत नियम नसतात. तें काम कायद्याकडे व पार्यायानें कायदेमंडळाकडे सोपविलेलें असतें.

## ( २ ) राज्यघटनांचें स्वरूप

लिखित व अलिखितः--राज्यघटनेचीं अनेक रूपें असतात. त्यापैकीं पहिलें ह्मणजे लिखित व अलिखित. एखाद्या देशाचा राज्यकारभार कसा चालावा या संबंधाची स्थूलमानानें एक घटना लिहून ठेवलेली असते. तिला लिखित राज्यघटना म्हणतात. बहुतेक सर्व देशांत लिखित घटनेप्रमाणेंच राज्यकारभार चालतो. ही घटना विशिष्ठ पद्धतीनें बनविलेली असते. केवळ बहुमताच्या बलावर ती तयार होत नाहीं. सर्वसाधारण जनतेची व त्यांच्या प्रतिनिधींची तिला संमति असते. कांहीं कांहीं देशांत अलिखित राज्यघटनाही चालू असते. कायदेमंडळानें कायदे करावे व त्या कायद्याप्रमाणें सरकारनें राज्यकारभार चालवावा. हे कायदे केवळ बहुमतानें पास झालेले असतात. कित्येक बाबतींत काय करावें हें समजत नाहीं, कारण राज्यघटना लिहिलेली नसते. अशा वेळीं अलिखित नियमांचा किंवा घटनात्मक रूढींचा ( convention ) आधार घेऊन निर्णय लावावयाचा असतो. इंग्लंड देशाची राज्यघटना अलिखित आहे. आतांपावेतों पार्लमेंटनें बहुमतानें पास केलेल्या कायद्यान्वयें तेथील राज्यकारभार चालतो. सर्वच कायद्यांना घटनेचें स्वरूप येत नाहीं हें लक्षांत ठेवले पाहिजे. असे कायदे वाटेल तेव्हां पार्लमेंटला बदलता येतात व तें बदलतेंही. पण घटनात्मक कायदे करावयास किंवा बदलावयास तें अतिशय जपून वागतें. लोकमत पूर्ण अजमावून पाहिल्यावर आवश्यक फेरबदल तें करीत असतें. वास्तविक इतकी काळजी घेण्याचें पार्लमेंटला कारण नाहीं, कारण इंग्लंडमध्यें लिखित अशी राज्यघटना नाहींच. तथापि घटनात्मक रूढी पुष्कळशा आहेत. या रूढीपुढें पार्लमेंट नेहमीं मान तुकवितें. या रूढींचें उल्लंघन तें सहसा करीत नाहीं. व केल्यास सर्वत्र अंदाधुंदी माजेल. म्हणून घटनात्मक कायद्यासंबंधानें पार्लमेंटवर व विशेषेंकरून पार्लमेंटचा अध्यक्ष जो स्पीकर त्याच्यावर फार मोठी जबाबदारी असते. पार्लमेंटनें बहुमतानें ठरविल्यावर मुख्य प्रधानाला तुरुंगांत टाकता येईल किंवा त्याचा शिरच्छेदही करता येईल, नोकर लोकांना एक दीडकीनाही

पगार देतां येणार नाहीं, सर्व जनतेवर शंभर टक्क्यानें कर वाढविता येईल किंवा कर अजीबात बंद करता येईल, न्यायकोर्टांचे सर्व अधिकार रद्द करता येतील–सारांश वाटेल तें करता येईल, कारण तेथें लिखित घटनाच नाहीं. पण रूढी मात्र आहेत व त्यांचें उल्लंघन पार्लमेंट सहसा करीत नाहीं. ज्या देशांत लिखित घटना असते तेथें कायदेमंडळांचे हातपाय बांधलेले असतात. त्यांना इतकें स्वैर वर्तन करतां येत नाहीं. राज्यघटनेप्रमाणेंच त्यांना वागावे लागते.

इंग्लंडखेरीज करून बहुतेक सर्व देशांत लिखित राज्यघटना आहेत. याचें कारण असें आहे की राजापासून सर्व सत्ता लोकांनीं आपल्याकडे घेतल्यावर कोणत्या नमुन्याप्रमाणें राज्यकारभार चालवावा हें प्रथम ठरविणें अवश्य असतें. अशी एखादी ठराविक राज्यघटना नसली तर राजा आपल्या हातांत असलेल्या नियंत्रित अधिकारांचाही दुरुपयोग करून पुन्हा आपली अनियंत्रित सत्ता स्थापन करील अशी लोकांना भिती वाटत होती; म्हणून कशीबशी तरी राज्यघटना डोळ्यांसमोर असू द्यावी असें त्यांना वाटणें साहजीकच होतें.

**दृढ व लवचीक राज्यघटना:-(Rigid & Flexible)** राज्यघटनेचें दुसरे स्वरूप म्हणजे ती दृढ किंवा लवचीक असणें. दृढ राज्यघटनेंत केव्हांही बदल होत नाहीं. कदाचित् लिखित घटना ज्या विशिष्ट पद्धतीनें बदलते त्याचप्रमाणें दृढ घटनाही बदलू शकते. पण लोकांच्या हाडींमासीं ती इतकी खिळलेली असते कीं तींत बदल करणें त्यांनाही अशक्य होते. बहुतकरून लिखित घटना दृढ असतात व अलिखित लवचीक असतात.

लिखित किंवा दृढ राज्यघटनेंत एक मोठा दोष आहे. तो असा कीं बदललेल्या परिस्थितीस ती अनुरूप होत नाहीं. शेकडों वर्षांपूर्वीपासून तयार केलेली व चालत आलेली घटना बदललेल्या परिस्थितीत उत्कृष्टपणें कशी चालावी ? कालमानाप्रमाणें राष्ट्राच्या पुढें येणारे प्रश्नही बदलत असतात. त्यांना तोंड देण्यासाठी पूर्वीची राज्यघटना कित्येकदां असमर्थ ठरते. घटना तयार करतांना शेदीडशें वर्षांनंतर कोणती परिस्थिती निर्माण होईल याचा कयास तेव्हांच्या मुत्सद्यांना बांधता येणें फार कठीण आहे. म्हणून अलिखित राज्यघटना चांगली असें कित्येकांना वाटतें. पण त्यांतही एक मोठाच दोष आहे. कित्येकदां राष्ट्राला घोर आपत्तींच्या प्रसंगांतून जावें लागतें. त्यावेळीं लोकांची मनें भावनाप्रधान होतात व या भावनेच्या भरांत हवे तसे घटनात्मक ( constitutional ) कायदे करून अडचणींतून पार पडण्याची प्रवृत्ति होते. पण प्रसंग निघून गेल्यावर प्रक्षुब्ध झालेलें लोकमत स्थीर व शांत होतें, व नंतर घाईघाईनें बदलेल्या घटनेंतील दोष दिसून पश्चाताप होतो. आतां कोणी असें म्हणेल कीं यांत पश्चाताप होण्याचें कारणच काय ? राज्यघटना तर अलिखितच आहे ना ? ती बदलण्याचा आपले हातीं अधिकारही आहेच. परिस्थिती बदलल्यानें आतां तीही बदलूं या ! पण तसें करणें धोक्याचें असते. राज्यघटना, लिखित असो, अलिखित असो, शक्य तोपर्यंत, बदलू नये. ती एक राज्याची नियंत्रणशक्ती आहे–परमपवित्र अशी एक शक्ती आहे. तींत वारंवार बदल केल्यानें राज्यकारभारांत अनियंत्रितपणा व बेजबाबदारपणा बोकाळतो. लोकांच्या मनांत संशयाला जागा होते. त्यांना आपल्या हक्कांच्या सुरक्षितपणाबद्दल

शंका वाटूं लागते. देशांत तीव्र असंतोष पसरतो. आपण हिंदुस्थानचेंच उदाहरण घेऊं या. कल्पना करा कीं या देशांत अलिखित घटना आहे. कालान्तरानें अल्पसंख्याक व बहुसंख्याक जातींमध्यें भांडणें जुपलीं व या यादवीला उग्र स्वरूप प्राप्त झालें, तर लिखित राज्यघटना नसल्यामुळें बहुसंख्याक असलेला हिंदुसमाज हवे ते घटनात्मक कायदे अल्पसंख्यांकांविरुद्ध करून त्यांना दडपून टाकील. पुढें स्थीरस्थावर झाल्यावर, व लोकांचीं मनें शांत झाल्यावर हे सर्व कायदे रद्दही करता येतील. पण ते रद्द केले तरीही अल्पसंख्याक लोकांच्या अंतःकरणांतून बहुसंख्याकंविषयीची तेढ जावयाची नाहीं. प्रसंग आला तर पुन्हा आपल्याविरुद्ध बहुसंख्याक समाज हवे ते कायदे करील अशी त्यांना नेहमीं भिती वाटावयाची. तेव्हां या दोघांमध्यें कायमचीच फळी उत्पन्न होण्याचा संभव आहे व असें झाल्यास लोकसत्ताक राज्यपद्धतीच्या सुरळीत अंमलबजावणीला अल्पसंख्यांकाचा विरोध निसंदेह बाधकच होईल. देशांत बंडाळी माजून राहिली म्हणजे लोकसत्ता कमकुवत होते. राजसत्तेप्रमाणें लोकसत्तेला अशा असाधारण परिस्थितीला यशस्वीपणें तोंड देतां येणें फार कठीण. वास्तवीक हिंदुस्थानांतील बहुसंख्याकांसंबंधानें अशी भिती बाळगणें सर्वस्वी निराधार आहे. आपण येथें केवळ कल्पनाच केली. हिंदुस्थानांत अलिखित राज्यपद्धती असणेंच शक्य नाही. तथापि एवढें मात्र खरें की ज्या देशांत जातिमत्सरानें लोक एकमेकांपासून दूर झाले आहेत, जेथें राष्ट्रीयत्वाची जळती ज्योत निरंतर तेवत नसते, जेथें आपापसात फूट व दुफळी उत्पन्न झालेली आहे किंवा होण्याचा संभव आहे तेथें अलिखित व लवचिक राज्यघटना यशपूर्वक चालूं शकणार नाहीं.

**संयुक्त व एकमुखी राज्यघटना:-** (Federal & Unitary) राज्यघटनेचें संयुक्त व एकमुखी असेही दोन प्रकार आहेत. राज्याचा विस्तार मोठा असला म्हणजे किंवा राज्यांत निरनिराळ्या जातीचें किंवा राष्ट्रीयत्वाचे लोक मुख्यतः राहत असले म्हणजे किंवा राज्यकारभाराच्या दृष्टीनें राज्याच्या निरनिराळ्या घटकांचे हितसंबंध भिन्न भिन्न असले म्हणजे संयुक्त राज्यघटना सामान्यतः अमलांत आणली जाते. उलटपक्षीं राष्ट्रीयत्वाच्या कसोटीवर लोक पूर्णपणें उतरलेले असून इतिहास, धर्म, परंपरा, आर्थिक व सांस्कृतिक हितसंबंध इत्यादि बंधनांनी त्यांचें एकीकरण झालेलें असते अशा देशांत, मग तो लहान असो वा मोठा असो, एकमुखी राज्यघटना सामान्यतः अमलांत आणली जाते. संयुक्तसंस्थानें, आस्ट्रेलिया, स्विट्झर्लंड इत्यादि देशांत पहिल्या प्रकारची राज्यघटना असून इंग्लंड, फरान्स, हिंदुस्थान या देशांत एकमुखी आहे.

संयुक्त राज्यघटनेंत राज्यकारभारासाठीं पाडलेले प्रान्त अगर संस्थानें यांच्या हातीं बरीचशी सत्ता असते. किंबहुना मध्यवर्ती सरकार अस्तित्वांत येण्यापूर्वी हे वेगवेगळे राजकीय विभाग आपापला कारभार स्वतंत्रपणें पहात असतात. व इतर विभागांतील लोकांशीं त्याचें सांस्कृतिक एकीकरण झालेलें असल्यानें ते आपापलें राजकीय एकीकरण करून घेतात व त्यासाठीं आवश्यक म्हणून आपापलें स्वातंत्र्यही मर्यादित करून घेतात. असें केल्यानें त्याचें स्वातंत्र्य नष्ट होतें असें कोणी समजूं नये. उलटपक्षीं असल्या एकीकरणानें-किंवा संयुक्तीकरणानें-बारक्यासारख्या दोऱ्याधाग्याचा जसा मजबूत दोरखंड तयार होऊं शकतो तशा प्रकारें हें

संयुक्त झालेलें राष्ट्र अधिक सामर्थ्यवान् होतें. असें एकीकरण झाल्यानंतरच संयुक्त सरकार अस्तित्वांत येते; म्हणजे एकूण त्याचें जनकत्व प्रांत किंवा इतर सर्व स्वतंत्र राजकीय विभागांकडेच असतें. आणि म्हणून संयुक्त राज्यघटनेंत राज्याच्या निरनिराळ्या घटकांकडे अधिक स्वातंत्र्य असतें. सामान्यत: अवशिष्ट अधिकार ( Residuary powers) प्रांतांनींच आपल्याकडे राखून ठेवलेले असतात. राज्यघटना तयार झाली म्हणजे अर्थातच राज्यकारभाराच्या कांहीं बाबी मध्यवर्ती सरकाराकडे व कांहीं प्रांतिक किंवा प्रादेशिक राजकीय विभागांकडे सोंपविलेल्या असतात. परंतु त्याचवेळीं म्हणा किंवा कालान्तरानें म्हणा, असें कांहीं प्रश्न उद्‌भवतात कीं ते प्रांतिक सरकारनें सोडवावे कां मध्यवर्ती सरकारनें या बद्दल राज्यघटनेंत मुळीं उल्लेखच सांपडत नाहीं. अशा वेळीं काय करायचे ? म्हणून राज्यघटनेंतच नमूद करून ठेवलेले असतें कीं अशी परिस्थिती उत्पन्न होतांच अकल्पितपणें मधूनच उद्‌भवलेल्या बाबीसंबंधाचा कारभार स्थानिक विभागांकडे–प्रांताकडे रहावा. म्हणजे अवशिष्ट अधिकार प्रांताकडेच आलेत. क्वचित ठिकाणी हे अवशिष्ट अधिकार मध्यवर्ती सरकाराकडेच देण्यांत येतात. पण तसें करणें संयुक्त राज्यघटनेच्या मूलभूत तत्वाशीं व स्वरूपाशीं पूर्ण विसंगत आहे. संयुक्त राज्यघटना म्हटली म्हणजे त्यांत अवशिष्ट अधिकार प्रांतिक सरकारकडेच रहावयाचे, मग राज्यकारभाराच्या सोयीसाठीं कोणी हा क्रम बदलला तर गोष्ट वेगळी !

संयुक्त राज्यघटनेमुळें भिन्न भिन्न राष्ट्रांचें एकीकरण होऊं शकतें. म्हणून एकमुखी राज्यघटनेंतील मध्यवर्ती सरकाराप्रमाणें या घटनेंतील मध्यवर्ती सरकार सर्वव्यापक व सर्व शक्तिमान् राहूं शकत नाहीं. यूरोपखंडात कित्येक देशांत अनेक राष्ट्रें आहेत–म्हणजे अनेक जातींचे लोक रहात आहेत. राष्ट्र व राज्य यांच्या सीमा एकच हव्यात असाही बराच प्रयत्न झाला पण व्यर्थ. पण संयुक्त राज्यघटनेच्या विद्यमानें प्रत्येक राज्यांत असलेलीं राष्ट्रें आपापल्या परीनें स्वतंत्र राहूनही एकत्र होऊं शकतात.

संयुक्त राज्यघटनेचा एक मोठा दोष असा कीं तेथील मध्यवर्ती सरकार, अवशिष्ट अधिकार प्रांताकडे गेल्यानें, असावें तेवढें प्रबळ नसतें. यामुळें राज्यावर संकटें ओढवलीं म्हणजे त्याला त्यांना यशस्वीपणें तोंड देणें कठीण होऊन बसतें. त्याची सारी भिस्त प्रांताच्या सहाकारितेवर अवलंबून असते. मध्यवर्ती सरकार प्रबळ नसल्यामुळें कित्येक राज्यें लयाला गेलेलीं आहेत. कांहीं कांहीं संयुक्त घटनेंत प्रादेशिक एकीचीं बंधनें इतकी शिथिल असतात कीं निरनिराळ्या राजकीय विभागांत हवें तेव्हां वेगळें होऊन त्यांना स्वतंत्रपणें राहतां येतें. संयुक्तघ टनेच्या अशा स्वरूपाला ' कॉनफेडरेशन ( Confederatoin )असें म्हणतात.

याच्या उलट एकमुखी राज्यघटना असते. यांतील मुख्य सरकार फारच प्रबळ असून प्रांतिक सरकारावर त्याचा चांगला दाब राहतो. सर्व प्रांत अथवा राजकीय विभाग यांवर अवश्यक देखरेख व नियंत्रण ठेवण्याचें त्याचें कर्तव्य असतें. राज्यकारभाराच्या महत्वाच्या व विशेष जबाबदारीच्या बाबी त्याच्याचकडे असतात. अवशिष्ट अधिकार तें आपल्या स्वाधीनच ठेवतें. ज्या देशांत फारसे जातीय भेद नाहींत, किंवा सांस्कृतिक भिन्नता नाहीं तेथें एकमुखी राज्यकारभार सुरू करणें केव्हांही इष्टच आहे. किंवा राज्यकारभाराच्या

सोयीसाठीं संयुक्त घटनेंतील अवशिष्ट सत्ता मध्यवर्ती सरकाराकडेच राहूं देणें चांगलें—त्यांतच देशाचें खरे हित असतें; कारण ही सत्ता प्रांतांकडे गेली तर त्यांना हवा तसा दुरुपयोग होतो व त्यामुळें मध्यवर्ती सरकार खिळखिळे होतें. अशा वेळीं राष्ट्रावर घोर अपत्ती ओढवली किंवा ठिकठिकाणीं बंडें उद्‌भवलीं तर त्यांचा प्रतिकार करण्याचें सामर्थ्य त्यांत राहत नाहीं. अर्थात हे निरनिराळे प्रांत अथवा राज्यांतील घटक अवशिष्ट सत्ता गमावून आपलें स्वातंत्र्य मर्यादित करून घेण्यास तयार असले पाहिजेत एवढेंच. पण राष्ट्रहिताच्या दृष्टीनें तसें करणेंच अधिक शहाणपणाचें होईल. किंवा तसें न केल्यास राष्ट्रीय आपत्तीच्या कालांत मध्यवर्ती सरकाराकडे सर्व सत्ता राहील असें तरी एखादें कलम राज्यघटनेंत नमूद करून ठेवलेलें बरें. त्यामुळें आणीबाणीच्या प्रसंगीं मुख्य सरकाराला सर्वांचें सहाय्य लाभून संकटांना यशस्वीपणें तोंड देतां येईल.

# लोकसत्ताक कायदेमंडळें

## प्रकरण ३ रें.

प्रत्येक राज्यघटनेंत मध्यवर्ती व प्रांतिक कायदेमंडळें किती, कोणत्या प्रकारें तीं निवडलेलीं असावींत, त्यांचें कार्यक्षेत्र, अधिकार–मर्यादा व जबाबदारी कोणती, दोन मध्यवर्ती कायदे-मंडळांत बेबनाव किंवा मतभेद उत्पन्न झाला तर तो कसा सोडवावयाचा, प्रधानमंडळ कसें स्थापन व्हावयाचें, विधिमंडळाचा त्यावर अविश्वास असला तर त्यानें काय करावयाचें, निवडणुकी कोणत्या तत्वावर किंवा कोणत्या पद्धतीनें व्हावयाच्या, मध्यवर्ती व प्रांतिक सरकाराच्या अधिकारांतल्या बाबी कोणत्या व त्या संबंधानें अधिकारक्षेत्राविषयीं दोघांमध्यें मतभेद झाला तर निर्णय कोणी द्यावयाचा वगैरे गोष्टीसंबंधानें प्रामुख्यानें उल्लेख असतो. सारांश, राज्यघटना म्हणजे राज्यकारभाराच्या पद्धतीचा कायदा असें म्हटल्यास अधिक बरें. या प्रकरणांत वर दिलेल्या सर्व गोष्टींचें आपणास विवेचन करावयाचें आहे.

### (१) कायदेमंडळें.

कायदेमंडळें हीं लोकसत्ताक घटनेचीं अत्यंत महत्वाचीं अंगें आहेत. लोकसत्तेची अंमलबजावणी कशी काय होत आहे हें पाहणें, व लोकसत्तेच्या योग्य विकासाला किंवा प्रगतीला आवश्यक असणारे कायदे पास करून घेणें, प्रधानमंडळावर नियंत्रण ठेवणें, राज्यकारभाराला लागणारा पैसा मंजूर करणें, कोठेंसा अन्याय होत असला तर तो दूर करणें, हीं कायदेमंड-ळाचीं महत्वाचीं कामें होत. लोकसत्तेचें नियंत्रण व संरक्षण करून तिला प्रगतीच्या मार्गावर नेण्याचें कायदेमंडळ हें महत्वाचें साधन आहे.

**वरचे व खालचे कायदेमंडळ:**—बहुतेक देशांच्या राज्यघटनेंत या दोन मंडळांची योजना केलेली असते. मध्यवर्ती राज्यकारभारांत एकच कायदेमंडळ असलेला देश विरळा. प्रत्येक देशाच्या दृष्टीनें तेथें दोन मंडळें असणें हितावह अतएव आवश्यक आहे. अर्थात दोघांचेंही मुख्य काम कायदे करणें हें आहे. पण बहुतकरून खालच्या कायदेमंडळांत प्रथम बिलें किंवा ठराव येतात व तेथें ते पास झाल्यावर ते वरच्या मंडळांत विचार करण्यासाठीं किंवा त्यांत दुरुस्ती करण्यासाठीं नेण्यांत येतात.

वरचे मंडळांत समाजांतील किंवा देशांतील वरच्या पायरीचे प्रतिनिधी बसतात. व खालचे मंडळांत सामान्य लोकांचे प्रतिनिधी असतात. प्रत्येक देशांत तीन स्थितींतले लोक

असावयाचे. भांडवलवाले धनवान लोक, पराक्रमी सरदार, सुशिक्षित व सुसंस्कृत विद्वान् व धर्मप्रणेते हे सर्व उच्च वर्गांत (aristocracy) येतात. सामान्य धंदेवाईक लोक व केवळ नोकरीवर उदर निर्वाह करणारे सुशिक्षित लोक हे मध्यम वर्गांत येतात. व मोलमजूरी व काबाडकष्ट करून कशी तरी पोटाची खळगी भरणारे लोक कनिष्ठ वर्गांत येतात. बहुधा वरचे मंडळांत उच्च वर्गांतील लोकांचें प्रतिनिधी असतात. हे लोक व्यवहारकुशल व सुविद्य व वजनदार असतात. वाईट कायदे अमलांत आले तर भांडवलवाल्यांचें जास्त नुकसान होतें. हे लोक सरकारला जास्त करही देत असतात. म्हणून देशाच्या कारभारांत हस्तक्षेप करण्याचा त्यांना अधिकार असणें जरूरच आहे. म्हणूनच वरचे कायदेमंडळाला खालचे मंडळानें केलेल्या कायद्यांना अनुमति द्यावयाची असते किंवा त्यांत इष्ट ती दुरुस्ती सुचवावयाची असते. खालचे मंडळांत मध्यम व कनिष्ठ वर्गांचे प्रतिनिधी असतात. याचा असा अर्थ कोणी करूं नये कीं या मंडळांत अतिविद्वान व अतिधनवान लोक निवडून येत नाहींत. येतात; पण वरच्या या दोन्ही वर्गांचे प्रतिनिधी म्हणून. त्यांनीं आपलें स्वतःचें धोरण पुढें दामटलें व तें या वर्गाला अहितकारक असले तर आपले प्रतिनिधी म्हणून हा कनिष्ट वर्ग त्यांना खास निवडून द्यावयाचा नाहीं. सारांश, खालचे मंडळांत सामान्य लोकांचे व वरचे मंडळांत उच्च वर्गांचे प्रतिनिधी असतात.

पण प्रत्येक लोकसत्ताक देशांत खालचे मंडळास अधिक महत्व असतें. याचें कारण असें कीं देशांतील बहुतेक लोक मध्यम व कनिष्ट वर्गांतलेच असतात, व उच्च वर्गापेक्षां याच दोन वर्गांत पुष्कळ पटीनें अधिक मतदार असतात. साहजीकच यांचे पुष्कळ प्रतिनिधी कायदेमंडळांत निवडून येतात. लोकसत्तेचा उपयोग वरच्या वर्गापेक्षां खालच्या दोन वर्गांनाच अधिक होतो; निदान व्हावा तरी. अर्थात कांहीं कांहीं देशांत लोकसत्ता पूर्णत्वास पोंचली नसल्यानें अधिकाराची वाटणी उच्च वर्गाकडे जास्त येते. पण आज ना उद्या सामान्य जनतेच्या हातीं सर्व सत्ता यावयाचीच. म्हणून त्यांचे प्रतिनिधी ज्या मंडळांत जास्त असतात त्यास अधिक महत्व प्राप्त होणें अवश्य आहे.

आतां कोणी असें म्हणेल कीं खालचे मंडळाला जर प्राधान्य देण्यांत येतें तर वरचे मंडळाकडे इतका अधिकार का ? खालचे मंडळानें केलेले कायदे तपासणीसाठीं किंवा दुरुस्तीसाठीं वरचे मंडळांत यावयाचे तर लोकसत्तेचें अस्तित्व किंवा वर्चस्व राहिलें कोठें ? या योगें उच्च वर्गाच्या स्वाधीन जास्त अधिकार दिल्यासारखें होत नाहीं का ? हें म्हणणें रास्त आहे. म्हणूनच कित्येकांना असें वाटतें कीं वरचे मंडळाचें अजीबात उच्चाटन व्हावें, लोकशाहींत त्याला मुळीं स्थानच नसावें, तें मंडळ अगदीं निरुपयोगी आहे. कारण खालचे मंडळानें पास केलेले कायदे त्यानें दुरुस्त केले किंवा फेटाळून लावले तर तें टवाळखोर व त्रासदायक समजलें जातें व ते जसेच्या तसेच अंधपणें पास केले तर तें अप्रयोजक अतएव अजागलाच्या स्तनाप्रमाणें निरर्थक आहे असें म्हणावें लागतें ! एवींतेवीं त्याचा कांहीं उपयोग नाहीं, म्हणून तें मंडळ काढूनच का टाकूं नये ?

पण तसें करणें चुकीचें होईल. कारण, सामान्यतः खालचे मंडळ अधिक भावना-

प्रधान व ध्येयवादी असतें. त्यांतील सर्व सभासद लोकप्रिय पुढारी असल्यानें लोकहितासाठीं काय करूं व काय नाहीं असें त्यांना होऊन जातें. या भरांत कित्येक प्रसंगीं त्यांना हवा तसा विवेक-पोंच रहात नाहीं. केव्हां केव्हां व्यवहाराला सोडून त्यांचें वर्तन होतें व आपण आणलेले ठराव किंवा बिलें व्यवहार्य होतील का याचें त्यांना भान नसतें. उचंबळलेल्या मनोवृत्तींच्या वातावरणांत त्यांचें म्हणणें कायदेमंडळ ऐकतेंही. उलटपक्षीं वरचे मंडळांत थंडया विचारसरणीचे सभासद, अनुभविक व वृद्ध मुत्सद्दी, राजकारभारांत मुरलेले पुढारी, व नेहमी जपून वागणारे मोठमोठे भांडवलवाले असतात. या सर्वांच्या तपासणीच्या व टीकेच्या प्रखर अग्नींतून एकादें बिल तावूनसुलाखून निघालें म्हणजे तें सोन्यासारखें शुद्ध होतें. त्यांत योग्य ती दुरुस्ती झाली म्हणजे तें अधिक कार्यक्षम बनतें. राष्ट्राच्या इतिहासांत लोकांच्या मनोवृत्तीमध्यें खळबळ उडवून देणारे अनेक प्रसंग उद्भवतात. अशा वेळीं सुखाचा व सुरक्षितपणाचा क्षुण्ण मार्ग बाजूला सारून राष्ट्र निराळयाच मार्गाला लागण्याचा संभव अधिक. म्हणून या प्रकारचे प्रसंग आले असतां वरचे कायदेमंडळ बुडत्याला काडीच्या आधाराप्रमाणें रक्षक व मार्गदर्शक होत असतें. वेळप्रसंगीं राष्ट्राला तारणारा तो विद्वतेचा, शहाणपणाचा व दूरदर्शित्वाचा सांठाच आहे. म्हणून त्या मंडळाला अर्धचंद्र देणें अविवेकाचें व अहितकारक होईल. सामान्यतः तें निरुपयोगी असलें तरी सर्व राष्ट्रांनीं आपत्कालीं विमा असें त्यास समजून जतन करून ठेवलें आहे.

त्या मंडळाविषयींची दुसरी भितीही निराधार आहे. खालच्या मंडळानें पास केलेले बिल तपासण्याचें, त्यांत दुरुस्ती करण्याचें किंवा तें फेटाळून लावण्याचें काम जरी या वरचे मंडळाकडे असतें तरी ते आपल्या अधिकाराचा सहसा दुरुपयोग करीत नाहीं. खालचें मंडळ अधिक लोकमतानुवर्ती, लोकप्रिय, लोकोपयोगी अतः महत्वाचें आहे ही गोष्टही समजत नाहीं इतके कांहीं तेथील सभासद दुधखुळे नसतात. त्यांना आपले अधिकार कळत असले तरी त्यांना पुष्कळशा मर्यादा आहेत हेंही त्यांना नीट समजतें. आपण पदोपदीं खालच्या मंडळाच्या कार्यांत विघ्नें उपस्थित केलीं तर त्याचा परिणाम इष्ट व्हावयाचा नाहीं, लोकक्षोभ भडकेल ही त्यांना भीती असतेच. फार तर ते खालच्या मंडळाचें बिल लांबणीवर टाकतील पण अखेर ते त्यास संमती देतील. तेव्हां हाही मुद्दा गौण आहे.

शिवाय उच्च वर्गाच्या लोकांना खालच्या कायदेमंडळांत बसणें उचित वाटत नाहीं. कां वाटूं नये हें खरें, पण वस्तुस्थिती मात्र अशी आहे. पण या वर्गानें राजकारणावर बहिष्कार टाकणें इष्ट नाहीं. म्हणून त्याची कोठें तरी सोय केली पाहिजे. ही सोय वरचे मंडळांत उत्तम होऊं शकते. राजकारणाच्या झटापटीच्या मामल्यांत हे लोक प्रत्यक्षपणें भाग घेत नाहींत. त्यांना तसें करणें आवडतही नाहीं. पण या रीतीनें त्यांची सोय केली तर प्रत्येक राष्ट्राला या वरचे मंडळाचा उत्तम उपयोग होऊं शकेल यांत शंका नाहीं.

**कार्यावरोध:**—वरचें मंडळ जरी सहसा खालचे मंडळानें केलेल्या कायद्याला विरोध करीत नाहीं तरी एकादेवेळीं तो फेटाळनही लावण्यांत येतो. अशा वेळीं काय करावें हा मोठाच

प्रश्न पुढें येतो. या दोन कायदेमंडळांतून एकादें बिल पसार झाल्यानंतर लोकसत्ताक राज्याचा जो मुख्य कर्णधार-याला अध्यक्ष म्हणण्याचा प्रघात आहे-तो त्यावर आपली सही करून अनुमति दर्शवितो. पण वरच्या मंडळानें तें बिल फेटाळून लावलें म्हणजे कार्यावरोध होतो. पुढें या बिलाचें काय करावें हें समजत नाहीं. तें रद्द करावें असें म्हटलें तर अधिक प्रातिनिधिक व लोकसत्ताक असें जें खालचें मंडळ त्यानें तें पास केलेलें! म्हणून प्रत्येक लोकसत्ताक राज्यघटनेंत असा कार्यावरोध उत्पन्न झाल्यास कांहींतरी तडजोडीची पद्धत सुचविलेली असते. अशा वेळीं एक तर दोन्ही मंडळें एकत्र होऊन ठराविक मतानें तें बिल पास करतात. त्याला तेवढीं मतें पडलीं नाहींत तर तें बिल नापास झालें असें समजण्यांत येतें. हें बहुमत साधारणत: दोन तितीयांश किंवा तीन चतुर्थांश असावें लागतें. किंवा वरच्या मंडळानें एकादें बिल फेटाळून लावलें म्हणजे तें अध्यक्षाकडे जातें. हा अध्यक्ष लोकनियुक्त असल्यानें खरें लोकमत अमुक बिलाला अनुकूल आहे का प्रतिकूल आहे हें त्यास चांगलें ठरवितां येतें. किंबहुना त्याला ठरविण्याचा अधिकारही पोंचतो. याप्रमाणें तो मनाशीं निश्चय करून त्या बिलाला आपली पसंति अगर नापसंती देतो. हा तडजोडीचा दुसरा प्रकार झाला. तिसरा प्रकार असा कीं एकादें बिल वरच्या मंडळानें रद्द केलें किंवा त्याची काटछाट केली व ती खालच्या मंडळाला पसंत पडली नाहीं, तर तेंच बिल तें मंडळ आपल्या प्रत्येक बैठकींत पास करून घेतें, व तें तीनदां पास झाल्यावर लोकमत त्याला अत्यंत अनुकूल आहे असें समजण्यांत येऊन तें पास झालें असें जाहिर करण्यांत येतें. ही पद्धत इंग्लंडमध्यें चालू आहे. हिंदुस्थानांत मात्र आपल्या हातांत असलेल्या जादा अधिकाराचा उपयोग करून गव्हर्नरजनरल त्या बिलाची वासलात लावीत असतो. अर्थात हें कृत्य लोकसत्ताक परंपरेला अनुसरून नसतें हें उघड आहे.

**कायदेमंडळाची मुदत:**-कायदेमंडळांत लोकांचे प्रतिनिधी असतात. म्हणून त्यांत एकंदर लोकमताचा प्रवाह प्रतिबिम्बित होतो. लोकसंमतीनें जर राज्यकारभार चालावयाचा तर लोकमतांत फरक पडतांच कायदेमंडळाच्या रचनेंतही फरक पडणें जरूर आहे. म्हणजे एकदां निवडलेले सभासद जनतेचे खरेखुरे प्रतिनिधी अधिक कालपर्यंत राहूं शकत नाहींत. कारण लोकमतांत केव्हां बदल होईल याचा नेम नसतो. म्हणून प्रत्येक कायदेमंडळाची मुदत ठरलेली असते. ती मुदत संपतांच तें विसर्जन पावतें. मग दुसरी निवडणूक होऊन निवडून आलेले प्रतिनिधी त्यांत बसतात.

प्रत्येक कायदेमंडळाची मुदत ठरलेली असते. खालचे मंडळाची मुदत तीन पासून पांच वर्षेपर्यंत असते. व वरचें मंडळाची पांच पासून नऊ वर्षेपर्यंत.

दरवर्षी कायदेमंडळाची निवडणूक व्हावी असें कित्येकांचें म्हणणें आहे. कारण, त्यामुळें लोकांचे खरे प्रतिनिधी कोण हें समजून पडतें. लोकसंमतीनें राज्यकारभार चालण्यासाठीं शक्य तितक्या लवकर ही निवडणूक व्हावयास पाहिजे. त्यामुळें लोकमतही अधिक प्रबळ होऊन त्याचा सरकारावर चांगलाच वचक बसेल व निर्भेळ लोकसत्तेचें अस्तित्व सिद्ध होईल. पण ही सूचना विचारार्हही नाहीं. कारण प्रतिवार्षिक निवडणुकीमुळें बरीच हानी होते. प्रथमत:

सरकारास व तसेंच उमेदवारांना दरवर्षी खर्च पडावयाचा. दुसरें, उमेदवारांचें सारें लक्ष कोण-त्याना कोणत्याही प्रकारें जास्त मतें मिळविण्याकडे वेधतें. तिसरें, कायदेमंडळाचे सभा-सदत्व फारच अस्थिर असल्यानें उद्योगधंद्यांत पडलेल्या पुढाऱ्यांना आपलीं कामें सोडून दरवर्षी निवडणुकीच्या धामधुमींत पडण्यांत आकर्षण रहावयाचें नाहीं. या योगें राजकारण हाच ज्यांचा धंदा व पैसे कमविण्याचें साधन झालें तेच उथळ लोक सर्व जागा पटकावून राज्यकारभाराची राखरांगोळी करतील. चवथें कारण असें कीं उमेदवार एकदाचा निवडणुकींत यशस्वी होऊन कायदेमंडळाचा सभासद झाला कीं राज्यकारभाराची पद्धती' त्यांतील बारीकसारीक गोष्टी, कायदेमंडळांत वागण्याचे नियम, मागील सर्व इतिहास वगैरे नीट समजण्यास त्याला वर्षसहामहिने सहज लागतात. तेव्हां कोठें त्याला काम करण्याची आवड उत्पन्न होते. पहिले नऊ दहा महिने निघून गेल्यावर त्याचें लक्ष पुन्हा आपल्या मतदार संघाकडे जातें. आपण पुन्हा निवडून कसें येणार ही काळजी त्यच्यामागें लागते व मतदार मिळविण्याच्या प्रयत्नास तो लागतो. बरें, प्रयत्न करून दुसऱ्यांदा तो निवडुकींत अपेशी ठरला कीं साराच ग्रंथ आटोपला. त्यानें पहिल्या कायदेमंडळांत मिळविलेला अनुभव फुकट गेला. त्याच्या ऐवजीं निवडून आलेल्या नवाड्याला पुन्हा एक वर्ष अनुभव घेण्यांतच खर्च करावा लागतो. राष्ट्रहिताच्या दृष्टीनें नवखे व अननुभवीक सभासद कायदे मंडळांत असणें अत्यंत हानीकारक आहे. त्यांच्या अज्ञानाचा सरकार म्हणजे प्रधानमंडळ हवा तसा उपयोग करून आपलें कार्य करतें. असल्या सभासदांमुळेंच कार्यकारीमंडळ बेजबाबदार होण्याच्या मार्गाला लागतें. त्यामुळें लोकसत्तेचा दुबळेपणा मात्र वाढत जातो. या सर्व कारणांवरून प्रतिवार्षिक निवडणूक राष्ट्रहिताला बाधक आहे असें दिसून येईल.

खालच्या मंडळाला तीन किंवा पांच वर्षांची मुदत चांगली. दरवर्षी कांहीं लोकमत बदलत नसतें. शिवाय वर्षभर एकादा प्रतिनिधी कायदेमंडळाचा सभासद राहिला म्हणजे काम करण्यासाठीं त्याला पुरेसा अनुभव मिळतो. त्याच्यापुढें आणखी दोन किंवा चार वर्षे असतात. या कालांत त्याचें कार्य सुरळीतपणें चालतें.

पण खालच्या कायदेमंडळाची मुदत त्रिवार्षिक किंवा पंचवार्षिक असली तरी तोपर्यंत मंडळाचें जीवित बहुधा टिकून रहात नाहीं. कारण कायदेमंडळाला जबाबदार असलेलें जे प्रधानमंडळ उर्फ कॅबिनेट त्यास आपलें धोरण सुसंगतपणें व नेटानें या मुदतींत चालवितां येत नाहीं. अर्थात हा कांहीं नियम नाहीं. प्रधानमंडळाच्या मागें खालच्या मंडळांतील बहुमताचा जोरदार पाठिंबा असला म्हणजे तीनच काय पण पांच वर्षेसुद्धा तें अधिकारभ्रष्ट होत नाहीं. पण कायदेमंडळांत त्याच्या धोरणाला भक्कम विरोध असला व त्याचें बहुमत हळूहळू अल्पमत होऊं लागलें तर त्या कॅबीनेटचें जीवन अगदी चंचल झालेंच समजा. एकाद्या महत्वाच्या बिलावर प्रतिपक्षाच्या विरोधाचा भडका उडाला व तें बिल फेटाळून लावण्यांत आलें तर प्रधानमंडळ आपल्यावर कायदेमंडळाचा विश्वास नाहीं, आपण लोकमताप्रमाणें वागत नाहीं असें समजून राजीनामा देतें. व जर प्रधानांना असें वाटलें कीं देशांतील मतदार आपल्या धोरणाला पाठिंबा देतील, पण कांहीं विशिष्ट कारणास्तव कायदेमंडळांतील बहुसंख्य लोक

विरोध करीत आहेत तर मग तें तत्काल दुसरी निवडणूक करवितें. आपला पक्ष पुन्हा बहुसंख्येनें निवडून आला तर पुन्हा तें राज्यकारभाराचीं सूत्रें हातीं घेत असतें. पण जर कां या प्रधानमंडळाला निवडणुकींत मिळणाऱ्या यशाबद्दल शंका वाटूं लागली तर नवी निवडणूक न होतां लगेंच दुसरें प्रधानमंडळ स्थापन होतें. व पुढें कायदेमंडळाची मुदत संपतांच दुसरी निवडणूक कायद्याप्रमाणें होत असते. आतां येथें आपण निवडणुकीसंबंधानें विचार करूं.

## (२) निवडणुकी.

लोकसत्ताक राज्यकारभारांत लोकप्रतिनिधींची निवडणूक ही अत्यंत महत्वाची बाब आहे. किंबहुना या शिवाय मोठमोठया देशांत लोकसत्ता स्थापन होणें अशक्यच झालें असतें. प्राचीन ग्रीसमध्यें लोकसत्ता होती पण त्यांत लहानलहानशीं नगर-संस्थानें होतीं म्हणूनच. आतां लोकसत्तेची व्याप्ति वाढली असल्यानें लोकप्रतिनिधींची निवड करणें आवश्यक आहे. या निवडणुकीचे मुख्य दोन प्रकार आहेत.

**प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष निवडणुकी:**-देशांतील सर्व लोकांनाच मतदानाचा अधिकार मिळत नसतो. लुले, पांगळे, चोर, पागल, भिकारी, लहान अठरा किंवा २१ वर्षांच्या आंतील मुलें व बहुधा स्त्रिया यांना मतदानाचा हक्क मिळत नाहीं. कारण, देशांत यांचा हितसंबंध विशेष नाहीं. देशाचा राज्यकारभार चालविण्यास जे लोक प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष मदत करतात किंवा करूं शकतात त्यांना हा अधिकार प्राप्त होतो. अलीकडे स्त्रियांनाही मतदानाचा अधिकार मिळूं लागला आहे. अशा या मतदारांनीं निवडणुकींत स्वत: होऊन प्रत्यक्ष भाग घेतला तर त्याला प्रत्यक्ष निवडणूक म्हणतात. कित्येकवेळां असें होतें कीं लोकांनीं निवडलेले प्रांतिक कायदेमंडळ, स्थानिक स्वराज्य संस्था (जसे म्युनिसिपालिटी किंवा लोकलबोर्ड) किंवा विद्यापीठाचें लोकनियुक्त मंडळ यांतील सभासद मध्यवर्ती कायदेमंडळांत आपल्यापैकींच प्रतिनिधी निवडतात. अशा निवडणुकीला अप्रत्यक्ष निवडणूक म्हणतात. पण या लोकसत्तेच्या युगांत अशा निवडणुकी जास्त प्रमाणांत होत नाहींत. कारण मतदारांना त्यांत प्रत्यक्ष भाग घेतां येत नाहीं.

**प्रतिनिधित्वाचे प्रकार:**-ठराविक कालांत निवडणुकी करून लोकांचे प्रतिनिधी निवडावयाचे असतात. पण निवडणुकीनें नेहमीं खरें लोकमतच प्रगट होतें असें म्हणणें चुकीचें आहे. ज्या पक्षाजवळ पैसा मुबलक असून त्याची व्यवस्थाही उत्कृष्ट असते तो पक्ष बहुधा मताधिक्यानें निवडून येतोच. कित्येकदां तर असेंही होतें कीं कायदेमंडांत एखाद्या पक्षाचें बहुमत आहे, तर त्या पक्षाच्या सभासदांना एकंदर मिळालेल्या मतांची मोजणी व बेरीज केली तर तींत कांहीं बहुमत दिसून येणार नाहीं. निवडणुकीच्या तत्वांत हा दोष असला तरी प्रतिनिधी निवडण्याचें त्याशिवाय दुसरें साधन उपलब्ध नाहीं. निवडणुकीच्या अनेक पद्धती असतात; पैकीं कांहीं महत्वाच्या पद्धतींचा येथें विचार करूं.

**(१) एक मतदारसंघ-एक सभासद:**—मतदारांच्या सोयीसाठीं संबंध देशाचे लोकवस्तीच्या प्रमाणांत मतदारसंघ पाडलेले असतात. लहान लहान मतदारसंघ बनवून प्रत्ये-

कांतून एकेक सभासद निवडून घेण्याची एक पद्धत आहे. इंग्लंड देशांत हीच पद्धति मुख्यतः प्रचारांत आहे. ही अत्यंत सोयीची व बिनकटकटीची आहे. दोन किंवा अधिक उमेदवार उभे राहतात; त्यापैकीं एकच निवडावयाचा असतो. म्हणून मतदारांना एकच मत असतें. ज्याला जास्त मतें पडतील तो निवडून येतो. या पद्धतीनें झालेल्या निवडणुकींत बरेचसे उमेदवार उभे राहिले तर सुसंघटित अल्पसंख्याक समाजाला किंवा पक्षाला आपल्याच एकाद्या उमेदवाराला सर्व मतें देऊन यश मिळूं शकतें. तसेंच एका जागेसाठीं दोनापेक्षां अधिक उमेदवार उभे राहिले तर यशस्वी झालेल्या उमेदवाराला मिळालेलें बहुमत म्हणजे मतदारांचें त्याच्या बाजूलाच बहुमत आहे, असें म्हणतां येणार नाहीं.

(२) Cumulative Vote—कित्येकदां मतदारसंघ फारच मोठे असतात व त्यांमधून दोन किंवा तीन सभासद निवडावयाचे असतात. अशा निवडणुकींत प्रत्येक मतदाराला जितके सभासद निवडावयाचे असतात तितकीं मतें असतात. त्यानें आपलीं सर्व मतें एकाच उमेदवाराला द्यावीं किंवा प्रत्येकाला एक एक द्यावें-कशाही रीतीनें मतें दिलीं तरी चालतें. या पद्धतींत अल्पसंख्याक समाजांचा बराच फायदा होतो. ते मतदार आपल्याच समाजाच्या उमेदवारांस आपलीं मतें देतात. बहुसंख्याक समाजाचे बरेच उमेदवार उभे राहिल्यास मतांची बरीच वाटणी होते. म्हणून अल्पसंख्याक समाजाचे उमेदवार यशस्वी होण्याचा संभव बराच असतो. निदान एखादी जागा तरी त्याला सहज पटकावितां येते. ही पद्धती देखील बरीच सुटसुटीत आहे.

(३) प्रमाणशीर प्रतिनिधित्व:-Proportional Representation. तत्वतः ही पद्धति उत्कृष्ट आहे. ज्या देशांत अनेक अल्पसंख्याक पक्ष, समाज किंवा जाति आहेत त्या देशांत निदान लोकसंख्येप्रमाणें आपापले प्रतिनिधी निवडून यावेत अशी सर्वांची इच्छा असते. आणि वस्तुतः तीच खरी लोकसत्ताक परंपराही आहे. अल्पसंख्याक पक्षानें, समाजानें किंवा जातीनें निवडणुकी जिंकून राज्यकारभार हातीं घ्यावा हें खऱ्या लोकसत्तेशीं विसंगतच होय. तेव्हां प्रमाणशीर प्रतिनिधित्वाचें तत्व सर्व प्रकारें योग्य आहे असेंच म्हणावें लागतें. या मतदानाच्या पद्धतीनें बरेचसे सभासद निवडून देतां येतात. समजा एकूण आठ सभासद निवडून यावयाचे आहेत. या आठ जागांसाठीं वीस उमेदवार उभे आहेत. मतदारांच्या संख्येला वीसनें भाग द्यावयाचा. जेवढा भागाकार येईल तेवढीं पहिल्या पसंतीचीं मतें (First Preferential Votes) ज्या उमेदवारांना मिळतील ते निवडून आले. असें समजावें. ज्यांना आवश्यक असलेल्या पहिल्या पसंतीच्या मतांपेक्षां अधिक मतें पडलीं तीं सर्व मतें आतां (पहिल्या मोजणींत आठही सभासद निवडून न आल्यामुळें) दुसऱ्या पसंतीच्या सर्वांत जास्त मतें पडलेल्या उमेदवाराकडे जातील व अशा रीतीनें आवश्यक मतें त्याच्या वाट्याला येतांच तो निवडून येईल. त्या मोजणींत उरलेलीं मतें त्याच्या खालच्या उमेदवाराच्या वाटयाला जातील, व या प्रमाणें तोही निवडून येईल. या प्रमाणें मतदारांनीं दिलेलीं मतें एका उमेदवारापासून दुसऱ्या उमेदवाराकडे जातात म्हणून याला 'चलत् मत' (Transferable Vote) असें म्हणतात. या पद्धतींत मतदाराला

उदाहरणार्थ आठ जागांसाठीं, आठ मतें नसतात; पण पहिली पसंती, दुसरी पसंती, तिसरी पसंती या प्रमाणें जितके उभे आहेत तितक्या पसंती मतपत्रिकेंत उमेदवाराच्या पुढें १, २, ३, ४ असे आंकडे घालून आपलीं मतें प्रदर्शित करता येते. ही पद्धति अतीशय भानगडीची असून मोजणी करण्यांत फार त्रास पडतो व कालक्षेप होतो. म्हणून या पद्धतीचा शक्य तेवढा कमी उपयोग करण्यांत येतो.

**द्वितीय मतदानपद्धति:**–कित्येक अत्यंत महत्वाच्या निवडणुकींत, खरें लोकमत कोणीकडे आहे हें पहावयाचें असल्यास, निदान दोनदां मतदान होतें. पहिल्या मतदानाच्या वेळीं (दोनपेक्षां अधिक उमेदवार एका जागेसाठीं उभे राहिले असल्यास) एखाद्याला सर्वांत जास्त मतें पडलीं तरी त्याला देशांतलें बहुमत असतेंच असें नाहीं. अशा वेळीं ज्याला सर्वांत कमी मतें पडलीं त्याला वगळण्यांत येऊन पुन्हा दुसऱ्यांदा उरलेले उमेदवार निवडणुकी लढवितात. यावेळीं ज्याच्याकडे एकंदर मतदारांचें बहुमत दिसून येईल त्याला निवडण्यांत येते.

याप्रमाणें या प्रकरणांत कायदेमंडळासंबंधानें सर्व बाजूंचा विचार झाला. कायदेमंडळें स्थापन झाल्यावर पुढील मुख्य काम म्हणजे प्रधानमंडळाची स्थापना हें होय. याचा विचार पुढच्या प्रकरणांत करूं.

# लोकसत्ताक प्रधानमंडळ

## प्रकरण ४ थें.

लोकमताच्या दृष्टीनें कायदेमंडळ ही जशी अत्यंत महत्वाची त्याचप्रमाणें लोकसत्ताक राज्यकारभाराच्या दृष्टीनें प्रधानमंडळ ही अत्यंत महत्वाची बाब आहे. कायदेमंडळाच्या विश्वासाचें व लोकसत्तेच्या सुरक्षिततेचें तें मुख्य प्रतीक आहे.

**प्रधानमंडळाची रचना:**-निवडणुकींत ज्या पक्षाचे प्रतिनिधी सर्वांत अधिक प्रमाणांत यशस्वी होतात त्या पक्षाच्या मुख्य पुढाऱ्याला लोकसत्ताक राज्याचा अध्यक्ष किंवा ज्या देशांत नियंत्रित राजसत्ता आहे तेथील राजा बोलावितो, व त्यास आपलें प्रधानमंडळ स्थापन करावयास सांगतो. ही पद्धत पुष्कळशा देशांत प्रचलित असून तीच विशेष सोयीचीही आहे. सर्व प्रधानमंडळ स्वत: स्थापन करण्यापेक्षां ही जबाबदारी अध्यक्षानें यशस्वी पक्षाच्या मुख्य पुढाऱ्यावर टाकणें बरें. कारण राज्यकारभाराची जबाबदारी मुख्य प्रधानावर असल्यानें आपले सहकारी एकदिलाचे असणें हें त्याच्या दृष्टीनें अत्यंत जरूर आहे. त्याच्या प्रधानमंडळावर सामुदायिक जबाबदारी असते. म्हणून राज्यकारभाराच्या धोरणाला सर्वांचा पूर्ण पाठिंबा हवा. मतभेद उत्पन्न झाला तर कशी तरी तडजोड करून घ्यावी लागते. तसें न झालें तर ज्या प्रधानाचें इतरांशीं पटत नसेल त्याला राजीनामा देण्याची पाळी येते. एकूण, कायदेमंडळाला प्रधान-मंडळांत फूट आहे असें समजतां कामा नये कारण; तेवढ्याच गोष्टीचा फायदा घेऊन विरोधी पक्ष सरकारवर कांहीं ना कांहीं कारणांवरून तुटून पडतो व त्यामुळें प्रधानमंडळाचें जिवित डळमळीत होण्याचा संभव असतो. ही पद्धत इंग्लंडमध्यें व इतर सर्व लोकसत्ताक राष्ट्रांत चालू आहे.

प्रधानमंडळ निवडण्याची दुसरी रीती अशी-लोकनियुक्त अध्यक्ष कायदेमंडळांत निवडून आलेल्या व आपल्या पक्षाच्या किंवा मताच्या धोरणानें वागण्यास तयार असलेल्या कांहीं पुढाऱ्यांना बोलावून स्वत:च प्रधानमंडळ अथवा कार्यकारी मंडळ स्थापितो. एकंदर मतदारांनीं त्याला बहुमतानें निवडून दिलेले असल्यानें तो या मंत्रिमंडळाचा मुख्य होतो. त्याच्या तंत्रानें इतरांना वागावें लागतें. अशा या मंडळावर सामुदायिक जबाबदारी नसते. अध्यक्षाच्या धोरणाला एखाद्या मंत्र्यानें विरोध केला तर त्यानें खुशाल राजीनामा द्यावा; पण एकदा स्थापन झालेलें हें मंत्रिमंडळ अध्यक्ष आपल्या पदावर आहे तोंपर्यंत जीव धरून राहतें. इंग्लंड, फरान्स वगैरे देशांच्या मंत्रिमंडळाप्रमाणें त्याचें जीवन अस्थिर नसतें. ही पद्धत संयुक्त संस्थानांत चालू आहे.

लोकसत्तेतील मंत्रिमंडळ निवडण्याचा आणखी एक प्रकार आहे. अध्यक्ष स्वतः हें काम करीत नाहीं. लोकांनीं निवडून दिलेले खालच्या व वरच्या कायदेमंडळांतील सर्व सभासद एकत्र जमून मंत्रिमंडळाची निवड करतात. यामुळें मंत्रिमंडळांतील सभासदांत आपआपसांत मतभेद असला तरी काम चालू राहतें. आपापल्या खात्यापुरता प्रत्येक सभासद कायदेमंडळाला जबाबदार असतो. या मंडळाचा त्याच्यावर विश्वास नसला किंवा त्यानें आणलेलें एकादें बिल या मंडळानें फेटाळून लावलें तर त्यास आपली जागा रिकामी करावी लागते, किंवा कायदेमंडळाच्या सल्यानें चालावें लागतें. ही पद्धति फार चांगली आहे. ती जास्त व्यवहार्य आहे. तींत जास्त स्थैर्य आहे. मंत्रिमंडळावर सामुदायिक जबाबदारी नसते. ज्यानें त्यानें आपलें काम लोकमताप्रमाणें केलें म्हणजे झालें. कायदेमंडळाची पुन्हा निवडणूक होईपर्यंत त्याच्या कामकाजांत प्रत्यवाय येत नाहीं. ही पद्धत स्विट्झर्लंड या देशांत कमीजास्त बदल करून चालू आहे.

**मंत्रिमंडळाचें कार्यक्षेत्रः**-एकदां मंत्रिमंडळाची स्थापना झाली म्हणजे सभासदांमध्यें राज्यकारभाराची निरनिराळीं खातीं वाटून देण्यांत येतात. सर्व मंडळानें सर्व खात्यांत लुडबुड करणें इष्ट नाहीं. ज्याच्या त्याच्या आवडीनिवडीप्रमाणें व योग्यतेप्रमाणें खात्याची वाटणी झाली म्हणजे काम सुरळीत चालतें. तो मंत्री आपापल्या कामात निपुण असतो आणि सरावानें व अनुभवानें ही निपुणता वाढत जाते.

राज्यकारभाराची अनेक खातीं पाडलेलीं असतात; जसें, परराष्ट्रसंबंध, लष्कर व आरमार उद्योगधंदे व कारखाने, फडणविशी, रेल्वे, शेतकी, शिक्षण, दळणवळण, न्याय, आरोग्य अंतर्व्यवस्था, इत्यादि. कार्याच्या व्याप्तीप्रमाणें प्रत्येक मंत्र्याकडे एकाददुसरें-बहुधा एकच-खातें असतें. प्रत्येक मंत्री आपापल्या खात्यापुरता जबाबदार असतो. त्या खात्यासंबंधानें कायदेमंडळांतील सभासदानें प्रश्न विचारला तर त्याला उत्तर द्यावें लागतें.

या मंत्र्यांच्या मदतीसाठीं पुष्कळसे चिटणीस असतात. प्रत्यक्ष राज्यकारभार चालविण्याची सर्वांवर जबाबदारी असते. प्रत्येक खात्याचीं स्वतंत्र हपीसें असतात. त्यांतील बडेबडे अधिकारी मंत्रिमंडळाला मदत करण्यास, आवश्यक माहिती पुरविण्यास व त्यांच्या धोरणाप्रमाणें चालावयास नेहमीं तत्पर असतात.

राज्यकारभाराचें धोरण ठरविणें व त्याची अंमलबजावणी करणें हें मंत्रिमंडळाचें मुख्य कार्य होय. या धोरणाला अनुसरून कायदे करावयाचे व ते कायदेमंडळांतून पास करून घ्यावयाचे असतात. मंडळांतील बहुसंख्य सभासदांचा बहुधा त्यांना पाठिंबा असतोच, त्यामुळें हें कार्य सुकर होतें. तथापि मंडळांत अनेक पक्ष असले तर या कार्यांत बराच अडथळा उपस्थित होतो. प्रधान मंडळाच्या पक्षाच्या सभासदांची संख्या सर्वांत जास्त असली तरी कित्येकदां त्यांच्या मागें पुरेसें बहुमत नसतें. अशा परिस्थितींत त्याला दुसऱ्या पक्षाची मदत मिळवावयाची असते. कारण तसें केलें नाही तर बहुमत विरुद्ध बाजूला पडून मंत्रीमंडळाला

राजीनामा देण्याची पाळी यावयाची. म्हणून आपणास पास करून घ्यावयाचे कायदे मदत देणाऱ्या पक्षाला किंवा पक्षांना पसंत पडतील की नाही याकडेही त्याला लक्ष द्यावें लागतें. केव्हां केव्हां दुसऱ्या पक्षाच्या एक दोन पुढाऱ्यांना आपल्या मंत्रिमंडळांत स्थान देऊन त्यांना खुष ठेवावें लागतें. दोन तीन पक्षाचे पुढारी मिळून जें मंत्रिमंडळ निर्माण होतें त्यास मिश्र मंत्रिमंडळ म्हणतात. अशा प्रकारचें मंडळ जास्त दिवस टिकाव धरून रहात नाहीं. कारण, कोणत्याही पक्षाला पूर्णपणें आपल्या धोरणाप्रमाणें चालणें अशक्य असतें.

**मंत्रिमंडळाचें पतन:**–इंग्लंडच्या धर्तीवर ज्या ज्या देशांत राज्यघटना चालू आहेत, त्या त्या देशांत मंत्रिमंडळाचें जीवन मोठेंच अस्थिर असतें. कारण कायदेमंडळांतील बहुमत त्याच्या एकाद्या प्रमुख बिलाच्या विरुद्ध गेलें म्हणजे त्यास राजीनामा द्यावा लागतो. इंग्लंडमध्यें मंत्रिमंडळानें राजीनामा देतांच बहुधा निवडणूक होते. त्याच नमून्याची राज्यघटना असलेल्या फरान्स देशांमध्यें तसें बहुतेक होत नाहीं. याचें कारण असें कीं इंग्लडमध्यें अनेक पक्ष नाहींत. एका अधिकारांत असलेल्या पक्षाच्या विरुद्ध बहुमत गेलें म्हणजे मंत्रिमंडळावर कायदेमंडळाचा विश्वास नाहीं असें सिद्ध होतें, आणि ज्यावर कायदेमंडळाचा व पर्यायानें एकंदर मतदारांचा विश्वास नाहीं असा पक्ष अधिकारांत राहूं देणें हें लोकसत्तेच्या तत्वांशीं विसंगत आहे. म्हणून लोकांचा विश्वास कोणत्या पक्षावर जास्त आहे हें अजमाविण्यासाठीं निवडणूक करावी लागते. पण फरान्समध्यें सरासरी आठ दहा पक्ष असल्यानें कोणत्याही पक्षाला कायदेमंडळांत असलेल्या एकंदर सभासदांपैकीं अर्ध्यापेक्षां अधिक सभासदांनीं पाठिंबा द्यावा व तो सतत चालू ठेवावा, असें होणें प्राय: अशक्यच आहे. एकाच पक्षाचे इतके सभासद कधींच निवडून येत नाहींत. म्हणून तेथें प्रधानमंडळाचें जीवित फार अस्थिर असतें. केव्हां केव्हां तर वर्षांतून दोन तीनदां नवीन मंत्रिमंडळ स्थापन करण्याचा प्रसंग येतो. अशा स्थितींत प्रधानमंडळानें राजीनामा देतांच निवडणुकी करणें म्हणजे कालाचा व पैशाचा शुद्ध अपव्यय होय, व असेंही होत गेलें तर देशांतील सूज्ञ, घरंदाज, उद्योगधंदेवाले लोक राजकारणांत विशेष भाग घेण्याचें सोडून देतील. म्हणून एका मंत्रिमंडळानें राजीनामा दिल्यावर फरान्सचा अध्यक्ष निराळें मंत्रिमंडळ स्थापन करण्याच्या प्रयत्नास लागतो व लवकर दुसरें मिश्रमंडळ तयार होतें.

पण जेथें इंग्लंडच्या धर्तीवर राज्यघटना नाहीं तेथें कायदेमंडळाची मुदत संपतांच दुसरी निवडणूक होते व या निवडून आलेल्या प्रतिनिधींचा ज्यावर विश्वास आहे असें नवीन मंत्रिमंडळ स्थापन होतें. इंग्लंडमध्यें सुद्धां जर एखाद्या पक्षाच्या मागें आपल्याच पक्षाचे एकंदर पार्लमेंटमध्यें बहुमत होईल इतकें लोक असले तर त्याचें जीवित पांच वर्षेंपावेतों राहतें. तेथें दर पांच वर्षांनंतर निवडणुकी होतात. तेव्हां मात्र हें मंडळ बदलण्याचा संभव असतो. पण तोच पक्ष जर बहुमतानें पुन्हा निवडून आला तर थोडासा आवश्यक फेरबदल करून जुनेंच मंत्रिमंडळ अस्तित्वांत येतें. इंग्लंडच्या इतिहासांत एकाच पक्षानें वीसवीस पंचवीस पंचवीस वर्षें राज्यकारभाराचीं सूत्रें अव्याहत चालविलेलीं उदाहरणें आहेत. पण अलीकडे

लोकमत अधिक प्रबल झालें असल्यानें व परिस्थितीप्रमाणें पक्षापक्षांच्या धोरणांतही बरेच बदल होत असल्यानें प्रधानमंडळाला एवढें स्थैर्य कधींच प्राप्त होत नाहीं.

एकूण प्रधानमंडळ हें लोकसत्तेचें एक प्रमुख अंग आहे. तें आपली सर्व शक्ति लोकमताच्या अनुकूलतेंतूनच संचित करीत असतें. लोकसत्ताक कायदेमंडळाला तें सर्वस्वी जबाबदार असतें. गाडीवाला ज्याप्रमाणें आपल्या घोड्याची लगाम आपल्या हातांत ठेवून त्याला हव्या त्या दिशेकडे व हव्या त्या गतीनें नेतो, तद्वतच कायदेमंडळ मंत्रिमंडळाला इष्ट त्या धोरणानें फिरवीत असतें. फरक एवढाच कीं घोड्याप्रमाणें हें मंत्रिमंडळ नम्र व आज्ञाधारक नसून कायदेमंडळाच्या सल्ल्याचा व बहुमताचा जसा त्यावर परिणाम होतो तसेंच मंत्रिमंडळही अनेक प्रसंगीं कायदेमंडळाला मार्गदर्शक व उपदेशक होत असतें. या अन्योन्य संबंधाचा बनाव जितका सुरळीत व प्रेमभावप्रेरित होईल तितकाच लोकसत्तेचा काल सुरक्षितपणाचा होऊन अखिल जनसमुदाय सुखी व संतुष्ट होईल.

# लोकसत्ता व पक्षसंस्था

## प्रकरण ५ वें

लोकसत्तेच्या दृष्टीनें देशांत वेगवेगळे पक्ष असणें अत्यंत जरूर आहे. कारण लोकसत्ताक राज्यकारभार चालविण्याची जबाबदारी लोकांना या राजकीय पक्षांशिवाय उत्तमपणें पार पाडतां यावयाची नाहीं. अनियंत्रीत राजसत्तेंत अशा पक्षांची मुळीं गरजच नसतें, निदान त्यांना उपयुक्त कार्य करून दाखविण्यास हवा तसा वाव नसतो. लोकशाहींत मात्र पक्षांशिवाय राज्यकारभारांत सुरळीतपणा यावयाचा नाहीं किंबहुना लोकसत्तेंत पक्षनिर्मिती होणें आवश्यकच नव्हे, अपरिहार्य आहे.

**पक्षसंस्थेची उपपत्ति:**–'भिन्नरुचिर्हि लोक:' असें म्हणतात तें खरें आहे. अगदीं क्षुल्लक बाबतींत सुद्धां आपण नित्य पाहतों कीं मनुष्यांमध्यें एकमत सहसा होत नाहीं. राजसत्तेंत पुष्कळशा लोकांनीं एकत्र होऊन एकजुटीनें काम करण्याची संधि फारशी येत नाहीं. पण लोकसत्तेंत अनेक लोकांनी एकमत होऊन काम केल्याशिवाय चालत नाहीं. असें जर आहे व मनुष्यांमनुष्यांमध्यें मतभेद उत्पन्न होणें हेंही जर स्वाभाविक आहे तर या दोन भिन्न गोष्टीं-मध्यें एकवाक्यता व्हावयाची कशी ? येथें पक्षसंस्थेची आवश्यकता भासते. देशांत निरनिराळे पक्ष स्थापन झाले म्हणजे लोक आपापल्या प्रवृत्तीप्रमाणें त्या त्या पक्षाला जाऊन मिळतात. या पक्षांच्या बावटयांखालीं राहून समान मनोवृत्तीचे पुष्कळ लोक ऐक्यभावनेनें प्रेरीत होऊन लोकसत्तेचें कार्य सुकर करतात. अनेक लोकांचें एकीकरण करण्याचें पक्षसंस्था हें एक उत्तम साधन आहे.

**पक्षांचें धोरण:**–प्रत्येक पक्षाला कांहींतरी ठराविक धोरण असतेंच. लोकसत्ताक राज्यकारभारासंबंधानें, समाजव्यवस्थेसंबंधानें किंवा एकंदर राष्ट्रापुढें ठेवलेल्या ध्येयासंबंधानें सर्वांचें मत सारखें असणें असंभव आहे. कोणाला वाटतें आपल्या देशानें साम्राज्य बनवावें, व असलेलें वाढवावें, त्याच्यासाठीं उत्तम लष्कर, आरमार किंवा विमानें ठेवावीं, देशविस्तार व नाविक सत्ता वाढल्यानें व्यापाराची भरभराट व्हावी व आपल्या देशांतील धंदेवाल्यांना अलोट फायदा व्हावा व त्यांनाच अनुकूल असे कायदे करावे. कांहीं लोकांना असें वाटतें कीं जगांत शांतता नांदावी व त्यासाठीं आपल्या देशानें आक्रमणशील राष्ट्रीयत्वाला बळी न पडतां आवश्यक असेल तितका स्वार्थत्याग करावा. किंवा नम्रतेचें व विनयशीलतेचें धोरण ठेवून जगाची सेवा करावी; कारण निरहंभावानें व परोपकारबुद्धीनें जे जगाचे सेवक बनतात

तेच खरेखुरे त्याचे स्वामी होण्याच्या योग्यतेस पोंचतात. व्यक्तीप्रमाणें राष्ट्रानेंही विश्वसेवेचें व्रत पाळावें. कित्येकांना असें वाटतें कीं लोकसत्ता हीच राज्यघटनेच्या उत्क्रांतीची परमोच्च सीमा आहे, म्हणून तिचें संरक्षण करणें, तिचा विकास करणें हेंच परम कर्तव्य ठरतें. तसेंच शिक्षणामध्यें सुधारणा करावी, शेतकऱ्यांची स्थिती सुधारावी, कारखान्यांत काम करून पोटाची खळगी भरणाऱ्या असंख्य मजुरांना अन्न व वस्त्रप्रावरण पुरेसें मिळावें एवढी तरी तरतूद राष्ट्रानें करावी असेंही पुष्कळांना वाटत असतें. व अलीकडे तर पुष्कळांचें असेंही मत होऊं लागलें आहे कीं समाजाची एकंदर घटना जीर्ण वृक्षाच्या खोडाप्रमाणें कुजलेली असून त्याची नवीन तत्वावर पुनर्घटना करावी; भांडवलवाल्या लोकांच्या हातून सर्व सत्ता लुबाडून ती मजुरांच्या हातीं द्यावी व तिची व्यवस्था त्यांनींच पहावी. हे व या प्रकारचे अनेक मार्ग राष्ट्रासमोर असतात. व राष्ट्रांतील निरनिराळे पक्ष यांपैकीं एकादा व त्यांच्याशीं विसंगत नसलेल्या इतर मार्गांचा अवलंब करतात.

प्रत्येक मनुष्याच्या पुढें जसें कोणतें ना कोणतें तरी ध्येय असतें त्याचप्रमाणें प्रत्येक पक्षाच्या पुढेंही असतें. त्या खेरीज एखादा पक्ष अस्तित्वांत येणेंच शक्य नाहीं. त्या ध्येयाला अनुसरून उपायांची योजनाही करण्यांत येते व तो पक्ष अधिकारांत आल्यावर आपल्यापुढें असलेल्या ध्येयाच्या सिद्ध्यर्थ प्रयत्न करीत असतो.

**पक्षाची घटना**:-पक्षसंस्था ही एक अत्यंत महत्वाची संस्था असल्यानें तिलासुद्धां घटना असणें आवश्यक आहे. उद्देश, मार्ग, एकंदर धोरण व रचना या संबंधानें तींत उल्लेख केलेला असतो. एक अध्यक्ष, दोन तीन उपाध्यक्ष, एक मुख्य चिटणीस व एक दोन सहाय्यक चिटणीस, एक कोशाध्यक्ष-इतक्या अधिकाऱ्यांची निवड करण्यांत येते. पक्षाचा अध्यक्ष अतिशय वजनदार व लोकप्रिय पुढारी असतो. संयुक्त संस्थानांत तर पक्षाच्या अध्यक्षाचें इतकें वजन असतें कीं राष्ट्राध्यक्ष व कॉंग्रेसचे सदस्य यांनाही त्याच्या म्हणण्याकडे दुर्लक्ष करतां येत नाही. विशेषेंकरून तो पक्ष अधिकारांत असला तर अप्रत्यक्ष व कायद्यांच्या बंधनांच्या पलीकडे असलेलें असे तें छोटेखानी सरकारच होतें. सर्व महत्वाचें कायदे पास होण्यापूर्वी त्याची गर्भित संमति घेण्यांत येते. या अध्यक्षाचें वजन लोकांना सहसा माहितहि व्हावयाचें नाहीं, लोकांच्या दृष्टीसमोर तो फारसा आलाही नसेल; पण राजकारणाचे सर्व धागेदोरे तो गुप्तपणें हलवीत असतो. संयुक्त संस्थानांत या पक्षसंस्थांचें जितकें प्राबल्य आहे तितकें दुसऱ्या कोणत्याही देशांत नाहीं.

कायदेमंडळांत असलेले निरनिराळ्या पक्षांचे सभासद आपापले अध्यक्ष, चिटणीस व व्हिप निवडतात. एकाद्या बिलावर वादविवाद होत असतांना आपल्या पक्षानें कोणीकडे मत द्यावयाचें या विषयीं हुकूम सोडणें, महत्वाच्या ठरावाच्या वेळीं आपल्या पक्षाच्या सर्व लोकांना येण्याबद्दल सूचना देणें व आपल्या पक्षाच्या एखाद्या तत्वानुरूप बिलाची वासलात लावण्यासाठीं हवे ते सर्व प्रयत्न करणें हें या व्हिपचें मुख्य काम असतें.

**पक्षाचें कार्य**:-लोकसत्ताक देशांमध्यें प्रत्येक पक्षाच्या कामगिरीला महत्व असतें. पक्षाशिवाय लोकसत्ताक राज्यपद्धति हवी तशी यशस्वीही व्हावयाची नाहीं. पक्षसंस्थेचीं खालीं दिल्याप्रमाणें मुख्य कामें असतात:-

(१) सर्वांत महत्वाचें काम म्हणजे निवडणुकी लढविणें. कायदेमंडळाची मुदत संपली किंवा अगोदरच प्रधानमंडळाचें पतन होऊन त्यानें लोकमत अजमावून पाहण्याचें ठरविलें म्हणजे निवडणुक होते. सर्व पक्षांची निवडणुकीची मोहीम सुरू होऊन व्याख्यानांना अगदीं पूर येतो. जो तो उमेदवार आपपल्या मतदारसंघांकडे जाऊन आपल्या पक्षाचें धोरण समजावून सांगतो व आपणास मत देण्यासाठीं मतदारांना विनंति करतो. निरनिराळ्या पक्षांचे अध्यक्ष आपल्या पक्षाचें ध्येय व कार्यक्रम जनतेच्या पुढें ठेवतात व आपण केलेल्या कार्याचा पाठ वाचून दाखवितात. निवडणुकीसारख्या धामधुमीच्या कालांत मोठी ताणलेली परिस्थिति उत्पन्न होत असते. परपक्षावर शिव्यांचा व स्वपक्षावर स्तुतीचा वर्षाव करण्यांत जो तो दंग झालेला असतो. खवळलेल्या समुद्राप्रमाणें लोकांचीं मनें क्षुब्ध झालेलीं असतात. जिकडे तिकडे राजकारणाची चर्चा चालू असते. अमुक पक्षानें अमुक प्रसंगीं लोकसत्तेच्या तत्वांशीं विसंगत असलेलें धोरण ठेवलें, अमुक मंत्र्यानें अगदीं बेजबाबदार वर्तन केलें, अमुक प्रतिनिधीनें आपल्या पक्षाविषयीं बेइमानपणा दाखविला, अमुक कायदा पास करावयास पाहिजे पण ऐन वेळीं अमुक पक्षानें दगा दिला, अशा प्रकारचा वादविवाद सर्वत्र चालू होतो. मतदार तयार होतात, कोणता पक्ष लोकांच्या तंत्रानें चालेल हें ते मनाशीं ठरवितात व मतें देण्याची वेळ आली म्हणजे त्याच पक्षाच्या उमेदवारांना मतें देतात. प्रत्येक पक्ष आपले जास्त प्रतिनिधी निवडून यावेत म्हणून प्रयत्नांची शिकस्त करतो. बहुतेक सर्व पक्षांजवळ निवडणुकीचा निधी असतो. गरीब पण लायक उमेदवारांना त्यांचा पक्ष आर्थिक मदत करीत असतो. लांचलुचपतीचेही अनेक मनोरंजक प्रकार या वेळीं पहावयास सांपडतात !

(२) ज्या पक्षाचे सर्वांत जास्त प्रतिनिधी निवडून येतात त्या पक्षावर राज्यकारभाराचीं सूत्रें हातीं घेण्याची जबाबदारी येऊन पडते. राज्याचा अध्यक्ष किंवा मुख्य सूत्रधार त्या पक्षाच्या पुढाऱ्याला निमंत्रण करून त्यास प्रधानमंडळ स्थापन करावयास सांगतो. ही जबाबदारी त्याला अंगावर घेणें अवश्य असते. मग त्याच्या पाठीमागें एकंदर कायदेमंडळांत बहुमत असो वा नसो. त्याला पुरेसें बहुमत नसल्यास इतर पक्षांशीं संगनमत करून मंत्रिमंडळ स्थापन करणें हें त्याचें कर्तव्य ठरतें. तसें करणें त्याला शक्य नसल्यास राज्यकारभाराची जबाबदारी इतर पक्षांवर येऊन पडते. पण तसें बहुधा होत नाहीं; कारण लोकसत्ताक राष्ट्रांत विजयी पक्षानें राज्याचीं सूत्रें हातीं न घेणें हें कर्तव्यविमुखतेचें द्योतक समजलें जातें.

(२) मंत्रिमंडळ स्थापन झाल्यावर इतर पक्षांनीं त्याच्या कारभारावर सूक्ष्म नजर ठेवावयाची असते. प्रधानमंडळ अस्तित्वांत येतांच एक प्रमुख प्रतिपक्षही स्थापन होतो. प्रतिपक्षाच्या पुढाऱ्याला लोकसत्तेंत बराच मान असतो. त्यानें कायदेमंडळांत प्रतिपादन केलेल्या मताला अधिकारारूढ पक्ष सहजासहजीं वाटाण्याच्या अक्षता लावीत नाहीं. अर्थात तें मत आपल्या पक्षाच्या धोरणाशीं पूर्ण विसंगत असलें तरच तिकडे दुर्लक्ष करण्यांत येतें. प्रतिपक्षाचा व इतर विरोधी पक्षांचा मंत्रिमंडळावर बराच वचक असतो. त्याच्या हातून चुका केव्हां घडतात व आपण त्याच्यावर तुटून पडून त्याला जर्जर व क्षीणबल केव्हां करूं यासाठीं ते सर्व टपून बसलेले असतात. या कारणास्तव कोणतीही गोष्ट करण्यापूर्वी मंत्रि-मंडळ अतिशय काळजीपूर्वक विचार करतें, व आपल्या हातून शक्यतोपर्यन्त कोणतीही चूक

घडूं देत नाहीं. हे विरोधी पक्ष कायदेमंडळांत नसते तर प्रधानमंडळाला बेजबाबदारपणें राज्यकारभार चालविण्यास व आपलीं स्वतःचींच मतें देशावर लादण्यास वेळ लागतां ना. लोकसत्ता अशा बेजबाबदार मंडळामुळें क्षीणबल होत असते. म्हणून कायदेमंडळांतील प्रतिपक्ष लोकसत्तेचा कांहीं मर्यादेपर्यंत तरी संरक्षक बनतो असें म्हटलें तर तें वस्तुस्थितीस धरूनच होईल.

एखाद्या महत्वाच्या बिलावर प्रधानमंडळाचा पराभव कसा करतां येईल इकडे या सर्व विरुद्ध पक्षांचें लक्ष असतें. जेथें तेथें त्याचा विरोध करावयाचा हें त्यांचें ब्रीद ठरलेलेंच असतें. त्यांची ही कृति सर्वथा समर्थनीय व सद्हेतुक असतेंच असें नाहीं. त्यांच्या अस्तित्वामुळें लोकसत्तेचें संरक्षण मात्र पर्यायानें होतें. त्यांचा मुख्य हेतु स्वार्थप्रेरितच असतो. अधिकारारूढ पक्षांविषयीं त्यांना मत्सर वाटत असतो. दुष्ट हेतु मनांत असूनही एकादेवेळीं बरी गोष्ट घडते हें या विरोधी पक्षांच्या अस्तित्वानें चांगलें सिद्ध होतें.

(४) पक्षसंस्थेचें चवथें कार्य लोकशिक्षणाचें. अज्ञान, अनभिज्ञ व कर्तव्यपराङमुख मतदारांच्या क्षेत्रांत लोकसत्तेच्या वृक्षाची वाढ होणें अशक्य आहे. मतदारांच्या अज्ञानाचा फायदा घेऊन कित्येक उपटसुंभ पुढारी आपला स्वार्थ साधीत असतात. लोकमत जितकें प्रबळ व सुशिक्षित तितकी लोकसत्ता व्यवस्थित व प्रगमनशील होत असते. आपल्या खऱ्याखुऱ्या धन्यांना सज्ञान करणें, राजकारणाचे त्यांना धडे शिकविणें, राज्यकारभारांत अधिक लक्ष घालणें हें लोकप्रतिनिधीचें एक प्रमुख कर्तव्य समजलें जातें. एकांडे शिलेदार होऊन हें कर्तव्य त्यांना पूर्णपणें बजावतां येणें शक्य नाहीं. एकाद्या पक्षाची कांस त्यांना धरावी लागते. कारण मतदार व्यक्तीच्या मतांपेक्षां पक्षाच्या धोरणाकडे अधिक सहृदयतेनें व सहानुभूतीनें पहातात. अर्थात व्यक्तिमाहात्म्यालाही निवडणुकींत बरेंच स्थान असतें, पण ते फक्त अशिक्षित मतदारसंघ असतांनाच. एखादा उमेदवार स्वतंत्रपणें निवडून आला व त्यानें कोणत्याही पक्षाशीं संमनमत केलें नाहीं किंवा त्याची बाजू धरली नाहीं तर तो एकटा कायदेमंडळांत काय करणार ? सर्व कायदे बहुमतानें पास व्हावयाचे असतात. तेव्हां एखादा कार्यक्रम अमलांत आणावयाचा असला म्हणजे कोणत्याना कोणत्या तरी पक्षाचा कार्यक्रमाशीं एकरूप व्हावें लागतें म्हणजे तो अधिक व्यवहार्य होत असतो. म्हणून निवडणुकींत व्यक्तीपेक्षां पक्षालाच जास्त महत्व प्राप्त होतें.

पक्षाचा आसरा धरून लोकसत्ताक शिक्षणाचें कार्य अधिक सुकर व शीघ्र होतें. निवडणूक होऊन कायदेमंडळ स्थापन झाल्यावर पक्षापक्षांच्या नित्य होणाऱ्या झटापटींकडे सर्व राष्ट्राचें लक्ष वेधतें, व राजकारणांत लक्ष लागणें ही तर लोकसत्ताक शिक्षणाची पहिली पायरी आहे. राज्यकारभारांत जनतेनें मन घालण्याचें कार्य सर्वांत जास्त जर कोणत्या संस्थेकडून होत असेल तर तें राजकीय पक्षसंस्थेकडूनच.

एक निवडणूक झाल्यानंतर दुसऱ्या निवडणुकीपर्यन्त आपल्या मतदारसंघाविषयीं तटस्थता दाखविणें हें बेजबाबदार प्रतिनिधीचें लक्षण आहे. निवडणुकींत यश मिळविणें हेंच केवळ त्याचें कर्तव्य नव्हे, तर वेळोवेळीं आपापल्या मतदारसंघाला कायदेमंडळांत होणारें कामकाज

समजावून सांगणें, आपल्या पक्षानें केलेल्या कार्याचा पाढा वाचून दाखविणें, त्याच्या युक्ततेचें समर्थन करणें, वेळप्रसंगीं त्यासंबंधानें मतदारांचें काय मत आहे हें पाहणें, या सर्व गोष्टी करणें त्यांचें प्रमुख कर्तव्य ठरतें. एकटा प्रतिनिधी कांहीं विशेष कर्तबगारी दाखवूं शकत नाहीं; म्हणून मतदारांपुढें सांगण्यासारखें बहुतेक त्याच्यापाशीं कांहींच नसतें. कायदे-मंडळांत व्यक्तीपेक्षां पक्षांचीच कामगिरी ठळकपणें दिसून येत असल्यानें तिच्याबद्दल दोन शब्द सांगून टाकण्याची अनायासेंच संधी मिळते. प्रत्येक प्रतिनिधीनें असें केलें तरच मतदार-संघाचा त्याच्यावर विश्वास बसतो, मग त्यानें स्वतः कांहीं काम केलेलें असो वा नसो. यामुळें पुढच्या निवडणुकींतही त्याचा त्याला फायदा झाल्यावांचून राहत नाहीं.

वरील विवेचनावरून लोकसत्ताक राज्यकारभारांत पक्षसंस्थेची किती उपयुक्तता आहे हें वाचकांच्या चांगलेंच ध्यानांत येईल. लोकसत्तेंत पक्षसंस्था अपरिहार्य आहे. निवडणुकी लढविणें, प्रधानमंडळ स्थापन करून त्याच्या पाठीमागें कायदेमंडळांतील बहुमताचा पाठिंबा मिळविणें, मतदारांना सुशिक्षित करणें, अधिकारारूढ पक्षावर आपल्या कडक देखरेखीनें नियंत्रण ठेवणें या गोष्टी झाल्याशिवाय लोकसत्ता स्थापन व्हावयाची नाहीं व झाली तरी ती कमकुवत व क्षीणबल अशीच होईल. पण अशा लोकसत्तेंत देशाची प्रगति न होतां उत्तरोत्तर अधोगतीच होत असते. विद्वान, प्रामाणिक, अनुभवीक पुढारी निर्माण न होतां स्वार्थसाधू, खुशामतगार, गचाळ व उथळ पुढाऱ्यांचें चांगलें फावतें. त्यामुळें लोकसत्ता हळूहळू अवनत दशेस जाऊन राष्ट्रीय आपत्तीच्या प्रसंगीं एकादा सर्वसत्ताधारी पुढें येतो व तो राज्यकारभाराचीं सर्व सूत्रें आपल्या ताब्यांत घेऊन अनियंत्रि-तपणें आपल्या सर्व स्वार्थमूलक आकांक्षा तृप्त करून घेण्याच्या मार्गास लागतो. अशी परिस्थिती निर्माण न होऊं देण्यासाठीं पक्षसंस्थेची अत्यंत अवश्यकता आहे. व ही संस्था जसजशी अधिक व्यापक, अधिक प्रबळ व अधिक कर्तव्यशील होत जाईल तसतसें लोकसत्तेला उत्तरोत्तर सुदिन प्राप्त होतील हें सूर्यप्रकाशाइतकें स्पष्ट समजावें.

# लोकसत्ता व पुढारी

## प्रकरण ६ वें

लोकसत्ताक आणि अनियंत्रित राजसत्ताक राज्यकारभारांत एक चटकन ध्यानांत येण्यासारखी गोष्ट ही कीं पहिल्या पद्धतींत लोकांवर जास्त जबाबदारी असते व दुसरींत तिचा पूर्ण अभाव दिसून येतो. खरोखर लोकसत्तेंत एकंदर जनसमुदायाच्या बुद्धिमत्तेवर, स्वार्थावर, वेळेवर व विवेकावर जितका ताण बसतो तितका इतर कोणत्याही प्रकारच्या राज्यकारभारांत बसत नसेल. आणि म्हणूनच लोकसत्तेंत पुढाऱ्यांची फारच अवश्यकता असते. निवडणुकींत भाग घेणें, मतें मिळविण्यासाठीं दारोदारीं हिंडणें, व्याख्यानें देणें, कायदेमंडळांचे सदस्य या नात्यानें काम करणें, राज्यकारभाराचीं सूत्रें हातीं घेणें, स्थानिक संस्थांच्या कारभारांत भाग घेणें इत्यादि बाबतींत कितीतरी पुढाऱ्यांची गरज लागत असते; व ते आवश्यक प्रमाणांत सांपडले नाहींत तर राज्यव्यवस्था कशी चालावयाची ? पण जो देश लोकसत्ताक राज्यकारभारासाठीं पुरेसे पुढारी निर्माण करूं शकत नाहीं तद्देशीय लोकांची लोकसत्तेसाठीं लायकी नाहीं असेंच म्हणावें लागतें.

पण पुढारी मिळणें पुष्कळ सोपें. कीर्ति कोणाला नको असते ? आपण विद्यावान्, संपत्तिवान् व कीर्तिवान् व्हावें असें प्रत्येक मनुष्याला वाटत असतेच. तें त्यास शिकवावें लागत नाहीं. प्रसंग येतांच समाजांतील कर्तबगार लोक, मग ते श्रीमान् किंवा बुद्धिवान् असो अथवा नसो, पुढें आल्यावाचून राहत नाहींत. अशा कर्तबगार व व्यवहारचतुर लोकांना लोकसत्तेंत जितका वाव सांपडतो तितका इतर राज्यपद्धतींत सांपडत नाहीं. म्हणून लोकशाहींत साहजीकपणेंच पुष्कळ पुढारी निपजतात.

**योग्य पुढारी**:-पण केवळ पुढारी मिळाल्यानेंच कार्यभाग होत नाहीं. लोकसत्तेला योग्य पुढारी पाहिजे. जे लोकांच्या अज्ञानाचा फायदा घेणार नाहींत, प्रसंगीं प्रक्षुब्ध झालेल्या वातावरणांत आपलीं मनें विलंचित होऊं देणार नाहींत, आपल्या दूरदर्शीपणाचा व मुत्सद्दीपणाचा योग्य उपयोग करून देशाला सुरक्षित मार्गाची दिशा दाखवितील, लोकसेवा हेंच ज्यांनीं व्रत स्वीकारलेलें असेल असे बुद्धिमान्, विगतमत्सर, प्रामाणिक, अनुभवी गंभीर मनोवृत्तीचे, उदात्त विचारसरणीचे व सरळ राहणीचे पुढारी प्रत्येक देशाला ललामभूत होत असतात. आणि प्रत्येक देशानें आपल्या पुण्याईचा साठा समजून त्यांना जतन केले पाहिजे. देशांत नाना प्रकारचे लोक असावयाचे. त्यांत अज्ञान व देशहिताविषयीं उदासीन असलेल्या लोकांचाच भरणा जास्त. त्यांना भुलथापा देऊन, वाटेल तशी लांच दाखवून, खोटयानाटया गोष्टी

सांगून व त्यांना न समजेल अशा रीतीनें आपली फाजील आत्मस्तुति व परनिंदा करून त्यांच्याकडून कोणी मत मिळविण्याचा प्रयत्न केला तर तो सफल होणार नाहीं असें नाहीं. एवढेंच नव्हे तर कित्येक पुढारी निवडणुकीच्या वेळीं मतें मिळविण्यासाठीं नानाप्रकारच्या अश्लाध्य उपायांचा अवलंब करतातहि. अशा वेळीं मतदारांची फसवणूक होऊन योग्य मनुष्याला मतें मिळत नाहींत व त्याचा राज्यकारभारावर प्रत्यक्ष परिणाम होतो. अर्थात वर वर्णन केलेल्या कसोटीस प्रत्येक पुढारी उतरणें प्राय: असंभव आहे. प्रत्येक देशांत असे पुढारी फार थोडे सांपडतात. परंतु निदान हें आदर्श ज्यांच्यापुढें आहे असे पुढारी जरी सामान्यत: राजकारणांत पडूं लागले तरी कांहीं वाईट नाहीं. त्यामुळें वरील प्रकार घडण्याचें अंशत: तरी थांबेल. तसेंच देशांत अनेक वेळीं वातावरण प्रक्षुब्ध होतें. निवडणुकीच्या वेळीं या क्षोभाला बराच तणाव पडतो. राष्ट्राराष्ट्रांमध्यें हातघाईचे प्रसंग आले, त्यांतील निरनिराळ्या जातींमध्यें कलह माजला, एकादें महत्वाचें बिल निकालांत काढण्याची वेळ आली किंवा इतर कांहीं कारणामुळें लोकांची मनोवृत्ति उचंबळून आली म्हणजे शांतपणें, नि:पक्षपातानें व निर्विकार मनानें विचार करणाऱ्या गंभीर मुत्सद्यांची राष्ट्राला फार गरज भासत असते. कारण यावेळीं शहाणपणाचा सल्ला मिळाला नाहीं तर तें आडमार्गाला जाण्याचा संभव फार; आणि त्यामुळें अनेक अडचणी उद्भवून सामान्य लोक त्रस्त होतात, देशांत बेबंदशाही माजते व ती लोकसत्तेच्या प्रगतीला अनिष्ठकारक ठरते. म्हणून लोकसत्ताक राज्यकारभार सुरळीतपणें चालण्यासाठीं अशा थोर मुत्सद्यांची आवश्यकता अत्यंत तीव्रतेनें भासते. त्याचप्रमाणें पुढाऱ्यांच्या ठिकाणीं सामान्य जनसमुदायाविषयीं सारखी तळमळ लागली असली पाहिजे. त्याशिवाय त्यांच्यानें जनतेचें कोणतेंही कार्य यशस्वीपणानें व्हावयाचें नाहीं. लोकसत्तेंत लोकांना पुढें येण्यासाठीं जसा जास्त वाव असतो तसाच पुढारीपणाचा दुरुपयोग करण्यासहि पुष्कळ संधी असते. स्वार्थी व नालायख पुढारी हव्या त्या रीतीनें लोकांच्या डोळ्यांत धूळफेक करून आपलें काम साधून घेतात. लोक सामान्यत: अज्ञान; तेव्हां त्यांना अशा पाताळयंत्री आपलपोट्यांचीं कारस्थानें कळत नाहींत. स्थानिक स्वराज्यसंस्थेंत शिरून आपला फायदा करून घेणें, संधी साधल्यास लांचलुचपत खाणें, कायदेमंडळांत शिरल्यावर अधिकारारूढ पक्षाशीं गुप्तपणें कट करून त्याच्या बाजूला मतें देणें व त्यामुळें सरकारनें खुष होऊन त्याच्या आप्तेष्टांना मोठमोठ्या नोकऱ्या देणें, व अन्य प्रकारें मदत करणें वगैरे गोष्टी पुष्कळशा लोकसत्ताक राज्यांत दिसून येतात. असल्या उत्तान पुढाऱ्यांचा जनतेला उपयोग न होतां उलट त्यांच्यापासून हानीच होत असते. लोकसत्तेंत एकवेळ कमी शिकलेले पुढारी खपतील, राजकारणांत चांगले वाकबगार नसलेले लोकही चालतील. त्यांच्यामुळें कदाचित थोडी हानीही होईल. पण स्वार्थसाधू मदान्ध पुढाऱ्यांमुळें होणाऱ्या हानीच्या मानानें ती उपेक्षणीय ठरेल. तसेंच राष्ट्राला बुद्धिमान् व अनुभवी पुढारी लाभणेंहि अत्यंत आवश्यक आहे. लोकसत्ताक राज्यकारभार राजसत्तेप्रमाणें सरळ नसतो. तो फारच गुन्तागुंतीचा असून एखाद्याला त्याविषयीं जर खडान्खडा माहिती नसली तर त्याला योग्य रीतीनें राज्यकारभार करतां यावयाचा नाहीं. जेथें लोकसत्ता पूर्णतया स्थापन झाली नाहीं तेथें तरी निदान सनदी नोकर अधिकारारूढ पक्षाच्या अनभिज्ञ मंत्र्यांना व मंडळाच्या सदस्यांना

कायद्याच्या, संप्रदायाच्या किंवा कार्यपद्धतीच्या जाळ्यांत अडकवून आपल्याच तंत्रानें राज्यसूत्रें सहज हलवितात. हे सगदी नोकर वास्तवीक अधिकारांत आलेल्या मंत्रीमंडळाचे सर्वस्वी ताबेदार. पण हे लोक अत्यंत व्यवहारदक्ष, कार्यकुशल व अनुभवी असल्यानें यथातथ्य माहिती असलेल्या मंत्र्यांना त्यांच्या सूचनेच्या विरुद्ध सहसा जातां येत नाहीं. लोकसत्ता कार्यक्षम करून उत्तमपणें चालण्यासाठीं प्रत्येक देशांत अशा प्रकारचे शक्य तितके जास्त पुढारी असणें अत्यंत आवश्यक आहे. किंबहुना जसे लोकपुढारी तशीच लोकसत्ता. लोकसत्तेला आपण बैलगाडीची पाहिजे तर उपमा देऊं. गाडी कितीही सुंदर असो, तिला जोडलेले बैल कितीही चपल असोत; पण जोपावेतों गाडीवान आपल्या कामांत वाकब होत नाहीं तोपावेतों गाडी योग्य मार्गानें जाईल का आड वाटेनें जाईल हें सांगवत नाहीं. कुशल गाडीवान नाठाळ बैलांनाही ताळ्यावर आणील. त्यांना भलत्याच मार्गानें जाऊं देणार नाहीं. तद्वतच राज्यघटनेचें कसेंहि स्वरूप असो, तिच्यांत कितीहि दोष असोत, योग्य पुढारी ती यशस्वी करून दाखवितील यांत तिळमात्र संशय नाहीं. ह्मणून असले पुढारी प्रत्येक देशाला शक्य तेवढे जास्त लाभले ह्मणजे लोकसत्ता प्रगतिवान व बलवान होऊन एकंदर जनता संतुष्ट राहील.

**लोकसत्ता व पुढाऱ्यांची निर्मिती:**–उच्च प्रतीचे पुढारी निर्माण करण्यास लोकसत्ता असमर्थ आहे असें क्वचित प्रतिपादन करण्यांत येते. व इतिहासाच्या आधारेंहि हें कांहीं ग्रंथकार सिद्ध करून दाखवितात. १९ व्या शतकांत मोठमोठे नररत्न उत्पन्न झाले. त्यांनीं आपल्या अलौकिक बुद्धिमत्तेनें, अचाट साहसानें व अद्वितीय कर्तबगारीनें जगास आश्चर्यमुग्ध केलें. असे देदीप्यमान तारे विसाव्या शतकाच्या लोकशाहीच्या कालांत नभोमंडळांत प्रकाशमान झाले नाहींत. हा दोष ते लोकसत्तेच्या माथ्यावर ठेवतात. निवडणुकीच्या धामधुमींत, कायदेमंडळाच्या गुन्तागुन्तींत व लोकशाहीच्या मध्यम प्रतीच्या वातावरणांत असामान्य व श्रेष्ठ प्रतीचे पुढारी काम करण्यास तयार होत नाहींत, निदान उत्साहानें ते राजकारणाशीं समरसून जात नाहींत व त्यामुळें देशाची कल्पनातीत हानि होते असें त्याचें ह्मणणें आहे. मकुलदर्शनीं त्यांचें म्हणणें खरें आहे. पण खालील विवेचनावरून या विधानास फारसा आधार नाहीं असें दिसून येईल.

प्रथमत: एकोणिसावें शतक हा राजसत्तेचा काळ होता. तेव्हां मोठमोठे पुढारी निर्माण झाले म्हणूनच हा आरोप लोकसत्तेवर ठेवण्यांत येतो. पण तो राजसत्तेचा काळ होता असें म्हणण्यापेक्षां तो लोकसत्तेचा उदयकाल होता, लोकसत्ताक चळवळीचा काल होता असें म्हणणें अधिक समुचितक ठरेल. लोकसत्तेच्या भावनेनें, स्फूर्तीनें, लोकांमध्यें नवीन चैतन्य उत्पन्न केलें होतें. राजसत्तेच्या अनियंत्रित जुलुमापेक्षां लोकसत्तेचा सावळागोंधळ बरा असें लोकांना वाटत होते. हा केवळ एक प्रयोग आहे असें समजलें तरी कालान्तरानें त्याला संघटित स्वरूप प्राप्त होऊन परिणामीं तो हितवादी ठरेल असें त्यांना वाटत होतें. कोणतीहि मोठी चळवळ सुरू व्हावयाची तर ती इष्ट मार्गानें न्यावयास अद्भुत सामर्थ्य असलेले पुढारी हवे. आम्हाला वाटतें लोकसत्तेच्या स्फूर्तिदायक अस्फुट प्रेरणेनेंच ते नररत्न चमकूं लागले. कालाच्या अफाट दऱ्येवर लोकसत्तेच्या तुफानानें उद्भवलेल्या त्या आद्यलहरी होत. हे श्रेष्ठ दर्जाचे नरदीपक

राजे लोकांनीं प्रजेवर केलेला अनन्वित छळ तात्विक दुर्लक्षतेनें कोठपर्यंत पाहूं शकतील ? तसें होणें असंभव आहे. दुसरें, साधारणपणें मनुष्याचा असा स्वभाव आहे कीं तो गतकालीन गोष्टीकडे किंवा नरवीरांकडे आदराच्या दृष्टीनें पहात असतो. कार्लाइलनें एकें ठिकाणीं म्हटलें आहे कीं मनुष्य एकदाचा मरण पावला म्हणजे त्याची कीर्ती दसपट वाढते. यामुळें मात्र दिवंगत पुढाऱ्यांची योग्यता कमी करण्याचा आमचा हेतु आहे असें कोणी समजूं नये. विसाव्या शतकांतहि अनेक लोकोत्तर पुढारी निर्माण झाले. पण ते अलीकडे मरण पावल्यानें किंवा त्यापैकीं कित्येक अजून जिवंत असल्यानें त्यांच्या खऱ्या योग्यतेची आपणास यथार्थ कल्पना होत नाहीं. भूतकालांत जमा झाल्यावर तेच आपणास श्रेष्ठ वाटूं लागतील.

पण वर्तमान लोकसत्ताक कालांतही अनेक श्रेष्ठ पुरुष निर्माण झाले आहेत असें म्हणण्यास हरकत नाहीं. विलसन, ब्रिआंड, मुसोलिनी, रामसे मॅकडोनाल्ड, लेनिन, महात्मा गांधी, सन्यतसेन, चँगकैशक, केमालपाशा वगैरे राजकारणधुरंधर कोणत्याही कालाला ललामभूत झाल्यावाचून राहणार नाहींत. बर्नार्ड शॉ, रविंद्रनाथ टागोर, प्रो. ऐन्स्टीन, एकनेर, प्रो. रमण, इबसेन इत्यादि थोर विभूतींनीं शास्त्रांत किंवा साहित्यांत आपली कीर्ति अजरामर करून ठेवली आहे. शिवाय आणखी एक गोष्ट लक्षांत ठेवणें अवश्य आहे. एकोणिसावें शतक प्रगतीच्या प्रारंभाचा काल होता. विसाव्या शतकांत अगोदरच औद्योगिक व शास्त्रीय बाबतींत सुधारणेचा बराच विकास झालेला आहे. अर्थात प्रो. बेरीनें आपल्या 'आयडिया ऑफ प्रोग्रेस' या पुस्तकांत म्हटल्याप्रमाणें सुधारणेला अंत नसतो; तिची उत्क्रांती सदैव होत असते. तथापि सुधारणेच्या प्रारंभकालांत मनुष्यांच्या बीजरूप श्रेष्ठत्वाला जितका वाव असतो तितका पुढें रहात नाहीं. म्हणून साहजीक आरंभींच्या नरश्रेष्ठांना आपण अत्यंत गौरवानें व आदरानें लेखतों. सरळच आहे, त्यांची कृति आपणास प्रत्यक्ष पहावयास सांपडते. वर्तमान कालांत हा वाव त्या मानानें कमी असूनहि आपणास अनेक श्रेष्ठ पुरुष पहावयास सांपडतात. अजून विसाव्या शतकाला आपला जीवनप्रवास संपविण्यास बराच कालावधि आहे. लोकसत्तेचा अजूनहि पुष्कळसा विकास व्हावयाचा आहे. तेव्हां उत्तरोत्तर अधिकाधिक श्रेष्ठ पुरुष निर्माण होऊन आक्षेपकांची भिती निराधार ठरेल अशी अपेक्षा करण्यास जागा आहे.

तथापि एवढें मात्र खरें कीं प्रत्यक्ष राजकारणांत पडणें श्रेष्ठ दर्जाच्या पुरुषांना आवडत नाहीं. पण असे सर्वच लोक त्यांत भाग घेत नाहींत असें नाहीं. तेवढ्यानेंच लोकसत्तेला गौणत्व आणण्याचें कारण नाहीं. कारण राजकारणाच्या धकामकीच्या मामल्यांत त्यांनीं भाग घेतला नाहीं तरी त्यांचा अप्रत्यक्षरीतीनें राजकारणावर परिणाम होतोच. तसेंच लोकसत्ताक कारभारांत अप्रत्यक्षपणें त्यांना अधिक वावही मिळत असतो. लोकसत्तेचें वातावरण त्यांच्या कार्यास बरेच पोषक होत असते.

# लोकसत्ता व लोकमत

## प्रकरण ७ वें

प्रबल लोकमत:--लोकसत्ताक प्रधानमंडळाची अंतिम नियंत्रणशक्ति (controlling factor) ज्याप्रमाणें एकंदर मतदारसंघांच्या पसंतीत सांठलेली असते तद्वतच लोकशाहीचें अंतिम नियंत्रण लोकमताच्या प्राबल्यावर अवलंबून असतें. राजसत्तेंत राजाच्या लहरीवर सर्व राज्यकारभाराचें तारूं डोलकावे घेत असतें; त्याच्या संमतीशिवाय कोणतीही महत्वाची गोष्ट घडणें शक्य नसतें. तसेंच लोकसत्तेंतील राज्यकारभार अखेर लोकमतावरच सर्वस्वी अवलंबून असावयाचा यांत नवल तें काय ? म्हणून प्रगमनशील लोकसत्तेंत लोकमत प्रबळ असणें अत्यंत आवश्यक आहे. देशांत बंड उत्पन्न होऊन अराजकता सुरू होणें, प्रधान मंडळानें लोकमत धुडकावून लावणें, कायदेमंडळांतील सभासदांनीं आपल्या मतदारसंघाला दिलेलीं वचनें मोडणें, किंवा त्यांकडे दुर्लक्ष करणें, त्यांनी बेजबाबदारीचें वर्तन करणें इत्यादि गोष्टी प्रबल व सुसंघटित लोकमताच्या अभावीं लोकसत्ताक देशांत प्रत्यहीं घडत असतात. त्यांना पायबंद घालण्यासाठीं मतदारांनीं अत्यंत जागरूक असले पाहिजे. कारण देशांतील अव्यवस्थेची अखेरची जबाबदारी त्यांच्यावरच असते. लोकशाहीचें यशापयश मतदारांच्या संघटनेवर सर्वस्वी अवलंबून असतें. देशांतील सामान्य लोक राज्यकारभाराचीं सूत्रें आपणांकडे घ्यावयास तयार असणें, त्यासाठीं लागणारा स्वार्थत्याग करण्याची त्यांची सिद्धता असणें, राज्य चालवून दाखविण्यास जरूर असलेला अनुभव त्यांच्या पुढाऱ्यांना असणें व त्यांच्याकडे सोंपविलेल्या कार्याकडे ते दुर्लक्ष करीत नाहींत हें ठरविण्याची पात्रता सामान्य लोकांमध्यें असणें हीं लोकशाहीचीं आधारभूत तत्वे होत. एवढ्या गोष्टी असल्याशिवाय लोकसत्तेची व्हावी तशी प्रगति होत नाहीं; किंबहुना या गोष्टी नसल्या तर देशांत अव्यवस्था उत्पन्न होते व राज्याची घडी विस्कळीत होऊन शेवटीं बंडाळी माजते. म्हणून सामान्य जनता व विशेषत: मतदार यांना नेहमीं कर्तव्यदक्ष, जागरूक व सुसंघटित असले पाहिजे. तसेंच राज्यकारभाराचें साधारण ज्ञान, निरनिराळ्या पक्षांचें ध्येय, धोरण व कार्यक्रम यांची सामान्य माहिती व त्यांपैकीं चांगला कोणता व वाईट कोणता हें ठरविण्यास जरूर असलेलें तारतम्य बुद्धि त्यांना हवी. लोकसत्तेंत लोकमत प्रबळ कां असावें याचीं एकंदर खालीं दिल्याप्रमाणें कारणें आहेत:--

(१) राज्यव्यवस्थेची अंतिम जबाबदारी मतदारांवर असते. लोकसत्तेंत देशांतील बहुतेक लोकांना मतदानाचा अधिकार प्राप्त होतो. तेव्हां साधारणत: सर्वच लोक ह्या जबाबदारीचे वाटेकरी असतात. ही जबाबदारी आपणांकडून योग्य रीतीनें पाळली जात आहे एवढी काळजी प्रत्येकास घेणें अवश्य आहे. देशांत बंडाळी माजली, राज्य-

कारभारांत गैरव्यवस्था उत्पन्न झाली तर त्याचा दोष प्रत्यक्ष कार्यकारी मंडळाकडे जातो हें खरें. तथापि त्याचा दोष, अप्रत्यक्ष रीतीनें कां होईना, मतदारांकडेही गेला पाहिजे. कारण त्यांनीं निवडून दिलेल्या सभासदांपैकींच कांहींच्या हातीं राज्यकारभाराचीं सूत्रें असतात. त्यांनीं अयोग्य लोकांची निवड कां करावी ?

(२) राजसत्तेपेक्षां लोकसत्तेंत लोकांना व्यक्तिगत हक्क (Individual rights) जास्त मिळतात. हक्क व कर्तव्य हे नेहमीं परस्परपूरक असले पाहिजेत. ते परस्परविरोधी होतांक्षणींच बेजबाबदारी वाढते, व कार्य सुरळीत होत नाहीं. समजा एक मनुष्य एकाद्या संस्थेचा अध्यक्ष झाला. अध्यक्ष या नात्यानें त्याला बरेच हक्क प्राप्त होतात. पण त्याचबरोबर जर त्यानें आपलें कर्तव्य केलें नाहीं तर संस्थेचें नुकसान होऊन ती अवनतीच्या मार्गाला अविलंबेंच लागणार नाहीं कां ? म्हणून हक्क व कर्तव्य यांना एकमेकांपासून वेगळें करतां येत नाहीं. लोकसत्ताक राज्यकारभारांत सामान्य लोकांना बरेच हक्क प्राप्त होतात. पण त्याबरोबर त्यांच्यामागें अनेक कर्तव्येंही लागतात. हीं कर्तव्यें त्यांनीं केलीं नाहींत तर त्यामुळें देशाचें नुकसान होईल. कर्तव्यपराङ्मुख मनुष्याला हक्क देणें हें केव्हांही उचित होणार नाहीं. म्हणून मतदारांनीं आपलीं कर्तव्यें केलींच पाहिजेत. आपल्या कर्तव्याविषयीं दक्ष असलेला मतदारसंघ लोकसत्तेला पोषक होतो. लोकसत्ताक राज्यपद्धतीवर अशा संघटित मतदारांचाच दाब राहू शकतो.

(३) तसेंच लोकसत्ताक राज्यपद्धति विशेष गुंतागुंतीची असते. अर्थात् राज्यकारभाराचें किंवा राज्यघटनेचें पुरेसें ज्ञान प्रत्येक मतदाराला असणें शक्य नाहीं व तेवढें आवश्यकही नाहीं. पण त्याविषयीं सामान्य माहिती त्याला असणें जरूर आहे. कदाचित् उमेदवार म्हणून उभे राहण्याची त्याच्यावर पाळी येईल. तो सभासदही निवडून येईल. तसें झाल्यास रायज्पद्धतीची संपूर्ण माहिती त्याला असावयास पाहिजे. व तिजबद्दलची त्याची पूर्वपीठिका तयार नसली, तिच्याविषयीं त्याला कांहींच माहिती नसली तर ती पूर्णपणें हस्तगत करून घ्यावयास त्याला किती त्रास पडेल बरे ?

(४) लोकसत्ताक राज्यकारभारांत पुष्कळ पुढाऱ्यांचीही आवश्यकता असते. प्रांतिक कायदे-मंडळांत पुष्कळांना निवडून द्यावें लागतें. गरजेप्रमाणें पुढारीही पुष्कळ पुढें येतात. कित्येकांना राज्यव्यवस्थेचें पुरेसें ज्ञानही नसतें. कित्येक आपमतलबी, विवेकभ्रष्ट व अननुभवी असतात. कित्येकांसमोर ध्येय किंवा धोरण नसतें. कित्येक भावनाप्रधान असून व्यवहारशून्य असतात. अशा पुढाऱ्यांना निवडून देणें धोक्याचें असतें, कारण ते देशहिताला बाधक ठरतात. मतदारांना त्यांच्याविषयीं माहिती हवी. आपल्या विश्वासास ते पात्र आहेत कां नाहीं हें त्यांना ठरविलें पाहिजे. देशहिताला पोषक होईल अशा रीतीनें ते राज्यशकट चालवितील यांची त्यांना खात्री झाली पाहिजे. लांचलुचपतीला व स्वार्थान्धतेला ते बळी पडणार नाहींत ही गोष्ट त्यांच्या मनीं बिंबली पाहिजे. एकंदर आपल्या कसोटीस ते पूर्ण उतरतात किंवा नाहीं हें पाहिल्याशिवाय मतदारांनीं त्यांना मतें देणें अयोग्य आहे. योग्य प्रतिनिधी निवडून देणें हें मतदारांचें

सर्वांत मोठें कर्तव्य आहे. अशिक्षित, अज्ञान मतदारांना तसें करतां येणार नाहीं. अशिक्षित मतदारसंघ केव्हांही प्रबळ व संघटित होऊं शकणार नाहीं. म्हणून मतदार सुशिक्षित व कर्तव्यदक्ष असावयास पाहिजे. तेच प्रतिनिधींची योग्य निवड करतील व त्यांचा आपल्या प्रतिनीधींवर व पर्यायानें राज्यकारभारावर दाबही राहील.

(५) योग्य प्रतिनिधी निवडतां येणें हें चांगलें. पण तेवढ्यानेंच काम भागत नाहीं. मतदारांना देशांतील निरनिराळ्या पक्षांचें ध्येय व कार्यक्रम यांविषयीं सामान्य माहिती असणें अवश्य आहे. तसेंच कोणता पक्ष आपल्या दृष्टीनें देशाचें खरें हित करूं शकतो, कोणता पक्ष आपल्या दृष्टीनें देशहितविरोधक आहे हें समजण्याइतकें ज्ञान मतदारांना असणें अवश्य आहे. लोकसत्ताक राज्यकारभारांत एकांडा शिलेदार विशेष कांहीं करूं शकत नाहीं. कारण एखादें बिल किंवा कायदा पसार होणें न होणें हें बहुमतावर अवलंबून असतें. कायदेमंडळांत निरनिराळ्या पक्षांचे अनेक सभासद असतात. सभासदांपेक्षां पक्षाचें वजन केव्हांही जास्तच असावयाचें. म्हणून हा एकटा प्रतिनिधी, तो सामान्य दर्जाचा असला तर, आपल्याकडे बहुमत करून घेण्याचा संभव कमीच. तेव्हां बिनपक्षाच्या उमेदवाराला निवडणुकींत यश येणें कठीण असतें व यदाकदाचित आलेंहि तरी त्याला राज्यकारभारावर आवश्यक दाब ठेवतां येणार नाहीं. एकाद्या पक्षाच्या हातून लोकसत्तेंत जी कामगिरी होईल ती अशा एकांड्या सभासदाच्या हातून होणें शक्य नाहीं. म्हणून मतदारांना कोणत्या पक्षाचें धोरण योग्य व कोणत्या पक्षाचें अयोग्य हें ठरविण्याइतकें ज्ञान असावयास पाहिजे. सारांश, आपल्या पक्षाची निवड करणें हेंही त्यांचें परम कर्तव्य ठरतें.

मतदारांच्या ठिकाणीं वर दिलेले सर्व गुण हवेत. तेव्हांच मतदारसंघ प्रबळ, बोलका, सुसंघटित व परिणामकारक होऊं शकेल. या मतदारसंघाचें कायदेमंडळावर व प्रधानमंडळावर चांगलें वजन पडल्यास त्यांना भलत्याच मार्गावर पाऊल ठेवण्याची कुबुद्धि सहसा होणार नाही. राज्यकारभार सुरळीत चालेल थोडीशीही गैरव्यवस्थाहि उत्पन्न झाल्यास जागरूक असलेले मतदार नालायक ठरलेल्या प्रतिनिधींना पुढें मतें देण्याचें नाकारून त्यांच्या विश्वासास पात्र झालेले नवीन प्रतिनिधी निवडून देतील. व राज्यकारभाराची घडी पुन्हा सुव्यवस्थित होईल. वर वर्णिलेली स्थिति केवळ आदर्श म्हणून मांडली आहे. ती एक दिशा आहे. त्या दिशेनें लोकमत जागृत करण्याचा पुढाऱ्यांनीं प्रयत्न केला पाहिजे.

इंग्लंडची राणी व्हिक्टोरिया हिचा तिच्या ग्लॅडस्टन या सुप्रसिद्ध मुख्य प्रधानाशीं राज्यकारभाराविषयीं नेहमीं मतभेद उत्पन्न होई. एके प्रसंगीं तिनें बोलून दाखविलें, "ग्लॅडस्टन साहेब, तुम्हाला माहित आहे कां मी कोण आहे? मी इंग्लंडची राणी आहे." ग्लॅडस्टनने शांतचित्तानें व निर्विकारपणानें उत्तर दिलें, "तुम्ही राणी-महाराणी असाल; पण मी इंग्लंडचें लोकमत आहे." लोकमतापुढें राजे, महाराजे यांनाही मान तुकवावी लागली. मग कुमार्गगामी मंत्रिमंडळ किंवा कायदेमंडळांतील सभासद यांची काय कथा? लोकमत प्रबळ असलें म्हणजे अशी जगांत कोणतीही शक्ति नाहीं कीं जी तें फेटाळून लावील. लोकमताची गंगा

अनिवार्य असून ती अप्रतिहत वहात असते. तिच्या प्रवाहांत मी मी म्हणविणारे राजे, जुलमी मंत्री किंवा अरेराव लष्कराधिकारी प्रवाहपतिताप्रमाणें कामाला आले आहेत. ती अखंड व निरंतर वाहणार. तिचा अवरोध कोणीही करूं शकत नाहीं. प्रबळ लोकमत ही लोकसत्तेची चैतन्यशक्ति आहे. ती शाबूत असेपर्यंत लोकशाहीला कसलीहि भिती नाहीं.

**लोकमताचें आविष्करण:**–प्रत्येक लोकसत्ताक राष्ट्रांत लोकमत प्रबळ कां असावें याचें विवेचन झालें. आतां आपण हें लोकमत कसें प्रगट होतें तें पाहूं:–

वृत्तपत्रें हें लोकमताचें एक अत्यंत महत्वाचें व परिणामकारक असें द्योतक आहे, असें समजण्यांत येतें. वर्तमानपत्रांच्या इतिहासाचा प्रारंभ लोकसत्तेच्या उदयाबरोबर झाला असें म्हणण्यास हरकत नाहीं. कारण राजसत्तेंत स्वतंत्रमतप्रदर्शनाला फारसा वाव नसतोच किंबहुना एकाद्या वृत्तपत्रानें राजाच्या जुलुमाविरुद्ध कांहींतरी लिहिण्याचा प्रयत्न केला कीं त्याची मुस्कटदाबी ताबडतोब होते. स्वतंत्र व लोकसत्ताक विचारांना राजसत्तेंत बिल्कुल थारा नसतो. उलट लेखनस्वातंत्र्य व भाषणस्वातंत्र्य हे लोकसत्तेचे मूळ आधार होत. लोकसत्तेची इमारत त्यांवर उभारलेली असते. लोकांच्या स्वतंत्र विचारांना दडपून टाकण्याचा लोकसत्ताक सरकारानें प्रयत्न केला तर सशस्त्र बडाचे वातावरण राष्ट्रांत हळूहळू तयार होऊन त्याचें पर्यवसान शेवटीं क्रांतींत होत असतें. आणि सशस्त्र बेकायदेशीर क्रांति लोकशाहीला जितकी विघातक होते तितकी दुसरी कोणतीहि घटना होत नाहीं. म्हणून स्वतंत्र मतप्रतिपादन हें लोकसत्तेचें एक प्रमुख उपांग आहे असें म्हटले पाहिजे. वृत्तपत्रें हें कार्य करीत असतात. राज्यकारभारावावर निष्पक्षतेनें टीका करणें, सरकारनें केलेल्या बेसनदशीर कृत्यांचें आविष्करण करणें, लोकांची गाऱ्हाणीं सर्वांसमोर ठेवणें हीं लोकसत्तेच्या दृष्टीनें वृत्तपत्रांचीं मुख्य कामें होत. एकंदर राज्यकारभाराचें खरें स्वरूप कळण्यास सामान्य जनतेला वर्तमानपत्रांशिवाय दुसरा उत्कृष्ठ मार्ग नाहीं. लोकसत्तेंत कोठें काय चुकत आहे हें मतदारांना समजणें अत्यंत आवश्यक असतें. कारण योग्य प्रतिनिधी निवडून देण्याची अंतिम जबाबदारी त्यांच्यावरच असते. अशा प्रतिनिधींच्या अभावींच तर देशांत बेबंदशाही माजते. म्हणून वृत्तपत्रांनीं आपली कामगिरी चोख बजावली तर मतदारांना ते उत्तमरीतीनें मार्गदर्शक होऊं शकतात.

वर्तमानपत्रांशिवाय लोकशाहीचें कार्य सुकर होणारही नाही. मोठमोठ्या पुढाऱ्यांचे संदेश गांवोगांवीं पसरविणें, निरनिराळ्या पक्षांचें धोरण व कार्यक्रम जनतेला समजावून सांगणें, वेळप्रसंगीं कायदेमंडळांना व मंत्रिमंडळांना सल्ला देणें वगैरे कामें त्यांच्या हातून उत्तम होऊं शकतात. प्रतिनिधींना किंवा पुढाऱ्यांना प्रत्येक मतदारास भेटणें अशक्य असतें. तेव्हां कित्येकदां मतदारांना वर्तमानपत्रांवरच अवलंबून रहावें लागतें.

लोकमताचें आविष्करण करण्याचें वृत्तपत्र जसें उत्तम साधन असतें तसेंच लोकमत बनविण्याचेंहि काम तें चांगल्या रीतीनें करतें. अज्ञ व अशिक्षित पण साक्षर असलेले मतदार तर बहुतेक वर्तमानपत्रांचा सल्ला पत्करून उमेदवारांना मतें देतात किंवा एकंदर राज्यकारभाराबद्दलीं आपलें मत बनवीत असतात. असें असल्यामुळें वर्तमानपत्रकारांवर दुप्पट जबाब-

दारी येऊन पडते. लोकांना योग्य वेळीं योग्य सल्ला देणें हें त्यानें अत्यंत पवित्र कार्य समजून पूर्ण विचारान्तीं आपलीं मतें आपल्या पत्रांतून प्रतिपादन केलीं पाहिजे.

वृत्तपत्र ही लोकशाहींतील एक महत्वाची संस्थाच आहे. कित्येक देशांत मंत्रिमंडळाचें अस्तित्व मोठमोठ्या वृत्तपत्रांच्या टीकेवरच अवलंबून असतें. लक्षावधि लोक अशा वृत्तपत्रांतून प्रतिपादन केल्या जाणाऱ्या मताकडे डोळे लावून बसलेले असतात. पण पुष्कळदां हीं वर्तमानपत्रें आपल्या राजकीय प्रभावाचा दुरुपयोगही करतात. भुताच्या हातीं कोलीत दिल्यासारखी अनेक वेळां त्यांची अवस्था होते. वृत्तपत्राचा मुख्य संपादक जरी अत्यंत अनुभवी, जबाबदार, विद्वान्, व्यावहारिक व वजनदार असला तरी त्याच्या हाताखालीं काम करणारे अनेक उपसंपादक केव्हां केव्हां पूर्ण बेजबाबदार असून वाटेल त्यावर तोंडसुख घेण्यास मागेंपुढें पहात नाहींत. पगार उदरभरणापुरता, विद्वत्ता तुटपुंजी, राजकीय अनुभव भोवळ्याएवढा, शीलानें भ्रष्ट, सूडबुद्धीनें प्रेरित झालेले व आपल्या महत्वाच्या जागेमुळें बेभान बनलेले हे वर्तमानपत्रांचे रकाने भरणारे लेखक, केवळ पडद्याआड लपून बसले असल्यानें हव्या त्या थोर व्यक्तींवर निंदेचा चिखल उडविण्यांत स्वतःला धन्य समजतात.* ही स्थिती अत्यंत लाजिरवाणी आहे. अशीं वर्तमानपत्रें लोकसत्तेचें कार्य पुढें नेटानें ढकलण्यास सर्वस्वी असमर्थ असतात. तीं लोकांची दिशाभूल करतात. त्यांना आपल्या पवित्र कर्तव्याचें विस्मरण होतें. म्हणून लोकमताचें तीं खरेखुरें निदर्शक ठरत नाहींत.

अशी स्थिती प्रत्येक राष्ट्रांत दिसून येते. म्हणूनच वर्तमानपत्रें हींच केवळ लोकमत प्रदर्शनाचीं मुख्य साधनें आहेत असें म्हणवत नाहीं. याचें दुसरें साधन म्हणजे राजकीय मनोवृत्तीच्या सुशिक्षित लोकांचे अड्डे. त्यांच्या उठण्याबसण्याच्या ठिकाणीं जाऊन त्यांच्यामध्यें चाललेली राजकीय चर्चा ऐकली म्हणजे साधारणपणें लोकमत कसें काय आहे हें चांगलें समजतें. हे लोक राजकारणापासून अलिप्त असतात. प्रत्यक्ष राजकारणाच्या क्षेत्रांत उडी घेणें कदाचित् त्यांना आवडत नाहीं किंवा नोकरीमुळें त्यांना तसें करवत नाहीं. पण वर्तमानपत्रें दररोज काळजीपूर्वक वाचणें, देशाला कोणता मार्ग हितकर व कोणता अहितकर हें ठरविणें इत्यादि गोष्टींची त्यांना मनापासून आवड असते. त्यांचें मत म्हणजे सर्व जनतेचें मत असें कोणी समजू नये. परंतु एखाद्या राजकीय घटनेसंबंधानें सुशिक्षित मध्यमवर्गाच्या लोकांचें काय मत आहे हें समजण्याचा या मंडळींच्या बैठकी हीं उत्कृष्ट साधनें आहेत.

तसेंच सभांच्या द्वारेंही लोकमत प्रगट होतें. एखादी महत्वाची गोष्ट घडली किंवा घडावयाची असली म्हणजे या सभांना नुसता ऊत येत असतो. पण अशा सभेंत वक्त्यांनीं प्रतिपादलेलीं मतें सर्वथा लोकमतानुरूप आहेत अशीही समजूत करून घेण्याचें कारण नाहीं. दुनिया झुकती है; झुकानेवाला चाहिये असें म्हणतात तें खरें आहे. कारण या सभेंतून होणारीं व्याख्यानें कित्येकदां भावनेच्या उन्मादांत होत असतात. एखादा भावनाप्रधान व कुशल वक्ता आपल्या श्रोतृसमुदायास सहज आपल्या मताला अनुकूल करून घेतो. अस्खलित वक्तृत्व हेंच त्याचें कारण. पण जेव्हां जनतेच्या मनाची स्थिति स्थीर होते, भावनेचा पडदा दूर होतो व

* लॉर्ड ब्राइसच्या एका अशाच आशयाच्या वाक्यावरून हें वाक्य सुचलें आहे.

डोकें शांत होतें तेव्हां सदर वक्त्याच्या विचारसरणीविरुद्ध कित्येकांच्या मनांत विचार डोकावूं लागतात. तथापि एवढें मात्र खरें कीं वर्तमानपत्रांप्रमाणें सभागृहें हें सुद्धां लोकमत समजण्याचें एक उपयुक्त साधन आहे. निदान एकाद्या तिऱ्हाइताला लोकमताचा प्रवाह कोणत्या दिशेनें वहात आहे याची अस्पष्ट कल्पना तरी यामुळें होतेच.

चवथें साधन म्हणजे ग्रामसंशोधन. देशाची खरीखुरी जनता खेड्यापाड्यांतूनच असावयाची. शहरांच्या कितीतरी पटीनें ग्रामांची संख्या अधिक असते. म्हणून देशाचें खरें लोकमत पाहण्यासाठीं खेड्यापाड्यांतच फिरले पाहिजे. पण या अज्ञ लोकांची मत बनविण्याइतकी योग्यता तरी असते का ? याला नाहीं हेंच उत्तर येईल. राज्यघटना, राज्यकारभार, सामान्य पुढारी, कायदेमंडळें, मंत्रिमंडळ यांविषयीं या अज्ञान लोकांना कितीशी माहिती असणार? तरी पण वर्तमान राज्यकारभारांत आपण सुखी आहोंत का दुःखी, आपल्या गरजा कोणत्या व सरकार त्यापैकीं किती पुरवितें, आपलीं गाऱ्हाणीं कोणती इत्यादि सामान्य व ठळक प्रश्नांचीं उत्तरें त्यांना सहज देतां येतील. खेड्यापाड्यांतील लोकांचें एकंदर मत यांवरूनच ठरवावयाचें असतें.

या प्रकारें आपणांस देशांतील लोकमत अजमावून पाहतां येतें. लोकशाहीची जसजशी वाढ होत जाते तसतसें हें लोकमत अधिक प्रबळ, व परिणामकारक होत असतें. तसेंच लोकमत जसजसें प्रबळ व सुसंघटित होतें तसतशी लोकशाहीचीहि प्रगती होऊन देशांत सुव्यवस्था, सुख व समाधान यांचें साम्राज्य पसरतें. लोकसत्ता व लोकमत हे परस्परपूर्वक आहेत. एकावाचून दुसऱ्याचें अस्तित्व राहणें जवळ जवळ असंभवच आहे.

**स्वयंविधिकारण ( Initiative ) सदस्यनिवृत्ति ( Recall ) व मतमोजणी ( Referendum):**–लोकमतासंबंधानें विचार करतांना या तीन पारिभाषिक शब्दांचा अर्थ लक्षांत ठेवणें अवश्य आहे. कित्येक देशांत लोकमत बरेंच संघटित व बोलकें असतें. निवडणुकीच्या वेळीं मतदारांनीं निवडून दिलेले सभासद केव्हां केव्हां मतदारांना हवे असतील असे कायदे करावयास विसरतात किंवा जाणूनबूजून तिकडे दुर्लक्ष करतात. म्हणून लोकसत्ताक राज्यकारभारांत लोकप्रतिनिधींच्या हातून घडलेले दोष मतदारांना नाहींसे करतां यावे अशी कांहीं तरी योजना असावी असें कट्टर लोकसत्तावाद्यांना वाटत असतें. ही योजना म्हणजे मधून मधून एखादा आवश्यक असलेला कायदा स्वतः मतदारांनीं करणें. या प्रकाराला स्वयंविधिकरण (Initiative) असें म्हणतात. तसेंच मतदारांनीं निवडून दिलेले कांहीं सभासद त्यांच्या इच्छेच्या विरुद्ध वागतात. ही गोष्ट बहुधा सर्वत्रच दृष्टीस पडते. अशा नाठाळ सभासदांना ताळ्यावर आणण्यासाठीं 'सदस्यनिवृत्ति' (recall) ची पद्धतहि कांहीं लोकसत्ताक देशांत आढळून येते. वारंवार सभा भरवून एखाद्या प्रतिनिधीच्या कृत्याचा निषेध करणें, त्याच्या निवृत्तिसाठीं तयार केलेल्या खलित्यावर त्याच्या मतदारसंघांतील दोनतृतीआंश किंवा तीनचतुर्थांश मतदारांच्या सह्या घेणें हीं कामें लोकांना करावीं लागतात. आवश्यक सह्या मिळाल्याबरोबर त्या प्रतिनिधीला आपल्या सदस्यत्वाचा राजीनामा देऊन परत यावें लागतें. याशिवाय कायदेमंडळानें एकादा कायदा पास केला व तो देशांतील एकंदर मतदा-

रांच्या इच्छेविरुद्ध असला असें दिसून आलें तर त्याची अंमलबजावणी होऊं नये अशीहि लोकसत्ताक राज्यघटनेंत व्यवस्था असावयास पाहिजे असें कित्येकांचें मत आहे. अशा प्रसंगीं सदरहू कायदा कायदेमंडळानें पास केल्यानंतरहि लोकमनास टाकण्याची पद्धत कांहीं देशांत अस्तित्वांत आहे. या पद्धतीला रेफरेंडम म्हणतात.

ज्या देशांत लोकमत प्रबळ व विश्वसनीय आहे तेथें या तीन्ही पद्धती चालू करण्यास हरकत नाहीं. भावनाप्रधान जनता हवी तिकडे झुकेल. आपल्या ओजस्वी वक्तृत्वानें एखादा पुढारी मतदारांना आपल्याकडे केव्हांही वळवून घेईल. पण अशा प्रकारें कोणताहि कायदा करणें, किंवा तो मनास टाकणें इष्ट होणार नाहीं. सामान्यतः कोणत्याही आणीबाणीच्या वेळीं मतदारांचीं मनें विचलित होणार नाहींत, अत्यंत निर्विकार मनानें एखाद्या कायद्याविषयीं ते आपलें मत देण्यास तयार होतील, व त्यांच्यामध्यें देशांतील महत्वाच्या घडामोडीविषयीं स्वतःचें मत स्वतंत्रपणें बनविण्याची पात्रता येईल तेव्हांच त्यांना वरील सर्व अधिकार देण्यांत यावे. हाच हिताचा व सुरक्षितपणाचा मार्ग आहे. स्विट्झलंड देशांत हे तीन्ही प्रकार अमलांत येत असून या जादा अधिकारांचा लोक दुरुपयोग करीत नाहींत असें त्यांच्या आतांपर्यंतच्या इतिहासावरून दिसून आलें आहे. स्विस लोक अत्यंत पुराणप्रिय व व्यवहारकुशल आहेत. परेंच लोकांप्रमाणें ते क्षणोक्षणीं आपलें मन विचलित होऊं देत नाहींत. सामान्यतः ते गंभीर मनोवृत्तीचे असल्यानें मतास निघालेल्या कायद्याबद्दल ते प्रथम निःपक्षतेनें पूर्ण विचार करतात व नंतर मत देण्याचें ठरवितात. शिवाय या तीन्ही पद्धती अनेक वर्षांपासून त्यांच्या देशांत चालू असल्यानें आतां त्यांच्याविषयीं लोकांना धोका वाटत नाहीं. त्या त्यांच्या राजकीय जीवनांत स्थीर झाल्या आहेत.

पण इतर लोकसत्ताक राष्ट्रांनीं लोकमतप्राबल्याच्या प्रतीकाचे हे तीन्ही प्रकार एकाएकीं चालू करणें इष्ट नाहीं. कारण या मतदारांच्या जादा अधिकारांचा दुरुपयोग होण्याचा संभव फार जो देश भौगोलिक दृष्ट्या लहान आहे, जेथें साधारणपणें मतदार स्थितिप्रिय (Conservative) आहेत, जेथें असल्या हक्कासंबंधाची कोणत्याना कोणत्यातरी प्रकारें ऐतिहासिक परंपरा आहे, जेथें लोकमत अधिक संघटित असून मतदार आपल्या कर्तव्याबद्दल जागरूक असतात त्या देशांतच हे तीन्ही प्रकार क्रमाक्रमानें चालू करणें बरें.

या तिघांचाही उपयोग लोकसत्तेचें नियंत्रण करण्याकडे झालेला चांगला. आडमार्गानें जाणाऱ्या मंत्रिमंडळावर किंवा मतदारांच्या इच्छा झुगारून लावणाऱ्या बेजबाबदार प्रतिनिधीवर आपला ताबा स्थापित करण्याचें मतदारांच्या हातीं हें उत्कृष्ट साधन आहे. त्यांनीं सुद्धां तेंवढ्यापुरताच त्याचा उपयोग करावा. देशाच्या सामाजिक किंवा औद्योगिक व्यवस्थेंत एकदम फरक घडवून आणणारे क्रांतिकारक कायदे अथवा जगांत पसरत चाललेल्या नवीन अद्भुत कल्पना आपल्या देशांत अमलांत आणण्याचें कार्य मतदारांकडे सोपविणें फार धोक्याचें आहे. तें काम राजकारणांत कसलेल्या अनुभवी, व्यवहारकुशल व सूज्ञ पुढाऱ्यांकडे असू देणें हेंच सर्वथैव योग्य होईल.

# लोकसत्ता व स्थानिक स्वराज्यसंस्था

## प्रकरण ८ वें

लोकसत्तेच्या शिक्षणाची स्थानिक स्वराज्यसंस्था हीच खरी शाळा समजली पाहिजे. प्राथमिक शाळा ही जशी विद्यार्थ्यांना माध्यमिक शाळेंतील शिक्षण घ्यावयास किंवा त्यासाठीं त्यांना योग्य करण्यास मदत करते त्याप्रमाणेंच प्रथम स्थानिक स्वराज्यसंस्थेंतच चिल्लर स्थानिक कारभाराचा अनुभव प्राप्त करून देशाच्या राज्यकारभाराचीं सूत्रें हातीं घेण्यास लोक तयार होतात. हें अनुभवजन्य ज्ञान संपादल्याशिवाय सामान्य प्रतिनिधींनीं एकदम मोठी उडी घेऊन राजकारणाच्या व राज्यकारभाराच्या विस्तीर्ण क्षेत्रांत नाहक पडूं नये. अनुभवाशिवाय अशी एकदम मोठी उडी घेतल्यास निदान सामान्य बुद्धीचे लोक किंकर्तव्यमूढ बनतात व अंधारांत पडल्यासारखी त्यांची चमत्कारिक स्थिति होते.

**स्थानिक स्वराज्याची आवश्यकता:**–विशेषेंकरून लोकशाहींत अशा संस्थांची फारच आवश्यकता असते मोठमोठे पुढारी साधारणत: तिकडे दुर्लक्ष करतात, स्थानिक राजकारणांत मन घालीत नाहींत, आपल्या कर्तबगारीच्या दृष्टीनें या संस्थांत लक्ष घालणें कमीपणाचें आहे असें त्यांना वाटत असतें. पण यामुळें अशा संस्थांची उपयुक्तता कमी ठरत नाहीं हें विसरतां कामा नये.

प्रथमत: आधुनिक राज्यकारभाराचें व्यापकत्व लक्षांत घेतलें पाहिजे. प्राचीन काळीं किंवा मध्ययुगीन कालांत सुद्धां राज्यकारभाराची जबाबदारी फारशी नव्हती. सगळा कारभार कमालीचा सुटसुटीत. दुसऱ्या राज्याविरुद्ध युद्ध करणें, आपल्या राज्याचें संरक्षण करणें, राज्यकारभार चालविण्यासाठीं व राजाचे सुख व वैभवलोलुपता हे साध्य करण्यासाठीं लोकाकडून हवा तसा कर उपटणें, हींच प्रत्येक सरकाराचीं मुख्य कामें समजलीं जात. एखादा राजा चांगला असला तर तो प्रजेच्या कल्याणार्थ इतर कांहीं गोष्टीही करीत असे, नाहीं असें नाहीं. पण हल्लीं जसा राज्यकारभार गुंतागुंतीचा होऊन बसला आहे, त्याची व्यापकता जशी अवाढव्य वाढली आहे, तशी पूर्वीं नव्हती; त्याच्यासमोर पूर्वीच्या सरकाराचीं कर्तव्यें तर अगदींच तुटपुंजी व तुच्छ आहेत. हल्लीं सरकारच्या कर्तव्याबद्दलच्या कल्पना फारच व्यापक झाल्या आहेत, त्याचें अधिकारक्षेत्र व कार्यक्षेत्र नाहीं नाहीं त्या ठिकाणीं पोंचलें आहे. तेव्हां आधुनिक शासनपद्धतींत नानाप्रकारचे असंख्य बिकट प्रश्न उद्भवणें अपरिहार्य आहे. हीं कामें इतकीं असतात कीं मध्यवर्ती कायदेमंडळ व प्रांतिक कायदेमंडळ या दोन्हीही प्रातिनिधिक संस्थांना त्यांची यथाशक्ति व यथायोग्य विल्हेवाट लावणें पराकाष्ठेचें कठीण झालें आहे. म्हणून राज्यकारभाराचीं

कालमानाप्रमाणें उत्तरोत्तर वाढणारीं सर्वच कामें हातीं घेऊन त्यांची कशीतरी वासलात लावण्यापेक्षां त्यापैकीं कांहीं इतर संस्थांकडे सोंपविणें हेंच चांगलें. अशीं हीं किरकोळ कामें -केवळ स्थानिक स्वरूपाचीं कामें-निकालांत लावण्याची आवश्यकता भासूं लागल्यानें स्थानिक स्वराज्यसंस्थांचें महत्व वाढलें आहे. या संस्थांना अशा कामांची विल्हेवाट योग्य रीतीनें लावण्यास बरीच सवड असते.

दुसरें, केव्हां केव्हां राज्यकारभाराचीं कामें इतकी क्षुल्लक व स्थानिक महत्वाचीं असतात कीं जोपावेतों त्यांच्याबद्दल प्रतिनिधींना पूर्ण माहिती नाहीं तोपर्यंत त्यांचा निकाल लागणेंही कठीण असतें. लोकशाहींत प्रतिनिधीवर जबाबदारी फार असते; त्यांना अनेक गोष्टींची माहिती असावयास पाहिजे. पण त्यांनीं प्रत्येक शहराच्या किंवा खेड्यापाड्याच्या क्षुल्लक गोष्टीबद्दलची माहिती करून घेणें हें शक्य व इष्ट आहे काय ? म्हणून ह्या अगदींच स्थानिक महत्वाच्या बाबी दुसऱ्या संस्थांकडे सोंपविण्यांत याव्यात यांत कांहीं आश्चर्य नाहीं. स्थानिक स्वराज्यसंस्थांचें हेंच मुख्य कार्य आहे.

तिसरें, लोकशाही म्हणजे स्थूलमानानें पाहतां लोकांचेंच, लोकांनींच चालविलेलें व लोकांच्याच हितासाठीं स्थापन झालेलें राज्य असें सामान्यतः म्हणण्यास हरकत नाहीं. अनेक विद्वान, लोकप्रिय, संपन्न व कर्तबगार लोकांना प्रांतिक व मध्यवर्ती कायदेमंडळांत निवडून येण्याचा जास्त संभव असतो. सामान्य व स्थानिक पुढाऱ्यांना एकदम इतके पुढें येणें कठीण; व इष्टहि पण नाहीं. तथापि लोकशाहींतील राज्यकारभारांत भाग घेण्याची पुष्कळांना हौस असते. व त्यांनीं ती कां पुरवूं नये ? त्यांचा तो एकप्रकारें हक्कच आहे. राज्यकारभाराची जबाबदारी अंशतः आपणावरही यावी हें त्यांना वाटणें अगदीं साहजीक आहे. पण आवश्यक योग्यता, लोकप्रियता, विद्वत्ता व पैशाची विपुलता यांच्या अभावीं त्यांना मोठ्या कायदेमंडळांत शिरण्यास वाव नसतो. तेव्हां त्यांच्यासाठीं अशा स्थानिक संस्था स्थापन करून त्यांच्या कर्तबगारीला मार्ग मिळावा, पुढें येऊन जास्त जास्त महत्वाचीं कामें करण्याची संधी त्यांना द्यावी हें सरकाराचें कर्तव्यच ठरतें. स्थानिक स्वराज्यसंस्थांमुळें अशा या छोट्या पुढाऱ्यांची उत्कृष्ठ सोय झाली आहे यांत शंका नाहीं.

तसेंच लोकसत्ताक राज्यांत पुढाऱ्यांची आवश्यकता फार असतें हें मागील एका प्रकरणांत पाहिलेंच आहे. पुष्कळसे पुढारी असणें हें लोकसत्ता सुरळीतपणें व उत्कृष्ठपणें चालण्याचें महत्वाचें साधन आहे असें मानलें तर जेणेंकरून जास्त जास्त पुढारी तयार होतील अशी कांहीं तरी योजना या राज्यपद्धतींत असणें अत्यंत आवश्यक आहे. या दृष्टीनें स्थानिकसंस्थांचा विचार केला तर लोकसत्तेला त्या अत्यंत पोषक ठरतात असें दिसून येईल. महत्वाकांक्षी लोक कांहीं एकदम पुढारी होत नाहींत. त्यांना हळूहळू लोककार्य केलें पाहिजे. त्यांना योग्य संधी मिळाली पाहिजे. ही संधी आणून देणें हें लोकशाही सरकारचें एक कर्तव्यच आहे. या स्थानिक संस्थामुळें छोटे छोटे पुढारी प्रथम तयार होतात. अशा संस्थामुळें स्थानिक राज्यकारभारामध्यें मन घालण्यास त्यांना प्रथम प्रेरणा होते. पुढारीपणाची महत्वाकांक्षा ही अशी एक प्रेरणाशक्ती आहे कीं ती लोकांना कधींहि स्वस्थ बसूं देत नाहीं. त्यांना जास्त जास्त कार्य

करण्यास ही प्रवृत्त करीत असते. कदाचित कित्येकांच्या अंतःकरणांत ती स्वार्थदृष्टिहि उत्पन्न करील, पण लोककार्य हाच केवळ पवित्र हेतु मनांत ठेवून कांहीं लोक राज्यकारभारांत लक्ष घालतील हेंहि अगदीं स्पष्ट व सरळ आहे.

पण स्थानिक राज्यसंस्थांच्या अस्तित्वाचा खरा हेतु म्हणजे लोकशिक्षण देऊन राज-कारभारासंबंधाचा अनुभव लोकांना प्राप्त करून द्यावयाचा. निवडणुकी कशा होतात, उमेदवारांनीं व मतदारांनीं कसें वागलें पाहिजे, मतें देण्यापूर्वी लोकांनीं कोणत्या गोष्टींचा विचार करावा, अशा संस्थांनीं आपला कारभार कसा चालवावा, राज्यकारभारांत कसकशा अडचणी उद्‌भवतात, आपलें ध्येय व केवळ तात्त्विक विचार व्यवहार्य होण्यास काय केलें पाहिजे, राज्यघटनेप्रमाणें न वागलें म्हणजे काय होतें; तारतम्य विचार सोडून कार्य केल्यास कोणते अनर्थ कोसळतात, इतर सभासदांशीं किंवा पक्षांशीं सहकार्य केल्यानें कसा फायदा होतो, संस्थांच्या सभा कशा चालतात व त्यांत आपण कसा भाग घ्यावयाचा, आपल्या मतदारसंघाशीं नेहमी संबंध ठेवल्यानें आपलें हित कसें होतें व त्यांच्याशीं बेइमानपणें व तुच्छतेनें वागलें म्हणजे पुढच्या निवडणुकीच्या वेळीं आपला कसा तोटा होतो, इत्यादि विविध गोष्टींचें शिक्षण स्थानिक राज्यसंस्थांमुळें लोकांना मिळत असतें. एखाद्या नवशिक्या मनुष्यापुढें मोठें यंत्र ठेवून तें चाल-विण्यास त्याला सांगितलें असतां त्याची जी तारंबळ उडते, तशीच स्थिति हें शिक्षण किंवा हा अनुभव न घेतां लोकसत्ताक राज्यकारभार चालविणाऱ्या लोकांचीही होत असते हें पक्कें समजावें. अनुभवानंतर त्यांना तें चालवून दाखवितां येईल यांत शंका नाहीं, पण आरंभावस्थेंत त्यांच्या हातून अनेक अक्षम्य चुका घडतील व त्यांचे दुष्परिणाम जनतेला निष्कारण भोगावे लागतील. राज्यकारभाराचा अनुभव, प्रसंगावधान, विरोधाच्या क्षोभकारक परिस्थितींतही कायम ठेवलेला मनाचा समतोलपणा, व्यवहारकुशलता व प्रामाणिकपणा या प्रमुख गुणांचा लोकशाहींत फार उपयोग होतो. त्यांची फार आवश्यकता भासते. राज्यकर्त्या पुढाऱ्यांच्या ठिकाणीं हे गुण असले म्हणजे लोकशाहीला विशेष भिती उरत नाहीं. या गुणांचा विकास करणें हा स्थानिक स्वराज्यसंस्थांचा मुख्य हेतु आहे; आणि म्हणूनच अशा संस्था लोकशाहीच्या उत्कृष्ठ शिक्षणसंस्थाच होत असें म्हणण्यास हरकत नाहीं.

स्थानिक राज्यसंस्थांची अर्वाचीन उत्क्रांति:--या संस्थाचा आधुनिक लोकशाहीच्या कालांतच उदय व उत्कर्ष झाला आहे असें कोणी समजूं नये. बीजरूपानें प्राचीन व मध्ययुगीन कालांतसुद्धां त्यांचें अस्तित्व होतें असें इतिहासावरून स्पष्ट दिसतें. त्यांचाच क्रमाक्रमानें विकास होत गेला. लोकांच्या हातीं जसजशी जास्त जास्त सत्ता येऊं लागली तसतसा या संस्थांचाही उत्कर्ष होत गेला. आपल्या देशांतील ग्रामपंचायतींच्या प्राचीनत्वाबद्दल शंका घेण्यास जागाच नाहीं. इंग्लंड देशांत सुद्धा अगदीं आरंभीं आरंभीं खेड्यापाड्यांतील लोक एका झाडाखालीं मधून मधून जमून आपला छोटासा कारभार पहात असत. ग्रीस देशांत याच स्थानिक संस्था अत्यंत प्रबळ असून त्यांच्या हातीं आधुनिक सरकाराचें सर्व अधिकार होते. पुढें त्यांचें परिवर्तन नगर-राष्ट्रांमध्यें (City States) झालें. हिंदुस्थानाप्रमाणें चीन देशांतही आपापसांतील भांडणें मोडण्यासाठीं अनेक प्राचीन संस्था होत्याच. या सर्व संस्थांकडे कमीअधिक अधिकार

असत. पुढें पुढें राजाचें प्राबल्य वाढून राज्यकारभारांचें क्षेत्रहि अधिक विस्तृत होऊं लागलें. तथापि खेडयापाडयांतील लोकांना राजांच्या शासनाचा दाब मुळींच जाचक होत नसे, किंवा फार तर क्वचित् प्रसंगीं होई. तेव्हां थोडयाशा बाबी सोडून दिल्या तर ही अज्ञ ग्रामप्रजा आपापला सोपा कारभार स्वतःच पहात असे.

आधुनिक कालांत मात्र या संस्थांना स्थिरत्व व महत्व आलें आहे. या संस्थाचें कार्य-क्षेत्र विशेष व्यापक झालें आहे. नवीन नवीन कल्पना अमलांत येत आहेत. सरकार म्हणजे संघटित समाजसंस्था असून त्याच्या उन्नतीसाठीं जें जें कांहीं करणें इष्ट व आवश्यक आहे तें तें सर्व करणें हें सरकारचें कर्तव्यच आहे असें अलीकडे लोकांना वाटूं लागलें आहे. औद्योगिक क्रांतीमुळें उद्योगधंदे व कारखाने यांची जी कल्पनातीत वाढ झाली, तीमुळें उत्तरोत्तर अधिक अधिक सामाजिक व राजकीय प्रश्न उपस्थित झाले असून ते सर्व सोडविणें सरकाराचें कर्तव्य ठरतें अशी लोकांची एकंदर समजूत झाली आहे. अर्थात् त्यापैकीं कित्येक स्थानिक गोष्टी स्थानिक राज्यसंस्थांकडे सोपविण्यांत येत आहेत. एवंच सरकाराप्रमाणें या संस्थांचेंही कार्यक्षेत्र हळूंहळूं वाढत आहे हें दिसून येईल.

हिंदुस्थानात म्युनिसिपालिटया व लोकलबोर्डे या मुख्य स्थानिक संस्था होत. इतर देशांत निरनिराळया नांवांनीं त्यांना संबोधण्यांत येतें. आपल्या देशांतील संस्थांना जेवढा अधिकार आहे त्यापेक्षां पाश्चात्य संस्थांना जास्त आहे. तसेंच त्यांचें कार्यक्षेत्रही विशेष व्यापक असून त्यांना नानाप्रकारच्या सुधारणा करण्यास बराच वाव असतो.

**स्थानिक राज्यकारभार:**—नगराच्या आरोग्याकडे लक्ष देणें व प्राथमिक शिक्षण देण्याची सोय करणें ही स्थानिक राज्यसंस्थांचीं दोन प्रमुख कर्तव्यें आहेत. ह्या दोन्ही बाबी अत्यंत व्यापक असून त्यासंबंधानें या संस्थांना अनेक गोष्टी करता येतात. शहरांतील सडका बांधणें व त्या नेहमीं उत्तम स्थितींत ठेवणें, सडकावरून रात्रीं दिवे लावण्याची व्यवस्था करणें, गांवांतील सर्व मलमूत्र व घाण काढणें, सार्वत्रिक रोगाचे निवारण करण्याचा प्रयत्न करणें, स्वच्छता ठेवणें, मुलांना खेळण्यास बागबगीचे लावणें, त्यांना पोहावयाची सोय करून देणें, सारांश नगराचे एकंदर आरोग्य ज्या ज्या प्रकारें उत्तम राहील त्या त्या सर्व गोष्टी करणें. तसेंच प्राथमिक शिक्षण सक्तीचें व मोफत करणें, शहरांतून ठिकठिकाणीं वाचनालयें स्थापन करणें, मधून मधून शिक्षण व आरोग्य याविषयीं व्याख्यानें देण्याची व्यवस्था करणें, विद्यार्थ्यांना व्यायामाची गोडी लावणें इत्यादि गोष्टी शिक्षण या मथळयाखालीं स्थानिक राज्यसंस्थांना करतां येतात. व त्या करीत असताना जो काय खर्च यावयाचा तो भरून निघेल इतक्या उत्पन्नाच्या बाबीही त्यांच्याकडे सोंपविण्यांत येतात. अलीकडे यांचें कर्तव्यक्षेत्र बरेंच व्यापक झालें आहे.

स्थानिक कारभाराला नगरांतील प्रतिष्ठित व सुशिक्षित लोकांकडून जेवढी सक्रिय सहानुभूति लाभावी तेवढी लाभत नाहीं असें दिसून येते. तसें होणें एकप्रकारें अपरिहार्यच आहे सर्वच सुशिक्षित, लायख व कर्तबगार लोक या संस्थांकडे आपलें सर्व लक्ष घालूं लागलें तर प्रांतिक व मध्यवर्ती राज्यसंस्था कोणाच्या भरंवशावर चालाव्यात ? तेव्हां

मोठमोठे पुढारी या संस्थांकडे पुरेसें लक्ष देतील अशी अपेक्षा बाळगणें व्यर्थ आहे. शिवाय लोकसत्तेच्या दृष्टीनें या संस्थांचा उपयोग योग्य पुढारी निर्माण करणें हा आहे ही गोष्ट विचारांत घेतली तर इतरेजनांनींच स्थानिक कारभारांत मन घालून तो उत्तम प्रकारें चालवून दाखवावा व तेणेंकरून पुढारीपणाची योग्यता क्रमाक्रमानें संपादन करावी हेंच इष्ट आहे.

या संस्था चालविण्यास अशा रीतीनें योग्य, अनुभवी व सुशिक्षित लोक न मिळाल्यामुळें त्यांच्या कारभारांत थोडीशी अंदाधुंदी रहावी हें अगदीं साहजीक आहे. हे छोटे पुढारी कित्येक प्रसंगीं स्वार्थसाधूही बनतात, नाहीं असें नाहीं. तेव्हां त्यांच्याकडून नगराच्या खऱ्या कल्याणाकडे आबाळ होते हें उघडच आहे. हीच स्थिती सर्व देशांत दिसून येते. संयुक्तसंस्थान (अमेरिका) हें तर लोकसत्तेचें माहेरघर. पण तेथेंही या स्थानिक राज्यसंस्थामध्यें अनेक घोटाळे नित्यशः उपस्थित होत असतात, इतके कीं सर्व सूज्ञ लोकांना त्यांच्याबद्दल तिरस्कार उत्पन्न होतो. लोकसत्तेच्या मार्गावर केवळ पदार्पण करणाऱ्या आपल्या देशांतही थोडासा असाच प्रकार दिसूं लागला तर आपण त्याचा विनाकारण बाऊ करण्यात अर्थ नाहीं. यामुळें कित्येक लोक उद्वेगानें असेंही म्हणूं लागतात कीं आपला देश लोकसत्तेसाठीं योग्य नाहींच. निराशावादाची सीमा याच्या पलीकडे क्वचित् जाईल. उत्साह व आशा यामुळें जगांत मोठमोठीं कार्यें घडलेलीं आहेत, व घडतील. कर्तृत्वहीन पुरुष लहानशा अपयशानेंही गांगरून जातात; त्यांच्या हातून कांहींच कार्य होत नाहीं. स्थानिक राज्यकारभाराच्या गोष्टी क्षुल्लक असतात, त्यांत किंचित घोटाळाही उत्पन्न झाला तर कांहीं मोठेंसें नुकसान होत नाहीं. कालान्तरानें हेही सर्व दोष निघून जातील. मात्र चिकाटी, धिम्मेपणा कार्यकुशलता हीं पाहिजे. या गुणांचा एकाएकी सार्वत्रिक विकास होणें कसें शक्य आहे ?

पण लोकशाही सुफलित करून दाखवावयाची असल्यास लोकसत्तेची होत आहे त्यापेक्षां अंमळ निराळ्या प्रकारें विभागणी व्हावयास पाहिजे यांत मात्र शंका नाहीं. आजकाल स्थानिक राज्यसंस्थांना, निदान आपल्या देशांत तरी, पुरेसे अधिकार नाहींत. त्यांचें कार्यक्षेत्र विशेष व्यापक नाहीं. ठराविक मर्यादा त्यांना ओलांडतां येत नाहीं. तसेंच जीं कांहीं कार्यें त्यांना करावयाचीं असतात त्यांसाठीं पुरेल इतकें उत्पन्नहि त्यांना नसतें. त्यामुळें त्यांचे हातपाय आखडल्यासारखे होतात. मग नवीन आवश्यक सुधारणा करण्यास त्यांना संधी कशी मिळावयाची ? म्हणून या संस्थांचें कार्यक्षेत्र वाढविल्यास व तन्निमित्त खर्च होणाऱ्या पैशाची तरतूद करून दिल्यास त्यांच्या हातून उत्कृष्ठ कार्य होईल एवढेंच नव्हें तर सुशिक्षित जनता स्थानिक राज्यकारभारांत अधिक उत्साहानें मन घालून तो आदर्श करून दाखविण्याचा प्रयत्न करील अशी आशा बाळगण्यास हरकत नाहीं. तसेंच राज्यकारभाराच्या या घटक-संस्थांना अधिक सत्ता प्राप्त झाल्यास लोकशाही अन्वर्थकहि होईल, प्रत्येक नागरिकाला आपण राजकीय सत्ता किंवा स्वातंत्र्य उपभोगीत आहों ही जाणीव होईल, व येणेंप्रमाणें तो आपलें कर्तव्य उत्तमरणें करण्याचा प्रयत्न करील. प्रत्येक देशांतील राजकीय असंतोषाच्या बुडाशीं नागरिकांच्या हातांत असलेल्या राजकीय सत्तेचा अपुरेपणा हेंच मुख्य कारण असतें. आपल्या स्वाधीन पुरेशी सत्ता आहे व चिकाटीनें, प्रामाणिकपणानें व कुशलतेनें कोणतेंही लोककार्य केल्यास तें सिद्धीस जाईल अशी जर देशांतील तमाम लोकामध्यें जाणीव उत्पन्न झाली तर देशावर कोसळणाऱ्या अन्तर्गत आपत्तींना अंशतः तरी पायबंद बसेल असें वाटतें. ही सत्ता प्रत्येक नागरिकाकडे देण्याचीं जीं अनेक साधनें आहेत तींत स्थानिक स्वराज्यसंस्था हें मुख्य आहे. म्हणून या संस्थांचे अधिकारक्षेत्र वाढविणें, त्यांचीं कर्तव्यें अधिक व्यापक करणें व त्यांच्या स्वाधीन पुरेशा उत्पन्नाच्या बाबी देणें हें लोकसत्ताक राज्यपद्धतींत अत्यंत आवश्यक आहे.

# भाग दुसरा

( लोकसत्तेचें समालोचन )

# लोकसत्तेचे गुणदोष-

## गुणाविष्करण

### प्रकरण ९ वें

येथपर्यंत लोकसत्तेच्या अंतर्व्यवस्थेचें संक्षिप्त रीतीनें सर्व वर्णन झालें. लोकसत्तेची राज्यघटना कशी असते, लोकमताचा राज्यकारभारावर कितपत परिणाम होतो, लोकांच्या प्रतिनिधींचीं, तसेंच पुढाऱ्यांचीं, कर्तव्यें कोणतीं, स्थानिक राज्यसंस्थांचा या राज्यव्यवस्थेला कसा उपयोग होत असतो वगैरे प्रश्नांची चर्चा झाली व तेथेंच पुस्तकाचा प्रथम भाग समाप्त झाला. या दुसऱ्या भागांत लोकसत्ताक राज्यपद्धतीचें टीकात्मक विवेचन करावयाचें योजिलें आहे.

प्रथमत: हें लक्षांत ठेवलें पाहिजे कीं अगदीं निर्दोष अशी कोणतीच राज्यव्यवस्था नाहीं. प्रत्येक घटनेंत कोणता ना कोणता तरी दोष असावयाचाच. अनियंत्रित राजसत्ता, लोकसत्ताक राज्यपद्धति, समाजसत्तावाद किंवा अगदीं अलीकडे निघालेलें फॅसिझमचें तत्व या सर्वांत कमी अधिक प्रमाणांत दोष आहेत हें कोणालाहि नाकबूल करतां येणार नाहीं. आपल्याला फक्त तुलनात्मक दृष्टीनेंच यापैकीं प्रत्येक राज्यव्यवस्थेकडे पाहावयाचे व त्यांतल्या त्यांत लोकसत्ताक राज्यपद्धति कितपत गुणयुक्त आहे, किंवा दोषयुक्त आहे, हें ठरवावयाचें. दुसरें असें कीं परिस्थिति अनुकूल असली, एकादी राज्यघटना यशस्वी करून दाखविण्याची लोकांची तयारी असली, तर ती कितीहि सदोष असो, ती व्यवस्थित रीतीनें चालवून दाखविण्याचा लोक हरतऱ्हेनें प्रयत्न करतील व बहुतांशीं त्यांना यशहि येईल. उलटपक्षीं असंतुष्ट व अननुभवी लोकांच्या समोर विद्वान व कुशल कायदेपंडितांनीं सर्वतोपरी निर्दोष, व्यवहारक्षम व उत्कृष्ट समजून एकादी राज्यघटना ठेवली तर ती अत्यल्प कालांतच अव्यवहार्य ठरून मोडकळीस आल्यावांचून राहणार नाहीं. कारण राज्यघटनाहि एखाद्या यंत्राप्रमाणेंच असते. यंत्रावर काम करणाऱ्या मनुष्यानें त्यास निरुपयोगी अतएव त्याज्य ठरविण्याचा निश्चय केला तर त्यास हें काम सहज करतां येईल. तीच गोष्ट राज्यघटनेंविषयींहि आहे. तेव्हां या गोष्टीकडे लक्ष देऊनच आपणास लोकसत्तेचे गुणदोष ठरविले पाहिजे. एकाद्या देशांत लोकसत्ताक राज्यघटना पूर्ण अयशस्वी ठरली तर त्यामुळें ती वाईटच आहे असें कोणीहि सरसकट मत बनविणें चांगलें नाहीं. तसेंच दुसऱ्या एका देशांत ती व्यवस्थितरीतीनें चालली असली तरीहि तिच्याबद्दल बाजवीपेक्षां चांगलें मतहि बनविणें योग्य नाहीं. एवढी प्रस्तावना पुरे झाली. आतां प्रस्तुत विषयाकडे वळावयास हरकत नाहीं.

(१) लोकसत्ताक राज्यपद्धतीचा पहिला मोठा गुण असा कीं ती एका मनुष्याच्या लहरीनें किंवा अनियंत्रित तंत्रानें चालत नसल्यामुळें एकसूत्री व अनिर्बंध राजसत्तेंतील ठळक दोष तींत नाहींसे होतात. राजसत्तेंत राहणाऱ्या लोकांचें सुखदुःख, त्यांची उन्नति किंवा अव-

नंति त्यांचें हित किंवा अहित सर्वस्वी राजाच्या योग्यतेवर अवलंबून असतें. राजा निर्दयी, दुर्वर्तनी मूर्ख व अकर्तृत्ववान असला म्हणजे प्रजेवर ओढवणाऱ्या आपत्तींना अंतच नको. प्रजेवर पुत्रवत् प्रेम करणारे, दयाशील व सामर्थ्यवान् राजे देशाला क्वचितच लाभत असतात. मध्ययुगीन कालाचा इतिहास वाचीत असतांना पदोपदीं असें दिसून येतें कीं राजा म्हटला म्हणजे तो दुर्गुणांचा किंवा बीभत्स विकारांचा मूर्तिमन्त पुतळाच होय. त्याच्या राज्यकारभारांत जनतेवर होणारा अनन्वित जुलूम, त्यांचा नैतिक व भौतिक अधःपात यांकडे लक्ष गेलें म्हणजे राजसत्तेबद्दल तिरस्कार उत्पन्न होतो. पूर्वीच्या मानानें आधुनिक कालांत राजाचा जुलूम बराच मर्यादित झालेला दिसतो हें खरें, पण त्याचें कारण म्हणजे त्यांच्यामध्यें आतां सुधारणा झाली आहे हेंच नसून लोकसत्तेच्या वर्धिष्णु बलानें, प्रतापानें व ऐक्यानें ते भयभीत झाले आहेत असें म्हटलें तर तें सत्याला अधिक धरून होईल. त्यामुळें ते लोकाला वचकतात, त्यांच्या मताला ते फारसा विरोध करीत नाहींत. कित्येक राजे तर आतां केवळ नामधारी झाले असून कायदेमंडळानें पास केलेल्या कायद्यांवर सही करण्यापलीकडे किंवा देशाचा एक शृंगार यापलीकडे त्यांना अधिक कोणतीहि म्हणण्यासारखी व्यावहारिक सत्ता नाहीं.

राजसत्तेंत होणाऱ्या जुलुमामुळेंच राष्ट्रीयत्वाचा प्रथम अस्पष्ट उदय झाला ही एकच गोष्ट लक्षांत घेतली कीं पुरें. लोकसत्ता स्थापन करण्याची जनतेला केवळ तात्विक हौस उत्पन्न झाली नाहीं. राजांच्या अपरिमित छळाला कंटाळूनच प्रथम त्यांनीं त्यांची अनियंत्रित सत्ता उधळून लावण्याचा प्रयत्न केला. व जसजसें त्यांच्या प्रयत्नाला यश येऊं लागलें तसतसा त्यांनी लोकसत्ता स्थापन करावयास प्रारंभ केला. यावरून ही गोष्ट सिद्ध होते कीं राजसत्तेपेक्षां लोकसत्तेंतच आपणांस अधिक सुखी व संतुष्ट राहतां येईल अशी प्रथम जनतेची खात्री झाली असली पाहिजे. त्याशिवाय राजसत्तेचा समूळ पराभव करण्याच्या भानगडींत ते कदापि पडले नसते

'पांचामुखीं परमेश्वर' अशी एक म्हण आहे. एखाद्या महत्वाच्या गोष्टीबद्दल एकापेक्षां अधिक लोकांची सल्लामसलत घेणें चांगलें हें एक व्यवहारांतलें साधें तत्व आहे. जेव्हां ज्याच्या धोरणाच्या पसंतीनापसंतीवर साऱ्या राष्ट्रांतील लोकांचें हिताहित अवलंबून असतें त्या धोरणासंबंधानें अनेक अनुभवी व राजकारणकुशल लोकांची संमति घेतलेली बरी असें कोणीही नाकबूल करणार नाहीं. लोकसत्ताक राज्यकारभारांत मंत्रीमंडळाच्या कार्यावर कायदेमंडळांतील विरोधी पक्षांची अविरत करडी नजर असते. देशांतील विशिष्ट लोकांवर अन्याय झाला; वैयक्तिक लोकांच्या हितसंबंधाला अन्यायानें धक्का बसला; सरकारी अधिकाऱ्यांनीं जुलूम केला; किंवा लांचलुचपत खाल्ली; सारांश घडूं नये तें वर्तन झालें, तर कायदेमंडळांतील त्या त्या भागांचे प्रतिनिधी सरकारावर प्रश्नांचा भडिमार करून, ठराव आणून, किंवा आणीबाणीचा प्रसंग म्हणून सभागृहांत उघड चर्चा करण्याची विनंती करून अथवा इतर प्रकारें सरकारचा विरोध करून हा सर्व होत असलेला अन्याय व जुलम चव्हाट्यावर आणतात, आणि लोकांचीं गाऱ्हाणीं दूर करावयास सरकारला भाग पाडतात. तसेंच लोकसत्तेंतील प्रतिनिधी आपापल्या मतदारसंघांत सर्व कारभार सुरळीतपणें चालला आहे काय इकडे सदैव लक्ष देत असतात.

राजसत्तेंतील प्रजाजनांपेक्षां लोकसत्ताक अमलांतील लोक अधिक धीट, कर्तव्यतत्पर व न्यायप्रिय असतात. राजसत्तेंत कित्येकदां तर राज्यकारभाराच्या विरुद्ध नाना प्रकारचीं गाऱ्हाणीं उघडकीस आणण्याचीहि चोरीच असते. तसें करावयाची लोकांना भीतीच वाटते; न जाणो, राजानें किंवा त्याच्या नोकरांनीं असल्या दोषनिदर्शनामुळें, अधिकच चिडून जाऊन, जास्त बेबंदशाही माजविली तर! करावयास जावें एक व व्हावें भलतेंच अशांतलाच प्रकार व्हावयाचा! सरकाराचा रोष आपणावर होईल कां या चिंतेनें त्यांचें मन सदैव ग्रस्त झालेलें असतें. उलटपक्षीं हा लोकसत्तेंतील प्रतिनिधी सरकारी नोकरांच्या अवकृपेची यत्किंचितहि क्षिती न बाळगतां आपल्याला योग्य दिसेल तो मार्ग निश्चयानें व निर्भयतेनें पत्करतो, त्यामुळें लोकांची एकंदर गाऱ्हाणीं किंवा तक्रारी दूर होण्याची लोकसत्तेंत अधिक संधि असते हें निर्विवाद आहे.

पण लोकांचा जेथें राज्यकारभारावर सामान्यतः ताबा असतो, किंवा सरळ शद्बांत सांगावयाचें म्हणजे सामान्य जनताच जेथें अप्रत्यक्षपणें कां होईना, लोकसत्ताक सरकाराची निवड करीत असते, तेथें राजसत्तेंतील लोकांवर होतो तसा जुलूम होणें तत्वतःच अशक्य असतें. जनतेचें हित व्हावें ही एकच भावना जेव्हां प्रतिनिधींच्या अन्तःकरणांत जाज्वल्यानें वास करीत असते, तेव्हां अन्यायाची भाषा बोलण्याचें कांहीं कारणच उरत नाहीं. राजसत्तेपेक्षां लोकसत्तेंत परस्पर बधुभावाचीं व राष्ट्रसेवेची कल्पना जास्त विकसित झालेली असते; कारण लोकसत्ता स्थापन करण्यासाठीं अखिल जनसमुदाय खांद्याशीं खांदा भिडवून, कमीअधिक स्वार्थत्याग करून व आवश्यक हालअपेष्टा सोसून राजापासून सत्ता कशी हिसकवून घ्यावी हें उत्तम रीतीनें जाणतो. हेच सामुदायिक संस्कार व परंपरा समाजामध्यें पुढेंही टिकून राहतात. अशा या समाजांत किंवा राष्ट्रांत प्रजासत्ताक राज्यकारभार स्थापन झाल्यावर अधिकारांत आलेला पक्ष अन्यायानें हातीं आलेल्या राज्यसूत्रांचा पूर्ण दुरुपयोग करील हें सामान्यतः संभवतच नाहीं.

आतां हें खरें कीं क्वचित् प्रसंगीं किंवा क्वचित् ठिकाणीं लोकांवर थोडथोडा जुलूम झालेलाही आपणांस दिसून येईल. तसा प्रत्येक दिव्याखालीं थोडाबहुत अंधार असावयाचाच. म्युनिसिपालिटीची पाण्याची गाडी पाणी शिंपडत शिंपडत सडकेवरून चालली असतां बाजूला उभे असलेल्या लोकांच्या अंगावरही थोडे शितोडे उडतातच. त्यांना तिच्यापासून क्वचित् त्रासही होतो. लोकशाहीचा प्रचंड व गुंतागुंतीचा राज्यकारभार कांहींसा धकामकीचा असतो. "रोड रिपेरीचें" काम चाललें असतां जसें स्टीमरोलरखालीं सांपडलेल्या छोटया प्राण्यांनाहि क्वचित हानी पोहोंचते तद्वतच प्रजासत्ताक राज्यव्यवस्थेच्या वरवंटयाखालीं क्वचित् प्रसंगीं कांहीं लोकांवर नकळत जुलूम होण्याचाही संभव आहे. पण ही गोष्ट निदर्शनास येतां त्याचा प्रतिकार करण्याचा सर्व लोक प्रयत्न करतात. राजसत्तेंत मात्र तो उघडकीस न आणण्याचाही यत्न चालू असतो. सारांश, राज्यकारभार हा असाच असावयाचा, पुष्कळांचें पुष्कळ हित साधीत असतांना कांहीं लोकांचें नुकसानही होतें. पण तें अपरिहार्यच आहे, असें समजून तिकडे दुर्लक्ष केलेलेंच बरें.

दुसरें असें कीं लोकशाहींतील राज्यव्यवस्था बहुधा बहुसंख्याक पक्षाच्या हातीं असते. या कारणास्तव त्या पक्षाच्याच धोरणाचा छाप राज्यकारभारावर पडतो. बहुतेक सरकारी बिलें किंवा ठराव याच धोरणाला अनुलक्षून असतात. म्हणून अल्पसंख्याक पक्षाच्या मताविरुद्धच कायदे पास व्हावयाचें; तेव्हां हाहि एकप्रकारचा जुलूमच आहे व कायदे लोकहिताविरुद्ध आहेत असें त्यांना साहजीकच वाटत असतें. या दृष्टीनें विचार करतां लोकसत्ता म्हणजे बहुसंख्याक पक्षाचा राज्यकारभार असून त्यामुळें अल्पसंख्याक पक्षांच्या ध्येयाला, धोरणाला किंवा कार्यक्रमाला किंचित् तरी ढळ बसतो हें सिद्ध होतें. हा अन्याय नव्हे काय? लोकसत्तेंत असें होऊं देणें इष्ट आहे का? कोणी असे प्रश्न विचारतील. याला उत्तर असें कीं राज्यकारभार एकाच्या (राजाच्या) ताब्यांत ठेवून तो त्यानें अनियंत्रितपणें चालविण्यापेक्षां राष्ट्रांतील बहुसंख्य पक्षाकडे तो सोंपविला तर त्यांत गैर असें कांहींच नाहीं. अधिकाराच्या मदांत एक मनुष्य जुलमी, व्यसनी व कर्तृत्वभ्रष्ट होण्याचा संभव जास्त असतो. बहुसंख्याक पक्षाची तशी प्रवृत्ति होणें असंभनीय असते. तसेंच, लोकशाहींत विरोधी अल्पसंख्याक पक्षांच्या हातीं प्रत्यक्ष अधिकार नसतो एवढेंच. पण त्यांच्या तीव्र व एकरूप विरोधाकडे कोणत्याही प्रबळ बहुसंख्य पक्षाला अजीबात दुर्लक्ष करतां येणें शक्य नाहीं. शिवाय हा अल्पसंख्य पक्ष कायमचाच अधिकारविमुख राहील असें थोडेंच आहे! आज ना उद्यां तो बहुसंख्य होऊन राज्याचीं सर्व सूत्रें आपले हातीं घेईलहि. बहुसंख्य पक्ष सदैव दूरदृष्टी ठेवून विशिष्ट मर्यादांचें उल्लंघन सहजा करीत नाहीं हें नेहमीं लक्षांत ठेवावें. तेव्हां लोकशाहीत अल्पसंख्याकांवर जुलूम होण्याचा संभव आहे ही भीति विशेष साधार व खरी नाहीं.

(२) लोकसत्तेचा दुसरा महत्वाचा गुण म्हणजे प्रजासत्ताक राज्यकारभार नेहमीं जनतेची संमति, सहानुभूति व साहाय्य यांच्यावर अवलंबून असतो. राजसत्तेच्या जुलमी राज्यव्यवस्थेंत या तत्वांना बहुधा अर्धचंद्रच मिळतो. रूसोनें आपल्या सोशल कॉन्ट्रॅक्ट या सुप्रसिद्ध पुस्तकांत म्हटल्याप्रमाणें मनुष्य खरोखरच निसर्गत: स्वतंत्र असतो; पण तो जसजसा मोठा होतो तसतसा आपणाभोंवतीं अधिकाधिक बंधनें आहेत असें त्यास दिसून येतें. याचें कारण हें कीं राजसत्तेंत हळूहळू त्याचें सर्व स्वातंत्र्य नष्टप्राय होऊन कळपांतील मेंढयाप्रमाणें मेंढपाळाच्या चाबुकाला भिऊन वागणारा तो सर्वस्वी असहाय, परावलंबी, परवश असा प्राणी बनतो. अलीकडील सर्व तत्ववेत्त्यांचें असें मत झालें आहे कीं मनुष्यप्राणी हा उपजतच स्वतंत्र असून त्याच्या व्यक्तित्वाचा विकास करण्यासाठीं स्वतंत्र अशा वातावरणांतच त्याला राहूं दिलें पाहिजे. ह्याच तत्वाचा जणूं काय स्वीकार करून अमेरिकन स्वातंत्र्ययुद्धानंतर जेव्हां तेथील मुत्सद्दी नवीन राज्यघटना तयार करण्यास एकत्र जमले तेव्हां एकमतानें त्यांनीं असें ठरविलें कीं संयुक्तसंस्थानांचे सर्व नागरिक पूर्ण स्वतंत्र असून राज्यकारभाराच्या सर्व बाबतींत सर्वांना सारखीच संधि मिळाली पाहिजे. ज्या तत्वांवर अमेरिकेची राज्यघटना तयार झाली त्यापैकीं हें वरील तत्व अत्यंत महत्वाचें समजलें जातें. तसेंच फरेंच राज्यक्रांतीचें Liberty, Equality & Fraternity म्हणजे स्वतंत्रता, समता व बंधुता हीं ब्रीदवचनें होतीं. या स्फूर्तिदायक संदेशानें अखिल फरेंच लोक उत्साहित होऊन लोकसत्ता स्थापन करण्यासाठीं त्यांनीं केवढें अचाट

साहस, अलौकिक कार्यकुशलता व अद्वितीय स्वार्थत्याग दाखविला हें इतिहासवाचकांना नव्यानें सांगावयास नको. या उच्च ध्येयामुळें त्यांच्यामध्यें नवचैतन्य संचरूं लागलें व अर्धवट कां होईना, प्रजासत्ताक राज्यकारभाराचा उपक्रम त्यांनीं सुरू केला. स्वातंत्र्य प्राप्त करण्यासाठीं कितीही स्वार्थत्याग केला, हालअपेष्टा सोसल्या तरी त्या अपुऱ्याच पडावयाच्या; त्यांचें फलस्वरूप जें स्वातंत्र्य तें उपभोगण्यास कोणतीही किंमत द्यावयास जनता तयार असते, निदान झाली पाहिजे. याचें कारण हें कीं स्वतंत्र राष्ट्रांत सर्व राजकीय हक्क प्राप्त होऊन प्रत्येकाला आपापलें व्यक्तित्व विकसित करण्यास पुरेशी संधि मिळते. सर्व नागरिकांना हे हक्क देणें आवश्यक कां आहे याचा आपण विचार केला तर असें दिसून येईल कीं ते प्रदान केल्याखेरीज राज्यकारभारासंबंधानें लोकांची स्पष्ट संमति, सक्रिय सहानुभूति व निरपेक्ष साहाय्य मिळण्याची आशा कमी. प्रत्येक राज्यकारभाराचा व्यवस्थितपणा, उत्कर्ष व विकास होण्यासाठीं जनतेचें हार्दिक सहकार्य असणें अत्यंत आवश्यक आहे राज्याची शाश्वती त्यांच्यावर अवलंबून असते. एकाद्या इमारतीला आधारभूत झालेले दगड मिस्किलपणानें जर कोणी काढून घेतलेत तर ती ढासळून पडण्यास जसा फारसा विलंब लागणार नाहीं; तद्वतच जनतेनें असहकार्य करून अडवणुकीच्या मार्गाचें अवलंबन केलें तर राज्याचा गाडा सुरळीतपणें चालणार नाहीं. ही गोष्ट अनियंत्रित राजसत्तेला सुद्धां लागू पडते. मग जेथें मतदारांच्या सहकार्यावरच राज्यकर्त्यांना विश्वसून रहावें लागतें त्या लोकशाहीला ही गोष्ट अधिक लागू व्हावी यांत नवल तें काय !

म्हणून लोकसत्ताक राज्यव्यवस्थेंत जेणेंकरून जनतेच्या हातीं सत्ता येईल व त्यामुळें त्यांना सरकाराशीं सहकार्य करण्याची प्रेरणा होईल अशी योजना असणें अत्यंत आवश्यक असते. म्हणजेच लोकांना जास्तींत जास्त अधिकार देणें होय. या योगें त्यांना एकंदर राज्यकारभाराविषयीं विशेष सहानुभूति व आपलेपणा वाटून ते आपल्याकडून शक्य तितकी मदत करण्याचा प्रयत्न करतात. राजसत्तेंत असा प्रकार पहावयास बहुधा सांपडावयाचा नाहीं. राजसत्ता लोकांची संमति व सहानुभुति यांवर कदापि अवलंबून नसते, हा तिचा सर्वांत मोठा दोष समजला जातो.

ज्या राज्यपद्धतीनें जनतेच्या जीवनक्रमास चालना मिळते, तिचें हित किंवा अहित, सुख किंवा दुःख, उन्नति किंवा अवनति यांना जी कारणीभूत होते, त्या राज्यपद्धतीबद्दल लोकांची संमति असणें अत्यंत आवश्यक आहे, हें कोणीहि कबूल करील. ही संमति व सहानुभुति प्राप्त होतांच ती राज्यव्यवस्था चिरकाल टिकेल, तिची उत्तरोत्तर योग्य वाढ होईल असें कोणी अनुमान केल्यास तें चुकीचें ठरणार नाहीं. लोकशाहीला जनतेचा पाठिंबा असतोच; कारण लोकशाही जनतेला जेवढें देते तेवढें राजसत्ता देत नाहीं. म्हणून राजसत्तेपेक्षां लोकसत्ता अधिक टिकाऊ व जनहितकारक होईल असें मानण्यास हरकत नाहीं.

(३) लोकसत्ताक राज्यकारभाराचा तिसरा महत्वाचा गुण असा कीं त्यायोगें लोकांचें आपल्या राष्ट्राबद्दल प्रेम वाढतें तसेंच राष्ट्रांतील निरनिराळ्या लोकांमध्यें परस्पर बंधुभावही उत्पन्न होतो. यामुळें राष्ट्रीयतेच्या भावनांना चालना मिळते. १४ वा, १५ वा व १६ वा लुई यांच्या स्वच्छंद व स्वैर वर्तनामुळें, अनन्वित जुलमांमुळें व निष्ठुर दडपशाहीमुळें त्रस्त

झालेले फरेंच लोक कदाचित एकत्र झाले असतील. पण आपण सर्व एकत्र होऊन १६ व्या लुईचा पराभव करूं व अनयंत्रित राजसत्तेच्या ठिकाणीं जबाबदार राज्यपद्धति सुरू करूं या चैतन्यमय आवेशें त्यांच्यामध्यें लवकर एकी झाली व पुढें त्यांनीं राज्यक्रांती केली. लोकसत्ता स्थापन करण्याची आशा–दुर्दम महत्वाकांक्षा-यामुळेंच आपापसांतील क्षुल्लक भेद विसरून ते सर्व एका मनुष्याप्रमाणें राजाच्या आततायीपणाला तोंड देण्यास सज्ज झाले.

वास्तवीक राष्ट्रप्रेम हें लोकसत्तेच्या मंदिराची पहिली पायरी आहे. आपल्या देशाबद्दल जाज्वल्य अभिमान असल्याखेरीज राजाच्या हातून प्रथम सत्ता झुगारून घेतां येणें अशक्य आहे. लोकसत्ता स्थापन झाल्यावर हा देशाभिमान वृद्धिंगत होत जातो. असें होणें अगदीं स्वाभाविक आहे.

याला पहिलें कारण असें कीं लोकशाही स्थापन झाल्यावर देशबांधवांची सेवा करण्यास लोकांना पुरेशी संधी प्राप्त होते. कारण राज्यकारभाराचीं सूत्रें लोकांच्या ताब्यांत येतात, राज्यकर्त्यांना व कायदेमंडळांतील सर्व सभासदांना सत्ता आपल्या हातीं घेण्यासाठीं आरंभीं मतदारांची याचना करावी लागते. अमुक उमेदवार आपल्या हितासाठीं, समाजाच्या किंवा अखिल राष्ट्राच्या एकंदर कल्याणासाठीं कांहींतरी खटपट करील अशी खात्री झाल्याशिवाय मतदार त्याला मत द्यावयाचे नाहींत. तेव्हां एकाद्या सत्तालोलुप पण स्वार्थी व मदान्ध मनुष्यालासुद्धां लोकांना संतुष्ट ठेवणें इष्ट वाटतें. पण असे लोक जास्त प्रमाणांत सांपडावयाचें नाहींत. वचन एक व कृति अन्य असे लोक मतदारांना नेहमीं नेहमीं फसवूं शकणार नाहींत. पण सामान्यत: असें दिसून येतें कीं लोकसेवा हेंच व्रत ज्यांनीं आचरिलें आहे असे लोकप्रिय पुढारी निवडणुकींत यशस्वी होतात. आपलीं मतें त्यांना देऊनच त्यांच्यावर असलेला आपला विश्वास मतदार व्यक्त करतात. त्यांच्या निरपेक्ष जनसेवेबद्दल लोकांपाशीं त्यांना देण्याजोगें आणखी दुसरें काय असावयाचें ? यशस्वी उमेदवारांच्या हातीं सत्ता येतांच अधिक लोकसेवा करावयास त्यांना उत्साह येतो.

लोकसेवा हेंच परस्परबंधुत्वाचें उत्कृष्ठ निदर्शक आहे. लोकसेवेचें व्रत राजसत्तेपेक्षां लोकसत्तेंतच अधिक आचरण्यांत येतें यांत संशय नाहीं. "परस्परं भावयन्तः श्रेयः परं अवाप्स्यथ" हें गीतावचन लोकसत्तेचा एक पायाच आहे. ही भावना जोपर्यंत राष्ट्रांत दिसून येत नाहीं तोंपर्यंत तें राष्ट्र लोकशाहीसाठीं पूर्ण तयार झालें आहे असें म्हणतां येणार नाहीं. तसेंच एकदां ही भावना उद्दीपित झाली म्हणजे लोकशाहींत तिला अत्यंत पोषक अशी परिस्थिती प्राप्त होते.

Democracy is a philosophy of Fellowship म्हणजे लोकसत्ता बंधुभावनेच्या अभिवृद्धीचें एक तत्वज्ञान आहे, असें एका ग्रंथकारानें (Brown-Meaning of Democracy) म्हटलें आहे. या राजकीय समाजांत सर्व लोकांनीं परस्परांशीं स्नेहरज्जूनें निगडित होऊन आपल्या राष्ट्राची नैतिक व भौतिक उन्नति करावी व जगांतील सर्व राष्ट्रांशीं मित्रत्वाचा संबंध ठेवून विश्वबंधुता वाढवावी हें लोकशाहीचें अंतिम ध्येय आहे. तें गाठण्याचा सर्वांनीं एकदिलानें प्रयत्न केला पाहिजे. आतां एवढें खरें कीं प्रत्यक्ष व्यवहारांत या ध्येयाची

बहुधा पायमल्ली होत असते. राष्ट्रांतील सर्व लोक एकमेकांशीं सलोख्यानें वागत नाहींत. त्यामध्यें अनेक पक्ष–उपपक्ष असतात, व त्यामुळें देशांत थोडीशी दुहीहि माजते. हें एकप्रकारें अपरिहार्यच आहे. कारण एकाद्या प्रश्नावर सर्वांचें एकमत होणें अगदीं असंभवनीय असतें. पण एवढी गोष्ट सोडून दिली तर असें बिनदिक्कत म्हणतां येईल कीं हें ध्येय साध्य करावयास लोकसत्ताक देशांत जसें अनुकूल वातावरण असतें तसें राजसत्तेंत नसतें.

लोकसत्ताक राष्ट्रांत राष्ट्रीयत्वाची भावना सदैव जिवंत असते. राष्ट्रावर संकट येतांच सर्व लोक अहमहमिकेनें आवश्यक स्वार्थत्याग किंवा कष्ट करावयास तत्पर असतात. ही गोष्ट युद्धप्रसंगीं प्रामुख्यानें दिसून येते. स्वार्थत्यागाची, बलिदानाची व राष्ट्रीय उत्साहाची ती जणूं पर्वणीच आहे असेंही क्षणभर वाटूं लागतें. या सर्वांचें कारण म्हणजे राष्ट्रप्रेम–राष्ट्राभिमान हें होय. तें अव्याज, निर्हेतुक व स्वार्थरहित नसतें असाही कोणी आक्षेप घेईल. नसेल कदाचित्; पण राष्ट्रावर आपत्ति कोसळली, त्यावर परकीयांची राजकीय किंवा आर्थिक सत्ता स्थापन झाली तर त्याप्रमाणांत आपल्या हातांत असलेल्या अधिकारांवरही गदा येईल या भीतीनें कदाचित लोक प्रसंगोपात्त स्वार्थत्याग करावयास तयार होतील; तरी पण त्यांच्या अंतःकरणांत स्वदेशप्रेम वास करीत नाहीं असें सिद्ध होत नाहीं. अनियंत्रित राजसत्तेंत देशावर संकट आलें म्हणजे तें निवारण करण्याची लोकांची इतकी तयारी नसते. कारण, ते राज्यव्यवस्थेबद्दल कांहींसे उदासीन असतात. येणाऱ्या आपत्तीमुळें राजसत्ता शिथिल झाली किंवा राजाचा पराभवही झाला तर त्यांना त्याबद्दल फारशी–लोकसत्तेंत वाटते तितकी–क्षिति वाटत नाहीं. याचें कारण एकच कीं राजसत्तेंत राष्ट्रीयत्वाचा विकास होणें फार कठीण असतें. लोक मुक्या जनावरांप्रमाणें राजाच्या हुकुमाची तामिली करतात. युरोपखंडाच्या इतिहासावरून असें दिसून येतें कीं जोपर्यंत राजसत्ता अनियंत्रित व जुलमी होती तोपर्यंत जनतेमध्यें राष्ट्रीयत्वाचा दीप तेवत नव्हता. पण राजसत्तेला पूर्ण त्रासून जेव्हां राजांना तोंड देण्याचा लोकांनीं निश्चय केला तेव्हां त्यांच्या मनांत देशाभिमान संचार करूं लागला. तो जसजसा वाढत गेला, राष्ट्रीयत्वाचें नवचैतन्य जसजसें अखिल जनतेंत खेळूं लागलें, तसतसा राजसत्तेचाहि ऱ्हास होत गेला व लोकसत्तेचा उदय झाला. या विधानाला इतिहासांत कदाचित् क्वचित अपवादही सांपडतील, पण साधारणपणें तें स्पष्ट व खरें आहे.

(४) लोकसत्तेचा चवथा विशेष असा कीं राजकीय उत्क्रांतीची ती जवळजवळ परमावधी समजली गेली असल्यानें तिच्यांत स्थायीपणाचे गुण जास्त आहेत. ती टिकाऊ, चिरंतन, अविनाशी अशी संस्था आहे. तिचें कदाचित कालाच्या ओघांत स्वरूप पालटेल, नवीन विलोभनीय तत्वांचा तिच्यावर परिणाम होईल; पण तिच्या बुडाशीं असलेले मूलभूत सिद्धान्त अचल व कालातीत ठरतील असा आम्हाला भरंवसा वाटतो. राजसत्तेप्रमाणें लोकसत्ता चंचल व विनाशी ठरावयाची नाहीं.

राज्यकारभाराच्या दृष्टीनें विचार केला तर राजसत्ता ही आरंभीची पायरी आहे असें म्हटलें पाहिजे. जग हें उत्क्रांतिशील असल्यानें राज्यकारभाराच्या या आद्य स्वरूपावर बदलत चाललेल्या बाह्य परिस्थितीचा परिणाम झाल्यावांचून कसा राहील? क्रमाक्रमानें राजसत्तेचें

लोकशाहीच्या तुलनापुढें लष्करच इतपत होतील. पण जी वैताच्या आडोश्यानें लवचीक व परिस्थितीला तोंड देणारी आहेत त्यांना भीती बाळगण्याचें कारण नाहीं. कारण ती लोकसत्तेशीं तद्रूप झालेली आहेत. तेव्हां लोकसत्तेचा काल जारीनें सुरू झाला आहे असें ह्मणण्यास हरकत नाहीं. उत्तरोत्तर लोकांची सत्ता वृद्धिंगत होऊन ती कोणत्याहि संकटाला तोंड देण्याइतकी समर्थ होईल असें अनुमान करावयास हरकत नाहीं. तेव्हां लोकसत्तेंत राज्यकारभारांत स्थायी गुण जास्त आहेत व त्यामुळें ती अधिक टिकाऊ आहे हें निर्विवाद आहे.

यावर कोणी असें म्हणेल कीं, अलीकडे समाजाच्या पुनर्घटनेच्या अनेक नवीन नवीन तत्वांचा पुरस्कार होत आहे, तीं लोकांना आवडूंही लागलीं आहेत, कांहीं कांहीं देशांत तर त्यांचा प्रयोग चालू असून तीं यशस्वीही होत आहेत, तेव्हां या नवीन कल्पना लोकशाहीच्या चतुष्कोनींत कशा बसावयाच्या ? फॅसिझम, सोशियालिझम, कम्यूनिझम, वगैरे तत्वाधिष्ठित कल्पना अमलांत आल्यास समाजाच्या एकंदर घटनेंत बरीच क्रांति होईल, व लोकशाहीलाही फाटा मिळेल. अशी परिस्थिति निकटवर्ति भविष्यकालांतच उद्भवणार असल्यामुळें लोकशाहीच्या तत्वांना तिलांजली मिळण्याचा संभव अधिक. अशीही कित्येकांना शंका येते. पण ती निराधार आहे असें थोडया विचारान्तीं दिसून येईल. लोकसत्तेचें आधारभूत तत्व कोणतें ? हें कीं, राज्यकारभाराचीं सूत्रें लोकांच्या ताब्यांत असावीत. अर्थात सर्व लोकांनाच आपला ताबा गाजवितां येणार नाहीं. म्हणून त्यांनीं निवडून दिलेल्या प्रतिनिधींच्या हातीं हीं सूत्रें असतात. सोशियालिझम किंवा कम्यूनिझम यामध्येंही राज्यकारभाराचीं सर्व सूत्रें लोकांच्याच स्वाधीन असतात. राज्यकारभाराचा प्रकार मात्र थोडा भिन्न. वास्तविक समाजसत्तावाद ही लोकशाहीच्याही वरची पायरी आहे. ती लोकसत्तेची आत्यंतिक उत्क्रांति आहे असें आपण म्हणूं. यामुळें लोकशाहीच्या तत्वांना बाधा येत नाहीं एवढें मात्र निश्चित. लोकशाहींतील राज्यकारभाराचें स्वरूप किंचित निराळें रहावयाचें एवढेंच. यावर कोणी अशी शंका घेईल कीं समाजसत्तावाद अगर साम्यवाद या तत्वावर आधारलेल्या राज्यपद्धतींत तर केवळ कामगार व शेतकरी यांनाच मताधिकार देण्यांत येतो, निदान रशियांत तरी आला आहे. त्या देशांतील इतर लोकांच्या हातून हा मतदानाचा अधिकार हिराहून घेण्यांत आला आहे. लोकसत्तेशीं हें कितपत सुसंगत आहे ? पण लोकसत्तेंत तरी सर्वांनाच मतदानाचा हक्क असतो असें नाहीं. जास्तींतजास्त म्हटलें तर देशांतील शेंकडा पन्नास लोकांना हा अधिकार प्राप्त झालेला असतो. या दृष्टीनें विचार करतां हीं नवीन तत्वें लोकसत्तेशीं दिसतात तेवढी विसंगत नाहींत, असें म्हणावें लागतें. एकूण या नवीन कल्पना व लोकसत्ता यांमध्यें तत्वत: विरोध नाहीं किंबहुना त्या एक दुसऱ्याला पोषकच आहेत असें म्हटलें तरी चालेल. सारांश, हीं नवीन तत्वें अमलांत आलीं तरी लोकसत्तेचें स्थान अचल राहील हें उघड आहे.

वर उल्लेखलेले चारी गुण लोकसत्तेचे प्रमुख गुण आहेत, हें दिसून येईल. याशिवायही लोकसत्तेपासून इतर कित्येक किरकोळ स्वरूपाचे फायदे आहेत; पण त्यापैकीं कांहीं महत्वाचेच येथें देऊं.

(५) लोकसत्तेमुळें सामान्यत: लोकांची दृष्टि अधिक व्यापक होते. देशांत काय चाललें आहे, आपणाकडे कोण कोण मत मागावयास येतात, ते कोणत्या पक्षाचे आहेत, त्यापैकीं कोणता पक्ष चांगला, त्याचा कार्यक्रम कोणता आहे; आपणास तो कितपत पसंत आहे, देशाच्या हिताच्या अभिवृद्धीला तो कितपत कारणीभूत होईल, हल्लीं देशाची परिस्थिति कशी आहे, आपलें त्यासंबंधानें काय कर्तव्य आहे वगैरे प्रश्न प्रत्येक मतदाराला आपापल्या कुवतीप्रमाणें सोडवावयाचे असतात. व जरी सामान्य मतदाराला सर्व बाजूंनीं विचार करण्याची संवय नसते किंवा त्याच्या अंगीं तेवढी पात्रताही नसते, तरीही तो स्थूलमानानें यांबद्दल विचार करतो किंवा कोणाकडून तरी परिस्थिती समजावून घेतो. उलट राजसत्तेंत त्याचा कोणी सल्लाही घेत नाहीं किंवा त्याला अधिकारहि देत नाहीं. तो केवळ आपल्याविषयींच विचार करतो. अर्थात दोन्ही प्रकारच्या राज्यव्यवस्थेंत बरेच अपवाद सांपडतील. पण सामान्यत: असें म्हणतां येईल कीं लोकसत्ताक राज्यांत सामान्य जनतेची दृष्टी अधिक व्यापक होण्याचा संभव जास्त आहे.

(६) लोकसत्तेंत साधारणपणें सर्व लोकांना सार्वजनिक कार्यांत तसेंच राज्यकारभारांत भाग घेण्याची आवड उत्पन्न होते. राजसत्तेमध्यें त्यांना ही संधीच प्राप्त होत नाहीं.

(७) लोकसत्ताक राष्ट्रांत चिरकालिक शांतता, सुख व समाधान नांदण्याचा संभव जास्त असतो.

(८) एकंदर देशाची सांपत्तिक, नैतिक, औद्योगिक व शैक्षणिक प्रगती होण्यास लोकसत्ताक राज्यकारभाराचा विशेष उपयोग होऊं शकतो.

आतांपर्यंत लोकशाहीचे गुणविवेचन झालें. यावरून तुलनेच्या दृष्टीनें राजसत्तेपेक्षां ही शतपट उत्कृष्ट राज्यव्यवस्था आहे असें दिसून येईल. पण यामुळें ती पूर्ण निर्दोष असली पाहिजे असें कोणीहि समजूं नये. तींत कांहीं दोषहि आहेत. संपूर्णत: निर्दोष अशी राज्यपद्धति सांपडणेंही अशक्य. तेव्हां आतां पुढच्या प्रकरणांत लोकसत्तेच्या दोषस्थलांचें वर्णन करूं.

---

# लोकसत्तेचे गुणदोष

(पुढें चालू)

## दोषाविष्करण

लोकसत्ताक राज्यकारभाराला मागील प्रकरणांत वर्णिल्याप्रमाणें जशी चांगली बाजू आहे तशीच त्यास वाईटहि बाजू आहे. लोकसत्तेंत अनेक दोष असून त्यापैकीं कांहीं टाळतां येण्याजोगे आहेत व कांहीं अपरिहार्य असेहि आहेत हे दोष दूर करणें हें सर्वस्वी लोकमतावर अवलबून आहे. लोकमत जितकें सुशिक्षित, सुव्यवस्थित, बोलके, टिकाऊ व परिणामकारक असेल तितके हे दोष कमी होऊन लोकशाही जनतेला सुखकर व हितकर होईल.

(१) लोकसत्तेचा पहिला दोष असा कीं तेथें कार्यारंभ किंवा कार्यसिद्धी लवकर होत नाहीं· लोकशाहींतील राज्यव्यवस्था अत्यंत गुंतागुंतीची असते. एकादें महत्वाचें बिल लवकर निकालांत काढावयाचें असल्यास सरकारला तसें करतां येत नाहीं. तें दोनतीनदां दोन्ही कायदेमंडळांतून निघालें पाहिजे, एकाद्या "सिलेक्ट कमीटी"च्या चांचणींतून पार पडलें पाहिजे, प्रतिपक्षाच्या अडथळयांतून बाहेर निघाले पाहिजे; पण त्या विषयीं एकंदर लोकमत अत्यंत प्रतिकूल असलें तर मंत्रिमंडळाला तें असें घाईघाईनें पास करवून घ्यावें कां याबद्दल पेंचहि पडतो. आटयापाटयाच्या खेळांत लोण पोंचविण्यास ज्याप्रमाणें शत्रुपक्षाच्या अनेक कोंडया फोडून जावें लागतें त्याचप्रमाणें कार्यकारी मंडळासहि आपल्याला हवा तो कायदा पास करून घेण्यास अनेक विलंबकारक प्रकरणांतून व अडवणुकीच्या मार्गांतून जावें लागतें कित्येकदां देशाची एकंदर परिस्थिती नाजूक असते, अनेक आणीबाणीचे प्रसंग उद्भवलेले असतात. या संकटांना तोंड देण्यासाठीं सरकारला आवश्यक कायदे ताबडतोब पास करून घेण्याची जरुरी भासते. पण लोकसत्ताक राज्यकारभारांत तसें सहसा करतां येत नाहीं. असे प्रसंग राजसत्तेंत उद्भवले तरीहि राजा कायदेशीर किंवा बेकायदेशीर, सौम्य किंवा कडक या सर्व प्रकारच्या उपायांनीं संकटांना तोंड देतो. त्याला तसें ताबडतोब करतां येतें. लोकसत्तेंत कायद्याचें प्राबल्य जास्त. प्रत्येक गोष्ट कायदेशीर रीतीनें झाली पाहिजे. तेव्हां एखादा आवश्यक असलेला कायदा भरकन पास करून त्याची अंमलबजावणी करणें कठीण असते.

संकटांना तोंड देण्यासाठींच काय पण सामान्यत: इतर अनेक सुधारणा करावयाच्या असल्या तरी लोकशाहीमध्यें कायदे लवकर पास होत नाहींत. राजसत्तेंत जशी एकादी सुधारणा सुलभतेनें होऊं शकते तशी लोकसत्तेंत होत नाहीं. सर्व काम गजगतीनें चालावयाचें !

यावर असें कोणी म्हणेल कीं निदान या दृष्टीनें तरी राजसत्ताक राज्यकारभार बरा. देशावर संकट आलें किंवा कांहीं सुधारणा घडवून आणावयाच्या असल्या तर राजा कायद्यांची परवा न करतां सर्व उपाय एकदम अमलांत आणतो ही किती चांगली गोष्ट आहे! पण यावर असेंही म्हणतां येईल कीं ही सर्व सत्ता त्याच्या हाती असल्यानें तो लोकांवर हवा तेव्हां व हवा तसा जुलूमहि करूं शकतो. चांगले राजे देशाला क्वचित लाभतात. तेव्हां देशाच्या भवितव्याविषयीं असा अनिश्चितपणा नको. त्यापेक्षां सुधारणा घडवून आणण्यास किंवा देशावर कोसळलेल्या आपत्तींना तोंड देण्यास थोडासा विलंब लागला तरी पत्करला, पण शेवटीं लोकांचें स्वातंत्र्य व अधिकार तर कायम राहतील! सशाच्या चपलतेपेक्षां कांसवाची मंद पण यशदायक गतीच बरी!

पण कित्येकदां असें होतें कीं युद्धासारखी कठिण परिस्थिति उत्पन्न झाली तर कायदेमंडळें प्रधानमंडळाला सर्व अधिकार देऊन टाकतात, त्याच्या धोरणांत ढवळाढवळ करीत नाहींत. गतमहायुद्धांत बहुतेक सर्व लोकसत्ताक राष्ट्रांतील प्रधानमंडळें सर्वसत्ताधिकारी होतीं. लोकांनीं त्यांच्या धोरणाबद्दल सहानुभूति दर्शविली, एवढेंच नव्हे तर यथाशक्ति त्यांना मदतहि केली. अशा प्रसंगीं सुद्धां सरकारच्या विरोधी पक्षाला कायदेशीर रीतीनें विरोध करण्याचा पूर्ण अधिकार आहे. पण हें अखिल राष्ट्राला सारखेंच लागूं होणारें संकट असल्यानें सरकारशीं सर्वांनींच सहकारिता केली पाहिजे एवढी व्यापक दृष्टि त्या पक्षाला ठेवावी लागते. कारण, अशा वेळीं लोकमत सर्वस्वी सरकारच्या बाजूचेंच असतें.

तसेंच सुधारणेची कोणतीही योजना पूर्ण विचारान्तींच अमलांत आणणें चांगलें. तिला थोडासा विलंब लागला तरी हरकत नाहीं. असले महत्वाचे कायदे घाईघाईनें पास करणें व सर्व बाजूंनीं विचार न करतां ते अमलांत आणणें बरें नाहीं. कित्येक प्रसंगीं ते अव्यवहार्य किंवा अनर्थावहहि ठरतात. लोकसत्तेतील सर्व कायदे मोठमोठ्या मुत्सद्यांच्या नजरेखालून व प्रतिपक्षीय विरोधाच्या घगधगींतून निघालेले असल्यामुळें पुढें पश्चातापाची पाळी सहसा येत नाहीं.

(२) लोकशाहीतील दुसरा महत्वाचा दोष असा कीं तीमध्यें लांचलुचपतीला बराच वाव असतो. निरनिराळे पक्ष आपापले स्वार्थहेतु तडीस नेण्यासाठीं अनेक वाममार्गांचाहि अवलंब करतात. राज्यकारभाराशीं संबंध येणाऱ्या लोकांना सर्वथा नीतिमत्तेच्या मार्गानें आपलें कार्य करीत राहणें परवडत नाहीं. या नैतिक अवनतीचे अनेक प्रकार आहेत. त्या प्रत्येकाचें आपण संक्षिप्त वर्णन करूं.

(अ) निवडणुकीच्या वेळीं उमेदवार मतें मिळविण्यासाठीं व प्रतिपक्षीयांचा पाडाव करण्यासाठीं अनेक अश्लाघ्य व मूर्खपणाचे उपाय योजतात. दारूबाजांना दारू पाजणें, मतें मिळविण्यासाठीं पगारी नोकर ठेवणें, मतदारांना वेळप्रसंगीं पैशाचें साहाय्य करणें (लांच देणें असें म्हटल्यास तें सत्याला धरून होईल), मतदानाच्या दिवशीं हव्या तितक्या मोटारी भाड्यानें घेऊन व पैशाची पुष्कळ उधळपट्टी करूनहि, ती केली नाहीं असें दाखविणें, निवडणुकीनंतर मंडळींना मिठाई चारणें, प्रतिपक्षाच्या उमेदवारांविषयीं हलकट वार्ता पसरविणें, इत्यादि

गोष्टी उमेदवार अगदीं राजरोसपणें, बिनदिक्कत करीत असतात. हे सर्व प्रकार कमी–अधिक प्रमाणांत गर्हणीय अतएव त्याज्य समजले पाहिजे. त्यांतल्या त्यांत पैशाची हवी तशी उधळपट्टी करण्यांत तर त्यांना कांहींच दिक्कत वाटत नाहीं. क्वचित ठिकाणीं निवडणुकीच्या कामीं वेश्यांचाही उपयोग होत असलेला आमच्या ऐकिवांत आहे. इंग्लंड देशांत कांहीं वर्षांपूर्वी एक अति सुस्वरूप बाई आपल्या उमेदवार नवऱ्याला मतें मिळविण्यासाठीं मतदारांना चुंबन घेऊं देत होती हें ऐकून तर कित्येकांना आश्चर्यच वाटेल. पाश्चात्य देशांत निवडणुकीच्या वेळीं जे अश्लाघ्य व लांचलुचपतीचे प्रकार अमलांत येतात त्यांकडे पाहून तर लोकशाहीबद्दल कांहीं लोकांना तिरस्कारहि उत्पन्न झाल्यास नवल नाहीं. या बाबतींत संयुक्त संस्थानांत तर पराकाष्ठाच झालेली दिसते.

(ब) निवडणूक झाल्यावर कायदेमंडळांची तसेंच प्रधान मंडळाचीहि बहुधा पुनर्घटना होते. कित्येक वेळी असें होतें कीं मंत्रिमडळाच्या पक्षाच्या बाजूला संख्याधिक्य नसतें. अशा वेळीं एकाद्या सरकारी बिलास किंवा ठरावास पाठिंबा मिळविण्यासाठीं इतर पक्षांच्या "कच्च्या दिलाच्या" सभासदांना अत्यंत कुशलतेनें फोडण्यांत येतें. गोविंदरावांचा मुलगा बेकार आहे. इतकें शिकूनसुद्धां नोकरी न मिळाल्यामुळें हवालदील झालेला ! त्याला सरकारी नोकरी देण्याची भाषा सुरू होतांच गोविंदराव सरकारजमा होतात व आपल्या पक्षाचा द्रोह करावयास सहज उद्युक्त होतात. एकाद्याला आपल्या गांवच्या लोकांची कांहीं गाऱ्हाणीं दूर करावयाचीं आहेत. त्यानें दाद मागण्याचा प्रयत्न केला तर तें सरकार बिनशर्त कसें ऐकून घेईल ? हाहि प्रतिनिधी वर प्रमाणेंच सरकारच्या धोरणास पाठिंबा देतो. असें एक ना दोन, अनेक उपायांनीं मंत्रिमंडळ प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष रीतीनें कायदेमंडळांत आपलें बहुमत तयार करून घेतें. हे असे प्रकार फ्रान्स देशांत बरेच पहावयास सांपडतात. ज्या राष्ट्रांत अनेक पक्ष असतात तेथें कोणत्याहि एक पक्षाकडे एकजिनसी बहुमत असण्याचा संभव कमीच. तेथें मंत्रिमंडळास हे सर्व उपाय अमलांत आणणें एकप्रकारें अपरिहार्यच वाटतें.

(क) कित्येकदां कायदेमंडळांत बरेचसे अगदीं लहानसहान पक्ष असतात. जरूर पडतांच कांहीं आमिष दाखवून त्यांना आपल्याकडे ओढण्याचाहि सरकार प्रयत्न करीत असतें. केव्हां केव्हां तर आपल्या स्वत:च्या पक्षाच्या धोरणास थोडासा फाटा देऊन व इतर पक्षांच्या धोरणास पाठिंबा देऊन तें आपल्याकडे बहुमत करून घेण्याचा प्रयत्न करतें. अशा या प्रकाराला इंग्रजींत लॉग रोलिंग (Log rolling) म्हणतात. हें सुद्धां वाममार्गाचेंच एक लक्षण आहे. कारण, ज्या धोरणाबद्दल लोकांची सहानुभूती अधिक आहे तें धोरण आपल्या समोर ठेवणारा पक्ष जेव्हां अधिकारारूढ होतो तेव्हां त्याप्रमाणें कार्याला लागणें हें त्याचें कर्तव्य ठरतें. पण तसें न करतां आपला स्वत:चा कार्यक्रम बदलवून दुसऱ्या पक्षाच्या कार्यक्रमाला अर्धवट संमति दिल्यानें अधिकारारूढ पक्षाचें थोडेंसे तरी नैतिक अध:पतन होत असतें. पण तसें केल्याखेरीज त्या पक्षाला कायदेमंडळांत बहुमत मिळण्याचा संभव कमी. म्हणून या मार्गाचा अवलंब करणें त्याला भाग पडतें. केवळ या दृष्टीनें सरकारचें कृत्य समर्थनीय ठरूं शकेल.

त्याचप्रमाणें सरकारचा मुख्य विरोधी पक्षहि अशा अनेक उपायांचा अवलंब करून आपल्याकडे बहुमत मिळण्याचा प्रयत्न करीत असतो. देशहिताकडेहि कित्येकदां दुर्लक्ष होतें. सरकारच्या धोरणाचा कसून विरोध करावयाचा व त्यास कोणत्या ना कोणत्या तरी प्रकारें हाणून पाडावयाचें हा एकच उद्देश त्याच्यापुढें असतो. प्रतिपक्षाचा पराभव करून आपण स्वत: अधिकाराचीं सूत्रें केव्हां हातीं घेऊं या एकाच स्वार्थमय भावनेनें तो प्रेरित झालेला असतो. 'अडवणुकीसाठीं अडवणूक' हा त्याचा एकमात्र कार्यक्रम असतो. हाहि प्रकार निंद्यच समजला पाहिजे.

(ड) केव्हां केव्हां सरकारच्या कार्यक्रमांत किंवा विरोधी पक्षांच्या विरोधांत भांडवल‧वाल्यांचा प्रच्छन्न हात अस्पष्टपणें दृष्टीस पडतो. मोठमोठ्या कारखानदारांना एकादा कायदा पास करून घ्यावयाचा असल्यास, अथवा कायदेमंडळापुढें विचारासाठीं आलेलें एकादें बिल नको असल्यास, ते आपल्या संपत्तीचा शक्य तेवढा उपयोग करून घेतात. आमिष दाखवून सभासदांना व्यक्तिश: आपल्याकडे करून घ्यावयाचे, निरनिराळ्या पक्षांच्या गंगाजळीस मदत करून त्यांना आपल्या मतानुकूल करावयाचे, असले अनेक प्रकार लोकशाहींत नेहमीं पहावयास सांपडतात. गतमहायुद्धाच्या धामधुमीच्या कालांत त्यावेळचा मुख्यप्रधान लॉईड जॉर्ज यानें आपल्या लिबरल पक्षाची तिजोरी पूर्ण भरून ठेवली होती ही गोष्ट तर आतां जाहिर झाली आहे. असले प्रकार बहुधा सर्वच लोकसत्ताक राष्ट्रांतून कमी अधिक प्रमाणांत दिसून येतात.

लांचलुचपतीचे, कोणतें तरी आमिष दाखवून आपलें कार्य तडीस नेण्याचे व इतर अनीतिमत्तेचे पुष्कळसे प्रकार, लोकशाहींत नित्य पहावयास सांपडतात. त्यापैकीं कांहीं अपरिहार्य असून कांहींना पायबंद घालतां येणें शक्य आहे. पण लोकमत जसजसें अधिक सुविद्य व सुपरिणामकारक होत जाईल तसतसे हे सर्व दोष आपोआप नाहींसे होतील असें समजून चालावयास हरकत नाहीं.

(३) लोकशाहीचा तिसरा महत्वाचा दोष असा कीं तेथील राज्यकारभारांत पैशाची उधळपट्टी बरीच होते. तसेंच, एकंदर राज्यव्यवस्था जास्त खर्चाची असते. राजसत्तेपेक्षां लोकसत्ताक कारभाराची इमारत पुष्कळ प्रचंड असून त्यांत खर्चाच्या अनेक बाबी असतात व कित्येक प्रश्न प्रत्यही निर्माण होतात एकाद्यानें स्वत:च्याच हिमतीवर धंदा स्थापन केला तर तो खर्चाच्या बाबतींत अत्यंत दक्ष असतो. त्यांत उधळपट्टी केल्यानें आपला सर्वनाश होईल हें तो पूर्ण जाणून असतो. म्हणून तो नेहमीं डोळ्यांत तेल घालून खर्चासंबंधानें काटकसर करण्याचा प्रयत्न करतो हें आपल्या नेहमीच्या पाहण्यांत आहेच. उलटपक्षीं बरेचसे भागीदार जमून एकादा धंदा सुरू करण्यांत आला म्हणजे थोडीबहुत तरी उधळपट्टी होतेच हेंही आपण नित्य पाहतों. राजसत्ता व लोकसत्ता यांच्या राज्यकारभारांतहि वरील दोन धंद्यांप्रमाणें सामान्यत: फरक दिसून येतो. आतां एवढें मात्र खरें कीं राजे स्वत: बहुधा अत्यंत खर्चीक असतात. उगाच मोठमोठे राजवाडे बांधणें, व्यक्तिगत इच्छा तृप्त करण्यासाठीं रयतेच्या पैशाचा हवा तसा दुरुपयोग करणें, ज्यांत प्रजेचें हित नाहीं अशा अनेक बाबतींत पैशाचा अपव्यय करणें इकडे राजाचें लक्ष विशेष असतें. उलटपक्षीं लोकसत्तेंत जो खर्च जास्त होतो तो अशाप्रकारें न होतां कोणत्याना कोणत्यातरी रूपानें लोकांच्या हितसंबंधाशीं, निदान अल्प प्रमाणांत तरी, निगडित झालेला असतो. या खर्चीकपणाच्या कांहीं महत्वाच्या बाबींचा उल्लेख केल्यास तें अस्थानीं होणार नाहीं.

प्रत्येक लोकसत्ताक राष्ट्रांत दोन मुख्य कायदेमंडळें असतात. देशाचा विस्तार जास्त असल्यास प्रत्येक प्रांतांत एकादे तरी कायदेमंडळ असतेंच. यासर्वांमध्यें लोकांनीं निवडून दिलेले प्रतिनिधी बसतात. या प्रत्येक सभासदास, तो हजर राहिल्यास, जाण्यायेण्याचा खर्च व तो तेथें जितके दिवस राहतो तितके दिवसांचा भत्ता मिळतो. जाण्यायेण्याचा खर्च व भत्ता हा इतका मुबलक असतो कीं एकादा गरीब प्रतिनिधी त्यावर आपला वर्षाचा प्रपंचहि सहज करूं शकेल. बरे, एवढी मोठी रकम न देणेंहि बरें नाहीं. लोक आपला अमूल्य वेळ घालवितात. तेव्हां त्यांना कोणत्याना कोणत्या तरी स्वरूपानें मोबदला देणें हें जनतेचें कर्तव्यच आहे. शिवाय कित्येक पुढारी चागले प्रतिष्ठित असतात. कोणी कुशल डॉक्टर तर कोणी कसलेला वकील; कोणी आपला धंदा बाजूला ठेवून तर कोणी आपलीं सर्व महत्वाची कामें दूर लोटून कायदेमंडळाच्या कामासाठीं जातात. अशा लोकांचें त्यांच्या मागें फार नुकसान होतें. तेव्हां त्यांना मोबदला देणें जरूर आहे.

शिवाय लोकसत्ताक राज्यकारभारांत कमेट्यांचें बंडहि बरेंच असतें. कायदेमंडळांना जोडूनच अनेक कमेट्या असतात. त्यांत काम करणाऱ्या सभासदांना आणखीहि मोबदला मिळतो. तसेंच मधून मधून सुद्धां चोकशी कमेट्या, किंवा कमीशनें बसवावीं लागतात. त्यांतील सभासदांनाहि अशाच प्रकारें जबर वेतन द्यावें लागतें.

तसेंच एकंदर राज्यकारभार पुष्कळसा गुंतागुंतीचा असतो. त्यासाठीं पुष्कळसे अधिकारी, छोटेमोठे नोकर व मजूर ठेवावे लागतात. एवढा प्रचंड नोकरवर्ग राजसत्तेंत ठेवण्याची गरज भासत नाहीं. कारण, राजसत्ताक राज्यकारभार सोपा, साधा व सुटसुटीत असून थोड्याशा नोकरांच्या सहाय्यानें चालवितां येतो. लोकसत्तेंत तसें होणें अशक्य आहे.

(४) लोकशाहीचा चवथा महत्वाचा दोष हा कीं त्यांत उथळ पुढाऱ्यांचा सुळसुळाट बराच असतो. वास्तविक प्रत्येक राष्ट्राला उत्तम पुढाऱ्यांची नेहमींच आवश्यकता असते. प्रामाणिक, विद्वान, व्यवहारकुशल, अनुभवी व निस्वार्थी पुढारी व मुत्सद्दी प्रत्येक देशाला ललामभूत होतात. लोकसत्तेचा सारा भार मुख्यत: त्यांच्यावरच असतो. पण त्याचबरोबर उथळ पुढाऱ्यांनाहि पुढें येण्याची पुष्कळ संधि मिळते. सामान्यत: राजकारणांत थोडी आवड उत्पन्न झाली, स्थानिक लोककार्यांत उत्साह दाखविला, चार दोन सभेंत व्याख्यानबाजी झोडली, लोकांच्या विकारांना किंवा उथळ मनोवृत्तींना चालना मिळेल अशीं मतें प्रतिपादलीं कीं झाला तो पुढारी. तो चटकन लोकांच्या विश्वासास व आदरास पात्र होतो. वस्तुत: त्याच्यांत विद्वत्ता अशी फारशी नसते; राजकारणशास्त्रांतला ओनामाहि त्याला कळत नसतो; जगाची एकंदर परिस्थिति कशी काय आहे व त्यासंबंधानें आपल्या देशानें कोणता मार्ग स्वीकारला पाहिजे याची त्याला कल्पनाहि नसते; प्रतिपक्षाला हाणून पाडून आपलें स्वत:चें हित कसें साधावें या एकाच गोष्टीकडे त्याचें लक्ष रात्रंदिवस लागलेलें असतें; नैतिक बाबतींत सुद्धां तो प्रवादरहित नसावयाचा—तरी सुद्धां आपल्या धडाडीनें, बेफिकीर धिटाईनें, सैल वक्तृत्वानें व लोकमतानुकूल वृत्तीनें तो चटकन पुढें येतो व निदान कांहीं कालपर्यंत तरी आपली छाप जनतेवर बसवितो. एकदांची त्यानें आपली प्रतिष्ठा स्थापली कीं मग तो जें काय बोलतो

किंवा जें काय करतो तें सहज पचतें; इतका त्याच्याबद्दल जनतेला विश्वास वाटूं लागतो. केव्हां केव्हां तर त्याचें वजन मोठमोठ्या पुढाऱ्यांपेक्षांहि जास्त असतें. कित्येकदां तर असें होतें कीं देशाचे खरे पुढारी लोकमताच्या प्रवाहाबरोबर वाहत जाण्यास कबूल नसल्यानें लोकांकडून त्यांच्यावर निंदेचा व अनेक अश्लाघ्य आरोपांचा वारंवार भडिमार होत असतो; आणि याचें कारण म्हणजे ह्या उथळ, खोट्या, लोकछंदानुवर्ती पुढाऱ्यांची लबाडी होय. तेच त्यांच्याविरुद्ध लोकमत उत्तेजित करतात. नाहीं तर सामान्यतः जनता उदासीनच असते. पण हें औदासीन्य या छोट्या घमेंडखोर व कीर्तिलोलुप पुढाऱ्यांना आपल्या अनर्गळ वाचालतेनें सहज दूर करतां येते. राष्ट्रविषयक प्रश्नासंबंधानें जनता प्रायः जशी उदासीन असते, तशीच ती विकारवशहि असते. एखादी खळबळ उडाली कीं तिची मनोवृत्ति क्षणोक्षणीं उचंबळते. या तिच्या वृत्तीचा हे पुढारी फायदा करून घेण्यास मागेपुढें पहात नाहींत.

याचा एक दुष्परिणाम असा होतो कीं निवडणुकीच्या वेळीं या लोकांचें चांगलेंच फावतें. सामान्य मतदारांचा त्यांच्यावर विश्वास असल्या कारणानें ते त्यांनाच मतें देतात. बहुधा असेच पुढारी निवडणुकींत यशस्वीहि होतात. तेव्हां कायदेमंडळांत अशा प्रतिनिधींचाच भरणा विशेष असतो. देशाच्या खऱ्या हिताच्या दृष्टीनें लोकसभेंत असले प्रतिनिधी असणें विशेष स्पृहणीय नाहीं. गंभीर वृत्तीचें, उच्च विचाराचे व विपुल राजकीय अनुभव असलेले प्रतिनिधी या मंडळांत असणें अत्यंत आवश्यक असते. पण या छोटेखानी पुढाऱ्यांच्या विपुलतेमुळें अशा लोकांना लोकसेवा करावयाला पुरेसा वाव सांपडत नाहीं.

पण लोकसत्तेचा हा एक दोष असला तरी तो अपरिहार्य असाच आहे. लोकशाहीला पुढाऱ्यांची, जनसेवेंत आपलें आयुष्य घालविण्याचा निर्धार केलेल्या लोकांची जेवढी गरज भासते तेवढी इतर राज्यव्यवस्थेंत क्वचितच भासते. तसेंच उच्च दर्जाच्या पुढाऱ्यांची संख्या जास्त असण्याचा कोठेंहि संभव कमीच. म्हणून लोकसत्तेचा प्रचंड कारभार सुरळीतपणें चालविण्यासाठीं छोट्या पुढाऱ्यांचें साह्य घेतल्याशिवाय गत्यंतरच नसते. एवढें मात्र खरें कीं त्यांच्या ठिकाणीं असलेले दोष कालमानानें, राजनैतिक पायंड्यानें व लोकमताच्या जागरूकतेनें बरेच कमी होऊं शकतात.

(५) लोकसत्ताक सरकार (Government) विशेष यांत्रिक स्वरुपाचें असतें. जसें, एकाद्या प्रचंड कारखान्यांत निरनिराळ्या ठिकाणीं अनेक यंत्रें ठेविलीं असून त्या सर्वांची गति एका भागांत असलेल्या इंजिनाच्या साह्यानें एक दोन माणसांना नियंत्रित करतां येते तद्वतच कित्येक राष्ट्रांत लोकशाहीचीहि स्थिती झालेली दिसून येते. याला इंग्रजींत Government by machine असें नांव आहे. हें यंत्र म्हणजे अधिकारारूढ असलेल्या पक्षांतील थोर व कारस्थानी पुढाऱ्यांचें मंडळ होय. या मंडळाला कोणतेंहि कायदेशीर स्वरूप नसतें. कित्येकदां या मंडळांतील लोकांना राज्यकारभारांतहि मुळींच स्थान नसतें. त्यांत निवडक लोक असून ते आपल्या पक्षांत अत्यंत वजनदार असतात. अप्रत्यक्ष रीतीनें राज्यकारभाराचीं अनेक सूत्रें ते आपल्या हातीं ठेवतात. सरकारावर त्यांचा बराच दाब असतो. साधारणतः या मंडळाला उपसरकार म्हणावयास हरकत नाहीं. फरक एवढाच कीं हें फार लहान असून कायद्याची

याला मान्यता नसतें. तसेंच याचे सभासद कोण कोण आहेत, ते काय करीत असतात, कोणत्या बाबीसंबंधानें ते खलबत करीत असतात याची इतरांना जाणीव सुद्धां नसते. अशीं "यंत्रें" संयुक्त संस्थानांत आहेत. इतर लोकसत्ताक राष्ट्रांत त्यांना एवढी परिपक्व अवस्था प्राप्त झालेली नाहीं. पण तीं किंचित् निराळ्या स्वरूपांत तेथें दृष्टीस पडतात. जो पक्ष अधिकारारूढ असतो त्या पक्षाचें कार्यकारी मंडळ बरेच वजनदार असून आपल्या पक्षाच्या सर्व सभासदांवर त्याचा ताबा असतो. हें कार्यकारी मंडळ जे जे ठराव करतें किंवा कार्यक्रम आंखतें ते ठराव किंवा कार्यक्रम अमलांत आणण्याचा मंत्रिमंडळ कायदेमंडळाच्या सभासदांच्या मदतीनें प्रयत्न करीत असतें.

यावर कोणी असें म्हणेल कीं यांत दोष कोणता? यांत वावगें असें काय आहे? वावगें हें कीं लोकसत्ताक राज्यकारभारांत अखिल लोकमत प्रतिबिम्बित होण्यापेक्षां मोठमोठ्या सूत्रधारांच्या मताचीच त्यावर अधिक छटा उमटलेली असते. एकाद्या पक्षांतील वरिष्ट लोकांच्या तंत्रानें लहानसें कार्यकारी मंडळ स्थापन व्हावयाचें व त्याच्याच मतानें त्या पक्षाचें धोरण, कार्यक्रम वगैरे सर्व कांहीं ठरावयाचें. लोकसत्तेचे कट्टर दुष्मन नेहमीं म्हणत असतात कीं लोकशाही हें केवळ थोतांड आहे, आपल्या हातीं सत्ता आहे असा केवळ लोकांना भास होतो पण वास्तविक सर्व सत्ता वरिष्टांच्याच ताब्यांत असते. Demcracy in essence is another form of oligarchic Government असें एका प्रसिद्ध लेखकानें म्हटलें आहे. वर दिलेल्या एकंदर विवेचनावरून वाचकांचीहि अशीच खात्री होईल कीं या बोलण्यांत बराच सत्यांश आहे.

पण सामान्यत: लोक सार्वजनिक कार्याबद्दल उदासीन असतात, मोठमोठ्या राजकीय, सामाजिक अथवा औद्योगिक प्रश्नासंबंधानें त्यांना आपलें स्वत:चें असें मत बनवितां येत नाहीं, तसें उच्च शिक्षणाच्या अभावीं आपल्या कर्तव्यासंबंधानें असावे तेवढे ते जागरूक नसतात या गोष्टी आपणास विचारांत घेणें अत्यंत आवश्यक आहे. आतां प्रश्न एकच उरला. या सार्वत्रिक औदासीन्याचा फायदा एका मनुष्यानें घेऊन त्यानें सर्वसत्ताधारी किंवा राजा व्हावयाचें कां लोकांच्याच विश्वासांतल्या कांहीं पुढाऱ्यांनीं घेऊन त्यांनीं लोकसत्ताक राज्यकारभारावर योग्य नियंत्रण ठेवायचें? या दोन्ही गोष्टी कदाचित सदोष असतील. पण दुसरी परिस्थिति पहिली पेक्षां अधिक बरी असें कोणीहि सांगूं शकेल. तेव्हां कमी सदोष अशी राज्यपद्धति स्वीकारणें हें नि:संशय अधिक चांगलें.

पण यामुळें लोकसत्ताक राज्यकारभाराला बाध येतो काय? कदापि नाहीं. लोकशाहींतील अंतिम सत्ता मतदारांकडेच असते. त्यांनींच जर आपल्या अधिकाराचा दुरुपयोग केला किंवा योग्य उपयोग केला नाहीं तर त्याचा दोष लोकांकडे आहे, लोकसत्ताक राज्यव्यवस्थेकडे नाहीं. कर्तव्यपरायण, सुविद्य व बोलके लोकमत अत्यंत प्रभावशाली असतें. ज्या ज्या राष्ट्रांत असें प्रभावशाली लोकमत आहे तेथें लोकसत्तेंतील अनेक दोष नाहीसे झाले आहेत; किंवा होण्याचा बराच संभव आहे. तसेंच जेथें तें परिणामकारक नाहीं तेथें राजसत्ता स्थापन होण्या-

पेक्षां अधिकारारूढ पक्षांच्या छोटया अंतस्थ मंडळाकडे राज्यकारभाराचीं सूत्रें असलेलीं काय वाईट? कारण राजापेक्षां देशांतील निरनिराळे पक्षोपपक्ष एकंदर जनतेला अधिक जबाबदार राहून लोकमताप्रमाणें आपलें धोरण ठरवितील असें गृहीत धरून चालण्यास कोणताच प्रत्यवाय नाहीं.

(६) त्याचप्रमाणें लोकसत्ताक राज्यव्यवस्थेशीं सामान्यत: सर्व जनता सहकार्य करावयास तत्पर असतें; हें खरें असलें तरी अत्यंत विचारशील लोक, तत्त्वज्ञानांत रममाण झालेले तत्त्ववेत्ते, धार्मिक प्रवृत्त्यनुरूप वागणारे महान पुरुष किंवा एकंदर समाजाच्या अगदीं वरच्या दर्जाचे लोक (Aristocracy) यांना भाग घेण्याइतकें उत्तेजनात्मक वातावरण लोकसत्तेंत निर्माण होत नाहीं हें मात्र अगदीं नि:संशय आहे. लोकशाहीचे एकंदर दोष विचारांत घेतां असें दिसून येईल कीं मध्यम आणि कनिष्ट वर्गाकरितां ती उत्तम व आदर्श अशी राज्यव्यवस्था आहे. त्यांसाठीं "जातीचे" लोक पाहिजेत दोन ठोसे घेणें; दोन देणें; लोकमताच्या प्रवाहांत वेळप्रसंगीं प्रवाहपतिताप्रमाणें धडपड करणें, लोकांची शिवीगाळ खाण्याइतकें मन कठोर ठेवणें, काम पडलें तर कांहीं कालापुरतीं आपलीं तत्वें बाजूला ठेवणें, वाटेल त्या य:कश्चित मनुष्यानें प्रश्न केला तर त्याला न रागावतां समयोचित उत्तर देणें, निवडणुकीच्या धामधुमींत घरोघर भटकून आपणास मत देण्यासाठीं मतदारांना आर्जव करणें, वगैरे वगैरे अनेक धकामकीच्या मामल्यांत पडून उत्साहित अंत:करणानें देशाची सेवा करणें यासाठीं खरोखर "जातीचींच" माणसें लागतात. वरच्या दर्जाच्या लोकांना सामान्य जगराहटीची आवड नसते. त्यांच्या हातून वर सांगितलेलीं कामें होणें बहुतांशीं असंभवच. तथापि कांहीं कांहीं पुढें येतातच व ते लवकरच देशाचे सर्वमान्य व लोकोत्तर पुढारी बनतात. पण त्यांच्यापैकींच इतर लोक वेगळे राहूनहि अप्रत्यक्षपणें आपल्या उदात्त विचारसरणीनें व पवित्र चारित्र्यानें लोकशाहीपुढें उच्च आदर्श ठेवण्यांतच परम संतोष मानतात.

(७) तसेंच एकंदर जनतेकडून लोकशाही फार अपेक्षा करते. याचा अर्थ असा कीं इतर राज्यव्यवस्था यशस्वी होण्यासाठीं लोकांकडून सहकार्याची अपेक्षा कमी असली तरी एकवेळ चालेल, पण लोकसत्ताक राज्यव्यवस्थेंत मात्र लोकांनीं आवश्यक स्वार्थत्याग केला पाहिजे, त्यांच्या ठिकाणीं आवश्यक गुण असावयास पाहिजेत, ते अधिक कर्तव्यपरायण असले पाहिजे, व त्यांनीं पुरेसें सहकार्य केलें पाहिजे. असें झालें नाहीं तर लोकसत्ता व्यवस्थित चालावयाची नाहीं, एवढेंच नव्हे तर ती नि:संशय अव्यवहार्य अतएव अयशस्वी ठरेल. सारांश, लोकशाही जनतेकडून जेवढी अपेक्षा करते तेवढी इतर कोणतीहि राज्यव्यवस्था करीत नाहीं; पण याचा मोबदला म्हणून ती जनतेला जेवढें परत देते तेवढें इतर कोणतीहि राज्यपद्धति देत नाहीं. (No form of Government expects so much from the people and no pays back so much in return—Bryce in Modern Democracies) पहिला लोकशाहीचा दोष समजावा, दुसरा मात्र तिचा गुण आहे.

वास्तविक लोकशाहीची अपेक्षा बरीच दांडगी आहे. साधारणत: लोकांमध्यें चांगुलपणा व कर्तव्यतत्परता हे गुण आहेत असें लोकशाही गृहीत धरून चालते. लोकसत्ताक राज्यकारभा-

राच्या अंमलबजावणींत हे गुण दृष्टोत्पत्तीस येतीलच येतील हा तिचा आधारभूत आद्य सिद्धान्त-पण प्रत्यक्ष व्यवहारांत हा सिद्धान्त केव्हां केव्हां जसा खरा ठरतो तसाच तो केव्हां केव्हां खोटाहि ठरतो. लोकांची मनोवृत्ति फार गूढ आहे, आणि त्यांच्या स्वभावचांचल्यामुळें या गूढाचें आकलन करणें फारच अवघड ठरतें. लोकांची मनोवृत्ती कशा प्रकारची आहे हें नक्की सांगणें फारच कठीण. पण साधारणत: असें म्हणतां येईल कीं मनुष्यप्राणी हा विरुद्ध गुणधर्मांचा सदेह समुच्चय आहे; तो जसा क्रूर, तसाच प्रेमळहि असून इतर विपद्ग्रस्त लोकांबद्दल त्याला सहानुभूति वाटते; तो जसा आपमतलबी, तसाच वेळप्रसंगीं कल्पनातीत औदार्यशीलहि आहे. देशासंबंधानें तो जसा उदासीन, तसाच आणीबाणीच्या वेळी आपलें कर्तव्य करावयासहि तो तत्पर असतो; एकाद्या खळबळीमुळें त्याची मनोवृत्ति विचलित झाली तरी काम पडलें तर एकाद्या गोष्टीविषयीं अत्यंत शांतपणें तो विचारहि करतो; तो स्वत: कदाचित अन्यायानें वागेल, पण चारीकडे अन्यायाचें राज्य पसरलें तर तो त्याबद्दल आपला तीव्र असंतोष प्रदर्शित करतो; दुसऱ्याच्या तंत्रानें वागणें त्याला बरें वाटत नाहीं, तरी पण एकीची तीव्र आवश्यकता भासल्यास सर्व मतभेद विसरून जाण्यासहि तो तयार असतो. अशी एकंदर मनुष्यप्राण्याची मनोवृत्ति आहे. तेव्हां अधिक सद्गुणांच्या आविष्करणाची लोकशाहीची अपेक्षा थोडी जास्त असली तरी ती अगदींच अस्थानीं आहे असें नाहीं. मनुष्यांत अनेक दुर्गुण आहेत, तसेंच सद्गुणहि आहेत. हे दुर्गुण नाहीसे होऊन सद्गुणांचा प्रादुर्भाव झाल्यास लोकसत्तेच्या यशस्वितेला ते पोषक होतात हें खरे आहे. पण असें होणें किती कठीण आहे हें सांगावयास पाहिजे असें नाहीं. म्हणूनच वाजवीपेक्षां अधिक अपेक्षा ठेवणें हा लोकशाहीचा एक दोषच आहे असें म्हणण्यास हरकत दिसत नाहीं.

येथपर्यंत लोकसत्तेचें दोषाविष्करण झालें. कांहीं कांहीं दोष अपरिहार्य आहेत व कांहींचें निवारण सहज होऊं शकते असें सूज्ञ वाचकांच्या ध्यानांत आलेंच असेल. त्यांचें निवारण करणें न करणें हें जनतेवरच सर्वस्वी अवलंबून असतें. कारण राजशाहींत जशी अंतिम सत्ता राजाच्या हातीं असते तशी लोकसत्ताक राज्यकारभारांत ती मतदारांच्या स्वाधीन असते. तेव्हां लोकशाहीचें यशापयश सबळ अथवा दुर्बळ लोकमतावरच सर्वथा अवलंबून असतें.

पण लोकशाहीच्या एकंदर गुणदोषांची गोळाबेरीज लक्षांत घेतां दोषापेक्षां तिच्यांत अधिक गुण आहेत व ती राष्ट्राला राजसत्तेपेक्षां अधिक हितकर, अधिक सुखावह व अधिक समाधानकारक ठरेल असें म्हणणें प्राप्त आहे. क्वचित प्रसंगीं लोकसत्तेपेक्षां राजसत्तासुद्धां राष्ट्राला अधिक उपयुक्त ठरण्यासारखी आहे. पण ती सर्वकाळ सुखदायी ठरते कां हें अत्यंत अनिश्चित असल्यामुळें ज्या राज्यपद्धतीमुळें पुष्कळांचें पुष्कळ हित नेहमीं साधतें, व जिचा दुरुपयोग होण्याचा विशेष संभव सामान्यत: कमी अशी लोकसत्ताक राज्यव्यवस्थाच चांगली. एकादे वेळीं एकादे राष्ट्राला चांगला राजा मिळतो. त्याचें भाग्य तत्काल उदयास येतें, तेथें लवकर सर्व प्रकारें भरभराट होते. लोक सुखी व संतुष्ट होतात. पण तो राजा दिवंगत झाल्यावर "येरे माझ्या मागल्या" या न्यायानें देशाचा दुर्दैवकाळ सुरू होण्यास विलंब लागणार नाहीं! कदाचित् पहिला राजा जितका चांगला तितकाच दुसरा वाईट ठरेल; नाहीं कशाकरून? तेव्हां अखिल जनतेचें भाग्य अनिश्चिततेवर लटकवीत ठेवण्यापेक्षां अनियंत्रित राजसत्तेलाच दूर करणें देशहिताच्या दृष्टीनें अधिक बरें नाहीं का होणार?

# शुद्ध लोकसत्तेच्या मर्यादा

## प्रकरण १० वें

या प्रकरणाच्या मथळ्यावरून वाचकांना अशी शंका होईल, कीं लोकसत्तेचे विविध प्रकार आहेत कीं काय. ही शंका खरी आहे. कारण लोकसत्तेचा सरळ अर्थ केला म्हणजे अनेक कल्पनातरंग उद्‌भवतात. लोकसत्ता म्हणजे लोकांची सत्ता! पण एक राजा जसा राज्य करतो तसा सर्व लोक सर्व लोकांवर राज्यकारभार कसा करूं शकतात? अशा राज्य-पद्धतींत सर्व लोकांच्या हातीं समान राजकीय सत्ता असली पाहिजे; पण हें तर अगदींच दिसत नाहीं. अनियंत्रिक राजसत्तेंत जी राजकीय व आर्थिक विषमता दृष्टोत्पत्तीस येते तशी लोकसत्तेंतही दिसते. मग लोकांना समान हक्क एक तर मिळालेच नाहींत किंवा मिळाले असले तरी ते पोकळ व निरर्थक तरी असले पाहिजेत, असें म्हणावें लागतें. लोकसत्तेंत कांहीं माणसें अधिकारपदावर असून सामान्य जनतेशीं वागण्यांत त्यांच्यामध्यें नम्रपणा व आदर यांचा लेशहि नसतो. कित्येक लोकांना तर अत्यंत हालअपेष्टेंत व अपमानांत दिवस घालवावे लागतात. ही गोष्ट जर प्रत्यहीं दिसून येत आहे तर लोकसत्ताक राज्यपद्धतींत लोकांच्या हातीं सत्ता कोणत्या प्रकारें आली आहे हें समजत नाहीं. अशा रीतीनें कित्येक लोक बुचक-ळ्यांत पडतात. याचा नीट उलगडा होण्यासाठीं आपणांस लोकसत्ता या शब्दाच्या अर्थाची अधिक फोड केली पाहिजे.

(१) देशांतील सर्व लोकांच्या संमतीनें जी राज्यव्यवस्था चालते तिला लोकसत्ता म्हणतात. हा लोकसत्ता या शब्दाचा खरा व सरळ अर्थ आहे. पण अशा प्रकारची राज्यव्य-वस्था अस्तित्वांत येणें व ती सुरळीतपणें चालविणें शक्य आहे काय यासंबधाचा विचार केला म्हणजे बऱ्याच अडचणी उपस्थित होतात. त्या अशा—

प्रथमत: आपणास हें कबूल केलें पाहिजे कीं मनुष्यामनुष्यातच नैतिक, बौद्धिक व सांपत्तिक विषमता दिसून येते. कित्येकांना तर असेंहि वाटतें की ही विषमता केवळ बाह्य परिस्थितीमुळेंच उत्पन्न झालेली नसून मनुष्याला जन्मतःच तिचें बंधन भोंवत असतें. ही अस-मानता परंपरागत प्राप्त झालेली असते. पूर्वजन्माच्या संस्काराचाच तो परिणाम होय असें या लोकांचें म्हणणें आहे. पण लोकसत्तेच्या कल्पनांचा प्रसार या आधुनिक कालांत विशेष जोरानें होत असल्यानें वरील मत खोटें आहे असेंहि पुष्कळांना वाटूं लागलें आहे. लोकसत्तेबरोबरच समता व बंधुता याहि तत्वांचा प्रसार झाला. किंबहुना हींच दोन तत्वें लोकसत्तेला आधारभूत असलेल्या कल्पना होत. मनुष्य जन्मतःच स्वतंत्र असून त्याच्यामध्यें व इतरांमध्यें मूलतः कांहीं फरक नाहीं. हा भेद कालमानेकरून उद्‌भवूं लागतो. बाह्य परिस्थित्यनुरूप मनुष्यामध्यें अनेक प्रकारची विषमता उत्पन्न होते. पण हा भेद असतो ही

गोष्ट सर्वांनाच कबूल केली पाहिजे. असें जर आहे तर लोकसत्ताक राज्यव्यवस्थेंत कोणाचें मत घ्यावें व कोणाचें नाहीं हा प्रश्न उपस्थित होतो. लोकसत्तेच्या व्याख्येप्रमाणें सर्वांचेंच मतें घेणें अवश्य आहे, मग तो गरीबांहून गरीब असो अगर श्रीमंताहून श्रीमंत असो. एखादा मनुष्य अत्यंत हीन कुलांत जन्मास आला असला तरी त्याचें मत घेतलें पाहिजे. दुसऱ्या एखाद्याला कांहीं समजत नसेल तरी चालेल पण त्याचाहि विचार घेणें प्राप्त आहे. यावरून असें स्पष्ट होतें कीं लोकसत्ताक राज्यकारभाराच्या बुडाशीं समानता हें एक महत्वाचें तत्व आहे. आपलें म्हणणें काय आहे हें सांगण्याचा प्रत्येकाला अधिकार असल्यामुळें लोकसत्तेनें ही बाह्य पण अपरिहार्य असलेली एवढी विषमता साफ नाहींशी केली आहे. यावर पुष्कळांचें असें म्हणणें आहे. कीं विषमता ही जर खरोखरच दिसून येते, एक मनुष्य दुसऱ्यापेक्षां बुद्धीनें, धनानें व सामाजिक दर्जानें अगदीं भिन्न आहे तर मग राज्यकारभारासारख्या महत्वाच्या बाबतींत दोघांनाहि एकाच तराजूमध्यें घालणें इष्ट होणार नाहीं. एका विद्वान्, अनुभवीक, राज्यकारभाराचें पुष्कळ ज्ञान असलेल्या प्रोफेसरालाहि एक मत व एका अत्यंत गरीब व निरक्षर मनुष्यालाहि एक मत–ही स्थिति इष्ट नाहीं. one man, one vote हें तत्व सुंदर असेल, पण त्यामुळें किती अनवस्था दिसून येते ? तेव्हां सर्वांच्या मतानें चालणाऱ्या राज्यव्यवस्थेंत म्हणजे लोकसत्तेंत हा एकप्रकारें अन्यायच होत आहे. सर्व लोकांच्या मतानें चालणारी ही राज्यव्यवस्था, या दृष्टीनें विचार केला तर, बरीच दोषपूर्ण आहे असें म्हणावें लागतें.

याला असें उत्तर देतां येईल कीं मागासलेल्या लोकांचें " संरक्षण " करणें, त्यांचे हक्क अबाधित राहूं देणें हें प्रत्येक राज्यव्यवस्थेचें कर्तव्य समजलें जातें. तसेंच सर्वांना एकेकच मत असलें तरी जे लोक अधिक योग्यतेचे आहेत त्यांना लोकशाहींत पुढें येऊन आपला दर्जा वाढविण्याची व जनतेची सेवा करण्याची संधि पुष्कळ प्राप्त होते. तेव्हां मतदानाच्या दृष्टीनें होणारा तोटा या संधीच्या योगानें सगळा भरून निघण्यासारखा आहे. शिवाय जे लोक विद्वान आहेत, विचारशील व समंजस आहेत त्यांना लोकांचीं मनें आपल्याकडे वळवून घेणें अधिक सोपें असतें. म्हणून वस्तुतः त्यांना एकच मत असलें तरी त्यांना कितीतरी पटीनें तें वाढविण्याची संधि मिळते. दिसायला एक पण वास्तवीक अनेक मतें त्यांच्या स्वाधीन असतात, असें म्हणण्यास हरकत नाहीं. पण हें केवळ वरील शंकेचें निरसन झालें. त्यामुळें मात्र मतासंबंधाच्या आक्षेपांची तात्विक साधारता कमी होत नाहीं.

दुसरें असें कीं एकाद्या लहानशा खेड्यांत एक सभा होत असून त्यांत सर्व गांवकरी लोक जमले, एकाद्या महत्वाच्या विषयांवर त्यांनीं चर्चा केली व सर्वांना ती गोष्ट मान्य झाली, म्हणजे सर्व लोकांच्या मतानें तिची अंमलबजावणी व्हावयाची. पण ही गोष्ट मोठ्या शहरांना लागू होणें शक्य नाहीं. मग देशाला लागू होणें तर पूर्ण अशक्यच. तेव्हां देशाच्या लोकसत्ताक राज्यकारभारांत सर्व लोकांची प्रत्यक्ष संमति मिळणें व त्याप्रमाणें व्यवस्था चालणें अगदींच असंभव आहे. प्राचीन कालीं ग्रीस देशांत शहरसंस्थानें (City States) होतीं. सर्व लोकांनीं एकत्र जमून एकाद्या महत्वाच्या विषयावर चर्चा करून सर्वानुमतें एकादें धोरण ठरवावयाचें असा क्रम होता. तीं संस्थानें पूर्ण लोकसत्ताक होतीं. प्रत्येक नागरीकाला राज्यकारभाराचीं सूत्रें

आपल्याही ताब्यांत आहेत असा अभिमान होता. राज्यकारभारावर प्रत्येकाची पूर्ण देखरेख होती. सारांश, लोकांच्या हातीं खरी सत्ता होती. शुद्ध लोकसत्तेचें हेंच खरें स्वरूप आहे. राज्याचा आपण एक घटक आहों, व म्हणून आपल्या हातीं सत्ता आहे ही जाणीव जोंपर्यंत नागरिकांना होत नाहीं तोंपर्यंत खरीखरी लोकसत्ता देशांत स्थापन झाली आहे असें म्हणतां येणार नाहीं.

यावरून असें दिसून येईल कीं पूर्ण व खरी लोकसत्ता देशांत स्थापन होऊं शकत नाहीं. कारण राज्यकारभाराच्या प्रत्येक बाबीसंबंधानें सबंध देशांतील लोकांचें खरें मत काय आहे हें समजणें व तें समजून घेण्याची व्यवस्था करणें अशक्य असतें. मग आतां असें कोणी म्हणेल कीं निवडणुकीमुळें लोक आपले प्रतिनिधी पाठवूं शकतात; हे एकत्र बसून राज्यकारभाराचें धोरण ठरवितात व त्यांच्यापैकींच कांहीं तें अमलांत आणतात. म्हणजे पर्यायानें लोकांच्याच हातीं सर्व सत्ता असते. निदान एका राजाच्या हातीं तर ती नसतेच!

शुद्ध लोकसत्ताक राज्यपद्धतीला व्यावहारिक स्वरूप देण्यासाठीं निवडणुकीच्या या मधल्या पायरीचा अवलंब करणें भाग आहे यांत कांहीं शंका नाहीं. पण त्यामुळें खऱ्या व शुद्ध लोकशाहीला थोडासा आळा बसतोच, असें ह्मणावें लागतें. कारण, एक तर एखाद्या कठीण प्रश्नासंबंधानें सर्व लोकांचें एकमत असणें संभवत नाहीं. राज्यकारभाराचे कांहीं प्रश्न इतके गहन असतांत कीं सामान्य लोकांना त्यांचा उलगडा होणें शक्य नाहीं. हुंडणावळ, खुला व संरक्षक व्यापार, कायद्याचे महत्वाचे प्रश्न वगैरे संबंधानें तर कित्येक प्रतिनिधींनाही नीटसा बोध होत नाहीं मग सामान्य अज्ञ जनतेला यांचें कोडें कसें उलगडणार? तसेंच देशाचा खर्च भागण्यासाठीं आपणा स्वतःवर ज्यादा कर लावावयास गरीब व अज्ञ मतदार कधींतरी संमति देतील कां? एवंच राष्ट्राच्या कित्येक प्रश्नासंबंधानें सामान्य लोकांना कांहीं समजत नाहीं, व समजलें तरी सर्वांचें एकमत होणें शक्य नाहीं. 'भिन्नरुचिर्हि लोकाः' या न्यायानें एकाच मुद्याविषयीं हजारों विचार पुढें मांडण्यांत यावयाचे! दुसरें असें कीं एका मतदारसंघाचें एकमत जरी झालें असलें तरी त्या संघातर्फे निवडून आलेला प्रतिनिधी तेंच मत प्रतिपादन करतो असें नाहीं. कित्येकदां तर मी सांगतों हेंच माझ्या मतदारसंघाचें मत आहे असें खोटेंनाटें तो बेधडक सांगून टाकतो. ही स्थिति कमीअधिक प्रमाणांत बहुधा सर्व देशांतच दिसून येत आहे. तेव्हां प्रश्न असा उद्भवतो कीं राज्यकारभार हा लोकांच्या सल्लयानें चालला आहे का लोकांच्या प्रतिनिधींच्या सल्लयानें? बरे, लोकांचे प्रतिनिधी कायदेमंडळांत जाऊन बसल्यावर एकाद्या विषयसंबंधानें ते आपलें एकमत बनवितात असेंही कोठें दिसून येत नाहीं. त्यांच्यांतही दुफळी! त्यांच्यामध्येंही तीव्र मतभेद दृष्टीस पडतो! अशा परिस्थितींत एखादा कायदा पास झाला तर त्याला देशाच्या सर्व लोकांची तर राहूंच द्या पण लोकांनीं निवडलेल्या सर्व प्रतिनिधींची तरी समति असते का? केव्हांही नाहीं! मग खऱ्या व शुद्ध लोकसत्तेचें अस्तित्व कोठें राहिलें?

या प्रकरणांत हीच गोष्ट सिद्ध करावयाची आहे. खरी लोकसत्ता हें केवळ तत्व आहे. ती व्यवहार्य नाहीं. तिची अंमलबजावणी होणें अशक्य आहे. तिला पुष्कळ मर्यादा आहेत. या मर्यादेमुळें तिचें मूळ स्वरूप विकृत होतें. एखाद्या लहान मुलाला पंधरा वर्षांनंतर पाहिल्यावर त्याला ओळखावयास सुद्धा त्रास पडतो, बहुधा ओळख पटावयाची नाहींच! त्याच प्रमाणें खरी लोकसत्ता व्यवहार्यतेच्या साच्यांतून बाहेर पडतांच तिचें स्वरूप अगदींच पालटतें. अर्थात अशी राज्यव्यवस्था राजसत्तेपेक्षां पुष्कळ बरी हें खरें आहे. वाळवंटातून प्रवास करतां करतां तहान लागली म्हणजे मृगजल दिसूं लागतें व पुढें जाऊन पाहावें तर तें हातीं लागत नाहीं. हल्लीं व्यवहारांत असलेल्या लोकसत्तेंत आपली तेवढी निराशा होत नाहीं यांतच समाधान मानावें!

(२) तर मग आतां लोकसत्तेची व्याख्या निराळी केली पाहिजे, असें सिद्ध होतें. पहिली व्याख्या परिस्थितीस धरून नाहीं. ती व्यवहार्य नाहीं. ती चूक आहे असेंच म्हटलें पाहिजे. ही दुसरी व्याख्या अशी.–

लोकांनीं निवडून दिलेल्या प्रतिनिधींच्या तंत्रानें चालणाऱ्या राज्यव्यवस्थेला लोकसत्ताक राज्यव्यवस्था म्हणतात. आणि एकंदर सामुदायिक लोकमत व राज्यकारभाराचें धोरण यांमध्यें जितकें तादात्म्य राहील तितकी लोकसत्ता अधिक यथार्थ व लोकहितकारक होईल.

लोकसत्तेच्या उच्च तत्वाला व्यवहार्य करावयास निवडणुकीशिवाय दुसरा उपाय नाहीं. पण यामुळें लोकसत्तेच्या तत्वाला थोडासा बाध कसा येतो याचें वर विवरण आलेंच आहे. अगदीं सामान्य अशा जनतेच्या हातीं अशा प्रकारची राज्यव्यवस्था पडली तर ती त्यांना चालवूनहि दाखवितां यावयाची नाहीं. निवडणुकीच्या बुडाशीं हाहि एक मुख्य हेतु आहे. देशाच्या विस्तारामुळें निवडणुकीच्या साधनाशिवाय लोकसत्ता व्यवहार्य व साध्य व्हावयाची नाहीं हें तर खरेंच, पण त्याच बरोबर हेंहि लक्षांत ठेवलें पाहिजे कीं विद्वान, समजदार, अनुभवी व राजनीतिकुशल प्रतिनिधींच्या नेतृत्वामुळें, मार्गदर्शिकत्वामुळें ज्ञानानें अंधळ्या व मनानें दुबळ्या अशा प्रचंड जनतेला आपली वाट धिम्मेपणानें आक्रमण करतां येते. असें नसतें, या थोड्या पण कार्यकुशल पुढाऱ्यांचें पाठबळ जनतेला मिळालें नसतें तर अफाट व मार्गशून्य अशा वाट अरण्यांत मनुष्याला सोडून दिल्यास तो जसा मूढ व असहाय होतो तशीच जनतेचीहि स्थिति शोचनीय झाली असती. देशाच्या विस्ताराच्या मानानें एकंदरीत असे लोक थोडेच सांपडावयाचे. याच लोकांना आपण उच्च वर्गांतील (oligarchy) लोक म्हणूं. समाजाचें ते मार्गदर्शक असतात. समाजाचें कल्याण व्हावें हा उच्च हेतु त्यांच्या अंतःकरणांत सदैव जागृत असतो. असे लोक प्रत्येक समाजांत, देशांत, उत्पन्न व्हावयाचेच. अशा लोकांनीं लोकसत्ताक राज्यकारभाराच्या अत्यंत गुंतागुंतीच्या प्रश्नांत लक्ष घातलें नाहीं तर मग काय सामान्य लोकांनीं घालावयाचें? असे लोक जनतेचे पुढारी होणें हें केवळ इष्टच नव्हे तर अपरिहार्यहि आहे.

यावरून एकच गोष्ट प्रत्ययास येते. ती ही कीं देशांतील बहुसंख्य अज्ञ लोकांचें नेतृत्व पत्करावयास विद्वान व कार्यचतुर लोकांची अत्यंत आवश्यकता असते. व हें जर खरें तर लोकसत्तेवर या अल्प लोकांची छाप बसावी, लोकसत्ताक राज्यकारभारावर यांच्या विचारांचा ठसा उमटावा, व लोकसत्तेच्या अंमलबजावणीच्या कार्यांत यांचा विपुल उपयोग व्हावा यांत नवल काय ? लोकशाहींत या थोड्या पण निष्णात लोकांची गरज लागते या संबंधानें लिहितांना प्रसिद्ध ग्रंथकार मॅलॉक आपल्या Limits of Pure Democracy या ग्रंथांत लिहितो-

"If talents are not alsolutely superflous it follows that oligarchy of some kind is a necessity; for talent as applied to government, can exert itself in one way only-namely that of an influence exercised by few men over many."

या अल्पसंख्याक व चतुर लोकांची लोकशाहींत पदोपदीं गरज लागते. त्यांच्याखेरीज निवडणुकीचा हेतु सफल व्हावयाचा नाहीं. त्यांच्या मदतीशिवाय राज्यकारभार सुरळीत चालावयाचा नाही. त्याच्याशिवाय लोकमत्ता व्यवहार्यहि व्हावयाची नाहीं. या अल्पसंख्याक वर्गाचा उदय होणें हें इष्ट व अपरिहार्यहि आहे. तोच ग्रंथकार पुढें लिहितो-

"In all advanced states of society, the exceptional influence of a more or less numerous few is alsolutely essential to the operation of the democratic principle, and this fact is at the same time fatal to the theory of pure democracy."

खऱ्या लोकसत्तेची प्रथमत व्याख्या देण्यात आली आहे. ती व्यवहार्य कशी नाही याचेंहि विवेचन झालें आहे. तथापि कोणत्याहि स्वरूपांत कां होईना लोकसत्ताक तत्वाची अमलबजावणी या चतुर अल्पसंख्य लोकांकडूनच व्हावयाची. पण अगोदर लोकांचें मत त्यांना अनुकूल करून घ्यावें लागतें. महत्वाच्या प्रश्नासंबंधीं मत बनविण्यास या मूठभर लोकांना बहुजन समाजास मदत करावी लागते. कांहीं प्रश्न अगदीं सरळ असतात. देशाचें संरक्षण, युद्धप्रसंग, नागरिकांच्या हक्कांचें संरक्षण इत्यादि प्रश्नासंबंधानें साधारण तर एकमतच दिसून येतें. कांहीं प्रश्न अत्यंत गुंतागुंतीचे असल्यानें ते सोडविणें फार कठीण. अशा वेळीं या अल्पसंख्य लोकांची फारच आवश्यकता भासते. किंबहुना बहुधा हेच लोक या प्रश्नांबद्दल विचार करून आपलीं मतें लोकांसमोर प्रगट करीत असतात. अज्ञ लोकांना याबद्दल एक अक्षरहि समजत नाहीं. पण हे लोक मोठे आहेत, विद्वान् आहेत, कार्यचतुर आहेत व देशभक्तहि आहेत असें मानून ते अंधपणानें त्यांच्या मताला मान देतात. कदाचित हे प्रश्न स्वतः सोडविण्याइतकी त्यांची बुद्धि विकास पावलेली असती तर त्यांनीं निराळेंच मत बनविलें असतें. पण अंधश्रद्धेमुळें व अज्ञानामुळें या अल्पसंख्य लोकांचें फावतें. हें लोक सर्वच सद्गुणी, सदाचारी व प्रामाणिक असतात असेंहि नाही. तेव्हां कित्येकदां जनतेची फसवणूकहि होत असते. कित्येक लोक तर खोट्यानाट्या गोष्टी सांगून व आपल्या वर्चस्वाचा फायदा घेऊन लोकांना ठराविक रीतीनें मत देण्यास सांगतात. कित्येक लांचलुचपत देऊन व

वेळप्रसंगीं धाकदपटशाहि दाखवून आपल्यालाच मतें देण्यास अज्ञ मतदारांना प्रवृत्त करतात. वरील ग्रंथकाराचें तर असेंहि मत आहे कीं वक्तृत्व सुरू झालें म्हणजे लोकसत्तेचा लोप होतो. (where oratory begins democracy ceases to exist) कारण वक्तृत्व ही अशी कला आहे कीं जीमुळें वक्त्याला दुसऱ्याचीं मनें आपल्याकडे, निदान तात्पुरती तरी सहज लीलेनें ओढून घेतां येतें. लोकसत्तेमध्यें वक्तृत्वाच्या प्रचंड ओघांत सांपडून दिङ्मूढ झालेले अनेक अज्ञ मतदार सांपडतील. मागाहून ते पश्चाताप करीत बसतात, किंवा कित्येक वेळां पश्चाताप होण्याइतकी त्याची बुद्धि प्रगल्भ झालेलीहि नसते. सार्वजनिक कार्याबद्दल ते अत्यंत उदासीन असतात. मतदानाच्या अधिकाराचा त्यांना योग्य उपयोग करण्याची प्रवृत्तीच होत नाहीं किंवा तो कसा करावा हेंहि कळण्याइतकी पात्रता त्यांच्या अंगीं नसते. पाठीमागून मात्र एखादी गोष्ट घडली व ती त्यांना प्रतिकूल वाटली तर त्यांचे डोळे उघडतात !

तेव्हां मतदारांना चार दोन गोष्टी सांगून किंवा त्यांच्यापाशीं लंब्या चौड्या बाता मारून एखादा उमेदवार मत उपटून घेऊन गेला म्हणजे तो या फसणाऱ्या अडाणी मनुष्यांचा प्रतिनिधी ठरतो ही गोष्ट कोणीहि मान्य करणार नाहीं. म्हणून प्रतिनिधित्वाच्या पायावर उभारलेला लोकसत्तेचा हा डोलारा दिसावयाला सुंदर दिसला तरी केवळ दिखाऊ आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. किंबहुना या सुंदर इमारतीला लोकसत्तेचेंच मंदिर म्हणावें कीं काय अशीहि शंका येते !

सारांश, खरी व शुद्ध लोकसत्ता हा केवळ भास आहे. हें एक केवळ तत्व आहे. तें आकर्षक आहे पण व्यवहार्य नाहीं. तें व्यवहार्य करण्यासाठीं, लोकसत्ता कार्यक्षम होण्यासाठीं कार्यकुशल व विद्वान अशा अल्पसंख्य लोकांची मदत घ्यावी लागते. विहिरींतून मोटेनें पाणी काढावयास दोन बैलांची आवश्यकता असते. एकाच बैलाच्यानें मोट ओढली जाणार नाहीं. तसेंच हें लोकसत्तेचें पाणी चारीकडे पसरवून शेतें सुपीक करण्यासाठीं केवळ अज्ञ मतदारांवरच अवलंबून राहतां येत नाहीं. केवळ त्यांच्यामुळें राज्यकारभाराची मोट व्यवस्थितपणें सतत चालूं शकेल हें संभवनीय नाहीं. तेव्हां कुशल अल्पसंख्य लोकांची मदत घ्यावी लागते. दोघांची जोडी एकाच दिशेनें चालूं लागली म्हणजे पाणी देण्याचें काम अत्यंत सुकर व परिणामीं हितकर होतें हें सांगणें नकोच या दोघांमध्येंहि एकवाक्यता पाहिजे. म्हणजेच लोककल्याणाचा वृक्ष पुष्पांच्या व फलांच्या संभारानें खालीं वांकेल. दोघांमध्यें बेबनाव झाला म्हणजे मोटेचे दोन बैल विरुद्धदिशेंत चालूं लागले, किंवा एकानें कामचुकारपणामुळें सर्व भार दुसऱ्यावरच टाकून दिला म्हणजे मोट जशी सुरळीतपणें चालावयाची नाहीं, तद्वतच लोकसत्तेचें कार्यहि अगतिक होतें.

एका ग्रंथकारानें म्हटलें आहे कीं–

"Democracy only knows itself through the co-operation of oligarchy."

हा सिद्धांत किती खरा आहे हें येथपर्यन्त झालेल्या विवेचनावरून वाचकांच्या लक्षांत आलेंच असेल. अल्पसंख्य लोकांची आवश्यकता कां आहे याचीं मुख्य कारणें अशीं:–

(१) मतदारांपुढें येणारे प्रश्न दोन प्रकारचे असतात-सोपे व महत्वाचे; आणि कठीण व गुंतागुंतीचें. पहिल्या प्रकारच्या प्रश्नांवर कदाचित मतदारांची एकवाक्यता होईल. पण दुसऱ्या प्रकारच्या प्रश्नांसंबंधानें विचार करण्याची त्यांच्या ठिकाणीं पात्रताच नसते. तेव्हां विद्वान अल्पसंख्य लोकांच्या हातून हें काम कुशलतेनें होत असतें.

(२) सामान्यत: राज्यकारभाराच्या बाबतींत बहुजनसमाज उदासीनच असतो. तेव्हां देशांत पक्षोपपक्ष असणें, हे विद्वान अल्पसंख्य लोक मदतीला असणें, केवळ आवश्यकच नव्हे तर अपरिहार्य पण आहे.

(३) लोकसत्तेचा कारभार एकंदर अत्यंत गुन्तागुन्तीचा असतो. तो व्यवस्थित रीतीनें चालविण्यासाठीं अनुभवी, विद्वान व प्रामाणिक लोकांची फारच जरूरी भासते. साधारणपणें अशा लोकांच्या संख्येचें प्रमाण प्रत्येक देशांत फारच थोडें असावयाचें. त्यांना पुढें येण्याची संधी असते. किंबहुना ते राज्यकारभाराचा गाडा चालविण्यास तयार नसले तर लोकशाही सुद्धां कार्यक्षम होणार नाहीं.

(४) मनुष्यामनुष्यामध्यें विषमता असते. कोणी प्रामाणिक व सच्चा तर कोणी लुच्चा व लबाड. कोणी शहाणा तर कोणी अडाणी. अशा प्रकारचा भेद सर्वत्र दिसून येतो. लोकशाहीला लागणाऱ्या गुणदुर्गुणांनीं युक्त असलेला मनुष्य संधीचीं द्वारें नेहमीं खुलीं असतांना, लोकांसमोर कां येणार नाही ? आपण मोठें व्हावें ही हांव किंवा ही सदिच्छा सर्वांनाच असते. जो तो आपल्या गुणांचा उपयोग करून ही महत्वाकांक्षा साध्य करण्याची खटपट करीत असतो. त्यांत त्याचा काय दोष ? तेव्हां कांहीं लोक पुढें यावयाचे व कांहीं मागेंच रहावयाचे हें स्वाभाविक आहे. पुढें येण्याची संधी लोकसत्तेंत फार असते. तेव्हां या कार्यकुशल, प्रामाणिक व विद्वान अल्पसंख्य लोकांचा उदय होणें अगदीं अपरिहार्यच आहे.

जेम्स स्टीफन या ग्रंथकाराचे सुद्धां हेंच म्हणणें आहे:-

In a pure Democracy, the ruling men will be the wirepullers and their friends; but they will be no more on an equality with the people than the soldiers and ministers of state are on an equality with the subjects of monarchy ......But under all circumstances the rank and file are directed by leaders of one kind or another who get the command of their collective force

लॉर्ड ब्राइस यांहि ग्रंथकाराचें असेंच मत आहे. राजकारणाची आवड असलेले लोक इतके थोडे असतात, कीं राज्यकारभाराचीं सूत्रें अल्पसंख्य लोकांच्या हातीं जाणें अपरिहार्य आहे.

The proportion of citizens who take a lively and constant interest in politics is so small, and likely to remain so small, that the direction of affairs inevitably passes to a few......

........................................................................................................

* James Stephen-Liberty, Fraternity and Equality.

Thus Free Government cannot but be and has always in reality been an Oligarchy within a democracy.*

यावर आतां कोणी अशी शंका काढील कीं, लोकसत्ताक राज्यपद्धति स्थापन करण्यासाठीं मरमर प्रयत्न करण्यांत अर्थ तरी काय? यासाठीं कितीतरी बंडें झालीं, मोठमोठ्या लढाया झाल्या, कित्येक राजे व राजघराण्यांतील लोक मृत्युमुखीं पडले, असंख्य लोक प्राणास मुकले, व ही सर्व हानि होऊन सुद्धां खरी लोकसत्ता म्हणजे काय तर मृगजळच! लोकशाहीचा मग उपयोग काय? त्यापेक्षां राजसत्ता किंवा इतर कोणतीहि राज्यव्यवस्था पुरविली! लोकसत्तेंत एवीतेवी सर्व सूत्रें अल्पसंख्य लोकांच्या हातीं जावयाचीं, व त्यांचीच पोळी पिकावयाची! ही स्थिति मोठी आनंददायी किंवा स्पृहणीय नाहीं. अशा प्रकारच्या शंका कित्येकांच्या मनांत उद्भवतील. त्यांनाहि उत्तर दिलें पाहिजे.

वरील सर्व विवरण लोकसत्तेची सरसता व उपयुक्तता कमी आहे असें दाखविण्याच्या हेतूनें केलें नाहीं. उलट अशा अडचणी असून सुद्धां लोकसत्तेचा संसार व्यवस्थितपणें चालणें शक्य असून त्यांत सर्वांना सुख व समाधान होण्यासारखें आहे. क्वचित ठिकाणीं हल्लीं असंतोष पसरलेला दिसत असला तरी त्याचा उगम लोकसत्ताक पद्धतींत नसून आणखी इतर कांहीं कारणांमुळें झालेला आहे असेंच म्हणावें लागेल. लोकशाहीच्या शीतल छायेंत राजसत्ताक किंवा इतर जुलमाच्या प्रखर सूर्यकिरणांनीं तप्त झालेल्या जनतेला सुखासमाधानानें राहतां येतें, यांत संशय नाही.

आतां मुख्य आक्षेपांना उत्तर देऊं. पहिला आक्षेप असा कीं लोकसत्तेंत तर राज्यांचीं सूत्रें हुषार, अल्पसंख्य लोकांच्या हातीं जातात तर मग सामान्य जनतेच्या हातीं काय उरलें? याला उत्तर असें कीं लोकशाहींत सर्वांनाच संधीची द्वारें सारखीच खुलीं असतात. अमुक मनुष्य विद्वान, प्रामाणिक, व राजकारणकुशल म्हणून तो या अल्पसंख्य लोकांत जमा झाला. पण तुम्हांलाहि त्यांच्यासारखे होण्यास काय हरकत आहे? तुम्हीहि विद्वान व्हा. राजकारणांत भाग घ्या. व लोककार्य करण्याची अंगीं संवय बाणवा. तुम्हालाहि या अल्पसंख्य लोकांमध्यें जमा होण्याची संधि प्राप्त होऊन राज्यकारभाराचीं सूत्रें तुमच्या योग्यमतेप्रमाणें तुमच्याहि हातीं येतील. स्वतंत्रता, बंधुता व समता ही तीन लोकसत्तेचीं आधारभूत तत्त्वें आहेत. कायद्यान्वयें प्राप्त होणारी स्वतंत्रता, परस्पर सहकार्यानें उत्पन्न होणारा बंधुभाव व समानसंधीमुळें विकसित होणारी समताबुद्धि हे तीन लोकशाहीचे गुणविशेष होत. एवंच आत्मोद्धाराचे, भौतिक किंवा लौकिक उन्नतीचें दार लोकशाहींत नेहमीं खुलें असतें. आपापल्या योग्यतेप्रमाणें ज्यानें त्यानें संधींचा फायदा घ्यावा, व राष्ट्राचाहि फायदा पहावा. राष्ट्रहित व राष्ट्रहिताबरोबर स्वहितहि साधण्याचा प्रत्येकाला अधिकार आहे. पेरील तो चाखील. लोकहितप्रवर्तक प्रयत्न पेरल्याशिवाय स्वोन्नतीचेंहि फळ कसें प्राप्त होणार? एवढें मात्र संभवतें कीं एकाद्या मनुष्यामध्यें लोकसत्तेला आवश्यक असणारे गुण व दोष असूनसुद्धां त्याला योग्य मोबदला मिळत नाहीं. पण ही गोष्ट सर्व प्रकारच्या परिस्थितीसहि लागू पडते. त्यामुळें मूळ सिद्धान्ताला बाध येत नाहीं. सारांश, लोकशाहींत अल्पसंख्य लोकांनाच राज्यकारभाराच्या उलाढाली

*Lord Bryce–Modern Democracies

करावयास मिळतात. सर्वांना तशी संधि मिळत नाहीं. ही तक्रार करणें निरर्थक व अप्रयोजक आहे. प्रत्येक नागरिकाला या अल्पसंख्य लोकांपैकींच एक होऊन राहण्याचा पूर्ण अधिकार आहे. त्याचप्रमाणें त्याला संधिहि मिळत असते. संधीचा फायदा न घेऊन लोकशाहीला दोष देणाऱ्या मनुष्याची तक्रार स्वतःच्या आम्रवृक्षावर फळें फळलेलीं पाहूनहि आपणास तीं मिळत नाहीत अशी निष्कारण तक्रार करण्याइतकेंच हास्यास्पद आहे.

दुसरा आक्षेप असा कीं अल्पसंख्य लोकांच्या उदयाची आवश्यकता व अपरिहार्यता जर सिद्ध झाली आहे लोकसत्तेचा संसार त्यांच्यावाचून सुरळीत चालावयाचा नाहीं ही गोष्ट स्पष्ट आहे तर मग लोकशाही म्हणजे कार्यकुशल अल्पसंख्य लोकांचेंच राज्य असें म्हणण्यास काय हरकत आहे? व असें असेल तर मग तिची मातब्बरी काय? ती स्थापन होण्यासाठीं जनतेनें प्रयत्न कां म्हणून करावा? तिचें रक्षण करण्यासाठीं सामान्य लोकांनीं राष्ट्रप्रेमाच्या वेदीवर स्वप्राणांची आहुती कां म्हणून द्यावी?

पण आपण एक गोष्ट विसरतों. या अल्पसंख्य लोकांच्या हातीं मुख्य सूत्रें असतात हें कबूल आहे. पण या अल्पसंख्य लोकांची निवड कोण करतो? तें काम मतदारांचेंच असतें. राज्यकारभाराचें मुख्य धोरण जनतेचें व राष्ट्राचें हित यावर अधिष्ठित असावें अशी मतदारांची प्रतिनिधींना आज्ञा असते. हे प्रतिनिधी त्यांचे दलाल. या दलालांची निवड करण्यांतच मतदारांची परीक्षा होते त्यावरच राष्ट्राचें हिताहित अवलंबून असतें. लॉर्ड ब्राइस म्हणतो—

A nation is tasted and judged by the quality of those it chooses and supports as its leaders; and by their capacity it stands or falls. तेव्हां राज्यकारभार चालविण्याची अल्पसंख्य लोकांवरच मुख्य जबाबदारी येऊन पडली असली तरी त्यांनाहि निवडून देण्याची जबाबदारी जनतेवर असतेच. त्यामुळें जनतेशी–मतदारांशीं–बेबनाव करून त्यांचें चालत नाहीं, त्यांच्या आज्ञांचा भंग करणें फार दिवस त्यांना परवडत नाहीं. उलटपक्षीं त्यांच्या आज्ञा शिरोधार्य मानून त्याप्रमाणें कार्य करणें हेंच त्यांच्या स्वतःच्या हिताचें आहे. या दृष्टीनें विचार केला असतां असें म्हणावें लागेल कीं हे हुषार अल्पसंख्य लोक (oligarchy) मार्गांत विघ्न उत्पन्न करणारे हितशत्रू नसून लोकसत्तेच्या बैलगाडीवर आरूढ होऊन तिला योग्य मार्गानें इच्छित ठिकाणीं नेणारे कुशल व अनुभवी लोक आहेत. गाडीवर बसून बैलांच्या दोऱ्या जोपर्यंत त्यांच्या हातांत आहेत तोपर्यंत बैल कितीहि नाठाळ असले तरी त्यांना आड वाटेनें ते जाऊं देणार नाहींत व हे कर्णधार अकुशल असले तर त्यांना काढून दुसऱ्यांना तें काम सांगण्याचा हक्क जनतेलाहि आहे. वाईट माणसाची नियुक्ति करण्याचा दोष अखेर मतदारांकडेच येतो. यांत या अल्पसंख्य लोकांचा दोष नाहीं. मॅलॉक म्हणतो.

The paralysis of oligarchy would be the paralysis of talent. It must, however, be clearly recognised that the activity of oligarchy is not the paralysis of democracy. ×

× W. H. Mellock—Limits of Pure Democracy.

राज्यकारभारांत या अल्पसंख्य लोकांचें अस्तित्व असल्यानें लोकसत्तेचा लोप होत नाहीं ही गोष्ट विसरतां कामा नये. एवढेंच नव्हे तर त्यांचें अस्तित्व, त्यांचा उदय लोकसत्तेंत आवश्यक व अपरिहार्य आहे असें समजून जनतेनें उत्तम प्रतिनिधी निवडून दिले पाहिजेत. तोच ग्रंथकार शेवटीं म्हणतो–

* The real solution of the difficulty lies in the full recognition of the fact that democracy and oligarchy are principles not exclusive but that in a great and complex state, the one is the complement of the other.

याप्रमाणें या अल्पसंख्य लोकांचें वर्चस्व लोकसत्ताक राज्याला पोषकच असतें. याचें मुख्य कारण हें कीं या अल्पसंख्य लोकांना जनतेनेंच निवडून दिलें असल्यानें त्यांच्यावर तिचा पूर्ण विश्वास असतो. त्यांनीं एखादेवेळीं एखादीं प्रथम वाईट दिसणारी गोष्ट केली तरी ती परिणामीं हितकर होईल अशीहि त्यांची दृढ श्रद्धा असते.

---

* I bid.

# लोकसत्ता व प्रत्यक्ष प्रतिकार

## प्रकरण ११ वें

लोकसत्तेपुढें जे अनेक गुंतागुन्तीचे प्रश्न उद्भवले आहेत त्यापैकीं महत्वाचा एक प्रश्न असा कीं या राज्यपद्धतीनें बंड अथवा प्रत्यक्ष प्रतिकार या संबंधानें कोणतें–कशा प्रकारचें धोरण ठेवावयाचें ? अलीकडे राज्यकारभाराचें कार्यक्षेत्र कल्पनातीत विस्तृत झालें असल्यानें शेपन्नास वर्षांपूर्वी न उद्भवणारे प्रश्न आज लोकसत्तेपुढें दत्त म्हणून उभे आहेत. या प्रश्नांचें स्वरूपहि अगदीं भिन्न असून त्यापैकीं कांहीं तर यशस्वीपणें सोडविणेंहि अत्यंत कठीण होऊन बसलें आहे.

लोकसत्ताक राज्यपद्धतीचा उदय झाल्यापासून सामाजिक व राजकीय या दोन प्रकारच्या विचारांचा व प्रयत्नांचा प्रवाह वेगवेगळ्या दिशेकडे वहात चालला आहे असें दृष्टीस पडतें. अर्थात हे विचार किंवा हे प्रयत्न यांचा उद्भव लोकसत्ताक राज्यपद्धतीपासून झाला आहे असें निश्चयानें म्हणतां येणार नाहीं. पण येवढें मात्र निःसंदेह आहे कीं लोकसत्तेंतील वातावरण त्यांच्या अभिवृद्धीस मात्र चांगलेंच पोषक ठरलें आहे. हे दोन प्रकारचे भिन्न विचार किंवा मानवी प्रयत्न म्हणजे (१) भांडवलशाही व (२) समाजसत्तावाद किंवा साम्यवाद हे होत. यांच्यामुळें कित्येक यूरोपियन राष्ट्रांमध्यें समाज दुभंगला आहे, त्याची दोन स्वतंत्र शकलें पडलीं असून उभयतांमध्यें भयंकर वैमनस्य माजून राहिलें आहे असें दिसून येतें. पाश्चात्य राष्ट्रें या वर्ग–कलहानें (class war) अगदीं मेटाकुटीस आलीं आहेत. उभय पक्षांचें वजन बरेंच वाढलें असून कित्येकदां देशांत यादवी सुरू होते कीं काय अशीहि भीति वाटते.

आतां येवढें खरें कीं हल्लीं फॅसिझम किंवा हिटलरशाहीमुळें सरकारविरोधी म्हणजे साम्यवादी पक्षाचें चांगलेंच निर्मूलन झालें आहे. इटालीमध्यें तर हा पक्ष प्रायः नाहींच असेंच म्हणणें योग्य होईल. जर्मनींत मात्र अद्यूनहि हा पक्ष बराच प्रबळ आहे. तथापि एवढें निःसंशय कीं साम्यवादी विचारांचा प्रवाह इतर देशांप्रमाणें तेथेंहि संथपणें, धिम्मेपणानें वाहत आहे. दंडुकेशाहीनें कांहीं लोकांची मनोवृत्ति बदलूं शकणार नाहीं, उलट चेंडू जितक्या जोरानें जमीनीवर आपटावा तितक्या जोरानें तो पुन्हा उंच उडी घेतो. तद्वतच या राजकीय झोटिंगशाही बरोबरच लोकांची साम्यवादी मनोवृत्ति दृढतर होत आहे.

वास्तवीक लोकशाहींत प्रत्यक्ष प्रतिकाराचा प्रश्न उद्भवण्याचेंहि कारण नाहीं. लोकसत्तेंत सर्व प्रकारचे विचार फलद्रूप होण्यास वाव असतो. त्याच्या अगोदर मात्र ते विचार सर्वसंमत झाले असले पाहिजेत, निदान पुष्कळशा लोकांना तरी ते मान्य झालेले असावे एवढीच लोक-

शाहीची अट. तेव्हां आपापसांत तीव्र कलह उत्पन्न होण्याचें कारणच वस्तुतः उरत नाहीं. पण याचें असें आहे कीं या दोन विचारांचे–म्हणजे भांडवलशाही व साम्यवाद यांचे–प्रवाह अगदींच भिन्न भिन्न दिशेला जात असून ते परस्परविरोधीहि आहेत. चिमुकलीं बहीणभावंडें जशी खेळीमेळीनें राहतात व क्वचित प्रसंगीं भांडून सुद्धां पुन्हां लवकरच एक होतात तशी एकाच परिस्थितीमधून उत्पन्न झालेल्या या दोन विचारांची किंवा तत्वांची अवस्था असलेली मात्र दिसत नाहीं. ही परिस्थिति म्हणजे आद्योगिक क्रांति. भांडवलशाहीचें बीज हींतच सांठलेलें होतें. आणि साम्यवादाचेंहि तींतच. या उभय प्रकारच्या विचारसरणीमुळें राज्यकारभाराचें क्षेत्रहि अधिक व्यापक झालें आहे. पूर्वीं न उद्‍भवणारे अनेक प्रकारचे प्रश्न सरकारापुढें आतां प्रत्यहीं उत्पन्न होत आहेत. आपल्या उत्कृष्ट संघटनेमुळें व वैभवानें प्राप्त झालेल्या श्रेष्ठपणामुळें भांडवलवाल्यांनीं राज्यकारभारावर आपला प्रभाव पाडला आहे. त्याला आपल्या अंतीम हितासाठीं विरोध करणें अवश्य म्हणून बहुतेक प्रत्येक देशांत मजूरपक्षही स्थापन झाला असून त्याची शक्ति व संघटना दिवसेंदिवस अधिक वाढत आहे. त्याला चिरडून टाकण्याच्या उद्देशानें बद्धपरिकर झालेला भांडवलवाल्यांचा पक्ष. राज्यकारभाराचीं सूत्रें बहुतेक देशांत प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष याच पक्षाकडे आहेत. तेव्हां या उभय पक्षांमध्यें तीव्र कलह उत्पन्न व्हावा यांत नवल नाहीं.

असंतोष हेंच सर्व कलहाचें कारण. लोकसत्तेच्या आद्यपुरस्कर्त्यांना असें वाटलें होतें कीं राजाची जुलमी व एकतंत्री राज्यव्यवस्था एकदां उलथून पाडल्यावर लोकांच्या तंत्रानें राज्यकारभार चालूं होईल व मग सर्व लोक सुखासमाधानानें व गुण्यागोविंदानें एकत्र राहून अधिक सुखी व संतुष्ट होतील. ही त्यांची सदिच्छा कांहीं अंशी विफल ठरली असें म्हणणें प्राप्त आहे. कारण लोकसत्तेबरोबरच समाजव्यवस्थाहि, आणखी इतर कारणांमुळें कां होईना, अधिक गुन्तागुन्तीची होत गेली. तिच्यांत पूर्वींसारखा सरळपणा राहिला नाहीं. शास्त्राच्या उत्तरोत्तर होत असलेल्या प्रगतीमुळें सुधारणेचें क्षेत्र अमर्याद वाढलें आहे. त्यामुळें झालें काय कीं राष्ट्रासमोर पूर्वीं कधीं न येणारे अनेक प्रश्न आतां नव्यानें येऊं लागले आहेत. त्यापैकीं कांहीं प्रश्न इतके क्रांतिकारक आहेत कीं ते यशपूर्वक सोडविल्यास समाजरचनेंतहि आमूलात फरक व्हावयाचा! तेव्हां मतभेद उत्पन्न होणें साहजिकच आहे. मतभेदामुळें असंतोष व असंतोषावर योग्य मात्रा उपयोगांत आणली गेली नाहीं म्हणजे त्याचा स्फोट होऊन प्रत्यक्ष प्रतिकाराची (direct action) भाषा सुरू होते. व या सर्वांचें पर्यवसान शेवटीं यादवींत होतें.

पण लोकसत्ताक राष्ट्रांत बंड होणें हीच गोष्ट प्रथमतः अत्यंत अनिष्टकारक आहे. राजसत्तेंत व एकसत्तेंत बंड झालें म्हणजे त्याचा तत्काळ बीमोड करण्याचा राजा वा सर्वसत्ताधिकारी कसून प्रयत्न करतो. आपल्या अधिकारांत असलेली सर्व पाशवी शक्ति तो एकाच दिशेनें एकवटतो. हवे ते उपाय योजून तो त्या बंडवाल्यांचा समूळ उच्छेद करतो. बंडाचें शमन करण्याचें काम त्याला जितकें लीलेनें करतां येतें तितकेंच सुलभतेनें लोकसत्ताक राज्यांतील कार्यकारी मंडळाला करतां येत नाहीं. या मंडळाला पदोपदीं लोकमताला भ्यावें लागतें.

बंडाच्या उपशमनार्थ जितके कडक उपाय अमलांत आणावयास पाहिजेत तितके आणावयास तें टंगळमंगळ करतें. याचा परिणाम असा होतो कीं बंडवाल्यांना उत्तेजन मिळाल्यासारखें होतें. बंडाचें स्वरूप उत्तरोत्तर अधिकाधिक उग्र होत जाऊन त्याचीं पाळेंमुळें जास्त जास्त खोल जाऊं लागतात. ही गोष्ट या थरापर्यंत आली म्हणजे मग कार्यकारी मंडळाचे डोळे उघडतात व आपली सर्व शक्ति बंडाचा उपशम करण्याकडे मग तें खर्च करते. या वेळीं मात्र सरकारास राज्याचीं सर्व सूत्रें पूर्णपणें आपल्या ताब्यांत घ्यावीं लागतात. व यापुढें लोकमताप्रमाणें तें बहुधा वागूं शकत नाहीं. सरकार सर्वाधिकारी बनतें. लोकमताचाहि त्याला पाठिंबा असतो. परराज्याशीं युद्ध चाललें असतां लोकसत्तेंत लोकमत स्वयं क्षीणबल होतें. देशावर एवढी घोर आपत्ती आल्यामुळें लोकहि बहुतकरून सरकारच्या कोणत्याहि कृत्याबद्दल संशय व्यक्त करीत नाहीत. त्यांचा सरकारवर अत्यंत दृढ विश्वास असतो. पण हें बंड मात्र स्वदेशांतच उद्भवल्यानें सरकारावर अंधपणानें विश्वास ठेवण्याइतकी लोकांची तयारी नसते. कारण बंडखोरीचा उद्देश त्यांना पटत नसला तरी बंडखोर हे आपलेच बांधव आहेत, एवढ्याच विचारानें त्यांच्या अंतःकरणांत सहिष्णुता उत्पन्न होते-सहानुभूति कदाचित होत नसेल. दडपशाहीच्या वरवंटयाखालीं अत्यंत निर्दयतेनें त्यांना सरकारनें चिरडून टाकावें असें त्यांना वाटत नाहीं. पण आपल्या पूर्वीच्या भीतिग्रस्त व साशंक धोरणानें व त्याच्या अंमलबजावणीनें बंडखोरांना उत्तेजन मिळून त्यांचा जोर वाढत गेला, म्हणजे लोकमताची यापुढें मुळींच पर्वा न करतां सरकार सर्व उपायांनीं बंडाचा आमूलात् उच्छेद करण्यास प्रवृत्त होतें. अशा वेळीं मात्र लोकशाहीचा लोप होतो. युद्धप्रसंगीं किंवा देशांत यादवी सुरू झाली म्हणजे लोकसत्ता केवळ नांवापुरतीच असते. वस्तुतः सर्व सत्ता कार्यकारी मंडळाच्या ताब्यांत जाऊन तें तिचा हवा तसा उपयोग-दुरुपयोग करतें. या धामधुमीच्या कालांतून लोकशाही शीरसलामत बाहेर पडते कीं नाहीं याचीहि शंकाच असते. गंडस्योपरि पीटिका संवृत्ताः या न्यायानें देशावरहि एका संकटामागून दुसरें संकट येण्याचा संभव फार. सर्वच प्रकारच्या असंतुष्ट लोकांना या राष्ट्रीय आपत्तींच्या कालांत सरकाराविरुद्ध उठण्याची आयतीच संधि प्राप्त होते. जगांतील मुख्य मुख्य क्रांतींच्या इतिहासाकडे पाहिलें असतां असें दिसून येईल कीं बहुधा अशाच प्रसंगीं क्रांतिहि होत असते. या एकंदर परिस्थितीचें कोणत्या गोष्टींत पर्यवसान व्हावयाचें हें निश्चित सांगतां येत नाहीं. तथापि शेवटीं एक सर्वसत्ताधिकारी ( dictator ) उत्पन्न होऊन तो राज्यकारभाराचीं सर्व सूत्रें आपल्या हातीं घेतो व असें घडल्याचीं पुष्कळशीं उदाहरणें इतिहासांत नमूद आहेत. इंग्लंडच्या इतिहासांत क्रॉमवेल, फ्रान्सच्या इतिहासांत पहिला, दुसरा व तिसरा नेपोलियन, व अगदीं अलीकडे झालेल्या राजक्रांतींत इटलीचा मुसोलिनी, रशियाचा लेनिन, तुर्कस्थानचा केमालपाशा व जर्मनीचा हिटलर हीं सर्व उदाहरणें सर्वांच्या पूर्ण परिचयांतलींच आहेत. तेव्हां राष्ट्रावर अशी घोर विपत्ति येऊं न देणें हेंच चांगलें. असंतोषाच्या कारणांची अगोदरच पूर्ण मीमांसा न करतां त्याचा बंडामध्यें स्फोट झाल्यावर तें मिटविण्यास हवा तसा अधिकार आपल्या हातीं घेणाऱ्यांची स्थिती शेवटीं गाडी निघून गेल्यावर जागें होणाऱ्या प्रवाशासारखीच असहाय होण्याचा संभव जास्त. म्हणून बंडाचीं चिन्हें दिसूं लागतांच सामोपचारानें व तडजोडीच्या धोरणानें तीं काढून टाकण्याचा प्रयत्न करणें हेंच लोकसत्तेच्या सुरक्षितपणाच्या दृष्टीनें इष्ट

आहे. योग्य उपचार न केल्यास रोगाचें प्रमाण वाढून तो एकादेवेळीं असाध्यहि होण्याचा संभव असतो. व एकदाचा तो असाध्य म्हणून मानला गेला म्हणजे डॉक्टरचीहि त्याच्यापुढें कांहीं मात्रा चालत नाहीं. म्हणून वेळींच सावध असलेले चांगलें.

बंडाच्या धुमश्चक्रींतून एखादा असामान्य लष्करी पुढारी उत्पन्न होऊन तो राज्यकारभाराचीं सर्व सूत्रें आपल्या ताब्यांत घेण्याचा प्रयत्न करतो. त्याचा प्रयत्न यशस्वी ठरला तर लोकसत्तेची परिसमाप्ती व्हावयास क्षणाचाहि विलंब लागावयाचा नाहीं. यशस्वी झालेले लष्करी सर्वसत्ताधारी अखेर आपलें स्वतःचें राज्य सुरू करतात अशींहि उदाहरणें इतिहासांत पुष्कळ सांपडतात. या प्रकारें अनियंत्रित राजसत्ता पुन्हा सुरू होतें. मग पुन्हा राजा व प्रजा यांमध्यें झगडा व्हावयाचा. इतिहासाची पुनरावृत्ती होत जाते! या सर्व विवेचनावरून एकच गोष्ट सिद्ध होते–ती ही कीं लोकसत्ता व प्रत्यक्ष प्रतिकार किंवा बंड या दोन गोष्टी परस्परविरुद्ध आहेत. लोकसत्ताक राज्यांत बंडाचा उद्भव होणें ही अत्यंत विघातक क्रिया आहे. लोकसत्ता तेव्हां हतबल होते. बंड किंवा प्रत्यक्ष प्रतिकार हा लोकशाहीचा फार भयंकर असा क्षयरोग आहे. क्षयरोगानें पछाडलेला रोगी बहुतेक बरा व्हावयाचा नाहीं. फारच काळजी घेतली तर कदाचित् तो आणखी कांहीं वर्षे जगेल. पण त्याचा अंत समीपच आला आहे अशी त्याच्या नात्यागोत्याच्या मंडळींची खात्रीच होते. तशीच स्थिति लोकशाहीचीही आहे. बंडाचीं अस्पष्ट चिन्हें दृग्गोचर होतांच तत्काल उपाययोजना झाली पाहिजे. त्याची सर्व कारणें प्रथम दूर केली पाहिजे; असंतोषाचें कोणत्याना कोणत्या तरी उपायानें पूर्ण निर्मूलन झालें पाहिजे; त्याशिवाय तरणोपाय नाहीं. नाहीं तर लोकसत्तेला क्षय लागून शेवटीं ती अत्यंत निसत्व, निर्बल व निरुपयोगी ठरून समाप्त होईल.

पण वस्तुतः लोकशाहींत बंड किंवा प्रत्यक्ष प्रतिकार यांचा उद्भवच होण्याचें कारण काय? लोकसत्तेच्या प्रशांत व शीतल छायेंत विश्रांति घेत असतांना असंतोषाच्या प्रचंड व प्रखर रविकिरणांच्या उष्णतेचा ताप व्हावयाचा नाहीं.–व्हावयास नको. लोकसत्ता हें एक सुव्यवस्थेचें छत्र आहे. या छत्राचा अवलंब केला असतां सर्व श्रमाचा परिहार होऊन श्रांत व तप्त झालेलें मन प्रशांत व प्रमुदित होईल–व्हावयास पाहिजे. काळ्याकुट्ट मेघांनीं व्यापलेली काळोखी रात्र अधिक अंधःकारयुक्त झाल्यावर वाटसरूंना उद्दिष्ट ठिकाणीं नेणाऱ्या आपल्या वाटा सुद्धां शोधून काढणें फार कठीण असते. बहुधा आडमार्गांनीं आपला मार्ग आक्रमण करून ते शेवटीं भलत्याच ठिकाणीं जाऊन पोंचतात. पण पहाट होतांच सर्व मार्ग हळूहळू दिसूं लागतात आणि सूर्योदय झाल्यावर आंधळे लोकहि दुसऱ्याची मदत घेऊन ठराविक मार्गानें इष्ट स्थानीं जाऊं येऊं शकतात. तद्वतच लोकसत्तेचा उदय व स्थापना होतांच ठराविक ध्येय गांठण्यासाठीं कोणत्या मार्गाचा अवलंब करावा हें ताबडतोब दिसून येतें. तेव्हां आडवाटांचा उपयोग करण्याचें कांहींच कारण उरत नाहीं. मार्ग आंखलेले असतात. ते कायदेशीर असतात, त्यांवरून राजरोजपणें जावयास कोणतीच हरकत नसते. नव्हे त्यावरून जाणें हेंच इष्ट आहे. राजमार्गानें–कायदेशीर इलाजानें–जर तुम्हाला कोणी जाऊंच दिलें नाहीं तर मग आडवाटेनें तुम्ही गेलांत तर कदाचित तें दोषास्पद ठरावयाचें नाहीं.

लोकसत्ताक राज्यकारभारांत आपला तीव्र असंतोष व्यक्त करावयाचा असल्यास तो सनदशीर मार्गानें व्यक्त करणें उचित व शहाणपणाचें होईल. असमाधानाचें परिमार्जन कायदेशीर उपायानें होऊं शकतें तर उगाच प्रत्यक्ष प्रतिकार करून किंवा बंड उभारून लोकसत्तेला क्षीणबल करण्याचें प्रयोजन नाहीं. कायद्यांचें पालन हेंच लोकसत्तेच्या सुरक्षितपणाचें व प्रभावीपणाचें लक्षण आहे. लोकसत्ताक राज्यपद्धतींतले सर्व कायदे लोकांनींच केलेले असतात. ते शिस्तपूर्वक व आदरपूर्वक पाळणें हेंच प्रत्येक नागरिकाचें आद्यकर्तव्य आहे. हे जोपर्यंत ते पाळत आहेत तोंपर्यंत लोकसत्तेची घडी विस्कळित व्हावयाची नाहीं. कायद्याचें पालन हेंच लोकशाहीचें संरक्षण. आपणाला उत्कृष्ट वळण लागावें म्हणून आपण स्वतः दहापांच नियम करून ठेवावेत व ते गैरसोयीचे आहेत म्हणून नेमके दुसरें दिवशींच ते मोडावेत यांत काय शहाणपणा आहे? लोकशाहीचेंहि तसेंच आहे. लोकांनींच केलेले कायदे लोकांनीं पाळणें हें केवळ लोकांचें कर्तव्यच ठरतें. त्यांनीं तसें केलें नाहीं तर लोकसत्तेचा पाया डळमळूं लागून त्यावर उभी असलेली राज्यकारभाराची प्रचंड इमारत कोलमडून पडण्यास फारसा विलंबहि लागावयाचा नाहीं. तेव्हां आपल्याच अंतिम हिताकरितां आपण स्वतः केलेले कायदे आपण आदरपूर्वक पाळले पाहिजेत हें सांगणें नकोच.

दुसरें असें कीं, सनदशीर मार्गानें आपला हेतु सिद्ध होऊं शकतो तर उगाच वक्र मार्गाचा आपण कां म्हणून अवलंब करावा? समजा आपणांस एखादा कायदा घडवून आणावयाचा आहे. वर्तमानपत्रें, व्याख्यानें वगैरेंच्या योगानें आपण लोकमत अनुकूल करून घेण्याचा प्रयत्न करावा. आपल्या मतदारसंघांतून निवडून येणाऱ्या प्रतिनिधीला तशा प्रकारची आपण आज्ञा करावी, किंवा कायदेमंडळांतील एखाद्या प्रभावशील पक्षाच्या पुढाऱ्याला भेटून त्याला आपले सर्व विचार सांगून त्याचें मत अनुकूल करून घ्यावें. असें केल्यास आज ना उद्या तो ठराव किंवा तें बिल पास करून घेण्याचा तो प्रयत्न करील. आपले विचार खरोखरच देशहिताला पोषक असल्यास, आपलें स्वतःचें सामर्थ्य किंवा प्रभाव जास्त नसला तरी, मतदारांनीं निवडून दिलेले प्रतिनिधी त्याप्रमाणें वागण्याचा प्रयत्न करतील. किंवा आपल्यांतहि आवश्यक योग्यता असल्यास त्या दिशेनें आपण स्वतः प्रयत्न करावा, कायदेमंडळांत सदस्य म्हणून निवडून यावें, तेथें आपल्या विचाराचा एखादा पक्ष बनवावा, इतर पक्षांशीं देवघेव करून संगनमत करावें व सरकारावर म्हणजे प्रधानमंडळावर वजन टाकून त्याला आपलें बिल किंवा ठराव स्वीकारण्यास भाग पाडावें. लोकसत्तेंत हवे ते कायदे करून घेण्याची संधि असते. मात्र अगोदर हें पाहिलें पाहिजे कीं त्यासाठीं लोकमत तयार झालें आहे किंवा नाहीं. लोकमत तयार नसल्यास तें आधीं तयार केलें पाहिजे. पण आपले विचार राष्ट्रहितवर्धक असतील तर ते लोकांना सहज पटतीलच व ते तदनुसार निवडणुकीच्या वेळीं प्रतिनिधींची निवडसुद्धां करतील. किंवा आपण एखाद्या महत्वाच्या पक्षाची मदत घेतली तर आपलें काम अत्यंत सुलभतेनें पार पडूं शकतें. आपल्या प्रतिनिधीकडून कायदेमंडळांत प्रश्न विचारून सरकाराकडून आवश्यक माहिती काढून घेतां येते, किंवा एखाद्या प्रश्नाबाबत त्याचें धोरण काय आहे हें कळूं शकतें. तसेंच क्षुल्लक स्वरूपाच्या स्थानिक तक्रारी दूर करून घेण्यास आपल्या

प्रतिनिधींची किंवा स्थानिक वर्तमानपत्रांची पुष्कळच मदत होते. एखादा मोठा प्रश्नच सोडवावयाचा असल्यास त्यासाठीं खटपट करावी लागते, थोडासा कालक्षेपहि होतो, व पैसाही खर्च होतो. सर्व खरें, पण शेवटीं आपलें कार्यहि शांततेनें सिद्ध होतें. लोकशाहींत या सर्व सोयी उपलब्ध आहेत, सर्व सनदशीर मार्ग खुले असून त्यांवरून गेल्यास तुम्हाला इष्ट ठिकाणीं पोंचतां येतें. असें असतांना बेकायदेशीर अशा प्रत्यक्ष प्रतिकाराचा अवलंब करण्याचें कांहींच प्रयोजन उरत नाहीं.

शिवाय असें पहा कीं मूठभर बंडखोर लोक असनदशीर मार्गानें सरकाराविरुद्ध उठून पुष्कळशा लोकांना घोर अडचणींत टाकतात. पुष्कळांचें पुष्कळ सुख हें लोकसत्ताक व्यवहाराचें मुख्य सूत्र आहे. थोडया लोकांची कृति पुष्कळशा लोकांना हानिकारक व्हावी ही गोष्ट लोकसत्तेला अत्यंत मारक अशी आहे. लोकसत्ता हतप्रभ होऊन आपला फायदा व्हावा असें जर या बंडवाल्यांना वाटत असेल तर त्यांचें कृत्य त्यांच्या दृष्टीनें कांहीं अंशीं समर्थनीय तरी ठरेल. पण ती बलहीन व्हावी ही त्यांची भावना असली तर त्यांचें बंडखोरीचें कृत्य केवळ असमर्थनीयच नसून अत्यंत निंद्य व गर्हणीय समजलें पाहिजे. आतां कोणी असें म्हणेल कीं त्यांचा हेतु उदात्त आहे, केवळ स्वहितासाठीं ते या आत्यंतिक मार्गाचा अवलंब करीत नसून ते केवळ सदिच्छेनेंच प्रेरित झालेले असतांना त्यांचें कृत्य गर्हणीय कसें ठरूं शकतें ? याला उत्तर एकच आहे. त्यांच्या सद्हेतुबद्दल सामान्य लोकांना जर संशय वाटत नाहीं, उलट आदर वाटतो, तर त्यांनीं या असनदशीर मार्गाचा उपयोग करण्याचें कांहींच सरळ कारण दिसत नाहीं. लोक त्यांना भराभर येऊन मिळतील. त्यांना सहज आपला स्वतंत्र पक्ष स्थापन करतां येईल. व दिवसेंदिवस त्यांच्या अनुयायांची संख्या वाढत्या प्रमाणांत असल्यामुळें त्यांच्या पक्षाचें वर्चस्व वाढेल. त्यांचा पक्ष प्रभावी होऊन सरकारलाहि तो आपला कार्यक्रम स्वीकारण्यास भाग पाडूं शकेल. असें असतांना प्रत्यक्ष प्रतिकाराचा गैरकायदेशीर उपाय योजून लोकसत्तेला संकटांत टाकण्यांत काय हंशिल आहे ? किंवा त्यांचा हेतु स्वार्थरहित, उदात्त तरी नसला पाहिजे. म्हणून कदाचित ते अल्पसंख्य ठरावे. वास्तवीक लोकशाहींत तर बहुसंख्य लोक अल्प संख्यांकांवर जुलूम करतात कीं काय अशी कित्येकांना भीति वाटते. पण या बंडवाल्यांच्या किंवा प्रत्यक्ष प्रतिकारवाद्यांच्या कार्यक्रमाची मीमांसा केल्यावर असें दिसून येईल कीं वरील विधान खरें नसून उलट अल्पसंख्य बंडवाले बहुसंख्यांकांवरच जबरदस्ती करण्यास प्रवृत्त होतात.

पण याशिवायहि प्रत्यक्ष प्रतिकाराच्या विरुद्ध एक गोष्ट अशी आहे कीं याच्या योगानें देशांत कलहाग्नि पेटून जी भयंकर परिस्थिति उत्पन्न होते तीमधून एखादा असामान्य लष्करी पुढारी पुढें येतो व तो आपल्या हातांत राज्यकारभाराचीं सर्व सूत्रें घेतो. कदाचित लोकशाहीवर त्यांचा विश्वास नसेल. कदाचित तो स्वार्थानें अंध झालेला असेल; पण तो देशाचा मुख्य मनुष्य झाल्यावर आपली सत्ता टिकाऊ कशी होईल याच विवंचनेंत असतो. अशा प्रकारच्या सर्व सत्ताधिकाऱ्याची स्थापना झाली म्हणजे लोकसत्तेची कशी काय दशा होणार हें कोणालाहि नव्यानें सांगण्याचें कारण नाहीं. आपल्या प्रतिकाराचें पर्यवसान

शेवटीं अशा रीतीनें व्हावें हें कदाचित् बंडवाल्यांनाहि इष्ट वाटत नसावें. त्या विचारानें त्यांनीं बंड केलेंहि नसेल. पण एकदा बंडाचा वडवाग्नि पेटला म्हणजे काय जाईल व काय राहील हें सांगतां येणें कठीण. लोकसत्तेशीं विरोध नसलेल्या बंडवाल्यांनीं हें भावी संकट अवश्य विचारांत घेतले पाहिजे. कारण ही स्थिति निर्माण होणें केवळ त्यांच्या अदूरदर्शित्वाचाच परिणाम समजला पाहिजे. ती टाळण्यासाठीं लोकसत्ताभिमानी बंडवाल्यांना व तसेंच लोकसत्ताक सरकारालाहि डोळ्यांत तेल घालून आपलें कर्तव्य केलें पाहिजे. व लोकशाहीच्या सुरक्षितपणाच्या दृष्टीनें जे जे उपाय ज्या ज्या वेळीं योग्य दिसतील ते ते बिनदिक्कत योजिले पाहिजेत.

सारांश, लोकांनींच केलेले कायदे लोकांनीं पाळावेत हें त्यांचें कर्तव्य ठरतें; लोकशाहींत सनदशीर मार्गानें कार्य सिद्ध होऊं शकतें; प्रत्यक्ष प्रतिकार किंवा बंड यामुळें थोडेसे लोक पुष्कळशा लोकांना अत्यंत अडचणींत टाकतात; बंडाच्या धूमधडाक्यांत एखादा सर्व सत्ताधिकारी पुढें येऊन राज्याचीं सर्व सूत्रें त्याच्या हातीं जाण्याचा संभव असतो, व तसें झाल्यास लोकसत्ता क्षीणबल होतें; या सर्व कारणांस्तव बंड किंवा प्रत्यक्ष प्रतिकार लोकसत्तेच्या तत्वाशीं पूर्ण विसंगत आहे असें म्हणावयास हरकत नाहीं.

पण वस्तुत: बंड हें अज्ञानाचें किंवा निराशेचें निदर्शक आहे. आपला हेतु सफल होत नाहीं हें पाहून अडाणी लोक असंतुष्ट होतात. त्यांचा असंतोष दिवसेंदिवस वाढतच जातो. आपलें कार्य कसें साधावें याची या लोकांना चांगलीशी अटकळ नसते. अगोदरच लोकशाहीचा राज्यकारभार गुन्तागुन्तीचा व त्यांत हे पडले असे. तेव्हां आपल्या हातीं कायदा घेणें व स्वसामर्थ्याच्या जोरावर आपल्या तक्रारी दूर करावयास सरकारला भाग पाडणें ही क्रिया इतकी सहज अतएव त्यांच्या अंगवळणीं पडलेली असते कीं तिच्याशिवाय त्यांना दुसरा कांहींच उपाय सुचत नाहीं. हा त्यांचा दोष नाहीं. लोकसत्ताक राज्यकारभारांत अधिकाऱ्यांनीं कोणत्याहि प्रकारच्या असंतोषाकडे दुर्लक्ष करतां कामा नये. सर्वांच्या रास्त तक्रारी दूर करून त्यांनीं लोकांना संतुष्ट ठेवले पाहिजे. हे अडाणी लोक तर केवळ अज्ञानामुळेंच बंडाला प्रवृत्त होतात. आपली गाऱ्हाणीं दूर करावयास इतर अनेक मार्ग खुले आहेत हें त्यांना माहित झालें व पटलें म्हणजे त्यांच्या हातून सहसा असा अनाचार होणार नाहीं.

पण बंड करणारे दुसऱ्या प्रकारचे लोक अत्यंत बुद्धिमान् व कार्यकुशल असतात. सर्व सनदशीर मार्गांचा अवलंब करूनहि आपला उद्देश सफल होत नाहीं असें पाहून ते अत्यंत विषण्णचित्त व शेवटीं निराशावादी व निर्भय बनतात; व आपलें कार्य वाटेल त्या उपायानें, व वाटेल त्या मार्गानें साध्य करण्यास प्रवृत्त होतात. त्यांना सदसद्बुद्धीची टोचणी व्यथित करूं शकत नाहीं; विवेकाची हांक अंगिकारलेल्या मार्गापासून त्यांना परावृत्त करूं शकत नाहीं; कोणत्याहि प्रकारचीं विघ्नें त्यांच्या मनाला विचलित करूं शकत नाहींत. आपला उद्देश सिद्ध करण्यासाठीं ते हवा तो स्वार्थत्याग व हवे ते कष्ट सहन करण्यास तयार असतात. लोकसत्तेंत असल्या निराश झालेल्या लोकांची संख्या वाढू देणें हें अधिकाऱ्यांच्या नालायकीचें स्पष्ट द्योतक

आहे. इतक्या थरापर्यंत गोष्टी जाऊ देणें म्हणजे लोकशाहीला बुध्या संकटांत टाकण्यासारखेंच आहे.

ज्यांच्या हातीं राज्यकारभाराचीं सूत्रें आहेत त्यांनीं विलंब न लावतां या लोकांच्या असंतोषाचें कारण नीटसें समजून घेतलें पाहिजे. रास्त असल्यास ते दूर केलें पाहिजे. कारण, हे लोक दिसावयाला मूठभर असले तरी त्यांचीं मतें व कृत्यें ज्यांना पटतात असेहि पुष्कळसे लोक असण्याचा संभव आहे. या बंडवाल्यांइतके ते निराश झालेले नसतात एवढेंच. पण त्यांची धडाडी, कार्यकुशलता व स्वार्थत्याग पाहून हेहि लोक तसें करण्यास हळूहळू उत्स्फूर्त होतात. आकाशांत प्रथम लहानसाच ढग दिसतो, पण तोच हळूहळू मोठा होऊन किंवा इतर ढग दुसरीकडून गोळा होऊन थोडयाच अवधींत सर्व आकाश मेघाच्छादित होतें. प्रथम गिरिशिखरावरून एक लहानसाच ओढा निघतो, पण पुढें पुढें त्याला लहानसहान अनेक निर्झरिणी येऊन मिळाल्यावर एक विशाल नदी निर्माण होते. बंडवाल्यांनाहि अशी चारीकडून प्रत्यक्ष–अप्रत्यक्ष मदत मिळण्याचा संभव आहे. म्हणून त्यांच्या सर्व गाऱ्हाण्यांची आवश्यक चौकशी करून तीं दूर करण्याचा अगोदर प्रयत्न केला पाहिजे. नाहीं तर बंडवाल्यांच्या यशाबरोबरच त्यांच्या तक्रारींची यादीहि वाढत जावयाची. तसें होऊं दिलें तर त्या सर्व दूर करणें अशक्य होऊन बसेल. म्हणून योग्य वेळीं योग्य उपाय अमलांत आले म्हणजे लोकशाहीवरचें भावी संकट टळेल.

देशाच्या अंतिम हिताच्या दृष्टीनें बंडवाल्यांनीं एक गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे. लोकसत्ताच उलथून पाडण्याचा त्यांच्या आग्रह असेल तर कठीण परिस्थिती उत्पन्न होण्याचाच संभव जास्त. लोकसत्तेचें संरक्षण करणें हेंच लोकसत्ताक सरकाराच्या प्रमुख कर्तव्यांपैकीं एक आहे. सामोपचारानें तसें त्याला करतां आलें नाहीं तर आपलें सर्व लष्करी सामर्थ्य उपयोगांत आणण्याचा त्याला पूर्ण अधिकार आहे, ही गोष्ट क्रांतिकारकांनीं विसरतां कामा नये. देशांत क्रांति झाल्यास–यादवी माजली तर–कोणती आपत्ती येऊन उभी राहील याचें विवरण वर आलेंच आहे. त्याशिवाय, क्रांती म्हणजे प्रचंड राजकीय, सामाजिक व आर्थिक भूकंप. तिच्यामुळें राष्ट्रीय जीवनाला अल्पकालीन धक्के बसतात, पण त्यांचे दुष्परिणाम चिरकालीन राहतात. सर्वत्र विस्कटितपणा प्राप्त होतो. लोकांना कायदे मोडण्याची संवय लागते. समाजाची घडी बिघडते. बेबंदशाही पसरते. या बेबंदशाहींतून पुन्हा सुव्यवस्था स्थापन करणें हें अतिशय दुर्घट कार्य असतें. त्याला फार कालावधी लागतो. राष्ट्रीय जीवनांत पुन्हा सुरळीतपणा येण्यास असामान्य कर्तबगारी लागते. प्रचंड धरणीकंपच तो. त्यानंतर तेथें सर्व नवीन सृष्टी निर्माण करावी लागते. तेव्हां देशाच्या अंतिम हितासाठीं हा आत्यंतिक क्रांतिकारक मार्ग आक्रमणें योग्य होईल काय ?

व्यावहारिक दृष्टया प्रत्यक्ष प्रतिकाराचा–क्रांतीचा–मार्ग किती धोक्याचा आहे याची आतां नीटशी कल्पना येईल. आतां कोणी ध्येयवादी म्हणतील, नव्या नव्या कल्पना, आतांपर्यंत न अनुभवलेलीं, व्यवहारलेलीं उच्च ध्येयें अमलांत आणावयाचीं तर क्रांतीशिवाय दुसरा उपाय नाहीं. लोकसत्तेंत या कल्पनांना वाव नाहीं. तेव्हां नवीन सृष्टी–नवा समाज निर्माण

करण्याची आशाच नको. खरें आहे. विचारवंत तत्ववेत्ते यांना राष्ट्र आपला अमूल्य ठेवा समजते. पण या तत्ववेत्यांनीं जी नवीन सृष्टी उत्पन्न करावयाची ती कोणासाठीं? अर्थात राष्ट्रांतील सर्व लोकांसाठीं. तेव्हां हा दिव्य संदेश लोकांना पटवून दिला व त्यांना आपल्यास अनुकूल करून घेतलें कीं लोकशाहींतहि हे नवीन विचार अमलांत आणण्यास हरकत रहावयाची नाहीं. दुसरें, सरकार लोकमताला जबाबदार राहील हें लोकशाहीचें मुख्य तत्व. या चतुष्कोनींत अंतर्भूत होणाऱ्या सर्व नवविचारांना या अत्यंत व्यापक अशा राज्यपद्धतींत पूर्ण वाव आहे हें नेहमीं लक्षांत असूं द्यावें. लोकांना पटलेले कोणतेहि विचार लोकसत्तेशीं विसंगत नाहींत. जेथें जेथें सरकार लोकमतानुवर्ती असतें तेथें तेथें लोकसत्तेचें तत्व राष्ट्रीय जीवनांत कमीअधिक स्वरूपांत एकरूप झालेलें असतें असें समजण्यास हरकत नाहीं, व तेथें तेथें या तत्वाशीं विसंगत नसणाऱ्या सर्व अभिनव कल्पनांना अमलांत येण्यास पुरेपूर संधी आहे. हिकमतीनें व नेटानें कार्य केलें पाहिजे एवढेंच. त्यासाठीं क्रांतीचा मार्ग आक्रमण्याची कांहींच आवश्यकता नाहीं. क्रांती-बंड हीं सर्व लोकसत्तेच्या तत्वाशीं पूर्णतः विसंगत आहेत. आणि म्हणूनच लोकसत्तेच्या साखळींत परराष्ट्र-धोरण व प्रत्यक्ष प्रतिकार हे दोन अत्यंत नाजुक दुवे आहेत असें म्हणण्यास हरकत नाहीं. कालाच्या अफाट उदधीवरून शांततेनें, निर्भयतेनें व धिम्मेपणानें प्रवास करीत असतां लोकसत्तेचें जहाज याच दोन आंत दडून बसलेल्या खडकांवर आपटून छिन्नभिन्न होण्याचा संभव आहे. म्हणून लोकसत्तेच्या कर्णधारांनीं अत्यंत सावधगिरीनें आपला मार्ग आक्रमण करावा एवढेंच सांगितलें कीं पुरें.

# लोकसत्तेचें भवितव्य

## (१) व्यक्तित्ववाद

### प्रकरण १२ वें.

लोकसत्तेच्या अंमलबजावणीचा निष्पक्षतेनें विचार केला असतां असें दिसून येईल कीं, ज्या उत्कट अपेक्षेनें व उदात्त महत्वाकांक्षेनें लोकांनीं ही नवीन राज्यपद्धति स्थापन करण्याचा प्रयत्न केला, ती आशा किंवा महत्वाकांक्षा पूर्णपणें सिद्धीस जाण्याचीं लक्षणें अजून तरी स्पष्टपणें दिसत नाहींत. लोकसत्तेपुढें पूर्वी कधींही उद्‌भूत न झालेले अनेक प्रश्न नव्यानें येत आहेत व त्या सर्वांना तोंड देतां देतां कमीअधिक प्रमाणांत लोकसत्ताक राज्यव्यवस्थेचें स्वरूपही बदलत आहे. आतां कोणी अशी पृच्छा करील कीं, लोकसत्तेच्या पुढें कांहीं उज्वल भविष्य आहे, का एकतंत्री राज्यव्यवस्थेप्रमाणें तीहि यथावकाश विनाश पावेल ? वास्तविक जगाचें पाऊल आधुनिक कालांत इतकें भराभर पुढें जात आहे कीं आणखी पंचवीस वर्षांनीं कोणती परिस्थिति निर्माण होईल याची चांगलीशी कल्पनाही करवत नाहीं. तेव्हां लोकसत्तेच्या भवितव्याबद्दल लिहावयाचें तें अत्यंत जपूनच लिहिलें पाहिजे.

तथापि, एवढी मात्र गोष्ट खरी कीं दोनचार तत्वांमुळें लोकसत्तेच्या स्वरूपांत थोडा-फार बदल होण्याचा संभव दिसून येतो. मनुष्यानें आपल्यापुढें एखादें उच्च ध्येय ठेवलें म्हणजे कळत न कळतसुद्धां त्याच्या हातून आपल्या आदर्शानुसार थोडेसें तरी वर्तन होतेंच; किंवा सूर्य कितीही प्रखर असला तरी आकाश काळयाकुट्ट ढगांनीं आच्छादित असलें म्हणजे जगावर काळोख हा जसा पडावयाच त्याचप्रमाणें लोकसत्तेला जो यापुढें मार्ग आक्रमण करावयाचा आहे त्यावर या चारदोन तत्वांचे दगडधोंडे म्हणा किंवा बाजूच्या उंच वृक्षांची शीतल छाया म्हणा, पडण्याचा संभव आहे. या तत्वामुळें उपस्थित होणारी परिस्थिति वाटेवर पडलेल्या दगडा-प्रमाणें विघ्नकारक व अनिष्टकारक होईल किंवा शीतल छायेप्रमाणें लोकसत्तेच्या प्रवासाला पोषक व सौख्यदायक होईल. हीं तत्त्वें म्हणजे (१) व्यक्तित्त्ववाद (२) समाजसत्तावाद (३) सर्वसत्ताधिकारित्व व (४) सांघिकसत्तावाद. या प्रत्येकामुळें लोकसत्तेच्या स्वरूपांत कसकसे फेरबदल होण्याचा संभव आहे याचें आतां विवेचन करूं:--

**व्यक्तित्त्ववाद म्हणजे काय ?**--मनुष्य जन्माला आला म्हणजे तो आपल्याबरोबर कांहीं उपजतच गुण घेऊन येतो. पूर्वजन्मींच्या संस्कारांचा व बाह्य परिस्थितीचा परिणामहि मनुष्यावर फार होत असतो. कांहीं लोक उपजतच कवि असतात, तर कांहींची प्रवृत्ति कलाकौशल्याकडे असलेली दिसून येते. पुष्कळसे लोक अगदींच सामान्य प्रतीचे असतात. कदाचित् उत्कृष्ट व अनुकूल परिस्थितींत त्यांच्या ठिकाणीं असलेले कांहीं गुण उदयास येतीलहि.

अशा सर्व दर्जाच्या व्यक्तींचा समाज बनलेला असतो. शक्तीच्या बळावर समाजाचें जें संघटन झालेलें असतें त्याला सरकार (State) म्हणतात. संघटित समाज म्हणजेच सरकार. तेव्हां या सरकारचें कर्तव्य सर्व व्यक्तींच्या अंतस्थ गुणांना स्वतंत्रपणें पोषक होईल अशी परिस्थिति निर्माण करणें हें आहे. हल्लींच्या लोकशाहीच्या काळांत अखिल समाजाचे सामयिक रीतीनें सरकार हिताहित पहात असतें. शिक्षक ज्याप्रमाणें एका वर्गातील सर्व मुलांना सारखेंच शिक्षण देत असतो, त्याचप्रमाणें ही सरकारची दृष्टी असते. वर्गातही निरनिराळ्या प्रकारचे विद्यार्थी असतात; परंतु अध्यापकाच्या शिक्षणाचा कांहीं मुलें आपल्या गुणांमुळें अधिक फायदा करून घेतात, तर कांहीं आपल्या दुर्गुणामुळें बेफिकीर राहतात. समाजाचीही अशीच स्थिती असते. सरकारनें उत्पन्न केलेल्या परिस्थितीचा चांगला उपयोग करून समाजांतील बुद्धिमान लोक आपापले हित व त्याचबरोबर समाजाचेंही हित साधण्याचा प्रयत्न करितात. सामान्य लोक वर्गातील सामान्य विद्यार्थ्यांप्रमाणें उदासीन राहतात. व्यक्तित्ववाद्यांचें असें म्हणणें आहे कीं, समाजांतील विशेषत: अत्यंत बुद्धिमान अशा लोकांच्या उपजत गुणांना पुरेसा वाव मिळाला पाहिजे. सरकारचें धोरण व त्यांतल्यात्यांत लोकसत्ताक सरकारचें धोरण समाजांतील सर्व प्रकारच्या लोकांना सारखेंच लागूं पडतें. त्याच्या ठिकाणीं हा लहान किंवा हा मोठा, हा श्रीमंत किंवा हा गरीब, हा सद्‌बुद्ध किंवा हा निर्बुद्ध असा भेदभाव नसतो–नसावा. सर्वांना सारखेच लागूं पडतील असे देशहितकारक कायदे करावयाचे, मग त्याचा कोणी चांगला उपयोग करो किंवा कोणी न करो, असें हें सरकाराचें सामान्यत: धोरण असतें. जे खरोखरच अभिजात, बुद्धिसंपन्न लोक असतात त्यांच्याकडे सरकार विशेष लक्ष देत नाहीं. त्यांच्या निसर्गदत्त गुणांना पुरेसा वाव मिळत नाहीं. त्यामुळें अशा असामान्य लोकांचा समाजाला जो फायदा व्हावा तो होत नाहीं. किंबहुना तेही हळूं हळूं सामान्य जनांच्या कोटींत जाऊन बसतात.

याचबरोबर हीहि गोष्ट लक्षांत ठेवावयास पाहिजे कीं हे अल्पसंख्य असामान्य लोकच मुख्यत: देशाच्या सर्वांगीण उन्नतीला अप्रत्यक्षरीतीनें कारणीभूत होत असतात. सर्व प्रकारच्या लहानमोठ्या शोधांचा उगम नेहमीं अशाच लोकांपासून होत असतो. अद्‌भुत व नाविन्यपूर्ण कल्पनांचा उदय प्रथम यांच्यापासूनच होत असतो. देशाच्या मार्गदर्शकांचा भरणा या अल्पसंख्य बुद्धिमान लोकांतूनच होत असतो. म्हणून या लोकांकडे विशेष लक्ष देणें, यांच्यासाठीं व्यक्तिश: योग्य परिस्थिती उत्पन्न करणें, त्यांच्यांतील अंतस्थ गुणांना पुरेसा वाव देणें हें सरकारचें मुख्य कर्तव्य ठरतें असें व्यक्तित्ववादी प्रतिपादन करतात.

**व्यक्तित्ववाद्यांच्या दृष्टीनें सरकारचें कार्य:**––समाजाच्या प्रत्येक घटकाची आपापल्यापरीनें उन्नति होऊं देणें हें व्यक्तित्ववादाचें मुख्य तत्त्व आहे. म्हणून समाजांतील सर्व भिन्नभिन्न लोकांना सरसकट एकच कायदा लागूं करणें योग्य होणार नाहीं. पण आपआपल्यापरीनें भिन्न गुणांचा स्वतंत्रपणें विकास होऊं द्यावयाचा, तर मग सर्वसंग्राहक अशा कायद्यांची आवश्यकता नाहीं काय ? याचा अर्थ असा नव्हे कीं सरकारनें फक्त तटस्थ असावयाचें व समाजांत जें जें कांहीं चालतें तें तें फक्त निमूटपणें पहावयाचें. एखाद्या बलवान् पण

सूज्ञ मनुष्याच्या हाताखालीं कांहीं लहान लहान मुलें जमलीं म्हणजे तो काय करतो किंवा त्यानें काय करावें ? त्यानें सर्वांना खेळीमेळीनें खेळूं द्यावें, कोणी बाहेरचा लुच्चा व आडदांड मुलगा आला व त्यांना त्रास देऊं लागला कीं त्याचें पारिपत्य करावें, एखाद्याला मदत लागली तर ती द्यावी, एखाद्याला कांहीं समजत नसल्यास तें समजावून द्यावें, पण शक्यतोंपर्यंत तटस्थ राहून मुलांना आपापल्यापरीनें स्वतंत्रपणें वागूं द्यावें. हें जसें त्या बलवान् मनुष्याचें कर्तव्य तेंच सरकारचेंही कर्तव्य असावें असें या व्यक्तित्ववाद्यांचें म्हणणें आहे.

समाजनियंत्रणाच्या कार्यांत सरकारनें फक्त अप्रत्यक्षपणेंच ढवळाढवळ करावी ! अप्रत्यक्ष नियंत्रण हेंच त्याचें खरें कार्यक्षेत्र. परकीयांची देशावर धाड आली म्हणजे समाजाचें रक्षण करणें, कोणी चोरीचहाडीचें वा बदनीतीचें वर्तन केल्यास त्यास शिक्षा करणें, लोकांचें अज्ञान दूर करणें, गुणविकासाच्या कार्यांत कोणाला अडथळा आल्यास तो बाजूला सारणें इत्यादि अप्रत्यक्ष कर्तव्यें सरकारनें केलीं पाहिजेत.

पण सरकारच्या अप्रत्यक्ष (Negative) कृतीला प्रत्यक्ष बाजूही असते ही गोष्ट व्यक्तित्ववाद्यांच्या निदर्शनास आली नसेल असें नाही. देशाचें रक्षण करण्यासाठीं त्याला सैन्य, आरमार, विमानें व पोलीस ठेवले पाहिजेत, अज्ञान दूर करण्यासाठीं शिक्षणखातें उघडलें पाहिजे. न्याय देण्यासाठीं न्यायाधीशांची नेमणूक केली पाहिजे. आपण जों जों विचार करावा तों तों असें दिसून येईल कीं हीं अप्रत्यक्ष कर्तव्यें करीत असतांना सरकारला थोडेसें तरी प्रत्यक्ष कार्य करावेंच लागतें. हाच निर्भेळ व्यक्तित्ववादाचा मुख्य दोष आहे. ज्या दृष्टीनें व्यक्तित्ववादाचे हे ध्येयवादी पुरस्कर्ते आपल्या तत्वांचा पुरस्कार करतात ती दृष्टि सदोष आहे. या त्यांच्या तत्वांची अम्मलबजावणी होणें अशक्यच आहे. हा वाद तत्वतःच अव्यवहार्य आहे.

**सरकारच्या कार्यक्षेत्राची मर्यादा:**--सरकारचें कार्य अप्रत्यक्ष (Negative) आहे हें ठरविल्यावर या तत्वाच्या पुरस्कर्त्यांनीं सरकारच्या कार्यक्षेत्राला आणखी मर्यादा घालून ठेवल्या आहेत. त्याचाही येथें संक्षिप्त विचार करूं. या वादाचें मुख्य प्रवर्तक ग्रीन, मिल, हर्बर्ट स्पेन्सर, सिज्विक व बोझांक्वेट हे आहेत. हे सर्व इंग्रज ग्रंथकार असून त्यांनीं आपापल्या कालांत या तत्वाचा जोरानें प्रसार केला. राष्ट्रीयत्वाची उगमभूमी जशी इटली, किंवा साम्यवादाची जशी जर्मनी तशीच इंग्लंड ही व्यक्तित्ववादाची जन्मभूमि आहे. या एकाच गोष्टीमुळें कदाचित् इंग्रज लोक व्यक्तिस्वातंत्र्याला सर्वांत अधिक महत्व देतात. या सर्व ग्रंथकारांचा रोख समाजांतील प्रत्येक व्यक्तीला शक्य तितकें अधिक राजकीय स्वातंत्र्य देण्याकडे आहे.

ग्रीन यानें आपल्या सुप्रसिद्ध ग्रंथांत* व्यक्तित्ववादाचें उत्कृष्टपणें विवेचन केलें आहे. सरकारच्या कार्यक्षेत्राच्या मर्यादेसंबंधानें त्याचें असें म्हणणें आहे कीं समाजाच्या स्वयंनिर्णयत्वाला दडपशाहीनें किंवा सु-राज्यानें सरकारनें बाधा आणूं नये. लोकांना आपा-

---

*Principles of Political Obligation.

पल्या मार्गानेंच जाऊं देणें इष्ट आहे. एवढेच नव्हे तर लोकांच्या उत्कर्षास प्रतिबंधक होतील असे सर्व प्रत्यवाय दूर करावेत. त्या योगें बहुजन समाजाला व्यक्तिस्वातंत्र्य मिळून, आपापलें कर्तव्य करीत सर्व लोक सुखी राहतील. जें योग्य आहे तें करतां येणें किंवा तें अनुभविणें यालाच ग्रीन स्वातंत्र्य (Liberty) म्हणतो. सरकारचें कार्य मात्र अप्रत्यक्षच (Negative,) आहे असें तो म्हणतो.

"The effected action of the state .....seems necessarily to be confined to the removal of obstacles"........"The function of the Government is to maintain condition of life in which morality shall be possible, and morality consists in the disinterested performance of self—imposed duties."

सारांश, नीतिमत्तेच्या वाढीला प्रतिरोधक होतील अशा प्रकारचे सर्व अडथळे दूर करणें हेंच सरकारचें कार्य. सरकारनें अशी परिस्थिति निर्माण केली पाहिजे कीं जींत मानसिक उन्नति होऊन नीतिमत्तेची वाढ होत जाईल. प्रत्येकानें आपापलीं कर्तव्यें समजून घेऊन त्या दिशेनें प्रामाणिकपणें व निस्वार्थतेनें प्रयत्न केले तर समाजाची सामयिक नीतिमत्ता निःसंदेह वाढेल.

मिल हा व्यक्तिस्वातंत्र्याचा फारच मोठा भोक्ता. विचारस्वातंत्र्य, स्वतःच्या इच्छेप्रमाणें कोणतेंही कार्य करावयास लागणारें आचारस्वातंत्र्य* व संघटनस्वातंत्र्य ही स्वातंत्र्यत्रयी त्यानें आपल्या पुस्तकांत पुरस्कारिली आहे. त्याची व्यक्तिस्वातंत्र्याबद्दलची व्याख्या खालीं दिल्याप्रमाणें आहे-

"The only freedom which deserves the name is that of persuing our own good in our own way so long as we do not attempt to deprive others of theirs or interfere with their efforts to obtain it."

म्हणजे दुसऱ्याच्या स्वातंत्र्याच्या किंवा कार्याच्या आड न येतां आपलें स्वतःचें कल्याण, आपणास इष्ट दिसतील त्या उपायांनीं साधणें हेंच खरें स्वातंत्र्य होय.

व्यक्तीला आपःपलें हित साधण्याचा सर्व अधिकार आहे, तर मग समाजाचें (सरकारचें) नियंत्रण व्यक्तीवर कितपत असावें हा प्रश्न उरतोच. व्यक्तीचा आपल्या स्वतःवर किती अधिकार? समाजाचें त्यावर किती नियंत्रण? मानवी जीविताचा कितपत भाग व्यक्तीच्या वाटेला जातो व समाजाकडे किती? यावर मिल असें उत्तर देतो-एखादी गोष्ट आपण केली. त्या गोष्टीचा परिणाम जर व्यक्तिपुरताच असला तर सरकारला मध्यें पडण्याचें कांहींच कारण नाहीं. तसेंच त्यालाही दुसऱ्याच्या कार्यांत अडथळा आणण्याचें प्रयोजन नाही. तसें केलें तर देशाचा कायदा त्याची काळजी घेईल. कोणी अशी शंका घेईल कीं, प्रत्येकाला आपलें कर्तव्य किंवा कल्याण समजतेंच असें नाहीं. तर मग तो तें साधणार कसें? अशा वेळीं सरकारनें किंवा समाजानें त्याला मार्ग दाखवायचा काय? तसें करण्याचें कारण नाहीं हें त्याला

*Liberty

मिलचें उत्तर! तो म्हणतो, 'पायांत बसेल असा जोडा मिळणेंही थोडें अवघड. मग प्रत्येक व्यक्तीला कशा प्रकारची राज्यव्यवस्था सोईची होईल हें सांगणें किती कठीण असलें पाहिजे!' सारांश, सरकारनें शक्य तेवढें जास्त व्यक्तिस्वातंत्र्य समाजाच्या प्रत्येक घटकाला देऊन टाकून ज्याच्या त्याच्या बुद्धीप्रमाणें ज्यानें त्यानें आपापलें कल्याण करावें व आपण आवश्यक असेल तेवढा अधिकार जवळ ठेवावा, असें मिलचें म्हणणें आहे

## हर्बर्ट स्पेन्सर

या सुप्रसिद्ध ग्रंथकारानें तर वरील दोषांवरही ताण केली आहे. आपल्या ग्रंथांत* तो म्हणतो, सरकार हा प्राचीन लुटारू संस्थेचा एक अर्वाचीन अवशेष आहे. ती अनीतिमान् व कुत्सित (Vicious) संस्था असून ती जें कांहीं करते, त्याचा मनुष्याच्या स्वतंत्र विकासावर दुष्परिणाम व्हावयाचाच. तथापि प्रत्येक समाजांत वाईट लोक असल्यामुळें, सरकारचें अस्तित्व अपरिहार्य आहे. ते स्वयं नष्ट झालेलें बरे किंवा त्याचें निदान शक्य तेवढें कमी अस्तित्व असावें. सरकारचें अस्तित्व तीन प्रकारें कमी दिसेल—

(१) आपल्या अस्तित्वाकडे दुर्लक्ष करण्याचा अधिकार सरकारनें प्रत्येक नागरिकाला द्यावा.

(२) सर्वांना समान स्वातंत्र्य द्यावें. त्यायोगें आपणा सर्वांवर जे कांहीं निर्बंध लादावयाचे त्यांत आपण भागीदार आहोंत अशी सर्व नागरिकांची समजूत होईल.

(३) सरकारनें आपलें स्वतःचें कार्यक्षेत्र शक्य तितकें जास्त मर्यादित करावें. यानंतर स्पेन्सरनें अमुक करूं नये, तमुक करूं नये वगैरेंचें वर्णन केलें आहे. सरकारनें स्वतः लोकांना शिक्षण देण्याच्याही स्पेन्सर विरुद्ध आहे. अमर्याद व्यक्तिस्वातंत्र्याचा तो एक प्रमुख पुरस्कर्ता आहे. तो म्हणतोः—

"The liberty which a citizen enjoys is to be measured, not by the measure of the governmental machinary he lives under, whether representative or other, but by the relative paucity of restraints it imposes on him."$

सरकार, मग तें प्रातिनिधिक असो वा नसो, परंतु तें किती निर्बंध नागरिकावर लादतात यावरूनच व्यक्तिस्वातंत्र्याची मोजमाप करतां येते.

या व्यक्तिस्वातंत्र्याच्या कल्पनांवरूनच त्याला आपल्या दुसऱ्या प्रसिद्ध पुस्तकांतील प्रतिपाद्य विषयाची स्फूर्ति झाली असावी.¶ त्यांत तो म्हणतो, सरकार हें मनुष्याप्रमाणेंच Organism आहे. मनुष्याची बुद्धि किंवा आत्मा ज्याप्रमाणें सर्व अवयवांकडून काम करवून

---

* Man V. State.

$ Man V. State. पृष्ठ १५

¶ Social Statistics.

घेतो, व स्वत: निष्क्रिय असतो त्याचप्रमाणें सरकार हा केवळ स्फूर्तीचा सांठा आहे. समाजाचे निरनिराळे घटक आपापल्या क्रिया करतात. State is an organism हा सिद्धान्त बराचसा दोषपूर्ण आहे. पण येथें दोषाविष्करण करण्याचें कांहींच प्रयोजन नसल्यामुळें, स्पेन्सरच्या सिद्धान्ताचें विवेचन पूर्ण करूं.

## सिज्विक

सर्व व्यक्तिवाद्यांत सिज्विकचें विवेचन जास्त व्यवहार्य दिसतें. अर्थात् त्यामुळें निर्भेळ व्यक्तिवादाला गौणत्व आलें आहे; पण त्याचें एकंदर म्हणणें बुद्धीला व व्यवहाराला अधिक धरून आहे, यांत शंका नाहीं सरकारनें शक्य तितके कमी निर्बंध ठेवावेत असें त्याचें म्हणणें आहे. प्रत्येक व्यक्तीचें रक्षण व्हावें, प्रत्येकाच्या मालमत्तेचें रक्षण व्हावें व एकमेकांमध्यें झालेले करारमदार पूर्ण पाळले जावेत, हींच सरकारचीं मुख्य कर्तव्यें होत. "प्रत्येक व्यक्ति आपलें स्वत:चें हित शहाणपणानें साधत असतां समाजाचें कल्याण बहुधा होतें" अशा मताचा तो आहे. इतर व्यक्तिवाद्यांपेक्षां सिज्विकनें सरकारच्या हातीं थोडी जास्त सत्ता ठेविली आहे ही समाधानाची गोष्ट आहे. तसेंच सर्वांपेक्षां तो जास्त व्यवहारी आहे, हेंही त्याचा ग्रंथ* वाचून पाहतां लक्ष्यांत येतें. या दृष्टीनें विचार करतां सिज्विक हा जुन्या व्यक्तिवादाचा आधुनिक पुरस्कर्ता आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं.

## बोझांक्वेट

या विद्वान ग्रंथकारानें मुख्यत: ग्रीन व स्पेंसर यांच्याच व्यक्तिवादाच्या सिद्धान्तांना आधारभूत मानून त्यांचा अधिक शास्त्रीय व तात्विक दृष्टीनीं विचार केला आहे. सर्वोत्कृष्ट जीवन हेंच व्यक्तीचें, समाजाचें व सरकारचें ध्येय असलें पाहिजे असें सांगून, हें ध्येय व्यक्ति-स्वातंत्र्याच्या मार्गानें अधिक लवकर साध्य होईल असें त्याचें मत आहे. हें त्याच्या ग्रंथांतील खालीं दिलेले कांही निवडक उतारे वाचले असतां चांगलें समजेल--

"What it [the state] can effect is to remove obstacles, to destroy conditions hostile to the realisation of the end."

"When opposed to freedom, a force that repels that force is right."

"The state is in its right when it forcibly hinders a hindrance to the best life or common good."

"The state action is negative in its immediate bearing, though positive both in its actual doing and its ultimate purpose."†

सर्वोत्कृष्ट जीवनाला बाधक होणाऱ्या अडथळ्यांना अडथळा उत्पन्न करावयाचा हीच सरकारच्या कार्यक्षेत्राची महत्वाची मर्यादा.

---

* Elements of Politics.

† Philosophical Theory of State.

येथपावेतों मुख्य मुख्य व्यक्तिवाद्यांच्या सिद्धांताचें समालोचन झालें. विषयान्तर होण्याची भीति म्हणून हें समालोचन अत्यंत संक्षेपानें करावें लागलें. समाजाच्या प्रत्येक घटकाला स्वातंत्र्य किती असावें व सरकारानें आपल्या हातीं असलेला असीम अधिकार कितपत गाजवावा हेंच फक्त पहावयाचें असल्यानें वरील विवेचन संक्षिप्त झालें आहे. पण तेवढ्यामुळें सरकार व नागरिक यांच्या परस्पर कर्तव्याची चांगली कल्पना होईल. आतां व्यक्तिवाद या ध्येयाचा परिणाम लोकसत्तेवर कसा काय होण्याचा संभव आहे हें पाहूं.

**व्यक्तिवाद व लोकसत्ता:**--वरवर विचार केला तर व्यक्तिवाद व लोकसत्ता हीं दोन तत्वें परस्परविरोधी नाहींत असें दिसून येईल. समाजाचा प्रत्येक घटक, प्रत्येक नागरीक, त्याला प्राप्त झालेल्या व्यक्तित्वाबरोबरच येणारीं कर्तव्यें प्रामाणिकपणें, निरपेक्षतेनें करील ही लोकसत्तेची अपेक्षा आहे. त्यानें तीं कर्तव्यें बजावलीं नाहींत तर लोकसत्ताक राज्यपद्धति यशस्वीपणें चालूं शकणार नाहीं. व्यक्तिवादाच्या बुडाशींही हेंच तत्व आहे. प्रत्येक मनुष्य समाजाचा अगदीं स्वतंत्र घटक आहे, असें जे कांहीं व्यक्तिवादी म्हणतात तें खरें नाही. हा सिद्धांत अगदींच लंगडा आहे, हें स्वयंसिद्ध आहे. म्हणजे मनुष्य हा स्वतंत्र घटक नसून समाजाचेंच एक अंग आहे, त्याच्या गुणदोषांचा समाजावर परिणाम होतो ही गोष्ट सर्वमान्य झाली आहे. तेव्हां प्रत्येक मनुष्यानें आपापलें कर्तव्य करीत रहावें, त्यायोगें समाजाचेंही कल्याण होतें, ही गोष्ट व्यक्तिवाद व लोकसत्ता या दोघांनाहि सारखीच लागू होते.

पण दोन तत्वांमध्यें तत्वत: जरी कांहीं विरोध नसला तरी आधुनिक काळांतील लोकशाहीच्या अंमलबजावणीकडे बारकाईनें लक्ष दिलें तर हे दोन्ही सिद्धान्त परस्परपूरक असूं शकत नाहीत असें दिसून आल्याखेरीज रहाणार नाहीं. सरकारचें कार्यक्षेत्र अप्रत्यक्ष (Negative) आहे, प्रत्यक्ष (Positive) नाही; हें व्यक्तिवादाचें सार. व्यक्तिवादाला अनुसरून लोकसत्तेला आपला संसार चालवितां येत नाहीं, असें नाहीं. अजून तशा प्रकारचा कोठेंच प्रयोग मात्र झाला नाहीं. सरकार (State) चें राज्यकारभाराचें क्षेत्र प्रत्यक्ष असावें कां अप्रत्यक्ष असावें याबद्दल लोकसत्तेच्या तत्वांत निर्बंध घालून देणारे नियम नाहींत. पण येवढें मात्र खरें की ज्याअर्थी लोकसत्ता लोकांच्या हितासाठीं लोकांनींच चालविलेली राज्यव्यवस्था आहे, त्या अर्थी तिचें कार्यक्षेत्र अप्रत्यक्ष असण्यापेक्षां प्रत्यक्ष स्वरूपाचें असणें फार चांगलें. लोकांच्या हितासाठीं ज्या ज्या सुधारणा करणें इष्ट आहे त्या त्या सर्व करीत रहाणें हेंच लोकसत्तेचें खरें कर्तव्य व कार्यक्षेत्र ठरतें. हल्लींच्या शास्त्रीय युगांत तर समाजव्यवस्था इतकी गुन्तागुन्तीची झाली आहे, आणि सरकारचें (Government) कार्यक्षेत्र इतकें वाढलें आहे कीं, व्यक्तिवादाच्या अनुरोधानेंच कार्य करणें हें लोकसत्तेला अशक्यप्राय झालें आहे. तेव्हां लोकसत्ता व व्यक्तिवाद यांमध्यें तत्वत: कांहीं विरोध नसला तरी व्यवहारांत तो दिसून येतो व दिसून येणें अपरिहार्यहि आहे, असें म्हणावें लागतें.

तथापि व्यक्तिवाद टाकाऊ आहे, असें कोणीहि म्हणूं शकणार नाहीं. तो हल्लींच्या युगांत जरी सर्वस्वी व्यवहार्य नसला तरी लोकांना अत्यंत स्फूर्तिदायक होईल यांत संशय नाहीं. या यंत्रसामुग्रीच्या कालांत उत्पन्न होणाऱ्या Mechanism च्या विरुद्ध तो एक परिणामकारक असा निषेध आहे. सर्वव्यापी, सर्वसंग्राहक व सर्वात्मक सरकारला तो एक आदर्श इशारा आहे. लोकसत्तेला या व्यक्तिवादापासून कोणते धडे शिकण्यासारखे आहेत याचें आतां संक्षिप्त विवेचन करून हें प्रकरण संपवूं.

(१) अधिकार हा दुरुपयोगक्षम आहे. मनुष्याच्या हातीं अधिकार असला म्हणजे तो त्याचा थोडासा तरी दुरुपयोग करतोच हा सामान्य नियम आहे. कोणत्याही राज्यव्यवस्थेपेक्षां लोकसत्तेंत अधिकाराची विभागणी अधिक व्यापक असते व जास्त लोकांच्या हातीं सत्ता येते. लोकसत्तेंत जे लोक पुढें येतात त्यांच्याच हातीं साधारणपणें सत्ता जाते. लोकसत्तेंत पुढारी होण्याचीही संधी जास्त असते. चलाख, कार्यसाधू व बोलक्या लोकांचें चांगलें फावतें. ते सर्व लोक कार्यक्षम, निरपेक्ष व प्रामाणिक असतातच असें कांही नाहीं. तेव्हां या लोकांच्या हातीं सत्ता गेली म्हणजे तिचा थोडासा तरी दुरुपयोग होणें अगदीं साहजीक आहे. म्हणूनच प्रत्येक नागरिकाला आहे त्यापेक्षां जास्त व्यक्तिस्वातंत्र्य असणें अवश्यक आहे. व्यक्तिशः व सामायिकरीत्या लोकांना अधिक स्वातंत्र्य असल्यास लोकसत्तेंत होणाऱ्या अधिकारप्राप्तीच्या दुरुपयोगाला निःसंदेह आळा बसेल.

(२) दुसरें असें कीं, अलीकडे लोकसत्ता ही भराभर अत्यंत व्यापक अशी संस्था बनत चालली आहे. सर्वच प्रकारचे प्रश्न सरकारकडे येऊं लागले आहेत. त्यामुळें त्याचा पसारा मनस्वी वाढला असून, देशांत सरकार म्हणजे मोठी राजकीय आर्थिक, सामाजिक, नैतिक व बौद्धिक अशी संस्था बनली आहे. अर्थात् समाजसत्तावादी म्हणतील, तसें कां होऊं नये ? सरकार हें समाजाचें प्रतीक आहे; नाहीं का ? पण हीं सर्व अवाढव्य कामें करता करतां सरकारच्या नाकीं नव येतें. याचा अर्थ असा कीं तीं कामें जशी व्यवस्थितपणें व बिनबोभाट व्हावयास पाहिजेत तशी होणें अत्यंत कठीण आहे. हें सर्व राज्यशकट उत्तम चालविण्यास उत्तम उत्तम माणसांची फार आवश्यकता असते. इतकीं माणसें सांपडणें फार अवघड असतें. सामान्यतः असें दिसून येतें कीं, लोक राज्यकारभाराबद्दल उदासीनच असतात. हा मनुष्यस्वभाव आहे. मग कशी तरी माणसें निवडून द्यावयाचीं, आणि या माणसांनी कसा तरी कारभार चालवावयाचा अशी परिस्थिती उत्पन्न होते. जितका पसारा जास्त तितका विस्कळीतपणा जास्त; जितका गोंडबंगालपणा जास्त तितकी लांचलुचपत, दडपशाही, अरेरावी व अधिकाराचा दुरुपयोग जास्त. लोकसत्ता उत्तमपणें चालवून दाखविण्याचें हें खास लक्षण नव्हे. त्यापेक्षां थोडा व्याप कमी करून शिरावर घेतलेलें कार्य उत्तमपणें व प्रामाणिकपणें चालवून दाखविलेलें इष्ट नाहीं काय ? व्यक्तिवादाची लोकसत्तेला हीच महत्वाची शिकवण आहे. शक्य तितकें कमी कार्य घेऊन तें अधिक यशस्वीपणें चालवून दाखविणें अधिक सुलभ आहे. उलट, लोकांच्याच हातीं कार्य देऊन मधून मधून लक्ष देत रहाणें; आवश्यकता दिसेल तेथें मदत करीत रहाणें, हें धोरण जर सरकारनें (State) स्वीकारलें तर त्यामुळें समाजाचें अधिक

कल्याण होईल असें माझें प्रामाणिक मत आहे. शिवाय सरकार स्वत: जितकें बोजड होत जातें तितका राज्यकारभाराचा खर्चही वाढत जातो. लॉर्ड ब्राइसनें आपल्या दोन ग्रंथांत (Modern Democracies) असें सिद्ध केलें आहे कीं, लोकसत्ताक राज्यकारभार सर्व राज्यकारभारापेक्षां अधिक भरमसाट व खर्चिक झालेला आहे. हा सर्व पैसा अर्थातच लोकांकडून यावयाचा. अशा प्रकारच्या बोजड व डोईजड झालेल्या राज्यकारभारासाठीं लोकांना अधिक स्वार्थत्याग करावा लागतो ही गोष्ट विशेष स्पृहणीय नाहीं.

(३) राष्ट्रापुढें कित्येकदां अत्यंत गंभीर प्रश्नही उपस्थित होतात. ते प्रश्न कसें सोडविले जातात, त्यावर देशाचें भवितव्य अवलंबून असतें. हे प्रश्न सोडविणारे पुढारी देशांतील अत्यंत बुद्धिमान व प्रामाणिक लोक असतातच असें नाही. पण त्यांच्या हातीं अधिकार असतो. या अधिकाराच्या मदांत तमाम जनसमुदायाची व राज्यकारभाराशीं प्रत्यक्ष संबंध नसलेल्या देशांतील थोर विभूतींचीही पर्वा न करतां हे लोक कित्येकदां एखादी गोष्ट ठरवितात. त्यामुळें राष्ट्राची हानीही होण्याचा कित्येक वेळा संभव असतो. कदाचित हीच गोष्ट लक्षांत घेऊन स्पेन्सरनें प्रतिपादलें असावें कीं, लोकांना सरकारच्या विरुद्धही जाण्याचा अधिकार असावा. व्यक्तिवादी सरकारच्या हातीं इतकी भयंकर सत्ता देण्यास तयार नाहीत, याचें मुख्य कारण हेंच आहे. या दृष्टीनें विचार करतां व्यक्तिवादांत बराचसा स्फूर्तिदायक व राष्ट्रहितकारी संदेश सांठविलेला आहे, हें कबूल करावें लागतें. व्यक्ति-स्वातन्त्र्याच्या अनुरोधानें सरकार अशा प्रकारचा निश्चय करण्यापूर्वी पुन: पुन: विचार करील, लोकमत पुन: पुन: अजमावून पाहील, आपण करूं घातलेल्या ठरावासंबंधानें लोकांमध्यें गैरसमज तर उत्पन्न झाला नाहीं ना, हें पुन: पुन: तपासून पाहण्याचा प्रयत्न करून पाहील. लोकसत्ताक सरकारला हा व्यक्तिवाद अक्षय मार्गदर्शक होणारा तारा आहे. व्यक्तिवादाचें तत्व मान्य केल्यावर सरकारचें पाऊल बहुतेक वांकडें पडणार नाहीं. हें तत्व लोकसत्तेचें एक उत्कृष्ट संरक्षक (Safeguard) आहे, ही गोष्ट जितक्या लवकर लोकांच्या ध्यानांत येईल, तितक्या लवकर लोकसत्तेला आपलें उद्दिष्ट साध्य करतां येईल, असें मला वाटतें.

(४) शेवटीं ही गोष्ट विसरतां कामा नये कीं, राष्ट्रांतील जे थोडेफार अत्यंत बुद्धिवान् व कल्पक लोक असतात त्यांना भरपूर उत्तेजन मिळणें अखिल समाजाच्या, किंबहुना अखिल जगाच्या दृष्टीनें अवश्य आहे. व्यक्तिवाद्यांची हीहि एक प्रमुख मागणी आहे. अशा प्रकारचें उत्तेजन लोकसत्तेंत मिळतें, ही गोष्ट खरी आहे; पण तें अल्पच प्रमाणांत असतें. अधिक प्रमाणांत दिल्यास लोकांच्या समान हक्काच्या तत्वाला बाध येतो, म्हणून कित्येक लोक कुरकुरही करतात. समाजांत असामान्य बुद्धिमत्तेचे लोक पुष्कळ सांपडतील. कित्येक कोमल कलिका पुरेसे खत व पाणी न मिळाल्यानें कोमेजून जातात त्याचप्रमाणें यांचीही स्थिती होते. डिलायल बर्न्स म्हणतो:--

But democracy, if it is opposed to plutocracy or aristocracy of birth, cannot be opposed to the aristocracy of intelligence. Indeed, the whole race grows in the development of its exceptional man.

Thus, even with respect to the few, the present social structure seems to demand more individual variety; and the few, who by wealth or birth, are able to develop themselves are but a fraction of those who are born exceptional *

कोणत्याही प्रकारच्या लोकांना विशेष सवलती देणें हें लोकसत्तेच्या तत्त्वाशीं विसंगत आहे. सर्वांना समान हक्क व सवलती मिळणें हा लोकसत्तेचा मुख्य पाया. तथापि समाजाच्या हिताच्या दृष्टीनें या मोठ्या लोकांना जास्त प्रमाणांत उत्तेजन दिल्यास वावगें होणार नाहीं. तें तसें देण्यांत यावें हा व्यक्तिवाद्यांचा आग्रह आहे व तो गैर आहे असें म्हणतां येणार नाहीं.

येथपर्यंत व्यक्तिवादाचें निरीक्षण व त्याचा लोकसत्तेवर कसा परिणाम होण्याचा संभव आहे, याचें वर्णन झालें. लोकसत्तेच्या कारभाराची अलीकडे भरमसाट व्याप्ती होत आहे. समाजसत्तावादानें राज्यकारभाराचें शकट अधिक बोजड व विस्तृत केलें आहे. लोक मात्र व्यक्तिवादाच्या संदेशाला ऐकून घेण्यास तयार नाहींत. पण आज ज्याप्रमाणें कित्येक लोकांना 'Return of Nature' म्हणजे 'निसर्गाकडे पुन: चला' या संदेशाचा मोह पडत आहे त्याचप्रमाणें त्यांना या सर्वव्यापक लोकसत्तेपासून परावृत्त होण्याची प्रवृत्ति उत्पन्न होईल याबद्दल शंका नाहीं. आज ना उद्यां व्यक्तिवादाचा संदेश लोकसत्तेला ऐकावा लागेल आणि म्हणूनच या ध्येयाचें विवरण करणें अवश्य वाटलें.

---

* Political Ideals.

## प्रकरण १३ वें.

# लोकसत्तेचें भवितव्य

## (२) समाजसत्तावाद

मागील प्रकरणांत लोकसत्तेवर व्यक्तिवादाचा कसकसा परिणाम होण्याचा संभव आहे याचें विवेचन झालें. पण लोकसत्तेवर समाजसत्तावादाचाहि परिणाम होण्याचा पुष्कळ संभव आहे. किंबहुना जागतिक घटनांची धांव व्यक्तिवादापेक्षां समाजसत्तावादाकडेच विशेष दिसते. हल्लींच्या गुन्तागुन्तीच्या यांत्रिक संस्कृतींत समाजाचे वेगवेगळे स्वतंत्र घटक पाडून प्रत्येक घटकाला आपापल्या योग्यतेप्रमाणें स्वोन्नति करून घेण्यास सरकारनें योग्य वातावरण निर्माण करण्यापेक्षां सर्व समाजावर सामयिक रीत्याच नियंत्रण ठेवलेलें बरें ही विचारसरणी दिवसेंदिवस अधिक प्रभावी ठरूं पहात आहे. तेव्हां व्यक्तिवादापेक्षां समाजसत्तावादाचें ध्येय लोकसत्तेवर आपला जास्त जास्त पगडा बसवील असें दिसतें. म्हणून या ध्येयाचें किंचित् सविस्तर विवेचन या प्रकरणांत करण्याचें ठरविलें आहे.

**औद्योगिक क्रांति व तिचे परिणाम**—अठराव्या शतकाच्या शेवटीं यूरोपखंडांत जी औद्योगिक क्रांति घडून आली ती अनेक दृष्टींनीं अद्वितीय अशीच होती. समाजाच्या एकंदर राहणीवर तिचा परिणाम झाला; राष्ट्रें अधिक उद्योगप्रधान व संपन्न होत गेलीं, देशादेशांमधला व्यापार भराभर वाढू लागला; लोकांना आपल्या राजकीय हक्कांची हळूहळू जाणीव होऊं लागली; व क्वचित देशांत तर तिचा राजकारणावर बराच परिणाम होऊन लोकांना मतदानाचा अधिक विस्तृत अधिकार प्राप्त झाला. या औद्योगिक क्रांतीच्या विशाल लाटेमुळें अनेक इतर विचारांच्याही लहान लहान लाटा उद्भवून त्या चारी बाजूला वाहूं लागतील याची अटकळ त्यावेळीं बांधतां आली नसती. पण या क्रांतीमुळें एक अत्यंत नाविन्य-पूर्ण विचारांचा ओघ इतिहासाच्या वाहत्या नदींत उत्पन्न होऊन तो पुढें अविरत व अप्रतिहत कायम राहील याची त्यावेळीं लोकांना कल्पनाही होणें अशक्यच होतें. ही नाविन्यपूर्ण विचारसरणी म्हणजेच राज्यव्यवस्थेचा एक नवीन सिद्धांत होय. हा सिद्धांत लोकसत्ताक राज्यपद्धतीचा नव्हे. औद्योगिक क्रांतीमुळें लोकसत्तेच्या आधींच उद्भूत झालेल्या कल्पनांना अधिक जोरानें चालना मिळेल ही गोष्ट तेव्हां निश्चित मानली गेली होती. हा नवीन सिद्धांत साम्यवादाचा होय. समाजाच्या अंतर्व्यवस्थेची ही नवीन व अद्भुत कल्पना या क्रांतीच्या उदरांतून निघून ती पुष्ठ झाल्यावर तिचा राज्यव्यवस्थेच्या मूलभूत तत्त्वांवर जोराचा परिणाम होईल असें लोकांना वाटतच नव्हतें. साम्यवाद अथवा समतावाद हा या क्रांतीमुळेंच उदय पावला. व याच्या बुडाशीं असलेलें तत्त्व सकृद्दर्शनीं अव्यवहार्य दिसत असलें तरी या क्रांतीमुळेंच तें व्यवहार्य होण्याचा जास्त संभव आहे. या क्रांतीमुळेंच साम्यवादाचा विकास झाला हीहि गोष्ट तितकीच खरी आहे.

**साम्यवादाचा उगम व विकास**—ही औद्योगिक क्रांती साम्यवादाच्या उदयाला व विकासाला कशी कारणीभूत झाली हें प्रथम पाहिलें पाहिजे.

अठराव्या शतकाच्या शेवटीं शेवटीं वाफेचा उपयोग कसा करावा याचा शोध लागला. सूत काढण्याचीं व विणण्याचीं यंत्रें निघूं लागलीं, कोळशाच्या खाणी सांपडल्या, दळणवळणाचे मार्ग सुधारले, आगगाड्या तयार करण्यांत आल्या, मोठीं जहाजेंही बांधण्याचें काम सुरू झालें. प्रथम प्रथम लहान लहान कारखाने चालू करण्यांत आले. इंग्लंडांत मुख्यत: कापसाचे कारखानेच अगोदर सुरू झाले. हे बहुधा कोळशाच्या खाणीजवळच असावयाचे. कारखान्यांत काम करावयास मजूर जास्त हवेत. कारखान्यांची वाढ जशी होत गेली तसें शेतकीवरून लोकांचें लक्ष उडालें. कारण कारखान्यांपासून जेवढा फायदा व्हायचा तेवढा शेतकीपासून होणें शक्य नाहीं. तेव्हां ज्यांच्या ज्यांच्यापाशीं पुष्कळ भांडवल होतें त्यांनीं त्यांनीं शेतकी सोडून कारखाने काढण्यास प्रारंभ केला. यामुळें शेतांतून काम करणाऱ्या मजूरांना पोटापाण्याला पुरेसें मिळेना; कारण मजूरांची संख्या तीच व आतां काम मात्र कमी. तेव्हां खेड्यापाड्यांतून हे मजूर लोक निघून जेथें कारखाने स्थापन झाले होते तेथें येऊन राहूं लागले.

कित्येक देशांत कारखान्यांची वाढ भराभर होऊं लागली. व्यापार वाढूं लागला व हळूहळू लोकही संपन्न होऊ लागले. पण इकडे कारखान्यांत राबणाऱ्या लोकांच्या हालअपेष्टा कमी न होतां उलट त्यांची स्थिति अत्यंत शोचनीय व उद्वेगजनक झाली. कारखान्यांत लहान लहान मुलें व स्त्रियाही मोलमजरी करून आपल्या पोटाची खळगी कशी तरी भरीत. कोठें कोठें त्यांना १५-१५, १८-१८ तासही काम करावें लागे. त्यांना पगार फारच कमी मिळावयाचा. दिवसभर काबाडकष्ट करून शेवटीं पोटालाही भरपूर न मिळाल्यानें त्यांना किती वाईट वाटत असावें ! पण एवढ्यावर त्यांच्यावरचें संकट थांबणारें नव्हतें. कारखान्यांत अनेक यंत्रांचा उपयोग होत होता. त्यांच्याभोंवतीं कधीं कुंपणें नसावयाचीं. त्यामुळें अपघात प्रत्यहीं होत असत. मजूरांना अत्यंत वाईट रीतीनें वागविण्यांत येत असे. रात्रंदिवस कोळशाचा धूर नाकातोंडांत जाऊन नाना व्याधी उत्पन्न व्हावयाच्या. मजूरांची राहण्याची जागा अपुरी व घाणेरडी असून, त्यांच्या शिक्षणाकडे व एकंदर आरोग्याकडे कारखानदार अगदीं दुर्लक्ष करीत.

इकडे कारखानदार मात्र उत्तरोत्तर अधिक श्रीमंत होऊ लागले. त्यांचें वैभव व ऐश्वर्य पाहून मजूरांना वैषम्य वाटलें तर त्यांत दोष कोणाचा ? हे भांडवलवाले वास्तविक आपल्या जीवावर गबर झालेले ! व ते आपल्यास पिळून काढीत आहेत, हें पाहून त्यांना त्यांबद्दल संताप वाटत असला तरी त्यांत वावगें असें कांहींच नाहीं. एखाद्या मोठ्या कारखान्यांत भांडवल काय ते एक दोन माणसांचें; किंवा कांही माणसांनीं स्थापन केलेल्या मंडळींचें. सर्व मजूरी मात्र मजुरांची. या मजूरांच्या हातीं एवढें भांडवल दिलें किंवा त्यांनीं तें कोठून तरी मिळविलें व नंतर एक कारखाना स्थापन करून तो ते चालवूं लागले तर त्यामुळें होणारा सर्व फायदा मजूरांमध्येंच वाटला जाणार कीं नाहीं ? मग मजूरांना सुस्थिति कां बरें प्राप्त होणार नाहीं ? पण त्याचप्रमाणें आतांही कां होऊं नये ? त्यांच्यापाशीं भांडवल नाहीं हें काय तें त्यांचें पाप ! पण भांडवलवाल्यांजवळ जी संपत्ति असते ती तरी स्वकष्टार्जित कोठें असते ? ती त्यांना परंपरेनें मिळालेली असते किंवा त्यांच्या हाताखालीं असलेल्या अनेक मजूरांना रात्रंदिवस निर्दयतेनें राबवून त्यांच्या कष्टापासून उत्पन्न झालेली असते. पण अशा रीतीनें प्राप्त झालेल्या

संपत्तीवर त्यांचा अधिकार तरी कां असावा ? मजूर हेंच उत्पन्नाचें मुख्य साधन. तेव्हां उत्पन्नाचा वाटा मुख्यतः त्यांच्याकडेच गेला पाहिजे. अशा प्रकारची विचारसरणी आतां सुरू झाली. कित्येक तत्ववेत्त्यांनाही ही गोष्ट पटूं लागली. कित्येकांना ती पटत नसली तरी त्यांना मजूर लोकांच्या असहाय स्थितीबद्दल सहानुभूति मात्र वाटूं लागली. खुद्द मजूर लोकांमध्येंहि समाधान व्यक्त होऊं लागलें. आपणही आतां हातपाय हलविले पाहिजेत, स्वस्थ बसून मुकाट्यानें जुलूम सोसण्याचे दिवस निघून गेले असें त्यांना वाटूं लागलें.

अशा परिस्थितींत मजुरांचे संघ स्थापन केले असतां, थोडेंसे तरी विधायक कार्य करतां येईल असें मजूर पुढाऱ्यांना वाटून त्यांनीं या कामास प्रारंभ केला. हळूहळू कित्येक मजूरसंघ स्थापिले गेले. अडीअडचणीच्या वेळीं मजूरांना आर्थिक मदत करावयाची, त्यांच्यावर होत असलेल्या जुलुमांचा प्रतिकार करावयाचा, त्यांचा परस्परांतील बंधुभाव व संघशक्ति वाढवावयाची, व एकंदरींत त्यांच्या शारीरिक, मानसिक व बौद्धिक उन्नतीसाठीं जें जें म्हणून करतां येणें शक्य आहे तें तें सर्व करावयाचें असा हेतु प्रथमतः या मजूर-संघाचा ('Trade Unions) होता. अशा या संघाच्या स्थापनेला व कार्याला कारखानदारांकडून अतिशय विरोध व्हावयाचा हें उघडच होतें, व त्याप्रमाणें झालाही. पण जसजशी या संघाची शक्ति वाढूं लागली तसतसे त्यांच्याकडून होत असलेल्या विरोधाचें प्रमाणही कमी कमी होऊं लागलें. व शेवटीं त्यांनाच काय पण खुद्द सरकारलाही या संघांना मान्यता देणें भाग पडलें.

पण हें कामकरी-संघ-तत्व (Trade Unionism), गरीब मजुरांच्या दारिद्र्ययुक्त परिस्थितीच्या खडकाळ प्रदेशांतून निघालेला हा विचारप्रवाह तेवढ्यावरच थांबण्याचें कारण नव्हतें. डोंगरांतून निघालेल्या एकाद्या निर्झरणीला वाटेंत अनेक लहान लहान उपनद्या येऊन मिळतात. पण केव्हां केव्हां असें होतें कीं, याच निर्झरणीची मोठी नदी तयार होऊन पुढें ती दुभागलीही जाते. तिच्यामधून फुटून निघालेली शाखाही आपला थोडासा मार्ग आक्रमून पुन्हां मुख्य नदीला येऊन मिळते किंवा ती स्वतंत्रपणेंच दुसऱ्या दिशेकडे वाहूं लागते. या संघतत्वाच्या प्रभावी प्रवाहाचीही हीच गत झाली. त्यापासून एक दुसरा नवीन प्रवाह उत्पन्न होऊन तो राजनीतीच्या मार्गानें वाहूं लागला. यालाच साम्यवाद (Socialism) किंवा बरोबर बोलावयाचें झाल्यास State Socialism असें म्हणतात. संघतत्व व साम्यवाद यांमध्यें फरक असा कीं, पहिल्या तत्वांत फारसें राजकारण येत नाहीं. त्याचा मुख्य हेतु म्हणजे मजूरांची स्थिती उत्कर्षदशेला न्यावयाची. हा प्रश्न बव्हंशीं सामाजिक व आर्थिक आहे. दुसऱ्या तत्वांत मात्र राजनीतीचा वास पदोपदीं कळून येतो. मजूरांची स्थिति सुधारावयाची ती कशी ? लोकसत्तेची वाढ भराभर होत आहे, तमाम सामान्य लोकांना मतदानाचा हक्क प्राप्त होत आहे, तेव्हां ही एक नवीन संधीच मिळत आहे, असें समजून मजूरांची उत्कृष्ट संघटना करून त्यांचेही प्रतिनिधी कायदेमंडळांत जावेत व इतर पक्ष जसे आपापल्या तत्वांसाठीं झगडतात तसें आपणही झगडून स्वोन्नति करून घ्यावी, असें मजूरांना वाटूं लागलें.

**साम्यवादाचा राजनैतिक पाया**—अशा प्रकारें परक्यांच्या प्रत्यहीं होणाऱ्या जुलुमांचा प्रतिकार करण्यासाठीं प्रथमतः स्थापन झालेल्या कामकरीसंघाच्या भात्यांतील बाण राजकारणापर्यंत जाऊन पोंचला. मजूरसंघ-तत्वाच्या उदयाबरोबरच ज्याप्रमाणें अनेक नवीन कल्पनांचाही उदय होऊं लागला त्याचप्रमाणें या तत्वाचा राजनीतीशीं संपर्क येतांच विद्युतशक्तिप्रमाणें कित्येक इतर नवीन सिद्धान्ताचाही उदय होऊं लागला. राजनीतीच्या मूळ सिद्धान्तावर साम्यवादाचा बराच परिणाम झाला. राज्यव्यवस्थेच्या रूढ कल्पनांना यामुळें जोराचा धक्का बसला.

समाजव्यवस्थेची पुराण कालापासून चालत आलेली परंपरा साम्यवादामुळें विचलित झाली. प्रत्येक सरकाराच्या कार्यक्षेत्राचा विस्तार वाढला. त्याचीं कर्तव्यें अधिक व्यापक होऊं लागलीं. या बदललेल्या परिस्थितीचा राज्यव्यवस्थेच्या मूलभूत तत्वांवरही पुष्कळच परिणाम झाला.

म्हणून साम्यवाद मूलतः सामाजिक स्वरूपाचा असला तरी आतां तो राज्यव्यवस्थेशीं व समाजव्यवस्थेशीं अत्यंत निगडित झालेला आहे. औद्योगिक क्रांतीमुळें जसा लोकसत्तेच्या चळवळीला जोर मिळाला, तसेंच साम्यवादामुळेंही अनेक राजनैतिक कल्पनांना चालना मिळाली. पण औद्योगिक क्रांती साम्यवादाच्या उत्पत्तीस कारणीभूत झाली; किंबहुना ती क्रांति झाली नसती तर साम्यवाद व साम्यवादामुळें उत्पन्न होणाऱ्या राज्यव्यवस्थेच्या अनेक नवीन कल्पना याही कदाचित् उत्पन्न झाल्या नसत्या असें म्हटल्यासही हरकत नाहीं.

**साम्यवादाला पोषक परिस्थिति**—वरील विवेचनावरून एक गोष्ट निरपवाद सिद्ध होते. ती ही कीं, ज्या ज्या देशांत मोठमोठ्या प्रमाणांत कारखाने आहेत तेथें तेथें मजूरसंघ-तत्वाची व्याप्ति वाढून त्यामुळें साम्यवादाचा उदय होण्याचा संभव जास्त. ग्रेट ब्रिटन, जर्मनी, फ्रान्स, रशिया इत्यादि पाश्चात्य देश धंदेप्रधान आहेत. एकंदरीत सर्व यूरोपखंडांतील देशांत कारखान्यांची वाढ अधिक झालेली आहे. त्यामुळें या समाजव्यवस्थेच्या नवीन कल्पनांना यूरोपांतच प्रथम चालना मिळाली. साम्यवादाचें तत्व पूर्णपणें पाश्चात्य आहे. तिकडे सुरूं झालेली विचारक्रांतीची लाट पूर्वेकडे भराभर वहात येत आहे हें खरें. पण यूरोप हेंच या कल्पनेचें उगमस्थान.

कारखान्यांची वाढ, मजूर संघ-तत्व व साम्यवाद या सर्व एकाच ध्येयाकडे नेणाऱ्या व एकमेकांशीं संलग्न असलेल्या तीन पायऱ्या आहेत. पहिलीवर पाय ठेवला ह्मणजे दुसरीवरही पाय ठेवणें क्रमप्राप्तच होतें. कुठलीही नदी घ्या, तिचें पाणी अखेर समुद्रास जाऊन मिळतें, त्याचप्रमाणें औद्योगिक क्रांतीमुळें उत्पन्न पावलेल्या या कल्पनांचें पर्यवसान शेवटीं साम्यवादांत व्हावयाचें हेंही निश्चित. देशकालपरिस्थितीप्रमाणें कोठें कोठें कमीअधिक प्रमाणांत किंवा कमीअधिक कालांत एवढेंच.

एवंच साम्यवाद आणि त्या नवीन तत्वाप्रमाणें उत्पन्न झालेल्या राज्यव्यवस्थेचा नवीन सिद्धांत व समाजव्यवस्थेचे स्थित्यंतर यांची अपरिहार्यता सिद्ध होते. हें तत्व चांगलें असो वा नसो, एकंदर देशाला सुस्थितीप्रत नेण्यास समर्थ असो वा नसो, राष्ट्र धंदेप्रधान झालें ह्मणजे त्याला या तत्वाच्या मोहजालापासून अलिप्त राहणें कठीणच आहे.

**समाजसत्तावादाचा उद्देश व स्वरूपः**—वित्ताची विभागणी योग्य रीतीनें होत नाहीं हेंच समाजसत्तावादाच्या उगमाचें मुख्य कारण आहे. मजूरांजवळ फक्त भांडवल नाहीं, नाहींतर त्यांनीहि एकमेकांशीं आर्थिक सहकार्य करून सहकारी तत्वावर पुष्कळसे कारखाने उभारले असते व साहजिकच त्यांपासून होणारा फायदा त्यांनीं आपआपसांत वाटून घेतला असता. ही गोष्ट या वादाच्या आद्य उत्पादकांच्या प्रथम निदर्शनास आली. जमीन, मजूरी, भांडवल व संघटना हीं उत्पन्नाचीं आधारभूत साधनें होत. पैकीं जमीनीला विशेष खर्च लागत नाहीं, मजूरी तर आपलीच आहे, अनुभवानें संघटनशक्ति निर्माण होत असते. राहतां राहिलें भांडवल. हें भांडवलच काय तें आपल्यापाशीं नाहीं. तथापि तें ज्यांच्यापाशीं आहे त्यांच्याकडेच प्राप्तीचा मुख्य वाटा जावा व प्राप्तीचें एक महत्वाचें साधन जो मजूरवर्ग त्याच्याकडे अगदीं थोडा भाग यावा, (इतका थोडा कीं त्यावर एका कुटुम्बाचें पालनपोषणहि होणें अत्यंत कठीण) हा एक भयंकर सामाजिक अन्याय आहे, तो दूर झालाच पाहिजे

अशा प्रकारची विचारसरणी समाजसत्तावादाच्या आद्य पुरस्कर्त्यांच्या मनांत घोळूं लागली. ते ह्मणूं लागले कीं भांडवलवाल्यांपाशीं सत्ता आहे, या सत्तेचा दुरुपयोग करून, मजूरांच्या दारिद्र्याचा फायदा घेऊन हे लोक फुकट अधिक संपत्तिमान व सत्ताधारी बनतात. पण सर्व लोकांच्या हक्कांचें समानतेनें संरक्षण करणें हें लोकशाहीचें कर्तव्य असल्यानें या भांडवलवाल्यांना विनाकारण अन्यायानें अधिक संपत्तिमान व सत्ताधारी होऊं न देण्याची खबरदारी या लोकसत्ताक राज्यकारभारांत घेण्यांत आली पाहिजे. तसेंच, गरीब मजूरांच्या दैन्यावस्थेचा फायदाहि कोणी घेतां कामा नये. व तसें कोणी केलें तर समाजानें ह्मणजे पर्यायानें सरकारानें त्याचें योग्य पारिपत्य करून पुढें तसा प्रकार होणार नाहीं अशी परिस्थिती उत्पन्न केली पाहिजे.

सारांश, वित्ताची योग्य व न्यायशीर विभागणी होणें हा समाजसत्तावादाचा मुख्य उद्देश आहे. हल्लींच्या भांडवलशाहीच्या युगांत राष्ट्रांतील थोडेसे लोक अत्यंत श्रीमंत व ऐश्वर्यवान होऊन बहुजनसमाज दारिद्र्यपंकांत खितपत पडला आहे ही गोष्ट कोणत्याही समाजाला किंवा राष्ट्राला भूषणावह नाहीं लोकसत्तेंत सर्वांच्या हितांचें रक्षण व्हावयाचें असतें तर मग असली दारुण आर्थिक विषमता कां? यामुळें असंतोष पसरून वर्गकलह वाढतो. हेंहि योग्य नाहीं. ह्मणून समाजाच्या उपयोगाचे सर्व कारखाने समाजानें आपल्या ताब्यांत घ्यावेत असें या लोकांचें ह्मणणें आहे. यामुळें भांडवलशाही नष्ट होईल, निदान तिचें प्राबल्य पुष्कळच कमी होईल. भांडवलवाल्यांकडे जाणारा फायदा सरकारकडेच राहील व सरकारला त्याचा राष्ट्रोन्नतीकडे चांगला उपयोग करतां येईल, असें या लोकांचें मत आहे.

साधारणतः देशांतील सर्व रेल्वे, खाणी, शेतकी व इतर मोठमोठे धंदे व्यक्तिशः लोकांच्या किंवा लोकांनी स्थापन केलेल्या कंपन्यांच्या ताब्यांत न राहूं देतां सरकारनें आपल्या मालकीचे करावेत हें मवाळ समाजसत्तावाद्यांना (Scientific Socialists) वाटतें. ते सरकारनें आपल्या स्वाधीन न ठेवतां कामकरी संघाच्याच देखरेखीखालीं चालूं ठेवावे असें सांघिक समाजसत्तावाद्यांना वाटतें (Guild Socialists). समाजांत कोणत्याहि व्यक्तीच्या ताब्यांत व्यक्तिगत भांडवल नसावें, समाजांतील सर्व प्रकारच्या भांडवलावर, कारखान्यांवर, उद्योगधंद्यांवरव व सर्व प्रकारच्या चळवळीवर व कार्यावर सरकाराची संपूर्ण सत्ता असावी असें साम्यवाद्यांना (Communist) वाटतें. या शेवटच्या लोकांचीं मतें आत्यंतिक आहेत हें सांगणें नकोच. साम्यवाद्यांत व समाजसत्तावाद्यांत हाच मुख्य फरक आहे. तसेंच साम्यवाद्यांचा उत्क्रांतिवादावर विश्वास नाहीं. आपणास हवी आहे ती परिस्थिति घडवून आणण्यासाठीं क्रांति केली पाहिजे, त्याखेरीज आपला उद्देश सफल होणार नाहीं असें त्याचें ठाम मत आहे. उलट, मवाळ समाजसत्तावाद्यांचा मुख्य भार उत्क्रांतिवाद व लोकसत्ता यांवर आहे. पार्लमेंटच्या मध्यस्थीनें सनदशीर मार्गानें हळूंहळूं इष्ट सुधारणा घडवून आणावयाच्या असा यांचा संकेत आहे. लोकांची मनोवृत्ति क्रमाक्रमानें समाजसत्तावादाकडे वळवून निवडणुकीच्या वेळीं समाजसत्तावाद्यांना पाठबळ देण्याला त्यांना प्रवृत्त करणें व एकदांची पार्लमेंटमध्यें अधिकारप्राप्ती झाली ह्मणजे योग्य सुधारणांचे कायदे करून घ्यावयाचे असें यांना वाटतें. या दृष्टीनें विचार करतां लोकसत्ता ही समाजसत्तेची पायरी असून हीं दोन्ही तत्वें परस्परपूरक व पोषक आहेत असें म्हणावें लागतें.

**समाजसत्तावाद व लोकसत्ता**—आतां या समाजसत्तावादाचा लोकसत्तेवर कसा परिणाम होण्यासारखा आहे याचें विवेचन करूं.

राजसत्तेपेक्षां लोकसत्ताकराज्यपद्धतींतला राज्यकारभार अधिक बोजड, अधिक गुंतागुंतीचा असतो हें निर्विवाद आहे. राजसत्ताक राज्यव्यवस्था फारच सोपी, सरळ, व सुटसुटीत असून

थोड्याच लोकांचा तिच्याशीं प्रत्यक्ष संबंध येतो, म्हणजे ती व्यवस्था चालविण्यास साधारणतः थोड्या लोकांचीच गरज भासते. परंतु लोकशाहींत राज्यकारभाराचीं खातींहि वाढलीं असून प्रचंड कायदेमंडळांचीहि त्यांत भर पडली आहे. लोकसत्तेची व्याख्या कोणी कोणी कायदेशीर रीतीनें संघटित झालेला समाज अशीहि करतात. एवंच समाजाच्या किंवा राष्ट्राच्या हितासाठीं ज्या ज्या गोष्टी करणें आवश्यक आहे त्या त्या सर्व आपल्या कार्यक्षेत्रांत अंतर्भूत करणें लोकशाहीला आवश्यक आहे. ह्मणजे अगदींच व्यक्तिगत असलेली बाब सोडून दिली तर लोकसत्तेच्या कार्यकक्षेंतून कोणतीहि गोष्ट सुटत नाहीं हें उघड आहे. लष्कर, आरमार, रेल्वे, शिक्षण, हुंडणावळ, नाणें, व्यापार, शेतकी, आरोग्य, कालवे, पोलीस, जकाती, न्याय इत्यादि बाबींकडे लक्ष पुरविणें हें तर लोकशाहीचें प्रथम कर्तव्य होऊन बसलें आहे. हीं कर्तव्येंच करतां करतां लोकशाहीला नाकीं नव आलें आहे. लोकसत्ताक राज्यकारभाराच्या सूक्ष्म समालोचनानंतर लॉर्ड ब्राइसनें असा सिद्धांत काढला आहे की ही राज्यव्यवस्था अत्यंत खर्चाची, अत्यंत व्यापक व गुन्तागुन्तीची असल्यानें ती जेवढी यशस्वी होईल असें वाटत होतें तेवढी मात्र झाली नाहीं, यांत संशय नाहीं.

याच लोकसत्तेला पुढें समाजसत्तावादाची जोड मिळतांच राज्यव्यवस्थेची व्यापकता कितपत वाढेल याची कल्पनाच करावी. आधीच लोकसत्तेला आपला व्यवहार उत्तम रीतीनें पाहतां येत नाहीं. मग आणखी समाजसत्तावादाची जोड मिळाली तर लोकशाहीचा संसार सुखानें सुरळीतपणें चालेल का अशी पुष्कळांना शंका वाटते.

समाजसत्तावाद ही लोकसत्तेच्या शिरावर एक मोठी जोखीमच आहे. यामुळें लोकसत्तेचें कार्यक्षेत्र अत्यंत व्यापक होऊन बसतें. समाजसत्तावादाच्या अंमलबजावणीमुळें वित्ताची विभागणी अधिक समतेनें व न्यायानें होईल हें निसंशय असलें तरी लोकशाहीला तो सुस्थितीप्रत नेईलच हें खात्रीपूर्वक सांगतां येत नाहीं. राज्यकारभाराच्या बाबी वाढवून घेण्यांतच भूषण व अभिमान वाटण्याचें कारण नाहीं. अधिक जबाबदारी कशी तरी पार पाडण्यापेक्षां कमी जबाबदारी अंगावर घेऊन उत्तम रीतीनें कार्य करून दाखविणें निःसंदेह अधिक भूषणावह आहे. लोकसत्ताक राज्यकारभाराचाहि याच दृष्टीनें विचार केला पाहिजे. अगोदरच बोजड झालेली राज्यव्यवस्था अधिक बोजड व गुन्तागुन्तीची करण्यांत हंशील काय? अर्थात् हा समाजसत्तावादाचा दोष नाहीं. पण समाजसत्तावादाचा लोकसत्तेशीं संबंध आल्यानंतर उद्भवणारा हा दोष आहे. याच दृष्टीनें आपण समाजसत्तावादाचे इतरही दोष पाहू.

**समाजसत्तावादाचे दोषः**—राज्यकारभाराची भयंकर व्यापकता हा समाजसत्तावादाचा एक मुख्य दोष मानण्यांत येतो. पण हा दोष कसा ठरतो? असेंहि कोणी विचारील. त्याला उत्तर वर आलेंच आहे. राज्यकारभारांत सुटसुटीतपणा रहात नाहीं. तो सर्वसंग्राहक झाल्यानें व्यवस्थितपणें चालणें अत्यंत कठीण आहे. लोकशाहीची राज्यव्यवस्थाच अजून यशस्वी झालेली नाहीं, तर मग तिच्यावरची जबाबदारी आणखी वाढवून तिची घडी विस्कटण्यांत शहाणपणा दिसून येत नाहीं. मनुष्याच्या योग्यतेप्रमाणेंच त्याच्यावर जबाबदारी टाकावी हें कोणी कोणाला सांगावें असें नाहीं. तें अगदीं स्पष्ट व सर्वसंमत असेंच आहे. अर्थात जबाबदारी गळ्यांत घातल्याशिवाय योग्यताहि प्राप्त होत नाहीं ही गोष्टहि कबूल करणें भाग आहे. पण त्याचबरोबर हेंहि लक्षांत ठेवावें कीं लोकसत्तेला समाजसत्तावादाची जोड देण्यापूर्वी या संयोगापासून सामान्य जनसमुदायाचें व राष्ट्राचें हित अधिक होईल का अहित? या गोष्टीचीहि पूर्ण शहनिशा प्रथम झाली पाहिजे. व असें जर दिसून आलें कीं यामुळें देशाच्या कल्याणापेक्षां

अकल्याणच जास्त होणारें आहे तर मग समाजसत्तावादाला अर्धचंद्र देऊन त्याचा जो स्तुत्य व न्यायशीर उद्देश आहे तो इतर कोणत्या तरी उपायानें सिद्धीस नेणाच्या प्रयत्नाला लागले पाहिजे. एवीतेवीं लोकसत्ताक राज्यकारभाराची जबाबदारी व कार्यक्षेत्र भरमसाट वाढवावें हा कांहीं समाजसत्तावाद्यांचा मूळ उद्देश नाहीं. इतर कोणत्याहि उपायानें मजूर लोकांची व मध्यम स्थितीच्या लोकांची सांपत्तिक व आत्मिक उन्नत्ति होण्याजोगी आहे असें त्यांच्या पूर्णपणें निदर्शनास आलें तर लोकसत्तेवरील जबाबदारी वाढवून राष्ट्रांत अव्यवस्था उत्पन्न होऊं देण्यापेक्षां त्या उपायांकडे ते आपलें लक्ष लावतील अशी अपेक्षा केली तर ती चुकीची ठरणार नाहीं असें वाटतें. म्हणूनच समाजसत्तावादाबद्दल लोकसत्तेच्या दृष्टीनें अधिक चर्चा होणें अवश्य आहे.

राज्यव्यवस्थेची व्यापकता वाढणें हीच मुख्य अडचण आहे काय ? ती तर आहेच; पण तिच्याबरोबर अनेक अडचणी उत्पन्न होतात. व या सर्व दोषांचा सामुदायिकरीत्या समाजसत्ताक लोकशाहीवर अनिष्ट परिणाम होतो हें विसरतां कामा नये. या विस्तृत राज्यकारभारासाठीं असंख्य तज्ञ लोकांची आवश्यकता आहे. राष्ट्रांतील सर्व प्रमुख व विद्वान लोक कोणत्या ना कोणत्या तरी प्रकारें या प्रचंड राज्ययंत्राचे निरनिराळे भाग होऊन राहतील. पण यांतहि काय वावगें आहे ? पण याचा मुख्य दोष म्हटला म्हणजे प्रबळ, सर्वसत्ताधारी व प्रचंड नोकरशाहीची निर्मिती हा होय. ही नोकरशाही अत्यन्त प्रभावशील व सत्ताधारी बनून राष्ट्रहिताच्या दृष्टीनें ती केव्हां केव्हां प्रत्यवायात्मकहि ठरते. लोकसत्तेला समाजसत्तावादाची जोड मिळाली तरी राज्यव्यवस्थात्मक कल्पनामध्यें ती सदैव अखंड, अविचल व चिरस्थायी राहील असें थोडेंच आहे ? राज्यव्यवस्थेच्या नवीन नवीन कल्पना उद्‌भूत होत असतात. समाजसत्तावाद किंवा साम्यवाद ही कल्पनाहि नवी म्हणजे १९ व्या शतकांतलीच आहे. समाजसत्तात्मक लोकशाही सर्वत्र किंवा कित्येक ठिकाणीं स्थापन झाल्यावर तीच अत्युत्कृष्ट व चिरसुखदायी ठरेल असेंहि नाहीं. कदाचित् कांही वर्षाच्या अनुभवानंतर ती टाकाऊहि वाटेल आणि तसें झालें तर ह्या समाजसत्तेच्या नोकरशाहीचें उच्चाटण करणें अत्यन्त कटीण किंबहुना अशक्यप्राय होऊन बसेल यांत संशय नाहीं. लोकसत्ताक कल्पनांचा जेव्हां उदय झाला व त्यांना मूर्त स्वरूप देण्यासाठीं बंडाळी व क्रांत्या होऊं लागल्या तेव्हां व त्या पूर्वीहि राजसत्तेचा जम चांगला बसला होता. व लोकसत्ता व राजसत्ता यांमध्यें दीर्घकालपर्यंत भयंकर संघर्षण होऊन हळहळू राजसत्ता विनाश पावूं लागली. अजूनहि राजसत्तेचा पूर्ण लोप झाला असें ह्मणतां येणार नाहीं. वस्तुतः राजसत्तेपेक्षां समाजसत्तात्मक लोकशाहीची नोकरशाही अधिक चिकट, बळकट, प्रभावशाली व चिरस्थायी ठरेल असें वाटतें. कारण ती अधिक संघटित, सत्तावान व प्रबुद्ध असते. समाजसत्तावादाच्या संयोगानें अत्यन्त प्रबल झालेल्या सरकाराचें तिला पाठबळ असतें. राष्ट्रांतील सर्व प्रमुख मुत्सद्यांच्या सल्लामसलतीचा तिला आधार असतो. राष्ट्राची सर्व शक्ति सरकारच्या ठिकाणी केंद्रित झालेली असते. सामान्य जनतेनें या नोकरशाहीच्या प्रचंड शक्तीला यशस्वीपणें तोंड देणें ही अवघड गोष्ट होऊन बसेल. अखेर संघटित लोकमताचा विजय होईल, हेंहि खरें; पण हें परस्पर संघर्षण अत्यंत दारुण व दीर्घकालीन असें होईल ही भीति आहे.

दुसरें असें कीं ही समाजसत्तावादानें स्थापन झालेली नोकरशाही लोकशाहीच्या मार्गांत अभेद्य अशी भिंतच आहे. लोकांच्या कल्पनेप्रमाणें राज्यकारभार चालावा हा तर लोकसत्तेचा प्रमुख दंडक आहे. राज्यव्यवस्थेच्या कल्पनांमध्यें होत जाणारें जें स्थित्यंतर त्याचा परिणाम तत्काळ राज्यकारभारावर व्हावयास पाहिजे हेंच लोकसत्तेचें सारभूत तत्व. पण या बलाढ्य

नोकरशाहीच्या अस्तित्वामुळें लोकमताची छाप राज्यकारभारावर बरोबर उमटणार नाहीं; व तशी स्थिति उत्पन्न झाल्यावर लोकसत्तेलाहि मूठमाती मिळणें अशक्य नाहीं. तिच्याऐवजीं देशांत अल्पसंख्याक लोकांचा कारभार (Oligarchy) सुरू होऊन कालान्तरानें त्याचेंहि रूपांतर एखाद्या सर्वसत्ताधिकाऱ्याच्या उदयांत होण्याचा बराच संभव आहे. ही गोष्ट सामान्य जनहिताला तर पोषक नाहींच पण कित्येकदां राष्ट्रहितासहि ती अत्यंत विरोधक होते.

मिलसाहेबानें आपल्या सुप्रसिद्ध "लिबर्टी"* या ग्रंथांत या बलाढ्य नोकरशाहीच्या उद्भवाबद्दल बरीच चर्चा केली असून समाजसत्तावादाच्या ध्येयांत हा फार मोठा दोष आहे असें प्रतिपादलें आहे. तसेंच दुसऱ्या एका नामांकित ग्रंथकारानेंहि असें ह्मटलें आहे—

"The ideal organisation of Society by the mastery of the state over all the means of production seems to imply the establishment of a large official caste with no competition to fear ...... If Society, once socialised, were never to change again, then perhaps, the state officials would be altogether useful; but if history would not end even at the coming of Socialism, then the official caste being hostile to further change, we shall be enslaved to the servants we have appointed. We shall have given to this caste the best brains of the community and the organised force of Society and it would be much more difficult to revolt against such a tyranny than it was against personal despotism or oligarchy." ¶

वरील अवतरण अंमळ मोठें आहे खरें. पण समाजसत्तावादाच्या एका दोषाचें त्यांत पूर्ण आविष्करण झालें असल्यानें तें संपूर्ण देण्याचा मोह आवरला नाहीं. या अवतरणांतील अंतर्भूत मुख्य मुद्याचे विवेचन वर केलेंच आहे. हल्लीं रशिया देशांत सोडून इतर कोठेंहि समाजसत्तावादाचा प्रयोग विशेष जारीनें सुरू करण्यांत आलेला नाहीं; व तेथेंहि आतां स्टॉलिन रिपोर्टप्रमाणें पुन्हां पार्लमेंटरी पद्धति सुरू करण्यांत येत आहे. तथापि रशियाची स्थिति लक्षांत घेतली असतां असें दिसून येईल की तेथें एक प्रचंड व बलाढ्य नोकरशाही स्थापन झाली आहे व राज्याचीं सर्व सूत्रें या नोकरशाहीशीं तन्मय झालेल्या अल्पसंख्य पुढाऱ्यांच्याच हातीं आहेत. आज रशियांत व्यक्तिस्वातंत्र्य नामशेष झालें असून साम्यवादाच्या विरुद्ध असलेल्या किंवा त्याच्याशीं एकमत नसलेल्या सर्व लोकांना किंवा पक्षांना अत्यंत निर्दयतेनें दडपून टाकण्यांत आलें आहे. या नोकरशाहीच्या पाठीमागें रशियन समाजाची सर्व पाशवी शक्ति एकवटली असल्यानें हें दडपशाहीचें काम अत्यंत सुलभ झालें आहे. नवविचारांना, नाविन्यपूर्ण कल्पनांना तेथें थारा नाहीं, मग उत्तेजन कुठलें? ॲरिस्टॉटलनें लष्कर व सरकार (State) यांमधील भेदाचें स्पष्टीकरण करतांना असें ह्मटलें आहे कीं लष्कराचा नियम हा कीं सर्व सैनिकांना एकसारखें करावयाचें व सरकारचा हा कीं लोकांच्या भिन्न भिन्न मनोवृत्तींना उत्तेजन देऊन विविधता आणावयाची. An army makes men more similar, a State more various.

---

* Mill—Liberty. Chapter IV.

¶ Political Ideals —Delisle Burns.

पण रशियाच्या सोव्हियट सरकारनें सर्वांना एकाच साच्यांत घालून मानवी मनोवृत्तींची विविधता दडपून टाकण्याचा विडा उचलला आहे. सर्व समाजसत्ताक लोकशाहीचें हेंच धोरण कमी अधिक प्रमाणांत राहील हें उघडच आहे.

पण या प्रचंड नोकरशाहीच्या स्थापनेपेक्षां अधिक उग्र व भयंकर असा दोष आम्हाला समाजसत्ताक राज्यपद्धतींत दिसून येतो. तो म्हणजे लोकसत्ताक सरकार सर्वसंग्राहक, सर्वव्यापी व अत्यन्त सामर्थ्यवान् होणें हा आहे समाजसत्ताक नोकरशाहीविषयीं जशी साशंकता उत्पन्न होते तद्वतच सर्वसत्ताक सरकाराविषयीहि मन साशंक होतें, किंबहुना अधिकच साशंक होतें.

सरकारच्या ठिकाणीं राष्ट्राची समस्त शक्ति एकवटल्यानें कोणती अनर्थपरंपरा उद्‌भवण्याचा संभव आहे याचा विचार करण्यासाठीं आर्वाचीन संस्कृतीचें प्रथम रहस्य जाणणें अवश्य आहे. हल्लीचें युग हें निव्वळ यांत्रिक युग आहे. अनर्गल आधिभौतिकता, प्रखर राष्ट्रीयता, कोणत्याहि विषयाबद्दल शुद्ध शास्त्रीय रीतीनें विचार करण्याची कठोर मनोवृत्ती, आध्यात्मिक विषयांबद्दल शोचनीय उदासीनता हीं या यांत्रिक संस्कृतीचीं प्रमुख अंगें होत. मर्यादित स्वरूपांत या प्रत्येकामुळें जगाचें कल्याण झालें आहे असें म्हटलें पाहिजे. पण खरी गोष्ट अशी कीं या प्रत्येकाची लाट एकदां सुरू झाली कीं ती उत्तरोत्तर अमर्याद वाढतच जाते. प्रत्येक अंगाच्या या अमर्यादित्वामुळेंच जगाचें चक्र हजारों वर्षें चालत असून सुद्धां आज जागतिक परिस्थिति असावी तशी समाधानकारक नाहीं व कांहीं कांहीं बाबतींत तर त्याची पीछेहाटच होत आहे, असें मोठमोठे तत्ववेत्तेहि कबूल करतात. अर्थात लोकसत्तेशीं या सर्व अंगांचा प्रत्यक्ष दाट संबंध नाहीं. तरी पण राष्ट्रीयत्व हें जें एक अंग आहे तें लोकसत्तेशीं पूर्णतः निगडित झालेलें आहे. आधुनिक इतिहासांत प्रथमतः राष्ट्रीयत्वाचा उगम झाला व नंतर लोकसत्तेची लाट उसळली. लोकसत्तेच्या कल्पवृक्षाचें राष्ट्रीयत्व हेंच बीज आहे. मर्यादित असलें म्हणजे राष्ट्रीयत्व समाजाला किंवा राष्ट्राला (म्हणजे राष्ट्रांतील तमाम जनतेला) हितावह होणारें आहे. पण मर्यादेच्या बाहेर गेल्यास हेंच राष्ट्रीयत्व देशाला व एकदर जगाला अनर्थप्रद ठरतें असा इतिहासाचा पुरावा आहे. हल्लीच्या युगांत या राष्ट्रीयत्वाची वाढ भरमसाट व अमर्याद झालेली आहे हे सर्वांना दिसतच आहे.

तसेंच जगाची हल्लीची राजकीय परिस्थितीहि समाधानकारक नाहीं; ती तशी केव्हांच नसते असें म्हटले तर वस्तुस्थितीला धरूनच होईल. शास्त्र व तज्जन्य आधिभौतिकता यांची वाढ व राष्ट्रीयत्वाचा अतिरेक यामुळें प्रत्येक राष्ट्र आपलें हित कसें साधतां येईल या एकाच उद्देशानें प्रेरित झालेलें दिसून येतें. जगाच्या सामुदायिक कल्याणासाठीं राष्ट्रसंघ स्थापन झाला असला तरी त्याचा आतांपर्यन्तचा इतिहास मोठासा उत्तेजनपर नाहीं. बॉलीव्हिया-पाराग्वे, मांचूरिया व अबिसीनिया या प्रकरणांमुळें तर राष्ट्रसंघाच्या उपयुक्ततेबद्दल अनेक लहान लहान राष्ट्रें अत्यंत साशंक झालेलीं आहेत. शिवाय महायुद्धापूर्वी जी परिस्थिति होती तिच्यापेक्षां हल्लीची जास्त आशाजनक आहे असेंहि नाहीं. व ती पुढें लवकर सुधरेल असेंहि वाटत नाहीं. जगांत राष्ट्रें व अतिरेकी राष्ट्रीयत्व जोंपर्यंत अस्तित्वांत आहेत तोंपर्यन्त राष्ट्राराष्ट्रांमध्यें संघर्षण चालू राहणारच. हल्लीं जग राष्ट्रीत्वाच्या खोट्या कल्पनेनें पछाडलेलें आहे. मध्ययुगीन कालांत अनियंत्रित राजसत्ता होती. राजांच्या वाढत्या महत्त्वाकांक्षेनें परस्परामध्यें युद्धप्रसंग होत असत. या आर्वाचीन कालांत लोकसत्ता स्थापन झाली आहे, व राष्ट्रीयत्वाच्या पायावर ती उभी असल्यानें आतां राष्ट्राराष्ट्रांमध्यें चुरस उत्पन्न झाली आहे. त्यामुळें अनेक युद्धप्रसंग उद्‌भवतात. पूर्वी राजाराजांमध्यें भांडणें तर आतां राष्ट्राराष्ट्रांमध्यें भांडणें! एकूण जगाला चिरस्थायी शांतता प्राप्त होण्याची आशाच नको.

हल्लींची खोटी राष्ट्रीयत्वाची कल्पना ही ह्या सर्व कलह व जागतिक अव्यवस्थेच्या बुडाशीं आहे याबद्दल आह्माला मुळींच शंका वाटत नाहीं. ही राष्ट्रीयत्वाची खोटी कल्पना जोंपर्यन्त बदलत नाहीं तोंपर्यन्त जगाचें हें असेंच चालावयाचें. रोमेन रोलंड हा सुप्रसिद्ध फ्रेंच राजकीय तत्ववेत्ता लिहितो:—

Love of my country does not demand that I shall hate and slay those noble aud faithful souls who also love their country but rather that I should honour them and seek to unite myself with them for our common good.

राष्ट्रीयत्वाच्या बुडाशीं ही उदात्त कल्पना जोंपर्यन्त स्थिर होत नाहीं तोंपर्यन्त आंतरराष्ट्रीयत्व, विश्वबंधुत्व व शांतता जगांत स्थापन होणें अशक्य आहे राष्ट्रीयत्व हें अग्नीसारखें तारक व मारक दोन्ही आहे. अग्नी उपयोगीहि पडतो तर जाळपोळ करण्याकडे त्याचा दुरुपयोगहि होतो. तद्वतच राष्ट्रीयत्व हें राष्ट्राला कुमार्गाकडेहि नेतें व सुमार्गाकडेहि नेतें. आपण श्रेष्ट व्हावें, जगानें आपल्याला श्रेष्ठ समजून मान द्यावा हा उद्देश सफल करण्यासाठीं प्रत्येक राष्ट्र झटत असतें. पण खरें श्रेष्ठत्व या खोट्या राष्ट्रीयत्वाच्या साह्यानें कधींच प्राप्त होत नसतें ही गोष्ट राष्ट्रांच्या जितके लवकर लक्षांत येईल तितके लवकर नवयुगाचा प्रशांत प्रातःकाल उदयास येणार आहे. पॉल रिशार्ड ह्मणतो:—

The greatest country, be its boundaries narrow or vast, is that in which humanity reaches its highest stature.†

जगाचा स्वामी होण्यापेक्षां जगाचा सेवक होणें हें जास्त अभिमानास्पद व भूषणावह आहे. खऱ्या श्रेष्ठत्वाचें बोज यांत सांठलें आहे. राष्ट्रीयत्वानें अग्नीचा मारकपणा काढून तारकपणा स्वीकारला पाहिजे. तरच जगाचा उद्धार होईल व विश्वबंधुत्वाचें साम्राज्य स्थापन होईल.

शिक्षणपद्धति हेंच राष्ट्रीयत्वाचें उगमस्थान आहे. खोट्या राष्ट्रीयत्वाची जाज्वल्य भावनाही शिक्षणापासूनच उद्भवते. पण हल्लीं शिक्षणपद्धति सर्वस्वी सरकारच्या स्वाधीन आहे. आपल्या ध्येयाचें बीज शिक्षणपद्धतीच्या योगानें सरकार हळूहळू तरुणांचा कोमल अंतःकरणांत रुजवीत असतें. ओल्या मडक्याचा काठ जसा वळवावा तसा वळतो. साहजीकच सरकारला (state) जशी तरुणपिढी पाहिजे आहे तशीच ती तयार होते. शिक्षणाच्या योगानें समाजाचे आनुवंशिक संस्कारहि बदलतात ही गोष्ट जर्मनी व जपान या देशांच्या इतिहासावरून सिद्ध होते. मग खऱ्या राष्ट्रीयत्वाला पोषक होईल असें शिक्षण दिलें तर कार्यभाग नाही का व्हावयाचा ? शिक्षणाच्या बाळकडूनें नवीन, खऱ्या व उदात्त राष्ट्रीयत्वानें प्रेरित झालेली तरुणपीढी सहज निर्माण करतां येते. बेंजामिन किड ह्मणतो—

The emotion of the ideal when directed by civilisation is a cause so potent to transform the world that there is practically nothing which cannot be achieved through even to the complete altering of the psychology of a people in a single generation.

---

† To the Nations.

पुढें तोच ग्रंथकार ह्मणतो.—

The will-to-attain to an end organised and transmitted to the social heredity is the highest capacity of the mind. It can only be imposed in all its strength through the young. So to impose it has become the chief end of education in the future. ¶

खऱ्या राष्ट्रीय शिक्षणामुळें नव कल्पनांनीं प्रेरित झालेली व विश्वबंधुत्वाच्या उदात्त ध्येयानें उत्स्फूर्त झालेली तरुणपीढी निर्माण करणें हें प्रत्येक सरकारचें परमोच्च कर्तव्य आहे. या योगानेंच कालान्तरानें खऱ्या राष्ट्रीयत्वाची कल्पना मनावर बिंबून जगाची परिस्थिति पालटतां येईल.

वरील विवेचन थोडेसें विषयाला सोडून झालें आहे. पण तो विषयहि तितकाच महत्वाचा आहे, ह्मणून त्याचें हें अतिसंक्षिप्त विवेचन केल्याबद्दल वाचक क्षमा करतील. मुख्य मुद्दा असा कीं हल्लींच्या लोकशाहींतच सरकार अत्यंत प्रबळ बनलें आहे. पूर्वी राजाराजांमध्यें भांडणें होत होतीं, पण आतां सबंध राष्ट्राराष्ट्रांमध्यें होत असल्यानें कलह, द्वेष, मत्सर यांचा अग्नि अधिकाधिक भडकून तो जगाची राखरांगोळी करूं पहात आहे. सरकार जेवढें बलिष्ठ तितकी जास्त या कलहाची भीषणता वाढेल यांत शंका नाहीं. लोकशाहींतच जर सरकार एवढें बलाढ्य होत आहे, तर समाजसत्तावादाची तिला जोड मिळतांच सरकारचें कार्यक्षेत्र अधिकाधिक व्यापक बनून तें सर्वसत्तात्मक व सर्वसंग्राहक असें होईल हें निर्विवाद आहे. व या आर्वाचीन कालांत खोट्या राष्ट्रीयत्वाचा अतिरेक झाला असल्याकारणानें सरकारला इतकें सत्तावान होऊं देणें विशेषच धोक्याचें होईल. दोन पक्षांत किंवा जातींत भांडणें चालू असतां उभयतांच्या हातीं लाठ्या, सुऱ्या, बर्चा, भाले, बंदुका वगैरे शस्त्रें दिल्यानें या कलहाचें स्वरूप अधिक भीषण व भयंकर होईल हें कोणीहि सांगूं शकेल. राष्ट्रें परस्परांमध्यें एकसारखीं लढतच असतात असें नाहीं. युद्धप्रसंग मधून मधून पण लवकर उद्भवतात हें खरें. पण हल्लीं आपापसांत मतभेद, गैरसमजूत, इर्षा, वैमनस्य हे पुरेपूर दिसून येतात हेंहि तितकेंच खरें आहे. यामुळेंच पुढें कलह उत्पन्न होतो. आज प्रत्यक्ष युद्ध चालत नसलें तरी युद्धाची प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष तयारी चालूंच आहे. निदान एकमेकांची मनें साफ नाहींत. बहुतेक परस्परद्वेषानेंच तीं कलुषित झालेलीं दिसून येतात. राष्ट्रीयत्वाची कल्पना आपण जोंवर बदलण्यास तयार होत नाहीं तोंवर हें असेंच चालावयाचें. तेव्हां अशा परिस्थितींत समाजसत्तावादाचें ध्येय स्वीकारून लोकसत्ताक सरकारास अधिक प्रबळ, सत्तावान व सर्वव्यापी होऊं देण्यांत शहाणपणा नाहीं असें आह्माला वाटतें. तसेंच समाजसत्ताक लोकशाहीचें सरकार अत्यन्त प्रबळ झाल्यानें इतर जे अनर्थ व्हावयाचे तेही टळत नाहींत.

आह्माला वाटतें कीं सरकारचें कार्यक्षेत्र वाढवून त्याला अधिक प्रबळ, सर्वसत्तात्मक व सर्वव्यापक होऊं दिल्यानें जगावर अधिक संकटें ओढवतील या संकटाच्या कालांत लोकशाहीचा प्राय: लोप कसा होतो याचें वर्णन मागील एका प्रकरणांत आलेंच आहे. समाजसत्तावाद खोट्या राष्ट्रीयत्वाच्या वाढीला कारणीभूत होईल. राष्ट्रें आपापल्या भौगोलिक अनुकूलतेनें प्रबळ बनतील व लष्करशाहीचा जोर वाढेल. पियर्सन या ग्रंथकारानेंहि हीच भीति प्रदर्शित केली

---

¶ Benjamin Kidd-Science of Power.

आहे.† प्रथम प्रथम कदाचित् समाजसत्तावाद विश्वबंधुत्वाच्या मोठमोठ्या वल्गना करील. पण यशाची पायरी चढतांच आपलें हें सोंग टाकून देऊन, स्वकृतीच्या संरक्षणार्थ तो राष्ट्राला व्यापारिक संरक्षणाच्या व लष्करशाहीच्या मार्गावर नेल्यावांचून राहणार नाहीं. देशांतील सर्व खाणी, रेल्वे, लोकोपयोगी कारखाने व इतर महत्वाचे उद्योगधंदे राष्ट्राच्या स्वाधीन झाल्यानें सरकारची सत्ता भयंकर व्यापक व भरीव होईल. आतांपर्यन्त सरकारचें कार्यक्षेत्र राज्यकारभाराचें होतें. समाजसत्तावादानें सरकार अधिक " बनियागिरी " हि करूं लागेल. तेव्हां राष्ट्राराष्ट्रांमध्यें स्पर्धा फार वाढून त्याचा काय परिणाम होईल याचा विचार वाचकांनींच करावा. कांहीं समाजसत्तावाद्यांचें असें ह्मणणें आहे कीं, आर्वाचीन कालांतील सर्व लढाया भांडवलशाही व तिच्यापासून उत्पन्न झालेली जी आंतरराष्ट्रीय स्पर्धा त्यांच्यामुळेंच झाल्या आहेत. पण समाजसत्तावादानें तरी ही भांडवलशाही नष्ट केली आहे काय ? व्यक्ति किंवा व्यक्तिसमुच्चयाच्या हातीं ती न राहूं देतां सरकारच्या ठिकाणीं ती एकवटलेली दिसून येईल. आतांपावेतों तिचा सरकारच्या धोरणावर लांबूनच अप्रत्यक्षपणें परिणाम होत होता. आतां प्रत्यक्ष सरकारच्या हातीं भांडवलशाही आल्यानें तिचा त्याच्यावर कांहींच परिणाम होणार नाहीं हें ह्मणणें सयुक्तिक नाहीं.

सारांश, अत्यंत प्रचंड व बलिष्ट नोकरशाहीची स्थापना होणें व सरकारचें कार्यक्षेत्र वाढून तें अत्यंत प्रबळ, सर्वसत्तात्मक व सर्वव्यापक होणें हे दोन अत्यंत महत्वाचे दोष समाजसत्ताक लोकशाहींत दिसून येतात. हे दोष इतके भयंकर आहेत कीं समाजसत्तावाद्यांनीं आपल्या या ध्येयाचा नाद सोडून द्यावा व आपला जो मूळ उद्देश कीं वित्ताची योग्य व न्यायशीर विभागणी व्हावी, तो सफल करण्यासाठीं इतर साधनें शोधून काढण्याच्या प्रयत्नास लागावें. अर्थात समाजसत्तावादी उच्च ध्येयानें प्रेरित झालेले आहेत, आपलें ध्येय समाजसत्तावादाच्या साह्यानें सफल होईल अशी त्यांची प्रामाणिक समजूत आहे, गरीब मजूरांच्या दैन्यावस्थेमुळें त्याचें मन द्रवलेलें आहे, जगांत शांतता स्थापन होऊन विश्वबंधुत्वानें भिन्न-भिन्न लोकांचें हार्दिक एकीकरण व्हावें असें त्यांना मनापासून वाटत आहे. अशा लोकांबद्दल कोणाला सहानुभूति वाटणार नाहीं ? पण ज्या साधनानें हे लोक आपलें उच्च ध्येय तडीस नेऊं पाहतात तें साधन मूलतःच सदोष असून राष्ट्राला इष्ट स्थळीं नेणारें नाहीं अशी आह्माला जबरदस्त भीति वाटते. आणि ह्मणूनच समाजसत्तावादाचें येथें थोडें जास्त समालोचन केलें. समाजसत्ताक लोकशाहीचें सरकार सर्वसत्तामान होतांच उच्च ध्येयाची भाषा एकीकडे राहून जगांत ज्या प्रत्यक्ष गोष्टी घडतात त्यांच्या कटु अनुभवावरून उपायांची योजना करीत राहील. रशियाचें सोव्हिएट सरकार आज जितकें सामर्थ्यवान आहे तितकें इतर कोणतेंहि राष्ट्र कदाचित नसेल. उत्तरोत्तर तें अधिकाधिक प्रभावशाली बनून इतर लहान-सहान किंवा मोठमोठ्या राष्ट्रांनाहि तापदायक होईल हें आजच्याच परिस्थितीवरून दिसून येतें. सत्तेचा समतोलपणा हें आंतरराष्ट्रीय व्यवहाराचें अत्यन्त व्यवहार्य्य व सोपें असें तत्व आहे. एखादें राष्ट्र अधिक प्रबळ होतांच त्याच्या विरुद्ध इतर दोन तीन राष्ट्रांचा गट निर्माण व्हावयाचाच. या प्रकारें परस्परांमधील चुरस वाढावयाची व अखेर या स्फोटक द्रव्याचा केव्हां तरी व कसा तरी स्फोट होऊन शांततेचा भंग व्हावयाचा हें तर एक ऐतिहासिक सत्य होऊन बसलें आहे. समाजसत्तावादानें परिस्थिति अधिक चिन्ताजनक व संकटयुक्त होईल असें वाटतें.

---

† Pearson–National Life & Character.

**समाजसत्तेची अपरिहार्यता:—** तथापि समाजसत्तावादानें आज जी कांहीं प्रगति करून दाखविली आहे ती पाहतां या ध्येयाची सफलता, निदान अंशत: तरी, कालान्तरानें झाल्यावांचून राहणार नाहीं असें वाटतें. या नवीन ध्येयाची ही जी लाट उसळली आहे ती अत्यन्त प्रचंड असून आज ना उद्या ती प्राय: सर्व देशांवरून वाहूं लागेल असें दिसतें. या समाजसत्तावादाच्या चळवळीची व्यापकता हेंच तिच्या प्रगतीचें व लोकप्रियतेचें रहस्य आहे. देशांत सामान्य लोक, मजूर व कामकरीवर्ग यांची संख्याच जास्त असावयाची. त्यांच्या उन्नतीसाठीं झटणारी कोणतीहि संस्था प्रभावी व लोकप्रिय व्हावयाची. ह्मणूनच कीं काय अत्यल्प कालांत या चळवळीचें पाऊल बरेंच पुढें पडलें आहे. याच कारणास्तव या चळवळीचें स्वरूप अधिक व्यापक होऊन ती यशस्वी होईल असें दिसतें.

यास्तव लोकसत्ताक सरकार यापुढें अधिक व्यापक होईल यांत शंका नाहीं. सरकारचें कार्यक्षेत्र दिवसेंदिवस अधिक विस्तृत होऊन सर्व प्रकारच्या औद्योगिक व सामाजिक बाबतींवर सरकारचें नियंत्रण सुरू होईल, व तें इतकें वाढेल कीं ज्या त्या विषयांत सरकारचें अंग असलेलें दिसून येईल. त्यामुळें कोणकोणते अनर्थ उद्‌भवण्याचा संभव आहे याचें विवरण वर आलेंच आहे.

समाजसत्तावादाच्या ध्येयाचा लोकशाहीवर पुष्कळच परिणाम होण्याचा संभव आहे हें नि:संशय. व्यक्तिवादाचा त्या मानानें विशेष परिणाम होईल असें दिसत नाहीं. पण तो आदर्श राष्ट्रानें समोर ठेवला तर राष्ट्रीय व आन्तराष्ट्रीय दृष्टीनें त्याचें अकल्याण तर व्हावयाचें नाहीं, उलट बरेचसें राष्ट्रीय व आंतराष्ट्रीय हित मात्र साध्य होईल असें माझें मत आहे. वाचकांनीं विचार करावा व जो उचित दिसेल तोच मार्ग स्वीकारावा यापेक्षां येथें अधिक काय सांगतां येईल ?

---

**टीप:—** समाजसत्तावाद्यांचें स्फूर्तिस्थान जें रशिया तेथेंहि लवकरच पार्लमेंटरी राज्यव्यवस्था सुरू व्हावयाची आहे असें स्टॅलिन रिपोर्टावरून समजतें. मध्यवर्ती राज्यकारभारांत वरचें व खालचें कायदेमंडळ स्थापन होऊन लोकांना नागरिक हक्क व मालकीचे ( Proprietory rights ) हक्क मिळावयाचे आहेत. प्रत्येक व्यवहारी माणूस इतिहास काय सांगतो इकडे अगोदर लक्ष देतो. पंधरा वर्षांच्या प्रयोगानंतर अखेर रशियालाहि हा नवीन मार्ग स्वीकारणें भाग पडत आहे. यावरून समाजसत्तावादांत मूलत: ( inherent ) अनेक दोष आहेत व सरकार कितीहि सर्वशक्तिमान व सर्वव्यापी झालें तरी ते कायमचे दूर होऊं शकत नाहींत हेंच सिद्ध होतें. समाजसत्तावाद्यांनीं समतोल मनानें या गोष्टीचा अवश्य विचार करावा.

## प्रकरण १४ वें.

# लोकसत्तेचें भवितव्य

## (३) लोकसत्ता व एकसत्ता

भविष्यकालांत लोकसत्तेवर आणखीहि एका ध्येयाचा परिणाम होण्याचा संभव दिसतो. तो म्हणजे एकसत्ताक राज्यपद्धतीचा. अशा प्रकारच्या राज्यपद्धतींत राज्यकारभाराचीं सर्व सूत्रें वस्तुतः एकाच मनुष्याच्या ताब्यांत असतात. राजसत्तेंतहि एकाच राजाची अनियंत्रित सत्ता असते. पण राजसत्ता व एकसत्ता या दोहोंमध्यें मुख्य भेद असा कीं राजसत्तेंत एक राजा मरण पावला असतां त्याचा मुलगा किंवा वारस परंपरेनें व हक्कानें गादीवर बसतो व एकसत्तेंत तसें कांहीं न होतां विस्कटलेल्या राजकीय परिस्थितींत जो सर्वांत बलिष्ठ ठरतो तोच राज्याची सर्व सूत्रें आपल्या हातीं घेतो.

अलीकडे पुष्कळ लोकांचें असें मत बनूं लागलें आहे कीं मिळमिळीत लोकसत्तेपेक्षां दणदणीत एकसत्ताच बरी. एवीतेवीं लोकसत्तेचा उद्देश व्हावा त्या प्रमाणांत सफल झालेला नाहीं व होणारहि नाहीं. त्यापेक्षां राष्ट्राचीं सर्व सूत्रें एकाच माणसाच्या हातीं देऊन वेगळें झालेलें बरें. महायुद्धानतर बऱ्याच देशांत एकसत्ता स्थापन झाली. इटली, रशिया, तुर्कस्थान व इराण या राष्ट्रांत तर उघडपणें सर्वसत्ताधिकारी उदयास आले व त्यांनीं आपापल्या इतमामा-प्रमाणें राज्यव्यवस्था चालविली व अजूनहि ते चालवीतच आहेत. व त्यांचा राज्यकारभार लोकसत्ताक राज्यकारभारापेक्षां अधिक उत्कृष्ट ठरला आहे. अत्यल्पकालांत त्यांनीं आपापल्या राष्ट्रांची अनेक प्रकारें उन्नति केली असून तेथील लोक एकंदरीत तूर्त तरी सुखी व संतुष्ट आहेत. तेव्हां अशाच प्रकारची राज्यव्यवस्था बरी असें पुष्कळ विचारवंत लोकांना वाटत असल्यास नवल नाहीं. म्हणून या प्रकरणांत एकसत्तेचें थोडेसें सूक्ष्म विवेचन करूं.

**एकसत्तेला पोषक असलेली परिस्थिति**—जगाच्या मुख्य मुख्य क्रांत्यांचें अवलोकन केलें असतां असें दिसून येतें कीं अव्यवस्था, बंडाळी यांच्यामुळेंच मुख्यत्वेंकरून एकसत्तेची स्थापना होत असते. राजसत्ता सुरळीतपणें चालली असतां मध्येंच एखाद्या सर्वसत्ताधिकाऱ्याचा उदय होणें प्रायः अशक्य असतें. तसेंच लोकसत्तेचाहि राज्यकारभार सुरक्षित चालला असतां एका-एकी ही एकसत्ता स्थापन होणेंहि प्रायः अशक्यच. एकसत्ता स्थापन होण्याच्या पूर्वी सामान्य जनसमुदायाची अशी साधारण समजूत होते कीं विद्यमान राजकीय परिस्थितीची घडी अत्यंत विस्कटित झालेली आहे, अधिकारांत असलेल्या लोकांच्या हातून ती व्यवस्थित होणें अत्यंत अवघड आहे, कोणी एखादा असामान्य लष्करी पुढारी पुढें येणें जरूर आहे व त्यानें आपल्याकडे सर्वाधिकार घेऊन राज्यांत सुव्यवस्था व बंदोबस्त राखावा. अशा प्रकारची राष्ट्रांत असहायतेची विचारसरणी सुरू झाली म्हणजे एखादा पुढारी पुढें येतोच.

बहुधा असें दिसून येतें कीं युद्धकालांत एकसत्तेच्या स्थापनेला वातावरण बरेंच अनुकूल असतें. गत महायुद्धाच्या वेळींच बरेचसे सर्वाधिकारी निर्माण झाले. रशियामध्यें क्रांति होऊन प्रथम राज्याचीं सूत्रें १९१७ च्या फेब्रुवारीमध्यें केरेन्स्की या अप्रतीम पुढाऱ्याच्या हातीं आलीं. केरेन्स्की लोकसत्तेचा भोक्ता. त्या धामधुमीच्या कालांत त्यानें रशियांत लोकसत्ताक राज्य-पद्धति सुरू केली; पण ती अयशस्वी ठरून पुढें नोव्हेंबर महिन्यांतच दुसरी क्रांति झाली व लेनिन ह्या लोकोत्तर पुढाऱ्यानें प्रथमतः सर्व सत्ता आपल्याकडे ठेवून सोव्हिएट राज्यकारभार स्थापन केला. केरेन्स्कीसारखाच त्यानें उपक्रम सुरूं केला असता तर तोहि कदाचित निष्फलच ठरला असता. हल्लींहि रशियांत इंग्लंड, स्विट्झर्लंड, फ्रान्स वगैरे देशांप्रमाणें लोकसत्ताक राज्यपद्धती चालू आहे असें ह्मणतां येणार नाहीं. त्या राज्यकारभारावर एक-सत्तेची, ती साम्यवादी कां असेना, छाप बसली आहे.

महायुद्धाच्या पश्चात् राज्यकारभारांत सर्वत्रच पुष्कळ अव्यवस्थितपणा आला. इटलीमध्यें तर कम्यूनिस्ट लोकांनीं क्रांति करून ते आपली राज्यव्यवस्था स्थापन करणार तोंच मुसोलिनी हा लोकप्रिय पुढारी पुढें सरसावला. त्यानें जवळ जवळ आपलीच सत्ता स्थापन केली. पुढें अनेक लहान लहान युद्धप्रसंग होऊन त्यांत मुसोलिनीचाच विजय होत गेला. त्यामुळें त्याची सत्ता अधिकाधिक स्थिर होऊन आज त्याचा एकतंत्री राज्यकारभार सुरूं आहे. इटलीची राज्यपद्धति क्वचित् लोकसत्ताक दिसत असली तरी मुसोलिनीच्या आज्ञेवांचून पानहि हालत नाहीं अशी स्थिती तेथें उत्पन्न झाली आहे.

महायुद्धानंतरच तुर्कस्थान व इराण या दोन राष्ट्रांतहि अनुक्रमें केमालपाशा व पेहेलवी यांनीं एकसत्ता स्थापिली व कदाचित त्यामुळेंच आज या दोन्ही राष्ट्रांची स्थिति समाधान-कारक आहे. पैकीं एकानें लोकसत्तेचा डोलारा उभारून ठेवला असून दुसऱ्यानें राजसंज्ञाहि धारण केली आहे.

दक्षिण अमेरिका खंडांत पुष्कळशीं लहान लहान राष्ट्रें आहेत. तीं बहुतेक एकमेकांशीं लढतच असतात. या कारणास्तव जवळ जवळ सर्व राष्ट्रांतच लष्करी पुढाऱ्यांनीं आपापली सत्ता स्थापन केली असून तेच अध्यक्षपदावर आरूढ झाले आहेत.

स्पेन देशांत तर आतांआतांपर्यन्त लष्करी पुढारीच मुख्य प्रधान असून राज्यकारभाराचीं सर्व सूत्रें त्यांच्याच हातीं होतीं. १९३१ मध्यें तेथें रिपब्लिक ह्मणजे अराजक लोकसत्ता स्थापन झाली. आतां अनेक स्थित्यंतरें होत आहेत. पोलंड व चीन या देशांचीहि सामान्यतः अशीच स्थिति आहे. सर्व कारभार लष्करी पुढाऱ्यांचे हातीं.

या सर्व उदाहरणांवरून एक गोष्ट निर्विवाद सिद्ध होते. युद्धकालांत किंवा युद्धकालाच्या नंतर पुष्कळशा देशांत मोठी बिकट परिस्थिति उत्पन्न होते. शुद्ध लोकसत्ताक राज्यकारभारांत सुद्धां अशा प्रसंगीं मुख्य प्रधान, अध्यक्ष किंवा कार्यकारी मंडळ यांच्या हातीं सर्व सत्ता लोक आपखुषीनें देऊन टाकतात. तसें करणें आवश्यकहि असतें. मग जेथें केवळ नामधारी लोकसत्ता आहे व मध्यवर्ती सरकार फार प्रबळ नाहीं, तेथें सर्वसत्ताधिकाऱ्यांनीं एकसत्ता सुरूं करावी यांत नवल तें काय ? गंमत ही कीं अशा वेळीं स्थापन झालेली ही एकसत्ता कित्येकदां जनतेला व राष्ट्राला अहितकर न ठरतां सुखप्रद व कल्याणकारीच ठरते. अव्यवस्था, बंड, युद्ध यांमुळें उत्पन्न होणारी परिस्थिति एकसत्तेला पोषक ठरते यांत मात्र बिलकुल शंका नाहीं.

**एकसत्तेचें स्वरूपः—**बहुधा एकसत्ता स्थापन व्हावयाची ती लष्करी सामर्थ्यावरच. ती चिरकाल टिकावयाची तरी लष्करी सामर्थ्यावरच व मोडकळीस यावयाची तरीहि लष्करी कमकुवतीमुळेंच ! सारांश, लष्करी वर्चस्व ह्याच एकसत्तेचा मुख्य आधार होय. तो दूर होतांच एकसत्तेचा लोप होतो.

अलीकडे मात्र हे लष्करी सर्वसत्ताधिकारी आपली सत्ता प्रस्थापित करण्यांत व ती टिकविण्यांत बरेच चतुर झाले आहेत. कदाचित् लोकमताचा त्यांच्या कृतींवर परिणाम होत असावा. देशाच्या राज्यकारभाराची घडी विस्कटित होऊन त्यांनीं आपला अंमल सुरू केला ह्मणजे त्यास ते लोकसत्तेचें शक्य तेवढें जास्त स्वरूप देण्याचा प्रयत्न करतात. लोकशाहीप्रमाणें कायदेमंडळ, प्रधानमंडळ, न्यायमंदिरें व एकंदर कारभार स्थापन करून जणूं काय आपण प्रतिलोकसत्ताच चालूं केली आहे असें लोकांना भासविण्याचा त्यांचा प्रयत्न असतो. यामुळें त्यांना सहजासहजीं लोकमतहि आपल्याकडे करून घेतां येते, व ही एकच गोष्ट एकसत्तेच्या व्यवस्थितपणाला व कांहींशी स्थिरत्वालाहि कारणीभूत होते. पण वस्तुत: सर्व मुख्य सत्ता या सर्वाधिकाऱ्यांकडेच असते. त्यांच्या मताविरुद्ध एकहि कायदा पास व्हावयाचा नाहीं. त्यांच्या संमतीवांचून कोणत्याहि कायद्याची अंमलबजावणी व्हावयाची नाहीं. सर्व सैन्य त्यांच्या हुकमतीखालीं असतें. त्याच्या जोरावर सर्वाधिकाऱ्यांना कोणतीहि गोष्ट करणें सोपें असतें.

या विसाव्या शतकांत जगांतील पुष्कळशा राष्ट्रांत जी एकसत्ता स्थापन झालेली दिसून येते ती वरील प्रमाणेंच आहे. या शतकांत लोकसत्तेच्या कल्पनांचें जें वातावरण उत्पन्न झालें आहे त्याचाच इष्टप्रकारें या एकसत्ताक कारभारावर परिणाम झाला असला पाहिजे. सर्वस्वी अनियंत्रित, व उघड उघड लष्करी व जुलमी सर्वसत्ताधिकाऱ्यांना हल्लींची परिस्थिती कोणत्याहि प्रकारें अनुकूल नाहीं. तेव्हां भोंवतालच्या प्रतिकूल परिस्थितीमुळें विवश होऊन त्यांना हा लोकसत्तेचा डोलारा उभारावा लागतो असें अनुमान काढल्यास तें विशेष चुकीचें ठरणार नाहीं.

अनियंत्रित व जुलमी एकसत्तेपेक्षां लोकशाहीचें पांघरूण घेतलेली ही एवंयुक्त एकसत्ता पुष्कळ बरी हें कोणीहि कबूल करील. इटालीचा मुसोलिनी, रशियाचा स्टॅलिन, तुर्कस्थानचा केमालपाशा या सर्वांची एकसत्ता याच प्रकारची आहे. आणि ह्मणूनच ती तेथें तेथें लोकप्रिय ठरून यशस्वीहि झाली आहे. आणीबाणीच्या प्रसंगांतून या लोकोत्तर सर्वाधिकाऱ्यांनीं आपापल्या राष्ट्रांची सोडवणूक केल्यानें त्यांचें वर्चस्व साहजीकपणेंच पुष्कळ वाढलें आहे. व त्यांचा एकंदर राज्यकारभारहि राष्ट्रहिताला पोषक असल्यानें ही विसाव्या शतकांतली एकसत्ता मिळमिळीत लोकसत्तेपेक्षां अनेक दृष्टींनीं व अनेकपटींनीं चांगली असेंहि अनेक लोकांचें मत होऊं लागलें आहे. ह्मणून आतां एकसत्तेचे गुणदोष पाहूं.

**एकसत्तेचे गुणः—**एकसत्तेचे पुरस्कर्ते प्रथमत: असें ह्मणतात कीं लोकसत्तेच्या पुरस्कर्त्यांनीं एकसत्ताक राज्यपद्धतींतले दोष काढण्यांत अर्थ नाहीं. कारण शुद्ध लोकसत्तेला पुष्कळशा मर्यादा आहेत. किंबहुना मोठमोठ्या राष्ट्रांमध्यें शुद्ध लोकसत्ता स्थापन होणें शक्य नाहीं. लोकसत्तेंत कर्तबगार अल्पसंख्य लोकांचेंच प्राबल्य जास्त असून राज्यकारभाराचीं सूत्रें त्यांच्याच हातीं असतात. लोकसत्तेंत या अल्पसंख्य पुढाऱ्यांचें अस्तित्व ( Oligarchy ) अपरिहार्य व आवश्यकहि आहे. एकसत्तेंत या अल्पसंख्य लोकांच्या ऐवजीं एकाचीच सत्ता

असते. एकाची सत्ता असणें काय किंवा अल्पसंख्यांकांची सत्ता असणें काय, सारखेंच. लोकसत्तेचा मूळ उद्देश असा कीं एकंदर देशाची राज्यव्यवस्था जनतेच्या तंत्रानें व सल्ल्यानें चालावी. तें साधणें जर असाध्य ठरतें व राज्यसूत्रें अखेर मूठभर पुढाऱ्यांच्या हातीं जातात तर मग ती एकाच्याच हातीं असणें काय वाईट ? निदानपक्षीं ही गोष्ट फारशी दूषणावह व अनर्थावह नाहीं.

पण अशा रीतीनें एकसत्तेचें समर्थन करणें उचित होणार नाहीं. एकाच्याच हातीं सर्व सत्ता असली म्हणजे तिचा दुरुपयोग होण्याचा संभव जास्त. पांच दहा किंवा त्यापेक्षांहि अधिक लोकांच्या हातीं सत्ता आल्यास तिचा दुरुपयोग होण्याचा संभव कमी ही गोष्ट कोणालाहि नाकबूल करतां येणार नाहीं. शिवाय हे अल्पसंख्य लोक राज्याचीं सूत्रें हलवीत असले तरी ते अखेर लोकांच्या प्रतिनिधींनाच जबाबदार असतात. ते आपल्या अधिकाराचा दुरुपयोग करीत आहेत ही गोष्ट लोकांच्या स्पष्ट निदर्शनास येतांच ते त्यांना पदभ्रष्ट करण्यासहि मागेपुढें पहात नाहींत. एकसत्तेंत सर्वसत्ताधिकाऱ्याचें वर्चस्व लष्करी सामर्थ्यावर प्रस्थापित झालेलें असतें. त्याला लोकमत एकाएकीं पदच्युत करूं शकत नाहीं. लोकसत्तेंत लष्कर कार्यकारी मंडळाचे ताबेदार असतें, आपल्या मर्जीप्रमाणें तें कोणतीहि गोष्ट करणार नाहीं, तें कायद्याच्या तंत्रानें वागेल व चालेल. सर्वसत्ताधिकाऱ्याचा प्रत्येक शब्द कायदाच असतो. प्रधानमंडळाचा प्रत्येक शब्द कायदा नसून प्रत्येक कायदा त्याला शब्दशः पाळावा लागतो.

एकसत्तेचे पुरस्कर्ते आणखी एका रीतीनें आपल्या तत्वाचें समर्थन करतात. ते म्हणतात, अंदाधुन्दीच्या कालांत किंवा युद्धकालांत लोकसत्ता अगदीं क्षीणबल होत असते. लोकसत्तेच्या उदधीला सामान्य कालांत ( Normal times ) भरती येते व आणीबाणीच्या संकटप्रसंगीं ओहोटी लागते. अशा वेळीं एकसत्तेशिवाय दुसरें उत्कृष्ट संरक्षक तत्व लोकसत्तेला सांपडणें कठीण.

एकसत्तेचें अशा प्रकारें समर्थन करणें एका अर्थी अनुचित होणार नाहीं. राष्ट्रावर एखादें मोठेंसें संकट आलें म्हणजे तेथें लोकसत्ताक राज्यकारभार व्यवस्थितपणें चालणें फार कठीण असतें यांत संशय नाहीं. राष्ट्राला घोर संकटांतून मुक्त करण्यासाठीं सर्वसत्ताधिकारी खरोखरच फार उपयुक्त ठरतो. पार्लमेंटगृहांत सभासदांनीं बिकट परिस्थितीसंबधानें हवे तसे प्रश्न विचारणें, कार्यकारी मंडळाला विरोधीपक्षानें पदोपदीं अडथळा करणें, नाजूक प्रश्नांसंबंधानें सभागृहांत चर्चा करावयाला सरकारला भाग पाडणें, व सरकारनें तें ऐकलें नाहीं तर त्याच्या विरुद्ध वर्तमानपत्रांतून वाटेल तसा गवगवा करणें वगैरे गोष्टींमुळें शत्रुपक्षाचा फायदा होत असतो, व राष्ट्राचें त्या प्रमाणांत नुकसान होतें. विशेषेंकरून लोकसत्तेंतलें जें कार्यकारी मंडळ इतर पक्षांच्या पाठबळावर आपला कारभार चालवीत असतें त्याला सर्वाधिकाराच्या अभावीं कोणताहि परिणामकारक उपाय, क्षणाचाहि विलंब न करतां अमलांत आणतां येत नाहीं. अशा आपत्तिकालांत तर गुप्तपणा व शीघ्रता या दोन गोष्टी बहुमोल ठरतात. शत्रूपासून आपला हेतु गुप्त ठेवून जें कांहीं करावयाचें आहे तें शीघ्रतेनें करून टाकलें असतां कार्यसिद्धी होण्याचा संभव जास्त. लोकसत्तेंत ह्या दोन्ही गोष्टी साधत नाहींत. एखादा कायदा करावयाचा, एखादें धोरण ठरवावयाचें किंवा एखादी योजना अमलांत आणावयाची तर तिचा सर्व प्रकारें कायदेशीर रीतीनें खल झाला पाहिजे, व तो जाहीरपणेंच झाला पाहिजे हा लोकसत्ताक राज्यकारभाराचा एक मुख्य दंडकच आहे. तेव्हां साहजीकपणें धामधुमीच्या कालांत किंवा युद्धप्रसंगीं लोकसत्ताक राज्यव्यवस्था बरीचशीं पंगू व अपरिणा-

मकारक ठरते यांत नवल नाहीं. म्हणून राज्यकारभाराची सर्व जबाबदारी एकाच प्रबळ व कर्तबगार लष्करी पुढाऱ्याच्या हातीं असलेली बरी असें एकसत्तेचे पक्षपाती म्हणतात.

वरील विचारसरणींत अगदींच तथ्य नाहीं, असें नाहीं. पण त्याबरोबरच एक गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे. ती ही कीं सर्व लोकसत्ताक राज्यघटनेंत–मग ती नियंत्रित राजसत्ता असो किंवा अराजक लोकसत्ता असो–अशा प्रकारच्या बिकट परिस्थितीस तोंड देण्यासाठीं संरक्षक कायदे असतातच. नियंत्रित राजसत्तेंत सर्व अंतिम सत्ता राजाच्या हातीं असते. पार्लमेंटांतून पास झालेल्या सर्व बिलांवर किंवा ठरावांवर राजाची सही असल्याशिवाय तो कायदा होऊं शकत नाहीं व त्याची अंमलबजावणी होत नाहीं. सामान्यतः तो केवळ सहीच करतो. पण अशा प्रसंगीं या सहीमुळें प्राप्त झालेल्या सर्व सत्तेचा त्याला उपयोग करतां येतो. किंवा ही गोष्ट तो प्रधानमंडळाला विश्वासांत घेऊन करतो. अराजक लोकसत्तेंत वेळप्रसंगीं सर्व सत्ता अध्यक्षाच्या हातीं जाण्याची तरतूद राज्यघटनेंत करून ठेवलेली असतेच. शिवाय या घोर संकटकालांत बहुतकरून देशांतील सर्व पक्ष आपापले मतभेद बाजूला ठेवून सरकारला हवी ती मदत करण्यास तत्पर असतात. गतमहायुद्धापूर्वी स्थापन झालेल्या सर्व देशांतील लोकशाही शीरसलामत राहिल्या या एकाच गोष्टीवरून असें निश्चित सांगतां येईल कीं लोकसत्तेला बिकट परिस्थितीशींहि यशस्वीपणें झगडतां येते.

पण एकसत्तेच्या समर्थकांच्या विचारसरणींत एक मोठाच दोष आहे. आणीबाणीच्या प्रसंगीं जी काय उपाययोजना करावयाची ती गुप्तपणें व तडकाफडकीं करतां यावी हा मुद्दा कोणालाहि पटण्यासारखा आहे. पण त्यासाठीं एकाच्याच हातीं सर्वाधिकार सोपविण्यांत काय हंशील आहे ? तो अधिकार प्रधानमंडळाच्या किंवा राज्याध्यक्षाच्या हातीं वहिवाटीनें किंवा कायदेशीर रीतीनें सोंपविलेला असतो यांत काय वावगें आहे ? सर्व सत्ता एकाच्याच हातीं देण्यापेक्षां एका लहानशा, सर्व सभासदांमध्यें मतैक्य असलेल्या कार्यकारी मंडळाकडे ती दिलेली काय वाईट ? एका मनुष्याच्या हातून चुका होण्याचा संभव जास्त. कदाचित् या छोटयाशा मंडळाकडूनहि त्या होतील. पण संभव कमी असतो एवढेंच.

आणीबाणीचे प्रसंग राष्ट्रावर नेहमींच येत असतात अशीहि गोष्ट नाहीं. घटकाभर हें कबूल करूं कीं राष्ट्रीय आपत्तीच्या कालांत एकसत्ता जास्त परिणामकारक ठरते. पण ही आपत्ति सारखीच सुरूं असते असें नाहीं. मधून मधून ती येते. त्यासाठीं एकसत्ता कायमचीच सुरूं ठेवावी असें ह्मणणें योग्य होणार नाहीं.

पण एकसत्ता स्थापन करण्याचें कारण या लोकांच्या दृष्टीनें निराळेंच आहे. तें असें कीं लोकसत्तेपेक्षां एकसत्तेंत लोकांचें कल्याण व राष्ट्राचें हित अधिक लवकर साधतां येतें. सर्वसत्ताधिकाऱ्याच्या मनांत येतांच राष्ट्रहिताला पोषक असतील त्या सर्व सुधारणा तो सहज व शीघ्र घडवून आणण्याच्या प्रयत्नास लागतो. या दृष्टीनें पाहतां लोकसत्ता जास्त चिकित्सक असते. एखादी महत्वाची गोष्ट केल्यास कायदेमंडळांत तिला पाठिंबा मिळेल कीं नाहीं, सामान्य जनतेचा तिच्याबद्दल काय अभिप्राय आहे, वर्तमानपत्रें काय ह्मणतील वगैरेबद्दल प्रथम विचारविनियम होऊन बरोबर कायदेशीर रीतीनें आस्ते आस्ते त्या सुधारणेचा कायदा कायदेमंडळांतून प्रतिपक्षांच्या विरोधाचे ठोके खात खात बाहेर पडतो. नंतर त्याची हळूहळूं अंमलबजावणी होत असते. अर्थात हा सारा विलंब फुकट गेला. एकसत्तेंत सर्वसत्ताधिकाऱ्याच्या मनांत एखादी गोष्ट येतांच तो तडकाफडकीं ती शेवटास नेतो व आपला उद्देश सफल

करतो. या मुद्याच्या पुष्ट्यर्थ एकसत्तेचे पुरस्कर्ते मुसोलिनी, केमालपाशा, लेनिन, स्टॅलिन या सर्वसत्ताधिकाऱ्यांच्या सत्कृतींचे दाखले देतात. इटली हें पूर्वीपासूनच प्रबळ राष्ट्र आहे. पण युद्धानंतरच्या कालांत तें बरेंच क्षीणबल झालें होतें. मुसोलिनीनें आपल्या कर्तबगारीनें तेथें अनेक इष्ट सुधारणा घडवून आणल्या. लोकसत्तेंत इटलीची प्रगति अशी वायुवेगानें झाली नसती. आज जगांत इटली हें एक अत्यन्त प्रबळ राष्ट्र असून त्याचा दरारा सर्वत्र पसरलेला आहे. त्याची औद्योगिक भरभराट पुष्कळ झाली आहे. या सर्वांचें श्रेय केवळ मुसोलिनीलाच आहे. रशियांत जी साम्यवादी क्रांति झाली, ती तर जगाच्या इतिहासांत अभूतपूर्व अशीच आहे. ती यशस्वी होईल असें पुष्कळांना वाटत नव्हतें. १७८९ मधल्या फ्रेंच राज्यक्रांती-प्रमाणेंच ती अल्पकालीन व अयशस्वी ठरेल असेंच बहुतेकांना वाटत होतें. पण ही क्रांति होऊन आतां अठरा वर्षें झालीं. ती यशस्वी झाली असें म्हणण्यास आतां कोणतीच हरकत नाहीं. ती स्थीर झाली असून रशियांत पुन्हां प्रतिक्रांति घडून येईल अशी भीति बाळगण्यास मुळींच कांहीं कारण नाहीं. पण या यशाचें श्रेय साम्यवादाच्या लोकप्रियतेला व सार्वजनिक स्वीकाराला न देतां या क्रांतीचे जे सूत्रधार व कर्णधार होते व आहेत त्यांच्याकडेच आहे. लोकोत्तर कर्तबगारी, अद्वीतीय कार्यकुशलता व थोर लोकप्रियता हेच त्यांचे गुण यशाच्या बुडाशीं आहेत. सर्वांनीं त्यांच्यावर विश्वास ठेवला. त्यांनीं सर्वाधिकार आपण होऊन त्यांना दिला. व सर्व-सत्ताधिकारी होतांच त्यांनीं इष्ट सुधारणा घडवून आणल्या. तुर्कस्थानमध्यें केमालपाशानेंहि अशाच प्रकारची प्रसंशनीय कामगिरी करून दाखविली. या अप्रतीम लष्करी पुढाऱ्यानें महा-युद्धांत पराभूत, हतबल व विदीर्ण [ disintegrated ] झालेल्या तुर्की साम्राज्याचा नाद सोडून आपल्या राष्ट्राचें—तुर्कस्थानचें—संरक्षण केलें, व आपल्या लष्करी सामर्थ्याच्या जोरावर भराभर सुधारणा घडवून आणल्या. राज्यकारभाराशीं खिलाफतीची फारकत करणें, स्त्रियांचा गोषा बेकायदेशीर ठरविणें, जनतेच्या पोशाखांत बदल करणें, मूळ लिपी बदलून तिच्या ऐवजीं लॅटिन लिपी प्रचारांत आणणें इत्यादि सुधारणा तर इतक्या क्रांतिकारक आहेत कीं त्या लोकसत्तेंत एवढ्या सुलभतेनें होणें प्राय: अशक्यच. पण केमालपाशाच्या हातीं सर्वा-धिकार असल्यानें, लोकांना आवडो वा न आवडो, करावयाचें तें त्यानें केलेंच. आज तुर्क-स्थान पूर्वीचें पुराणप्रिय व मागसलेलें राष्ट्र राहिलें नसून तें एक प्रगमशील व भरभराटलेलें राष्ट्र बनलें आहे. याचें श्रेय प्रबळ एकसत्तेलाच आहे हें कोणीहि नाकबूल करणार नाहीं.

हीं व यासारखींच जीं इतर उदाहरणें इतिहासांत घडलीं आहेत त्यावरूनच एकसत्तेचे पुरस्कर्ते कांहीं अशीं लोकसत्तेच्या विरुद्ध झाले आहेत. एवीतेवी राज्यकारभार कोणी का चालवेना, प्रजेला, जनतेला सुख झालें, तिचें कल्याण झालें कीं झालें. राष्ट्राची उन्नति करणें, जनतेचें सुख व समाधान साधणें हाच राज्यकारभाराचा मुख्य उद्देश. तो उद्देश कोण-त्याहि प्रकारें साधला तर त्यांत काय वावगें ? लोकसत्ता, राजसत्ता किंवा एकसत्ता हें एक साधन आहे, साध्य नव्हे. मग साधनाविषयीं इतकी चर्चा करण्याचें प्रयोजन काय ? एकसत्तेनें सर्व गोष्टी जर सहज व शीघ्र साध्य होतात तर मग तिच्या सार्वत्रिक स्थापनेला लोकांनीं पाठिंबा कां देऊं नये ? अशा प्रकारची विचारसरणी हे एकसत्तावादी पुढें मांडतात. याला थोडक्यांत उत्तर देऊं.

कांहीं कांहीं सर्वसत्ताधिकारी खरोखरच कर्तबगार व राष्ट्रहितदक्ष असतात. पण जगाच्या इतिहासांत अशा लोकोत्तर माणसांच्या सत्कृतींचा जसा उल्लेख सांपडतो तसाच सत्ताधिशांच्या दुष्कृतीहि नमूद केलेल्या आढळतात. प्रजेला वात्सल्यानें वागविणारे जसे कित्येक राजे होऊन गेले तसेंच प्रजेवर अनन्वित अत्याचार करणारे पशुतुल्य राजेहि पुष्कळ होऊन गेले. एकसत्तेचा

जर पुरस्कार करावयाचा तर मग राजसत्तेचाहि कां करूं नये ? पुष्कळशा सर्वसत्ताधिकाऱ्यांनीं इतिहासास शोभविलें आहे, तद्वतच पुष्कळशा नृपतींनींहि उत्कृष्ट कामगिरी केली असून आपण अजूनहि त्याच्या कृतींकडे आदरयुक्त दृष्टीनें पाहतों. एकसत्ता लोकहितकारी तशी राजसत्ता कां असूं नये ? एकसत्तेच्या ऐवजीं राजसत्तेचाच पुरस्कार कां करूं नये ? पण आतां राजसत्ता अगदींच टाकाऊ व मृतप्राय ठरली आहे. तिचें पुनर्जीवन होणें अशक्यच दिसतें. लोकसत्तेच्या देदिप्यमान सूर्यप्रकाशामुळें राजसत्तेचें लुकलुकणारे तारकांचें तेज अगदीं फिकें पडलें आहे. सर्वांत जो अधिक प्रबळ तोच टिकाव धरून राहतो हा तर सामान्य सिद्धान्त ( Survival of the fittest ) आहे. हा सिद्धान्त लोकसत्ता व राजसत्ता यांना लागं केला तर काय दिसून येतें ? राजसत्तेचा जगांत जवळ जवळ लोप झालेला असून या विसाव्या शतकांत तर लोकसत्तेचा सर्वत्र विजय होत आहे. तूर्त त्याला ग्रहण लागलें आहे एवढेंच !

राजसत्ता व एकसत्ता यांमध्यें विशेष महत्वाचा फरक नाहीं. राजसत्तेंत परंपरागत राजवंशांतील लोकांना राज्यपद मिळतें तर एकसत्तेंत प्रायः अत्यन्त बलिष्ट अशा लष्करी पुढाऱ्याला. पण राजापेक्षां हे लष्करी पुढारी एक प्रकारें वाईटच ! कारण त्यांनीं एकदां आपली सत्ता स्थिर केली कीं त्यांच्याच लहरीप्रमाणें सर्व कारभार चालावयाचा व अशा लोकांना अधिकारभ्रष्ट करणें फार कठीण. कांहीं सर्वसत्ताधिकारी राष्ट्राला हितकारी ठरतांच एकसत्ता बरी अशा प्रकारचा एकदम सिद्धान्त ठोकून देणें योग्य होणार नाहीं. हे सत्ताधारी पुढारी नेहमींच कर्तबगार व लायक ठरतात याची खात्री काय ? बरें, एकदां त्यांनीं आपल्या सत्कृतींनीं लोकांचीं मनें आपल्याकडे वळविलीं, व मग हळूहळू आपला स्वार्थ साधण्यास प्रारंभ केला तर मग कसें ? त्यांच्या हातून चुका होणार नाहींत याची ग्वाही कोणी द्यावी ? वारंवार लोकसत्तेच्या विरुद्ध त्यांनीं कृत्यें केलीं तर त्याला जबाबदार कोण ? पांचामुखी परमेश्वर हें तत्व लोकसत्तेच्या बुडाशीं आहे, व तें उत्कृष्ट ठरलें आहे. एकसत्तेंत एकाच्याच लहरीनें राज्यकारभार चालावयाचा असल्यानें तो दीर्घकालपर्यन्त लोकांना सुखकर व राष्ट्राला हितकर ठरेल याची शाश्वति नाहीं.

**एकसत्तेचे दोषः—**कित्येकदां असें होतें कीं सर्वाधिकार प्राप्त होणें ह्मणजे राज्याच्या सिंहासनाची एक पायरी चढणें यासारखेंच ठरतें. स्वकर्तबगारीनें व पराक्रमानें मिळविलेलीं राज्यकारभाराचीं सूत्रें शेवटीं आपण होऊन दुसऱ्याच्या हातीं देऊन टाकावीत हें सर्वसत्ताधिकाऱ्यांना मनापासून वाटत असेल का याबद्दलच प्रथम शंका उत्पन्न होते. तसें त्यांना खरोखरच वाटत असल्यास ते जगाच्या आदराला पात्र आहेत असें समजलें पाहिजे. पण सामान्यतः इतकी निःस्वार्थता, एवढी उदात्त देशभक्ति सामान्य जनांमध्यें दिसून येत नाहीं. इतिहासांत अशीं कित्येक उदाहरणें घडलीं आहेत कीं जेव्हां या सत्ताधिकाऱ्यांनीं आपलें स्वतःचें राज्य स्थापन करण्याचा प्रयत्न केला. थोडेंसे ऐतिहासिक विहंगमावलोकन केल्यास ही गोष्ट ताबडतोब लक्षांत येईल.

इंग्लंडच्या इतिहासांत क्रॉमवेलची गोष्ट महशूरच आहे. पहिल्या चार्लस राजाच्या अत्यंत जुलमी वर्तनाला कंटाळून इ. स. १६४० मध्यें राजा व प्रजा यांमध्यें घनघोर युद्ध माजलें. या यादवींत क्रॉमवेलनें आपल्या अचाट लष्करी सामर्थ्यानें पार्लमेंटच्या बाजूनें लढून राजपक्षाचा पूर्ण पराभव केला. त्यास शेवटीं तुरुंगांत टाकलें. पण राजा तेथूनहि कारस्थानें रचीत असे. तेव्हां त्याचा शिरच्छेद केल्याशिवाय देशांत शांतता नांदावयाची नाहीं असें सैन्याला वाटलें.

लवकरच राजाची चौकशी झाली व त्यास सुळावर चढविलें. व नंतर इंग्लंडमध्यें कॉमन वेल्थ उर्फ लोकांचाच राज्यकारभार सुरू झाला व क्रॉमवेल या राज्याचा लॉर्ड प्रोटेक्टर उर्फ सर्वसत्ताधिकारी बनला. पण क्रॉमवेल व पहिला चार्लस् यांच्या राज्यकारभारांत विशेष फरक नव्हता ! चार्लस् राजानें रोमन कॅथलिक पंथाचा पक्षपात करून प्रॉटेस्टंट पंथाविरुद्ध अप्रत्यक्ष मोहीम सुरू केली, तर क्रॉमवेलनें प्यूरिटन पंथ उराशीं बाळगून उघड उघड तो प्रस्थापित करण्याचा यत्न केला. चार्लस् 'राजा हा ईश्वराचा अंश आहे' हें तत्व मानणारा असून अनियंत्रित राजसत्तेचा पुरस्कर्ता होता तर क्रॉमवेल केवळ अनियंत्रित राज्यकारभारचा भोक्ता होता. चार्लसूनें चारपांचदां पार्लमेंट मोडली तर क्रॉमवेलनेंहि तीन चारदां तसें केलें. प्रजेला चार्लसूचा अंमल जसा जुलमी ठरला तसाच क्रॉमवेलचाहि ठरला. क्रॉमवेलनें राजाचे सर्व अधिकार आपल्याकडे घेतले. त्याच्या संमतीशिवाय एकहि कायदा पास व्हावयाचा नाहीं. एवढेंच नव्हें तर एका पार्लमेंटनें क्रॉमवेलला राज्यपदहि अर्पण करण्याचा बूट घातला. पण क्रॉमवेल धूर्त. आपणास इतक्या अल्पावधींत हें राज्य पचावयाचें नाहीं असें समजून त्यानें ही देणगी साभार नाकारली ! या बाबतींत सर्वसत्ताधिकाऱ्याला राजा बनविण्याचा प्रयत्न करण्यांत आला. पण परिस्थितीमुळें तो फसला. तथापि राजाचा कारभार जसा जुलमी तसाच सर्वसत्ताधीशाचाहि असतो, नाहीं असें नाहीं, ही गोष्ट प्रत्ययास येते.

फ्रान्सच्या इतिहासांत तर असलीं उदाहरणें बरींच सांपडतात. फरेंच राज्यक्रांतीनंतर तीन वर्षांनींच (१७९२) फरान्सचा राजा सोळावा लुई याला फाशीं देण्यांत आलें. त्या नंतर पुष्कळशा राज्यघटना अमलांत आल्या. या प्रत्येक राज्यघटनेंत हळूहळू लोकांची सत्ता कमी करून ती उत्तरोत्तर थोडथोड्या माणसांच्या हातीं केंद्रित केली गेली. दरम्यान नेपोलियन बोनापार्ट आपल्या अचाट लष्करी प्रभावानें लोकांची कौतुकदृष्टि दिपवून टाकीत होता. लवकरच तो फरान्स देशाचा फर्स्ट कॉन्सल किंवा सर्वसत्ताधिकारी बनला. नंतर लवकरच त्याला जिवें ठार करण्याचा कट उघडकीस आला. ही संधी साधून त्यानें १८०३ मध्यें बादशहाचा किताब धारण केला. त्यापुढें त्याचें सर्व आयुष्य शत्रूंशीं लढण्यांतच गेलें. पण मुख्य लक्षांत ठेवण्याजोगी गोष्ट ही कीं एकदां सर्वाधिकार प्राप्त झाल्यावर नेपोलियनला राजा होण्यास योग्य संधि सांपडली व अखेर सर्वसत्ताधीशाचा तो सार्वभौम राजाहि झाला.

नेपोलियन–युद्ध १८१५ पर्यंत चालू होतें. या वर्षी वाटर्लू येथें त्याचा पूर्ण पराभव होऊन बोरबोनचें घराणें फ्रान्स देशांत पुनश्च स्थापन झालें. तें १८३० पर्यंत चालू होतें. या वर्षी पुन्हा क्रांति झाली व अधिक उदारमतवादी अशा ऑर्लीन्सच्या घराण्याची राजसता स्थापन झाली. ती १८४८ पर्यन्त अबाधितपणें चालू होती. पण १८४८ मध्यें पुन्हां तिसरी राज्यक्रांति होऊन अराजक लोकसत्ता (Republic) दुसऱ्यांदा अस्तित्वांत आली. नेपोलियनच्याच वंशांतला एक लोकप्रिय पुढारी–लुई नेपोलियन बोनापार्ट–हा प्रचंड बहुमतानें राज्याध्यक्ष झाला. आतां राष्ट्राची अखिल सत्ता त्याच्या हातीं आली. तिचा फायदा घेऊन त्यानें १८५१ मध्यें मतास टाकून ही अध्यक्षांची सत्ता दहा वर्षांपुरती वाढवून घेतली व त्यानंतर पुन्हां लोकांचें बहुमत आपल्याकडे वळवून तो बादशहा झाला ! दुसरें नेपोलियन–साम्राज्य तें हेंच.

आणखी एक अलीकडचें उदाहरण चीनच्या इतिहासांत सांपडतें. विसाव्या शतकाच्या आरंभीं चीनमध्यें मांचू घराण्याचें राज्य होतें. त्याचा अंमल अत्यंत जुलमी पण परक्या युरोपियन लोकांना हितकर असा होता. चीनी लोक फार संतापून गेले होते. १९१० मध्यें

त्या देशांत एक उग्र राज्यक्रांति झाली. मांचू घराणें पदभ्रष्ट होऊन चीनमध्यें अराजक लोकसत्ता स्थापन झाली. तिचा पहिला अध्यक्ष युआनशीकाय हा लष्करी पुढारी होता. लवकरच त्यानें आपण स्वत: राजा होण्याचा कट केला. पण चीनच्या सुदैवानें ही गोष्ट लवकरच उघडकीस आली. इतर चीनी लष्करी पुढारी एक होऊन युआनशीकायचा पूर्ण पराभव झाला.

गतमहायुद्धानंतरहि अशा प्रकारचीं एकदोन उदाहरणें घडलेलीं आहेत. यावरून सर्वाधिकार प्राप्त झाल्यावर राजसत्ता स्थापन करण्याची प्रवृत्ति केवळ एकोणीसाव्या शतकांतील किंवा तत्पूर्वीचीच नसून या विसाव्या शतकांतील लोकशाहीच्या कालांतहि दिसून येते ही गोष्ट सिद्ध होते. महायुद्धानंतर तुर्की साम्राज्याप्रमाणें इराणचीहि राज्यकारभाराची घडी विस्कटलेलीच होती. तेथेंहि क्रांति होऊन एक मुख्य प्रधान प्रथम सर्वसत्ताधिकारी बनला व पुढें लवकरच त्यानें राजसत्ता स्थापून आपल्या घराण्याचा अंमल सुरू केला ! फार काय पण केमालपाशाबद्दलहि अशाच प्रकारच्या भुमका मागें उठल्या होत्या. तुर्कस्थानांत तो आपलें स्वत:चें राज्य चालू करणार आहे अशी दाट वदंता तुर्कस्थानी राज्यक्रांतीनंतर सर्वत्र पसरली होती.

अगदीं ताजें उदाहरण म्हणजे अफगाणिस्थानमधील. बच्चाईसाकूच्या बंडामुळें अमीर अमानुल्लाचें आसन डळमळीत झालें व अखेर त्याला राज्यत्याग करावा लागला. त्यानंतर अफगाणिस्थानांत यादवी सुरू झाली. पण इतक्यांत फ्रान्सच्या दरबारीं असलेला अफगाणांचा वकील नादिरखान हा लष्करी पुढारी परत स्वदेशीं आला. त्यानें शत्रुपक्षाचा बीमोड करून देशांत शांतता स्थापन केली. व लवकरच त्यानें आपली राजसत्ताहि सुरू केली. येथेंहि लष्करी पुढारी व राष्ट्राचा सर्वसत्ताधिकारी हळुहळू आपला जम बसवून राजा कसा होतो हें उत्कृष्ट रीतीनें पहावयास सांपडतें.

वरील उदाहरणांवरून एक गोष्ट निर्विवाद सिद्ध होते, ती ही कीं एकसत्तेचें पर्यवसान राजसत्तेत होण्याचा संभव बराच असतो. आतां राजसत्ता टाकाऊ ठरली आहे. या विसाव्या शतकांत तिला बिलकूल थारा नाहीं. राजसत्तेचा कट्टा पुरस्कर्ता सर हेन्री मेन हा विद्यमान असतां तर कदाचित त्यानेंहि आपल्या मतांचें परिवर्तन करून लोकसत्तेच्या तत्वाला पाठिंबा दिला असता. तेव्हां एकसत्तेचा पुरस्कार करून राजसत्तेचें पुनरुत्थापन करणें म्हणजे हातीचें सोडून पळत्याच्या पाठीमागें धांवण्याचा प्रयत्न करण्यासारखेंच हास्यास्पद आहे.

**लोकसत्ता व एकसत्ता**—वरील विवेचनावरून हें दिसून येईल कीं एकसत्ता राष्ट्राला व जनतेला दीर्घकालपर्यंत सुखकर होईल अशी श्रद्धा बाळगणें व्यर्थ आहे. हल्लीं ज्या कांहीं ठिकाणीं एकसत्ता स्थापन झाली आहे, ती कदाचित् अकस्मातच राष्ट्राला हितकर ठरली असेल. मुसोलिनीच्या पश्चात् फॅसिझमची प्रगति इटलींत कशी काय होतें हें पहावयाचें आहे. त्यावरूनच एकसत्ता त्या देशाला कायमची हितसंवर्धक होण्याजोगी आहे काय हें ठरवितां येईल पण मुसोलिनीचा अंमल राष्ट्रहितकारी झाला ही गोष्ट मान्य केली तरी हें कबूल करावें लागेल कीं त्याच्यासारखें असामान्य, कर्तबगार, राष्ट्रहितदक्ष, प्रामाणिक व निस्वार्थी लष्करी पुढारी सर्व राष्ट्रांना सदासर्वकाल लाभतीलच असें नाहीं. मुसोलिनीसारखे लोक विरळा त्याचा कारभार यशस्वी झाला असेल, पण त्यावरून सर्व एकसत्ता अशाप्रकारें यशस्वी होईल हें अनुमान काढणें चुकीचें ठरेल.

लोकसत्तेच्या कारभारांत केव्हां केव्हां गोंधळ माजतो, जागतिक कारणांमुळें राज्याची घडी विस्कटित होते, एखादे वेळीं बंडाची भीती असते व मधून मधून युद्धप्रसंगहि उद्भवतात

अशा परिस्थितींत लोकसत्ता क्षीणबल होते. तिचा कारभार परिणामकारक ठरत नाहीं. जें धोरण आंखावयाचें किंवा ज्या उपायांची अंमलबजावणी करावयाची ती वेळेवर न होतां दिरंगाईनें होते. अशा प्रसंगीं राष्ट्रांतील कायदे-मंडळानें ठराविक कालासाठीं एखाद्या लायक माणसाला सर्वसत्ताधिकारी नेमणें चांगलें. देशांत स्थीरस्थावर झाल्यावर, राज्यकारभाराची घडी पुन्हां नीट बसल्यावर किंवा संकट निघून गेल्यावर कायदे-मंडळानें सर्व कारभार परत आपल्या हातीं घ्यावा. किंवा एकाच्या ऐवजीं दोन किंवा तीन माणसांचें एक मंडळ नेमून त्याच्याकडे सर्व जबाबदारी सोंपवावी. असें करणें अधिक चांगलें. सारांश, लोकसत्तेला मधून मधून सर्वसत्ताधीशाची आवश्यकता भासते. किंबहुना अशा प्रकारची योजना राज्यघटनेंत स्पष्ट असली म्हणजे लोकसत्तेचा संसार अबाधित व निष्कंटक चालू लागेल. अर्थात् राष्ट्रावर आपत्ति येतांच सर्व पक्ष आपापले तीव्र मतभेद विसरतात व मिळून मिसळून राज्याचा कारभार चालविण्यास हातभार लावतात. पण हें जितकें उत्तम रितीनें व्हावें तितकें होत नाहीं व अशा प्रकारची ऐक्यवृत्ति प्रत्येक प्रसंगीं दिसून येतेच असेंहि नाहीं. म्हणून संकटापासून राष्ट्राचें संरक्षण करण्यासाठी वर उल्लेखलेली योजना राज्यघटनेंत असणें बरें.

लोकसत्तेंत दोष असतील-आहेतच. पण एकसत्तेंत ज्याप्रमाणें राष्ट्राची भराभर प्रगति झाल्याचीं उदाहरणें आहेत तद्वतच लोकसत्तेंतहि झाल्याचीं उदाहरणें विपुल आहेत. लायक व प्रामाणिक सर्वसत्ताधिकारी चांगला असें गृहीत धरून चाललें तरी एकसत्ता व लोकसत्ता यांना ससा व कांसव यांच्या शर्यतीची उपमा देण्यास कोणतीच हरकत दिसून येत नाहीं. सामान्यत: लोकसत्तेंत राष्ट्राची प्रगति कांसवाच्या गतीप्रमाणें हळुहळुं, धिम्मेपणानें, नेटानें पण खात्रीपूर्वक व यशपूर्वक होत असते. उत्कृष्ट एकसत्तेंत राष्ट्राची प्रगति सशाच्या गतीप्रमाणें अधिक जोरानें व आरंभोत्साहानें होते. पण ती अखेर चिरकालीन यशाची ठरेल असें निश्चयपूर्वक सांगतां येत नाहीं. ससा व कांसव यांच्या शर्यतींत ज्याप्रमाणें आपण कांसवाच्या धिम्मेपणाच्या व चिकाटीच्या गतीचें कौतुक करतों तसेंच लोकशाहीचेंहि केलें पाहिजे. जो हळुहळुं पण दृढनिश्चयानें आपला मार्ग आक्रमण करतो तोंच शेवटीं यशस्वी ठरतो हा व्यक्तीला लागूं होणारा सिद्धान्त राष्ट्रालाहि लागूं करायला हरकत नाहीं.

---

प्रकरण १५ वें.

# लोकसत्तेचें भवितव्य

## (४) संघसत्ताक लोकशाही

मागें वर्णन केल्याप्रमाणें तीन ध्येयांचा लोकसत्तेवर जसा परिणाम होण्याचा संभव आहे तद्वतच आणखीहि एक नवीन ध्येय लोकसत्तेच्या भवितव्याशीं संलग्न होऊं पहात आहे. हें ध्येय म्हणजे संघसत्ता. हे संघ दोन प्रकारचे असतात. पहिला शेजारसंघ व दुसरा औद्योगिक संघ. या दोन प्रकारच्या संघांशीं राष्ट्राचा प्रत्येक घटक तद्रूप होऊन जें एक सार्वत्रिक एकमत निर्माण होईल तें अमलांत आणण्याची राज्यव्यवस्था म्हणजेच खरी लोकसत्ता असें या संघसत्ताक लोकशाहीच्या पुरस्कर्त्यांचें म्हणणें आहे.

**जुनी लोकसत्ता व नवी लोकसत्ता**—आतां यावर कोणी असें म्हणेल कीं ह्या लोकसत्तेच्या कल्पनेंत नाविन्य कोणतें ? हल्लीं प्रचारांत असलेली लोकसत्ता व वर उल्लेखलेली लोकसत्ता यांत फरक कोठें आहे ?

हल्लीं प्रचारांत असलेल्या लोकसत्ताक राज्यपद्धतींत आपण काय पाहतों ? लोकांना मताधिकार दिलेला असतो, निवडणुकीच्या वेळी ते आपले प्रतिनिधी निवडतात. अनेक पक्ष स्थापन होतात. प्रत्येक पक्षाचा कार्यक्रम निरनिराळा असतो ज्या पक्षाचे प्रतिनिधी बहुमतानें निवडून येतात तो पक्ष राज्यकारभाराचीं सर्व सूत्रें आपल्या हातीं घेऊन इतर पक्षांच्या मतांची फारशी पर्वा न करतां आपलाच कार्यक्रम अमलांत आणण्याचा प्रयत्न करीत असतो. व कायदेमंडळांत त्याचें बहुमत असल्यानें त्याच पक्षाचा उद्देश सिद्धीस जातो. म्हणजे सामान्यत: असें म्हणतां येईल कीं लोकसत्ता म्हणजे मतदारांनीं निवडून दिलेल्या बहुसंख्याक प्रतिनिधींच्या तंत्रानें चालणारा राज्यकारभार. पण या राज्यकारभारावर देशांतील बहुमत (व कित्येकदां तर तेंहि नाहीं) प्रतिबिंबित झालेलें असतें; सार्वत्रिक एकमताची त्याच्यावर पूर्ण छाप बसली नसल्यानें सर्व लोकांचें जींत अंग आहे अशा प्रकारची ही राज्यव्यवस्था नव्हे. म्हणून या पद्धतीला खरीखुरी लोकसत्ता म्हणतां येणार नाहीं.

नवीन लोकसत्तेची मुख्य पुरस्कर्ती एम्. पी. फॉलेट* ही होय. हिच्या म्हणण्याप्रमाणें खरी लोकसत्ता म्हणजे परस्परांच्या योगानें चाललेल्या व परस्परांशीं तद्रूप झालेल्या, अखिल जनतेचा राज्यकारभार. (Democracy is the rule of an interacting, inter-permeating whole.) राज्यकारभारावर पूर्ण सार्वत्रिक एकमताची छाप बसली पाहिजे हा या बाईचा मुख्य कटाक्ष आहे. बहुमतानें राज्यकारभार चालविणें यांत पुरुषार्थ नाहीं. खऱ्या लोकसत्तेचें तें तत्वहि नाहीं. कित्येकदां प्रतिनिधी लोकमताच्याहि विरुद्ध जातात.

* The New State:—M. P. Follet.

वास्तविक मतदार हे खरे राज्यकर्ते असावयास पाहिजेत. पण राज्यकारभारासंबंधानें त्यांना साधारणपणें तीन वर्षांतून एकदांच आपलें मत प्रदर्शित करण्याचा अधिकार असतो; व तोहि अमुक कायदा बरा किंवा वाईट यावर नव्हे, तर अमुक उमेदवारावर त्यांचा विश्वास आहे किंवा नाहीं यावर. व असेल तर त्यालाच मत देण्याचें त्यांचें कर्तव्य आहे. कित्येकदां तर प्रतिनिधींचीं मतें पूर्णपणें मतदारांच्या मतांविरुद्ध असतात. म्हणून कायदेमंडळें संपूर्ण प्रातिनिधिक असूं शकत नाहींत. अशा प्रकारच्या राज्यकारभाराला खरी लोकसता म्हणणें युक्त नाहीं.

एखाद्या हौदांत प्रत्येक मनुष्यानें तांब्या तांब्या पाणी आणून ओतावें व तो पूर्ण भरावा, तशा प्रकारचें लोकसत्तेचें स्वरूप असलें पाहिजे. राष्ट्रीय जीवनांत प्रत्येकाचें जीवनतत्व पूर्णतेनें एकरूप झालें पाहिजे. राज्यकारभारांत आपलेंहि अंग आहे, राज्यकारभारांतल्या प्रत्येक गोष्टीला आपली संमति आहे, एवढेंच नव्हे तर ती ठरविण्यास आपण मदत केलेली आहे अशी भावना प्रत्येक नागरिकाची झाली तरच ती खरी लोकसत्ताक राज्यव्यवस्था. जेणेंकरून लोकांच्या खऱ्या मताचें राज्यकारभारांत रूपांतर होईल अशा व्यवस्थेलाच लोकसत्ता म्हणतात.

अशा प्रकारची राज्यव्यवस्था स्थापन करण्यासाठीं सर्वांनीं लोकसत्ताकपद्धतीनें राहिलें पाहिजे एकमेकांत मिसळलें पाहिजे. एकमत दाखविलें पाहिजे. मतभेद असला तर तो कां व कसा घालवावा याचा विचार केला पाहिजे. आपल्या गरजा व इतरांच्या गरजा लोकोपयोगी ठरल्या तर त्या पूर्ण झाल्या पाहिजेत. प्रत्येकानें जबाबदार व्यक्तीप्रमाणें वागलें पाहिजे फॉलेट म्हणते--

To have democracy, we must live it day by day. Democracy is the actual commingling of men in order that each shall have continuous access to the needs and wants of others. Democracy is not a form of government; the democratic soul is born within the group and then it develops its own forms.*

अशा प्रकारची या नवीन लोकसत्तेची कल्पना आहे. ही कल्पना अगदीं नवीन आहे. महायुद्ध संपल्यावर या बाईनें आपलें हें उत्कृष्ट पुस्तक प्रसिद्ध केलें. त्याच्यापूर्वी या कल्पनांचा उदय झाला असला तरी त्यांना विशेष महत्व आलें नव्हतें. संयुक्त संस्थानांत कांहीं कांहीं ठिकाणीं या कल्पनांना मूर्त स्वरूप देण्याचा प्रयत्न चालू आहे. पण हें नवीन तत्व पूर्णतः अमलांत आलेलें नाहीं.

**नवीन लोकसत्तेचें स्वरूपः**—या नवीन लोकसत्तेचें स्वरूप शेजारसंघानें व्यक्त होतें. प्रत्येक शहरांत किंवा गांवांत व खेड्यापाड्यांत असले अनेक संघ स्थापन झाले पाहिजेत. मधमाशांच्या पोवळ्याप्रमाणें संबंध देशभर या संघांचें जाळें पसरलें पाहिजे. प्रत्येक संघाचे सर्व शेजारीपाजारी मंडळी सभासद राहतील. अर्थात हा संघ १०–१५ मंडळींचाच नसतो. शहराचे पुष्कळसे निरनिराळे भाग पाडून प्रत्येक भागांत एकेक संघ स्थापन करावयाचा असतो. याचा विशेष हा कीं ही सर्व मंडळी साधारणपणें एकमेकांना ओळखतात. या शेजारसंघांना (Neighbourhood Groups) राजकारणाचा आधार असावा. एखादें वादविवाद मंडळ

* Ibid, Page 160.

स्थापन करून तेथें प्रत्येकानें भाषण करावें, आपापलीं मतें मांडावीं व काम आटोपतांच आपापल्या घरीं जावें, तशा प्रकारचा हा शेजारसंघ नसून नगर, प्रांतिक किंवा राष्ट्रीय राज्य-व्यवस्थेचा तो एक घटक मानला गेला पाहिजे.

"लोकांनीं निरनिराळे शेजारसंघ स्थापन करून आपली संघटना करावी. या संघातर्फे आपले दैनिक आयुष्य प्रगट करावें; त्या जीवनाच्या गरजा, इच्छा, महत्वाकांक्षा प्रत्येक संघानें सामुदायिक रीत्या प्रगट कराव्यात. त्या गरजांना राजकारणाचा आधार असावा. म्हणजे त्या इष्ट व सार्वत्रिक कल्याणाच्या ठरल्या तर अमलांत आणण्याचा प्रत्येक संघाला अधिकार असावा. सारांश, या शेजारसंघांना राज्यव्यवस्थेचे घटक म्हणून मान्यता मिळावी."

पण शेजारपणाची भावना उत्पन्न झाल्याखेरीज हे शेजारसंघ परिणामकारक ठरणार नाहींत. लोकांमध्यें स्वदेशप्रेम व ऐक्याची भावना उत्पन्न झाल्याखेरीज देशाला राष्ट्र ही संज्ञा प्राप्त होत नाहीं; व त्याचें राष्ट्रीय संघटन होऊं शकत नाहीं. त्याचप्रमाणें शेजारपणाची भावना उद्भवल्याशिवाय हे शेजारसंघ संघटितपणें व सुव्यवस्थितपणें चालूं शकणार नाहींत. ही शेजारभावना खालीं दिलेल्या पांच उपायांनीं जागृत होऊं शकते असें ही ग्रंथकर्त्री म्हणते.—

(१) शेजारच्या व नगराच्या प्रश्नांबद्दल चर्चा करण्यास सर्व शेजाऱ्यांची नियमित सभा भरविणें.

(२) या सभांमध्यें सत्यान्वेषणाच्या दृष्टीनें खरा खरा वादविवाद करणें.

(३) व्याख्यानें, व क्लब यांच्या योगानें कांहीं तरी एकत्र मिळून शिकणें. परस्पर संपर्कानें इतरांच्या अनुभवांचे भागीदार होणें.

(४) या शेजारसंघाच्या कार्यांत अधिकाधिक भाग घेणें.

(५) शेजार, नगर, प्रांत व राष्ट्र यांत परस्पर संबध उत्पन्न करणें

या उपायांनीं शेजारभावनेची उत्कटता व एकता उत्पन्न होईल. पण यापेक्षांहि अधिक महत्वाची उपयुक्तता या शेजारसंघाची आहे. "शेजारसंघटनेनें पुष्कळशा गोष्टी सिद्धीस जातात. त्यापैकीं महत्वाच्या म्हणजे—पक्षसंस्थेला अर्धचंद्र मिळणें, आपला दैनिक जीवनक्रम व गरजा यांचा सरकारशीं प्रत्यक्ष व अप्रतिहत संबंध स्थापन करणें, वर्गद्वेष व जातिमत्सर कमी होणें, जबाबदार नागरीक निर्माण करणें, व नवीन लोकसत्तेला शिस्त व अनुभवाची जोड देणें."*

पण सर्वांत महत्वाचा फायदा म्हणजे पक्षसंस्थांचा पूर्ण लोप होणें हा आहे. लोकसत्तेला पक्षसंस्थेची किती आवश्यकता असते याचें मागील एका प्रकरणांत विवेचन झालेंच आहे. पण सदरहू ग्रंथकर्त्रीच्या म्हणण्याप्रमाणें हे पक्षोपपक्ष खऱ्या लोकसत्तेच्या दृष्टीनें राष्ट्राला हितकर ठरत नाहीत. हे सर्व पक्ष आपापला कार्यक्रम अमलांत आणण्याचा प्रयत्न करतात. सर्व पक्षांमध्यें एकवाक्यता करून सर्वांच्या दृष्टीनें राष्ट्रहिताला जो कार्यक्रम पोषक ठरेल तो अमलांत आणण्याची हल्लींच्या लोकसत्तेंत सोय नाहीं. निरनिराळ्या पक्षांचें अस्तित्व हेंच याचें कारण आहे. यामुळें वेगवेगळ्या पक्षांमधला मतभेद कायम राहतो, राष्ट्रांतील निरनिराळ्या प्रकारच्या लोकांमधला मतभेद कायम राहतो, व कायम राहत गेल्यानें तो वाढतही जातो. म्हणून या मतभेदाला चिरस्थायी करणारे हे पक्ष राष्ट्रहिताला साधक न ठरतां बाधकच ठरतात

* Ibid, Page 217.

यांत नवल कोणतें ? तेव्हां त्या पक्षसंस्थेचें मूलतः निर्मूलन झालें पाहिजे व शेजारसंघ स्थापन केल्याखेरीज तें होणार नाहीं असें या बाईचें म्हणणें आहे.

तसेंच या शेजारसंघानें लोकांचे खरेखुरे पुढारी उदयास येतील. लोकसत्तेची व्यवस्था पुष्कळशा पुढाऱ्यांवांचून व्यवस्थितपणें चालूं शकत नाहीं. पण तेच पुढारी अप्रामाणिक, उथळ, अदूरदर्शी व स्वार्थी असले तर जनतेचें अहितच होत असतें. शेजारसंघांच्या स्थापनेनें पक्षसंस्थेबरोबरच अशा पुढाऱ्यांनाहि गचांडी मिळण्याचा संभव आहे. एवढेंच नव्हे तर या संघामुळें लोकांच्या कल्याणाची खरी कळकळ बाळगणारे मुत्सद्दी व व्यावहारिक पुढारी निपजतील. "हा पुढारी धिम्मेपणानें अवलोकन करणारा, उत्कृष्ट वक्ता व आपली संघ–भावना प्रामाणिकपणानेंच उत्कटतेनें प्रदर्शित करणारा पुढारी असतो. त्याचा प्रधान हेतु हा कीं आपल्या संघभावनेला राज्यकारभारांत मूर्त स्वरूप प्राप्त व्हावें."

ही संघ–भावना अमलांत आणण्यासाठीं शेजारसंघांच्या स्वाधीन राजकीय सत्ता असणें अवश्य आहे. ज्या योगें ही भावना अमलांत आणतां येईल अशा प्रकारची व्यवस्था अस्तित्वांत आली पाहिजे. तरच या संघांना महत्व प्राप्त होईल व त्यांच्या चळवळीला व कार्यक्रमाला खरेपणा येईल. ही सत्ता प्राप्त झाल्यावर हे सर्व संघ आपापलीं कामें लोकलबोर्ड व म्युनिसिपालिटया यांच्याप्रमाणें करूं लागतील. "आपण जें काय करतों तें सरकारसाठीं नव्हे किंवा सरकार जें काय करतें तें आपणाकरतां नव्हे. आपणच नेहमीं सरकाराचे हात, पाय, नव्हे डोकें व अंतःकरणसुद्धां असलें पाहिजे."* अशा प्रकारची मनोवृत्ति उत्पन्न होण्यासाठीं शेजारसंघाखेरीज दुसरें उत्कृष्ट साधन नाहीं.

या प्रकारचे केवळ शेजारसंघ स्थापूनच कार्यभाग व्हायचा नाहीं. शहरांतील सर्व शेजारसंघांनीं आपापले प्रतिनिधी निवडून ते शहरसंघांत पाठविले पाहिजेत. येथें पक्ष स्थापण्याचें कांहीं कारण नाहीं. शेजारसंघांत शेजारभावना उत्पन्न होऊन आपापला मतभेद बाजूस सारून सर्व लोक ज्याप्रमाणें अहमहमिकेनें, उत्साहानें व शेजारसंघाचें हित पाहण्याच्याच केवळ हेतूनें काम करतात, त्याचप्रमाणें या मूळसंघांनीं निवडून दिलेल्या प्रतिनिधींनींहि, आपलें एकमत करून, क्षुल्लक मतभेद विसरून, सामुदायिक एकमताशीं तद्रूप होऊन कार्य केलें पाहिजे. तसेंच प्रांतसंघांनीं व राष्ट्रीय संघानें किंवा कायदेमंडळानेंहि करावें. राष्ट्राच्या इमारतीचा शेजारसंघ हा पाया आहे; व राष्ट्रसंघ कळस आहे. ही प्रचंड इमारत बांधण्याच्या कामीं आपण सर्वांनीं हातभार लावला आहे अशी राष्ट्रांतील सर्व लोकांची भावना झाली पाहिजे.

We do not begin with a unified state which delegates authority; we begin with the neighbourhood group and create the state ourselves. Thus the state is built up through the intertwining of all.¶

अशा प्रकारचें या नवीन लोकसत्तेचें स्वरूप आहे. ही लोकसत्ता म्हणजे बहुसंख्यांकांचा राज्यकारभार नाहीं. यांत पक्षसंस्था नाहीं व लुच्च्या पुढाऱ्यांनाहि विशेष वाव नाहीं. विचारविनिमय करून एकमत निर्माण करणें व त्याच्याशीं सर्वांनीं तद्रूप होऊन व इतर क्षुद्र

---

* Ibid, Page 238.

¶ Ibid, Page 255.

मतभेद विसरून जाऊन तें अमलांत आणावयास सर्वांनीं उत्साहानें झटणें हेंच या नवीन कल्पनेंतलें रहस्य आहे. सर्व स्त्रीपुरुषांना मताधिकार दिल्यानें लोकसत्तेच्या विस्ताराचें कार्य पुरें झालें आहे. आतां तेंच कार्य अधिक उत्कटतेनें व तद्रूपतेनें झालें पाहिजे. फॉलेट म्हणते—

The relation of neighbours to one another must be integrated into the substance of the state. Politics must take democracy from its external expression of representation to the expression of that inner meaning hidden in the intermingling of all men.

सारांश, परस्पर संपर्कानें व विचारविनिमयानें निर्माण होणारी एकभावना राज्यकारभारांत व्यक्त झाली पाहिजे हेंच लोकसत्तेचें मुख्य कार्य आहे. लोकसत्ताक राज्यकारभार केवळ बहुमताच्या व तडजोडीच्याच धोरणानें न चालतां सामुदायिक मतांत एकजिनसीपणा उत्पन्न झाला तरच ती खरी लोकसत्ता.

तसेंच धंदेसंघांनाहि महत्व देण्यांत यावें. त्यांचाहि राज्यकारभारांत कोठेंतरी समावेश व्हावा असेंही मत ग्रंथकर्त्रीनें प्रतिपादलें आहे. पण शेजारसंघ व धंदेसंघ या दोघांमध्यें आरंभींच कशीतरी एकवाक्यता होऊन मग त्यांचे प्रतिनिधी मध्यवर्ती कायदेमंडळांत जावेत असेंहि तिचें म्हणणें आहे.

**संघसत्ताक लोकशाहीचे गुणदोषः**—धंदेसंघ हेच राष्ट्राचे राजकीय घटक होऊन राज्यकारभाराचीं सर्व सूत्रें त्यांच्या हवालीं करावीं अशी धंदेसंघसत्तावाद्यांचीं (Syndicalists)ची मागणी आहे. फॉलेटनें या संघांना आपल्या नवीन लोकशाहींत स्थान दिलें असलें तरी तें फार महत्वाचें नाहीं. शेजारसंघ हे राजकीय घटक असावेत, हेंच तिनें जोरानें प्रतिपादलें आहे. धंदेसंघसत्तावादांत बरेच दोष आहेत. पैकीं कांहीं मुख्य असे—

(१) प्रत्येक नागरिकाचें जीवन बहुविध असतें. एखाद्या धंद्याचाच तो केवळ घटक नसतो. त्याला मुलें झालीं म्हणजे पिता या नात्यानें त्याचीं कांहीं कर्तव्यें असतात. धंद्याबद्दल विचार करतांना त्याचीं कांहीं निराळींच कर्तव्यें असतात. बाह्य परिस्थितीचा त्याच्या मनोविकासावर सदैव परिणाम होत असतो. त्याची जो काय उन्नति झाली असेल ती केवळ एखाद्या धंद्याचा घटक म्हणून नव्हे तर तो समाजाचा एक घटक असतो म्हणून. समाजांत प्रत्यही होणाऱ्या घटनांचा त्याच्या जीवनावर प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष परिणाम होत असतो. अशा स्थितींत समाजाचा घटक न मानून केवळ एखाद्या विशिष्ट धंदेसंघाचा सभासदच म्हणून त्याला राज्यकारभारांत भाग घेऊं देणें इष्ट नाहीं.

(२) दुसरें असें कीं एखाद्या धंद्याचा प्रतिनिधी म्हणून त्याची कायदेमंडळांत निवड झाली तर तो प्रथम आपल्या धंद्याच्या हितसंबंधाकडे लक्ष देईल हें स्वाभाविकच आहे तो कदाचित प्रथम डॉक्टर, शिक्षक, मजूर किंवा कारखानदार ठरून नंतर नागरीक म्हणून आपलें कर्तव्य करील. ही गोष्ट लोकशाहीला पूर्ण विरोधी आहे. प्रथम राष्ट्राचा घटक म्हणून तुम्हाला वागलें पाहिजे, एखाद्या धंद्याचा म्हणून नव्हे. प्रथम हिंदु, किंवा मुसलमान, किंवा शीख किंवा पारशी व नंतर हिंदी ही भावना उराशीं बाळगूं लागला म्हणजे हिंदी राष्ट्राचें हित होणें जसे अशक्य तद्वतच या धंदेसंघसत्तावादाची गोष्ट आहे. प्रत्येक मनुष्यानें प्रथम नागरीक म्हणून वागलें पाहिजे. नंतर हवें असल्यास त्यानें आपल्या मागें इतर उपाधी लावून घ्याव्यात. असें केलें तरच राष्ट्राचें खरें हित होईल.

या दृष्टीनें विचार केला तर धंदेसंघसत्तावाद हा लोकशाहीला पोषक नसून उलट बाधकच आहे असें दिसून येईल.

उलट शेजारसंघ हे राष्ट्रहिताला विघातक होत नाहींत. प्रत्येक माणूस नागरीक या दृष्टीनेंच विचार करून आपल्या शेजाऱ्याच्या सुखसोईकडे लक्ष देत असतो. एखादी गोष्ट एखाद्या शेजारसंघाच्या हिताची असते; पण इतर अनेक शेजारसंघामध्यें विचारविनिमय होऊन जें काम योग्य ठरेल तीच गोष्ट अमलांत येते. प्रत्येक शेजारसंघामध्यें सर्व प्रकारचे व दर्जाचे लोक असतात; मजूर, शेतकरी, शिक्षक, डॉक्टर, सावकार, वकील वगैरे. या सर्वांमध्यें वादविवादानंतर एखाद्या धोरणासंबंधानें एकवाक्यता व्हावयाची व नंतर तें धोरण, इतरांना बाधक नसल्यास, अमलांत यावयाचें

हल्लींच्या लोकशाहीचा विस्तार फारच वाढला आहे. बहुतेक लोकांना मतदानाचा अधिकार प्राप्त झाला असल्यानें लोकशाहीचें या दिशेनें होणाऱ्या विस्ताराचें कार्य जवळजवळ पूर्ण झालें आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. पण हा विस्तार जसजसा वाढत आहे तसतशी एखाद्या धोरणासंबंधानें एकवाक्यता होण्याचा संभवहि कमी कमी होत चालला आहे, ही गोष्ट नाकबूल करण्यांत अर्थ नाहीं. ह्मणजे, दिवसेंदिवस लोकसत्ता हा बहुसंख्यांकांचा राज्यकारभार आहे ही गोष्ट अधिकाधिक स्पष्ट होत आहे. लोकशाहीच्या दृष्टीनें हा प्रकार अत्यंत घातुक आहे. लोकसत्ता याचा अर्थ लोकांच्या संमतीनें, लोकांनींच चालविलेला राज्यकारभार असा आहे. बहुसंख्याकांचा राज्यकारभार ह्मणजे कांहीं लोकसत्ता नव्हे. परस्परविनिमयानें जी एकसूत्रता उत्पन्न होते तिचें प्रतिबिंब हुबेहूब राज्यकारभारांत उमटलें पाहिजे, तरच ती लोकसत्ता. फॉलेटच्या लोकसत्तेच्या कल्पनेंत विचारविनिमयानें उत्पन्न झालेल्या एकवाक्यतेला सर्वांत जास्त महत्व दिलें आहे. परस्परांच्या योगानें चाललेल्या व परस्परांशीं तद्रूप झालेल्या अखिल जनतेचा राज्यकारभार ह्मणजेंच लोकसत्ता असें तिचें ह्मणणें आहे, व तें योग्यच आहे असें कोण ह्मणणार नाहीं ? ही एकवाक्यता शेजारसंघान्वयें उत्पन्न होण्याचा संभव जास्त आहे यांतही संशय नाहीं.

शिवाय, शेजारसंघाच्या स्थापनेमुळें आणखीहि एक फायदा होण्यासारखा आहे. सामान्यतः असें दिसून येते कीं मोठमोठ्या मतदारसंघांत लोकांना एकमेकाबद्दल फारच थोडी माहिती असते. शहरांतला एखादा माणूस निवडणुकीच्या वेळी उमेदवार उभा राहिला तर खेड्यापाड्यांतील लोकांना त्याच्याबद्दल कितीशी माहिती असणार ? याचा परिणाम असा होतो कीं प्रतिनिधी आणि मतदार यांच्यामध्यें अधिकाधिक फारकत होऊन प्रतिनिधी आपल्या कर्तव्याविषयीं उदासीन, बेफिकीर होतात. ही गोष्ट लोकसत्तेच्या यशस्वितेला अत्यंत बाधक होते. उलट शेजार-संघ हे लहान लहान संघ असतात. लोकांना एकामेकाबद्दल माहिती असते. अमूक पुढारी प्रामाणिक का लुच्चा, व्यवहारकुशल का केवळ ध्येयवादी, गंभीर का उथळ हें संघांतील लोकांना सामान्यतः माहित असतें. यामुळें लायख पुढारी निवडून देण्याचें काम त्यांच्या हातून उत्कृष्ट होतें. मतदार कशा प्रकारचे प्रतिनिधी निवडून देतात यावरच लोकसत्तेचें यशापयश अवलंबून असतें. लोकसत्तेची हीच खरी कसोटी आहे. शेजारसंघामुळें हें निवडणुकीचें कार्य अधिक उत्साहानें होऊन मतदार योग्य पुढारी निवडून देतील अशी आशा बाळगण्यास हरकत नाहीं.

तिसरें, मनुष्याचा असा स्वभाव आहे कीं तो लहान लहान समुदायामध्येंच अनेक प्रकारें प्रगट होत असतो. प्रचंड समुदायापुढें व्याख्यान देण्याची पुष्कळांना भीति वाटते, पण थोड्या

लोकांसमोर आपले विचार मांडण्यास ते मुळींच कचरत नाहींत. लहान लहान संघांमध्यें विचारविनिमयहि चांगला होतो. वादविवादांत आपण जिंकावें हा तेथें मुख्य हेतु नसून कोणती गोष्ट सर्वांच्या हिताची होईल ही गोष्ट समजण्याकडे सर्वांची प्रवृत्ति असते. कांहीं लोक आपल्या ठराविक क्षेत्रांत जास्त मनमोकळेपणानें वागतात. त्यांच्यावर इतर ठिकाणीं जाण्याचा प्रसंग आला तर ते अत्यंत मुग्ध व शांत असतात. तसेंच लहान लहान क्षेत्रांत त्यांना अधिक उत्साहानें काम करावेसें वाटतें. व तेथें त्यांना वाव मिळतांच त्यांची कर्तबगारी चांगलीच प्रत्ययास येते. असा हा सामान्य मनुष्याचा स्वभाव असल्यानें लहान लहान शेजारसंघांतर्फे लोक अधिक अहमहमिकेनें कार्य करून दाखवितील असें वाटतें. लॉर्ड ब्राइसनेंहि आपल्या "मॉडर्न डेमोक्रसीज" या पुस्तकांत असाच निर्वाळा दिला आहे. "The Social nature of man functions best in small communities." अल्पसंख्य समाजांतच मनुष्याचा स्वभाव उत्कटतेनें प्रगट होत असतो. म्हणून पुढील राज्यव्यवस्थेंत शेजारसंघ हाच राजकारणाचा घटक असावा हें मत निःसंदेह विचारणीय आहे.

शेजारसंघसत्तेच्या तत्वाची अंमलबजावणी झाल्यास खरी एकजिनसी लोकसत्ता स्थापन होईल, व योग्य पुढाऱ्यांची निवड होईल व लोक अधिक उत्साहानें आपापली कर्तव्यें करीत राहतील असें या शेजारसंघाच्या पुरस्कर्त्यांचें मत आहे. तात्विक दृष्टचा विचार केला तर या सर्व गोष्टी तर्कशुद्ध वाटतात. पण तर्कशुद्ध गोष्टी नेहमींच व्यवहार्य असतात असें नाहीं.

अव्यवहारता हाच आमच्या मतें या नवीन कल्पनेतील मुख्य दोष आहे. लहान लहान समाजांमध्यें उत्कटतेनें प्रगट होण्याचा मनुष्यस्वभाव आहे ही गोष्ट अक्षरशः खरी मानली तरी मनुष्य एकंदर स्वार्थी व राज्यकारभाराविषयी उदासीन असतो हाहि निष्कर्ष लॉर्ड ब्राइसनें आपल्या वरील ग्रंथांत काढला आहे. राजांच्या पाशवी जुलुमांना कंटाळूनच लोक सामान्यतः राजकारणांत पडूं लागले ही गोष्ट राष्ट्रीयतेच्या ऐतिहासिक उदयाचा विचार करतां दिसून येते. अजूनसुद्धां लोकांची साधारणतः राजकारणापासून अलिप्त राहण्याची प्रवृत्ति दिसून येते. निवडणुकीच्या वेळीं समाजांत एकप्रकारची खळबळ उडून जाते, निवडणुकीच्या दिवशीं सुट्टीहि असते, मतदानाच्या ठिकाणीं जाण्यासाठीं मोटारी तयार असतात, पुष्कळसे स्वार्थानें प्रेरित झालेले असतात, पुष्कळांकडे कधीं न येणारे मोठमोठे लोक येऊन अमुक प्रकारें मत देण्याचा आग्रह करून जातात, पुष्कळांनीं लांचलुचपतही खाल्लेली असते, पुष्कळांना जत्रेप्रमाणें हा दिवस वाटतो—हा एवढा सर्व सरंजाम असल्यानंतरही शेकडा ६०—७० लोक आपापली मतें देण्यास बाहेर पडतात. उरलेल्या शेंकडा ३०—४० लोकांनीं घरीं कां बसावें? तसेंच, तीन वर्षांतून एकदां मत देऊन टाकण्यापलीकडे मतदार अधिक काय करतात? आपल्या मतदारसंघांतून निवडून दिलेला प्रतिनिधी कायदेमंडळांत कसा वागतो याकडे त्यांचें लक्ष बिलकूल नसतें. मतदारांचें संघटन करून तें अधिक बोलकें व प्रभावशील करण्याची वहिवाट फारच थोड्या देशांत प्रचलित असलेली दृष्टीस पडते. एखाद्या कायद्यासंबंधानें मतदारांचें काय मत आहे हें पाहण्याचा प्रयत्न मतदारसंघाकडून तर होत नाहींच पण त्याचा प्रतिनिधी सुद्धां त्याबाबत पूर्ण उदासीन असतो ही गोष्ट वारंवार प्रत्ययास येते. सारांश, लोक एकंदरीत राज्यकारभाराविषयीं उदासीन असतात. जेथें स्वार्थ साधण्याची मात्र संधी असते तेथें ते पराकाष्ठेची धडपड करतात.

या उदासीनतेचें मुख्य कारण हें कीं राजकारणांत भाग घेण्यास आवश्यक असलेलें ज्ञान सामान्य लोकांच्या संग्रहीं नसतें. दुसरें, ते आपापल्या उद्योगधंद्यांत गुन्तलेले असल्यानें या

अवान्तर गोष्टींत हात घालण्यास त्यांना पुरेशी सवड नसते. कांहीं अतिशय सुशिक्षित लोकांना तर राजकारणाविषयीं तिटकाराच वाटतो. अगदींच सामान्य लोकांत मिसळणें, प्रतिनिधी निवडून येण्यास पाण्यासारखा पैसा व वेळ फुकट घालविणें, मतदारांची हांजी हांजी करणें, वेळप्रसंगीं आपल्या आवडत्या तत्वांनाहि बाजूला सारणें वगैरे राजकारणांतल्या अटकळी अशा लोकांना साधत नाहींत. जे अगदीं गरीब असतात त्यांच्यापुढचा मुख्य प्रश्न म्हणजे पोटापाण्याचा. या धांदलींत सदैव गुन्तले असतांना त्यांना इतर बाबींकडे लक्ष देणें जवळ जवळ अशक्यच असतें अशी ही एकंदर मतदारांची स्थिति आहे. तेव्हां अशा परिस्थितींत शेजारसंघ हाच नवीन लोकसत्तेचा पाया बनवून मतदारांकडून अधिकाधिक कार्य करवून घेण्याची योजना व्हावी तशी सफल व्हायची नाहीं असें आम्हाला वाटतें. नित्यपरिचयाचें उदाहरणच घेतलें तरी ही गोष्ट सिद्ध होते. एखाद्या संस्थेच्या कारभारांत कितीसे लोक प्रत्यक्ष भाग घेतात ? संस्थेच्या सभेच्या प्रसंगी कितीसे सभासद हजर राहतात ? व उत्साहानें वादविवादांत भाग घेतात ? बहुधा या संस्थांची सर्व सूत्रें चार दोन उत्साही माणसांकडेच असतात. त्यांच्यामुळेंच संस्थेचा कारभार चालतो. हाच नियम शेजारसंघांनाहि लावण्याला कोणतीच हरकत नाहीं. तत्वत: विचार केला तर शेजारसंघसत्तेची कल्पना जशी नाविन्यपूर्ण तशीच नवीन लोकसत्तेंत परिणामकारक ठरेल असें वाटूं लागतें. कदाचित् आरंभीं आरंभीं ती यशस्वी होत आहे असेंहि वाटूं लागेल. पण सर्वसामान्य लोकांचें सदासर्वकाळ सर्व लक्ष राजकारणांत लागेल ही कल्पना केवळ ध्येयात्मकच ठरेल, ती व्यवहार्य ठरणार नाहीं.

सारांश, अव्यवहारता हाच मुख्य दोष या नवीन कल्पनेंत दिसून येतों. देशासंबंधाची आपापलीं कर्तव्यें सर्वच नागरीक पाळूं लागले तर हां हां म्हणतां समाजाची सर्वांगीण उन्नति होईल. राजानें आपला राज्यकारभार प्रजेवर आपल्या मुलाप्रमाणें प्रेम करून चालविला असता तर लोकसत्ताक कल्पनांचा इतक्या लवकर उदयहि झाला नसता. लोकसत्तेंतहि सर्व मतदारांनीं आपापलीं कर्तव्यें केलीं असतीं तर या राज्यपद्धतीला कोणीहि नांवें ठेवलीं नसतीं व ती व्यवस्थितपणें चालली असती. मग लोकशाहीच्या नवीन नवीन कल्पनांना कदाचित् चालनाहि मिळाली नसती. पण मुख्य अडचण ही कीं सामान्यत: राष्ट्राचे घटक या नात्यानें लोक आपापलीं कर्तव्यें करीत नाहींत, ते स्वार्थी व उदासीन असतात, तितका त्यांना वेळहि नसतो व आवश्यक असलेलें ज्ञानहि त्यांना नसतें. म्हणूनच अल्पसंख्य हुशार, मुत्सद्दी, प्रामाणिक व लोकप्रिय पुढाऱ्यांच्या कार्यप्रवण शक्तीची लोकसत्तेला नेहमीं आवश्यकता असते.

सामान्य मतदारांची ही प्रवृत्ति असल्यानें शेजारसंघसत्ताक लोकशाहींतही हल्लीं ज्या-प्रकारचे पक्ष दृष्टीस पडतात व ज्या प्रकारचे पुढारी निर्माण होतात त्याच प्रकारचे पक्ष व पुढारीहि पुढें येतील. शेजारसंघाची पुरस्कर्ती या पक्षस्थापनेच्या पूर्ण विरुद्ध आहे. त्यामुळें देशांत तीव्र मतभेद उत्पन्न होऊन सार्वजनिक एकमत तयार होणें अगदीं अशक्य असतें, व असें झालें तर लोकसत्ता बहुसंख्याकांचाच राज्यकारभार ठरतो—सर्व लोकांचा नाहीं, असें तिचें म्हणणें आहे. पण हे शेजारसंघ स्थापन झाले तरी हे पक्षोपपक्ष उदयास येतील असें आम्हाला वाटतें. मतदारसंघांत जर भेद उत्पन्न होतात तर शेजारसंघांत ते होणार नाहींतच असें म्हणणें धाष्टर्याचें होईल. विशेषत: मनुष्यस्वभावांतले दोष लक्षांत घेतां या संघांतही ते दिसूं लागतील असें वाटतें. त्याचप्रमाणें हल्लीं जसे पुढारी आपणांस दिसतात त्यापेक्षां कांहीं निराळ्या प्रकारचे पुढारी शेजारसंघाच्या स्थापनेंत पुढें येतील असा आत्मविश्वास वाटून घेण्याचेंहि कारण नाहीं.

व्यवहारतेच्या दृष्टीनें विचार करावयाचा तर असें म्हणतां येईल कीं प्रत्येक राज्यघटना किंवा राज्यपद्धती जितकी सुलभ, सुटसुटीत व कमी लोकांच्या सल्ल्यानें चालणारी तितकी ती अधिक कार्यक्षम व यशस्वी ठरेल. अखिल जनतेच्या अव्याहत, निरपेक्ष व सतत स्वार्थत्यागावर किंवा मदतीवर किंवा सहकार्यावरच चालू राहणारी राज्यपद्धती अखेर अयशस्वी ठरल्यावांचून राहणार नाहीं. विद्यमान लोकसत्तेच्या व्यवस्थेंत एकप्रकारें समतोलपणा आला आहे. राज्य-कारभाराच्या गरजा व सामान्य जनतेची तयारी, कार्यतत्परता व सहकार्य या दोन्ही गोष्टींचा तींत समन्वय साधला आहे. या समन्वयामुळेंच लोकाशाहीला स्थैर्य आलें आहे व तें वाढतच जाण्याचा संभव आहे. फॉलेटनें प्रतिपादलेल्या नवीन लोकसत्ताक व्यवस्थेंत हा समतोलपणा राहणार नाहीं अशी भीति वाटते. दैनिक राज्यकारभाराच्या गरजा तींत पुष्कळच वाढल्या असून त्या पुरविण्यास आवश्यक असलेली मदत, सहकार्य व स्वार्थत्याग जनतेकडून सदैव होणें अशक्य आहे. म्हणून शेजारसंघाची कल्पना नाविन्यपूर्ण व लोकसत्तेला पूर्णतेच्या मार्गाला नेणारी असली तरी ती यशस्वीपणें चालवून दाखविण्याइतकी लोकांची तयारी व उत्सुकता नसते असें म्हणावें लागतें. कदाचित् लहान लहानशा देशांत, अल्पप्रमाणांत, अनेक प्रयोगानंतर ती यशस्वी होईल. संयुक्तसंस्थानांत असे प्रयत्न चालू आहेत. तरी तेथें या शेजारसंघांना (Neighbourhood Groups) राजकारणाचा दर्जा प्राप्त झालेला नाहीं, ते राजकीय घटक आहेत अशी मान्यता मिळालेली नाहीं. त्याच्या अभावीं या संघाकडून जी थोडीफार कामगिरी व्हावयाची तीहि धडपणें होत नाहीं. निदान थोड्या प्रमाणांत हा नवीन प्रयोग करून पाहण्या-इतकी ही कल्पना मनोहर आहे यांत संशय नाहीं. चारदोन प्रयोग यशस्वी ठरल्यावर या उपक्रमाची विस्तृतपणें अंमलबजावणी करावयास हरकत नाहीं. अर्थात् आम्हांला या बाबतीत शंका आहे हें सांगणें नकोच.

प्रकरण १६ वें.

# लोकसत्तेचें भवितव्य

## समारोप

However grave the indictment that may be brought against democracy, its friend can answer, " what better alternative do you offer ? "

—*Lord Bryce*
(Modern Democracies)

मागील चार प्रकरणांत चार ध्येयांचें लोकशाहीच्या दृष्टीनें विवेचन झालें. प्रत्येक ध्येयाचा थोडथोडा परिणाम लोकसत्तेवर होण्याचा संभव आहे.

त्यांतल्या त्यांत लोकसत्तेच्या गंगेंत समाजसत्तावादाचा प्रतिदिन वाढणारा प्रवाह अनिवार्य ठरेल अशीं लक्षणें दिसत आहेत. याचें कारण एवढेंच कीं लोकसत्ता ह्मणजे बहुसंख्याक लोकांचा राज्यकारभार ही खुळी कल्पना व्यवहारांत खरी ठरूं पहात आहे. " एक माणूस, एक मत " या तत्वाप्रमाणें आतां जास्तजास्त लोकांना मताधिकार प्राप्त होत आहे. व राष्ट्रांत जर कोणत्या वर्गांत जास्त लोक असतील तर ते मजूर व कनिष्ट वर्गांतच. तेव्हां हळूहळूं सर्व सत्ता याच लोकांच्या ताब्यांत जाऊन तिचा उपयोग ते समाजसत्तेच्या स्थापनेंत करतील यांत आश्चर्य नाहीं

ह्मणूनच पुष्कळसे तत्ववेत्ते लोकसत्तेच्याहि विरुद्ध उठले आहेत. आपल्या " Decline of the West " या पुस्तकांत ऑसवॉल्ड स्पेंगलर यानें असा अभिप्राय दिला आहे कीं या विसाव्या शतकांत सीझरसारखाच अचाट पराक्रमाचा पुरुष उदयास येऊन तो आपली एकसत्ता स्थापन करील. जगप्रसिद्ध इंग्रज तत्ववेत्ता डीन इंज यानेंहि लोकसत्तेबद्दल साशंकता व्यक्त केली असून असें मत दिलें आहे कीं सार्वत्रिक मतदानानें सबंध समाज मजूरांच्या ताब्यांत जातो. व हे मजूर शहाणे म्हणून राज्यकारभार पहात नाहींत, तर त्यांची संख्या समाजांत सर्वांत जास्त असते म्हणून. अशा प्रकारच्या राज्यपद्धतींत सरकार न्यायप्रिय तर असूं शकत नाहींच, पण तें शहाणपणानेंहि वागत नाहीं. पुढें तो म्हणतो, पोपट व माकड यांच्या दीर्घकालीन राज्यकारभारानंतर आपल्यावर राज्य करण्यास एखादा गरूडपक्षी आला तर पुष्कळ लोक त्याचा सत्कारच करतील.

" After a long regime of parrots and monkeys, most people would be glad to welcome an eagle."

याच कारणास्तव बरेचसे लोक एकसत्तेचे पुरस्कर्ते बनले आहेत. लोकसत्तेच्या संकटकालांत तात्पुरती एकसत्ता स्थापन केली तर ती राष्ट्रोद्धारकच ठरेल, असें दाखविण्याचा मागील प्रकरणांत प्रयत्न केलाच आहे. तेथेंच लोकसत्तेचे दोषहि दाखविले आहेत. एकसत्तेचें रूपांतर राजसत्तेंत होण्याचा संभव कसा असतो हें दिसून आल्यावर या वादाचा वास्तविक कोणी पुरस्कार करूं नये. या संबंधानें डीन इंज यानेंहि एक शंका प्रदर्शित केली आहे. तो ह्मणतो,

Among others, there is the difficulty of getting rid of the strong man when he is no longer strong.

या म्हणण्यानेंहि आमच्याच मताला पुष्टी मिळते. बर्नार्ड शॉनें खालील मनोरंजक विधान करून लोकसत्तेची कुचेष्टाच केली आहे –

Now politicians who spend monday in making promises, tuesday in breaking them and wednesday in being found out, are re-elected by enthusiastic majorities on saturday.

यावरून आजकालचे राजकीय पुढारी, त्यांचीं अभिवचनें, त्यांना परत निवडून देणारे मतदार कशा प्रकारचे असतात याची थोडीशी तरी कल्पना होते.

एक गोष्ट मात्र लक्ष्यांत ठेवण्याजोगी आहे. लोकसत्तेला विरोध करणारे लोक बहुतकरून तत्ववेत्त्यांमध्येंच किंवा केवळ तात्विक विचार करणाऱ्यांमध्येंच जास्त सांपडतात. याचें कारण कदाचित् असें असूं शकेल की लोकसत्ताक राज्यकारभारांत केवळ तत्ववेत्त्यांना पुढें येण्याची फारच थोडी संधी असते. ज्या राज्यव्यवस्थेंत त्यांच्या हातीं सत्ता नाहीं ती त्यांना कशी आवडावी? अर्थात हा स्वार्थैक दृष्टीनें विचार झाला. दुसरें असें की तत्ववेत्ते हे बहुधा तत्वज्ञान प्रतिपादणारेच असतात. तितकेच ते व्यवहारकुशल असते तर लोकशाहीला एवढा विरोध करते ना आपल्या विरोधाबरोबरच त्यांनी राज्यपद्धतीची दुसरी एखादी व्यवहार्य कल्पना सुचविली असती तर त्यांची टीका अधिक विधायक ठरली असती व तिचा मुत्सद्यांनीं अधिक काळजीपूर्वक विचार केला असता.

लोकसत्तेंत दोष नाहींत, असें नाहीं. पण राजसत्ता व एकसत्ता यापेक्षां लोकसत्ताक राज्यपद्धति कमी संकटप्रद व कमी जोखमीची आहे. तींत राष्ट्राची प्रगति कदाचित भराभर होणार नाहीं. पण ती सावकाशपणें होईल व निश्चयपूर्वक होईल. तिचा कारभार अधिक खर्चाचा असेल, पण तो खर्च लोकासाठींच होतो, लोकच त्या खर्चाचे वाटेकरी असतात. राजसत्तेंत कदाचित हा खर्च कमी होईल, कदाचित फारही; पण जो काय होईल त्याचा फायदा एकाच राजाला अधिक मिळावयाचा. लोकसत्तेंत कदाचित लांचलुचपतीचे प्रकार पहावयास सांपडतील, पण एकतंत्री राजाच्या कारभारांत तर ते याहीपेक्षां जास्त प्रमाणांत पहावयास सांपडतात. अगदीं निःपक्षतेनें विचार केला तर असें ह्मणावें लागेल कीं एकसत्ता व राजसत्ता यांचे गुणदोष लक्ष्यांत घेतां लोकसत्ताच बरी.

जगाची उन्नति राजसत्तेपेक्षां लोकसत्तेंतच जास्त झाली आहे हें कोणालाहि कबूल करावें लागेल. हल्लींच्या संस्कृतीचा दर्जा लोकसत्तेंत निर्माण झालेल्या अनुकूल परिस्थितीमुळेंच इतका वाढला आहे. अर्थात तींत कांहीं दोष असतील. ते कालान्तरानें दूर होतील अशी

आपण आशा करूं या. पण लोकसत्तेच्या विरुद्ध इतके लवकर प्रबळ विचारसरणी उत्पन्न होण्याचें कारण नाहीं. लोकसत्ता हें आर्वाचीन तत्व आहे. त्याचा उदय अगोदर झाला असला तरी १९व्या शतकांतच त्याची वाढ झाली व या विसाव्या शतकांत तें स्थिर झालें आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. हें तत्व चांगलें का वाईट हें इतके लवकर ठरविणें इष्ट नाहीं, तसें करणें अनैतिहासिक होईल. इतिहासाच्या आरंभापासून तों आत्ताआत्तापर्यंत, कांहीं ठिकाणचे अपवाद सोडून दिलेत तर, राजसत्तेचा अंमल अखंडित चालू होता व ती टाकाऊ ठरली आहे हें आतां पूर्ण निदर्शनास आलें आहे. लोकांना, तसेंच राष्ट्रांना ती अधिक अहितकर ठरली नसती तर राजसत्तेचें उच्चाटन झालेंच नसतें. यावरूनच राजसत्ता टाकाऊ ठरली आहे हें सिद्ध होतें. तें सक्रिय सिद्ध करावयास कितीक तरी शतकें लागलीं ? मग लोकसत्ता टाकाऊ आहे हें ठरविण्याची इतकी घाई कां ? हें आपण ठरविण्याचें कारण नाहीं, इतिहासच तें ठरवील व ठरवीतहि आहे क्वचित ठिकाणीं एकसत्ता यशस्वी झालेली पाहून तीच सर्वत्र सुरू व्हावी हें विधान करणें जसें अविवेकाचें तसेंच अनैतिहासिक आहे.

लोकशाहीच्या क्षुल्लक दोषांकडे दुर्लक्ष करणें हेंच अखेरीस हिताचें ठरेल. लोकशाहीवर विश्वास ठेऊन तिचे दोष दूर करण्यांतच शहाणपणा आहे. पांचामुखी परमेश्वर हें एक अबाधित सत्य आहे. लोकशाहीचे दोष ठळकपणें दिसूं लागतांच राजकारणी लोकांनीं ते बुद्धचा नाहींसे केले नाहींत तर शेवटीं जनताजनार्दन जागृत होऊन ते दूर करील. धर्माची ग्लानी होतांच परमेश्वर जसा अवतार घेऊन धर्माची पुन्हां संस्थापना करतो तद्वतच कांहीं स्वार्थी पुढाऱ्यांमुळें लोकशाहीला अवनत दशा प्राप्त झाली तरी वेळ येतांच जनताजनार्दन पुढें सरसाविल्याशिवाय राहणार नाही. जनतेनें कैक शतकांपर्यंत युद्ध करून, नानाप्रकारचे अनन्वित जुलूम सहन करून, पराकाष्ठेचा स्वार्थत्याग दाखवून, मी मी म्हणणाऱ्या अतुल पराक्रमी राजांना जमीनीवर लोळविले आहे, तें पुन्हा राजसत्ता स्थापन होऊं देण्यासाठीं नव्हे. अखिल जनता एकदांची खडबडून जागी झाली तर तिच्यापुढें अखेरपर्यन्त टिकाव धरून राहणारी जगांत कोणतीहि शक्ति नाहीं ही गोष्ट इतिहासानें सिद्ध केली आहे. म्हणून ही लोकसत्तेची प्रबळ पण गंभीर गंगा, भयंकर संकटांचा रखरखीत उन्हाळा सतत पडू लागला तरी, अखंड व अप्रतिहत वाहत राहील अशी आमची पूर्ण खात्री आहे; कारण जननिश्चयाच्या हिमाच्छादित हिमालयाचा तिला भरपूर आधार आहे. राजसत्ता किंवा एकसत्ता व लोकहित हें सतत परस्परपोषक राहूं शकत नाहीं. शेवटीं तें परस्परविरोधी ठरणारच. लोकसत्ता व लोकहित हेच जगाच्या अंतापर्यंत परस्परपूरक ठरतील. गंगेचें पाणी जसें कोठें उथळ तर कोठें खोल असतें तद्वतच लोकसत्तेवर मधून मधून संकटें येऊन तिचें रूपांतर क्वचित एकसत्तेंत तर क्वचित राजसत्तेंतहि होण्याचा संभव आहे पण अखेर गंगा जशी सागरास जाऊन मिळते तशी लोकसत्तेची गंगा लोककल्याणाच्या समुद्राला मिळालीच पाहिजे. लोकसत्तेच्या अंतिम यशाबद्दल कोणालाहि शका घेण्याचें कारण नाहीं. मधून मधून कदाचित तिला धक्के बसतील, निरनिराळ्या ध्येयवादांचा तिच्या जीवनक्रमावर परिणाम होईल. पण जगांतून तिचें कायमचें उच्चाटन होईल हें मात्र संभवत नाहीं.

मागील प्रकरणांत वर्णिलेल्या चार ध्येयांपैकीं समाजसत्तावादाचा लोकसत्तेवर सर्वात जास्त परिणाम होण्याचा संभव आहे. समुद्राच्या प्रचंड लाटेप्रमाणें समाजसत्तावादाचें आक्रमण अनिवार्य आहे अशीं आज लक्षणें दिसत आहेत. समाजसत्ताक राज्यपद्धति आपलें कार्य करून गेल्यावर तिच्या विरुद्ध एक प्रतिक्रिया उत्पन्न होईल. राष्ट्रीय सरकारास सर्वसामर्थ्यवान, सर्वसंग्राहक व सर्वव्यापक करणें किती धोक्याचें व एकंदर जगाच्या अकल्याणाचें आहे याची

खात्री समाजसत्तेचा अंमल चालू झाल्यावांचून लोकांना व्हावयाची नाहीं. कित्येकदां लो प्रयोगानेंच एखादी गोष्ट शिकत असतात. तिच्या दोषांबद्दल कितीहि आरडाओरड केली तर ते त्यांना पटावयाचे नाहींत. समाजसत्तावादाच्या विरुद्ध प्रतिक्रिया सुरू होतांच व्यक्तिवादाकं लोकांची धांव जाईल असें अनुमान काढण्यास हरकत नाहीं. या ध्येयाचा लोकसत्ताक राज्य पद्धतीवर जितका अधिक परिणाम होईल तितका चांगला असें आम्हाला वाटतें. त्याचीं कारणे मागें दिलींच आहेत. पण तूर्त तरी व्यक्तिवादाला फारसें पाठबळ असलेलें दिसत नाहीं.

शेजारसंघसत्तावाद व एकसत्तावाद या दोघांचाहि मधून मधून लोकसत्तेवर परिणाम हो असलेला दिसून येईल.

पण लोकसत्ता एकंदरींत चिरस्थायी होणार याबद्दल शंका नाहीं. तींत दोष असले तरी तिच्या तोडीची दुसरी राज्यव्यवस्था नाहीं असेंच म्हणावें लागतें. राज्यव्यवस्थेच्या शास्त्रां दुसऱ्या क्रांतिकारक तत्वांचें संशोधन होण्याचा संभव कमीच. एका राजानें राज्यकारभा पहावा किंवा तो लोकांनीं चालवावा याशिवाय दुसरें कोणतें नवीन तत्व पुढें निघावयाचं राहिलें आहे ! समाजसत्ता, व्यक्तित्ववाद, शेजारसंघसत्ता हीं सर्व तत्वें लोकसत्तेंत कमीअधि प्रमाणांत अनुस्यूत आहेत. तीं सगळीं लोकसत्तेंत जमा होतात. राजसत्ता, एकसत्ता व लोकसत्ता या तीन प्रकारच्या राज्यपद्धती शेवटीं उरल्या. पैकीं एकसत्ता लोकसत्तेच्या कालां एकसमयावच्छेदेंकरून मधून मधून चालू होण्याचा संभव असून राजसत्तेला केव्हांचीच मूठमाती मिळाली आहे.

लोकसत्ता हा जनतेचा निसर्गसिद्ध हक्क आहे. प्रत्येक राष्ट्र या हक्काच्या साफल्यासाठी हवा तो स्वार्थत्याग करण्यास तयार आहे.

आमचीही इच्छा हीच कीं लोकसत्तेचा जय होवो.

समाप्त